# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०३/२००९** **दिनांक ०८.०३.२००९**

**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक ०८ मार्च, २००९ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-२४१५-२००९, दि.२८.०२.२००९ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक०८.०३ २००९ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा.अध्यक्ष श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष, |
| ०३. | मा.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील | ०४. | मा.श्री.पांडुरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०६. | मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव |
| ०७. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे | ०८. | मा.श्री.समि खतिब |
| ०९. | मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर | १०. | कॅप्टन सुरेश वासुदेवा |
| ११. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर | १२. | डॉ.पी.एल.तिवारी |
| १३. | मा.सौ.सुमित्रा कैलास कोते | | |

मा.श्री.किशोर रा. मोरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११(२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा.अध्यक्ष, श्री.जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सभेचे सुरुवातीस व्यवस्थापन समितीचे सदस्य मा.ना.श्री.राधाकृष्ण एकनाथराव विखेपाटील यांची शालेय शिक्षण आणि विधी व न्याय विभागाचे कॅबिनेट मंत्री म्हणून महाराष्ट्र राज्याचे मंत्री मंडळात नियुक्ती झाली त्याबद्दल त्यांचा मा.श्री.शंकरराव गेणुजी कोल्हे,उपाध्यक्ष,व मा.श्री.पांडुरंग गमाजी अभंग यांचे हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येऊन सभेने त्यांचे हार्दीक अभिनंदन केले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक व मा.श्री.कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डेय यांनी दूरध्वनीवरुन कळविले त्याची नोंद घेण्यात येऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.

**विषय नं.०१ दिनांक ०८.०२.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१७०** दिनांक ०८.०२.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली-

**०१ निर्णय क्र.७५ (१२) मधील शेवटचा परिच्छेद-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या सेवानिवृत्त होत असलेले कर्मचारी श्री.प्रल्हाद गंगाधर शेळके, पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी त्यांना मुदतवाढ मिळावी, असा विनंती अर्ज केलेला आहे. सध्या पाणीपुरवठा विभागाकडे साठवण तलावावर फिल्टर प्लॅन्ट, नवीन पाईप लाईन इ. महत्वाची कामे प्रस्तावित असून श्री. शेळके यांना त्याची संपूर्ण माहिती असल्याने त्यांना तुर्त सहा महिने कालावधीसाठी रु.१०,०००/-या एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या सेवानिवृत्त होत असलेले कर्मचारी श्री.प्रल्हाद गंगाधर शेळके, पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी त्यांना मुदतवाढ मिळावी, असा विनंती अर्ज केलेला आहे. सध्या पाणीपुरवठा विभागाकडे साठवण तलावावर फिल्टर प्लॅन्ट, नवीन पाईप लाईन इ. महत्वाची कामे प्रस्तावित असून श्री. शेळके यांना त्याची संपूर्ण माहिती असल्याने त्यांना तुर्त सहा महिने कालावधीसाठी **रु.१५,०००/-या** एकत्रित वेतनावर कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**०२ निर्णय क्र.८४ मधील खालील परिच्छेद-**

**(ब)** संस्थान मधिल सर्व विभागाकडील आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण, डेडस्टॉक, कंझुमेबल स्टॉक, अचानक रोख रक्कम तपासणी अशा एकूणच कामकाजासाठी प्रशासना अंतर्गत पुरेशा तज्ञ व कुशल मनुष्यबळा अभावी सन २००५-०६ पासून सक्षम संस्थेची नेमणूक करण्यात येते. सन २००८-०९ या आर्थिक वर्षाकरीता मे.शास्त्री पुरोहित ॲण्ड असो.चार्टर्ड अकौटंट, पुणे यांची एकूण

मानधन वार्षिक रू.१,७५,०००/-(अक्षरी एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) या एकत्रीत मानधानावर नेमणूक करण्यात आली असून त्यांचे काम समाधानकारक आहे. तसेच वैधानिक लेखा परिक्षण दोष-दुरुस्ती अहवाल तयार करणे कामी त्यांचे मार्गदर्शन घेण्यात आले आहे.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

**(ब)** संस्थान मधिल सर्व विभागाकडील आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण, डेडस्टॉक, कंझुमेबल स्टॉक, अचानक रोख रक्कम तपासणी अशा एकूणच कामकाजासाठी प्रशासनाअंतर्गत पुरेशा तज्ञ व कुशल मनुष्यबळा अभावी सन २००५-०६ पासून सक्षम संस्थेची नेमणूक करण्यात येते. लेखा परिक्षकांनी केलेल्या लेखी विनंतीनुसार सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरीता मे.अभय ए. शास्त्री ॲण्ड असोसिएट चार्टर्ड अकौटंट, पुणे यांची एकुण मानधन वार्षिक रू.१,७५,०००/-(अक्षरी एक लाख पंच्याहत्तर हजार मात्र) या एकत्रीत मानधनावर नेमणूक करण्यात यावी. (कार्यवाही-मुख्यलेखाधिकारी)

**०३ निर्णय क्र.१३२ मधील शेवटच परिच्छेद-**

मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांनी या मशिनची किंमत रक्कम रुपये १,८०,०००/- इतकी कळविली असून त्यातील विविध होलच्या चाळणीचे प्रकारापैकी आपणाला आवश्यक असणा-या ३ टाईपच्या चाळण्यासाठी रुपये ३०,०००/- असे एकुण रुपये २,१०,०००/- इतकी मशिनची किंमत सर्व टॅक्सेसह कळविली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला, त्यास मान्यता देण्यात आली.

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.**

मे.साई इंजिनिअर्स, नाशिक यांनी या मशिनची किंमत रक्कम रुपये १,८०,०००/- इतकी कळविली असून, त्यातील विविध होलच्या चाळणीचे प्रकारापैकी आपणाला आवश्यक असणा-या ३ टाईपच्या चाळण्यासाठी रुपये ३०,०००/- असे एकुण रुपये २,१०,०००/- इतकी मशिनची किंमत सर्व टॅक्सेसह कळविली असून, सदरची मशिन मे.साई इंजिनिअर्स,नाशिक यांचेकडून खरेदीस अथवा देणगीदाराकडून देणगी म्हणून स्विकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.०२ दिनांक ०६.०२.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या सल्लागार समिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.१७१** दिनांक ०६.०२.२००९ रोजी शिर्डी येथे झालेल्या सल्लागार समिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या,त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

०१. शिर्डी येथे येणाऱ्या भक्तांची गर्दी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. सदर गर्दीवर नियंत्रण रहावे याकरीता मा.जिल्हाधिकारी यांनी तिरुपती देवास्थानप्रमाणे दर्शनाची व्यवस्था करता येईल किंवा कसे याबाबत त्यांनी संगणक प्रणाली तयार केलेला आहे. सदरचा आराखडा अंतिम केल्यानंतर बाहेरील देशातून/राज्यातून येणाऱ्या भक्तांना शिर्डीत आल्यावर कोणत्या वेळेस श्रीसाईंचे दर्शन / आरती याचा लाभ घेता येईल याबाबत माहिती होईल. सदरची संगणक प्रणाली अंतिम झाल्यानंतर संस्थानने याबाबत निर्णय घ्यावा. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी )

०२. शिर्डी येथे वाहतूकीमूळे होणारी कोंडी दुर करणेसाठी शिर्डी राहाता बायपासचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बी.ओ.टी. तत्वावर सुरु करण्यात आलेले आहे. परंतू सदर बायपासचे काम सध्या रखडलेले आहे. याकरीता मा.जिल्हाधिकारी यांनी पहाणी करुन सदरचे बायपासचे काम लवकरात लवकर पूर्ण करणेबाबत कार्यवाही करावी. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०३. शिर्डी येथे रस्त्यावर होणारी वाहनांची कोंडी सोडविणेसाठी शिर्डी शहराचे बाहेर दोन ते तीन किलोमिटर अंतरावर वाहनतळ तयार करण्यात यावे. याकामी पहाणी करुन जागा निश्चित करण्यात यावी. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०४. शिर्डी विकास योजनेतील आरक्षित भू-खंडापैकी काही जागांचा विकास करण्यात आला असून काही जागा विकसित करणे बाकी आहे. अशा जागा श्री साईबाबा संस्थानकडे वर्ग करुन त्याचा संस्थानमार्फत विकास करण्यात यावा. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०५. अहमदनगर-मनमाड रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम गेली सहा महिन्यापासून बंद आहे. याबाबत मुख्य अभियंता,रस्ते विकास महामंडळ यांनी आपला अहवाल सादर करावा. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०६. शिर्डी येथील एस.टी.स्टॅण्ड विकसित करणेबाबत निर्णय झालेला आहे. या बस स्टॅण्ड विकसित होईपर्यन्त संस्थानने श्री लोढा यांची खरेदी केलेल्या जागेवर एस.टी.बसेसची थांबण्याची तात्पूरती व्यवस्था करावी. त्यासाठी सिंचन चारी क्र.१२ बंदीस्त करुन रस्ता रुंदीकरण करणेसाठी पाटबंधारे विभागाने संस्थानला परवानगी द्यावी. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०७. शेती महामंडळाची १७०० एकर जमिन संस्थानला मिळाल्यास त्या जमीनीवर संस्थानचे विविध विकास प्रकल्प कार्यान्वीत होतील. याकरीता सदरची जमीन संस्थानला मिळणेकामी मा.जिल्हाधिकारी यांनी प्रयत्न करावे. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०८. श्री साईबाबा संस्थानने शिर्डी येथील जिल्हा परिषद शाळेसाठी नवीन अद्यावत इमारतीचे बांधकाम करुन दिलेले आहे. तेथिल अतिरिक्त वर्ग खोल्यांमध्ये संस्थानच्या कनिष्ठ महाविद्यलयाचे वर्ग भरविण्यात येत आहेत. संस्थानतर्फे कनिष्ठ महाविद्यालयासाठी पर्यायी व्यवस्था होईपर्यंत सदर वर्ग जिल्हा परिषद शाळा इमारतीत भरविण्यात यावेत,असें मा.अध्यक्ष यांनी सांगितले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

०९. शिर्डी नगरपंचायतीने शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांचे वाहनांवर पथ कर आकारण्यास सुरुवात केली होती. परंतू त्या वाहनांवर पथकर आकारु नये याकरीता संस्थानने शिर्डी नगरपंचायतीस दरमहा ठराविक रक्कम दिलेली आहे. परंतू यापूढे शिर्डी नगरपालिकेस संस्थानने किती रक्कम द्यावी याबाबत शिर्डीत दररोज येणाऱ्या वाहनांचा सर्व्हे करुन किती रक्कम होते याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी,पोलिस निरिक्षक, पी.डब्लू.डी यांनी एकत्रित आपला अहवाल एक महिन्याचे आत सादर करावा. तसेच सदरहू रकमेला शासनाची मान्यता घेणेकामी पाठपुरावा करणेत यावा.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

१०. शिर्डी पोलिस स्टेशनकरीता शासनाने एक पेट्रोलपंप दिलेला आहे. परंतू तो गेली ४-५ वर्षापासून बंद आहे. सदरचा पेट्रोल पंप पोलिस स्टेशन सुरु करणार नसेल तर तो संस्थानकडे वर्ग करण्यात यावा.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

११. शिर्डी पोलिस स्टेशनकडे कर्मचारी निवासस्थाने अपूरी असल्याने आवश्यक निवासस्थाने संस्थानमार्फत शासकीय जागेत बांधकाम करुन देणेबाबतचा प्रस्ताव शिर्डी पोलिस स्टेशनने सादर करावा.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

१२. शिर्डी शहराकरीता पोलिस कर्मचारी कमी पडतात त्यांची संख्या वाढविणेबाबत प्रस्ताव शासनाकडे सादर करावा. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

१३. शिर्डी शहरातील रस्त्यावरील वाहनांचे अडथळे दुर करणेसाठी सध्या एक क्रेन संस्थानमार्फत भाड्याने देण्यात येत आहे. याकामी संस्थानमार्फत अद्ययावत क्रेन विकत घेऊन त्या शिर्डी पोलिस स्टेशनकडे वर्ग कराव्यात व त्याची दुरुस्ती व देखभाल शिर्डी पोलिस स्टेशन यांनी करावी. याबाबत शिर्डी पोलिस स्टेशन यांनी प्रस्ताव संस्थानकडे सादर करावा. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

१४. मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं.१९५ मधिल संस्थानचे हेलीपॅडकडे जाणारा रस्ता अरुंद असल्याने तेथील चारी क्र.११ बंदीस्त करुन रस्ता रुंदीकरणासाठी पाटबंधारे विभागाने संस्थानला परवानगी द्यावी.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.०३ नोंद घेण्याचे विषय.**

**०१ (अ) जमा खर्च तक्ता जानेवारी,२००९**

**(ब) माहे जानेवारी,२००९ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे जानेवारी,२००९ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे जानेवारी,२००९ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र.१७२** (A) माहे जानेवारी,२००९ मधील जमा रु २४,०६,०२,९४३.६० आणि खर्च रुपये १२,२६,६९,३१९.०४ चा तक्ता, मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर रक्कम रुपये २५ हजार पर्यंतच्या सर्वसाधारण खर्चाचा तपशील जानेवारी,२००९ रुपये २,६३,०१४.०० चा तक्ता, दिनांक २८.२.२००९ अखेर संस्थानची गुंतवणूक रुपये ३,३६,५४,४७,६६६.०० चा तक्ता, माहे जानेवारी,२००९ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या सोने चांदी, कापड व इतर वस्तूसह आलेल्या एकूण रुपये ९,७६,३०,५७५.०० देणगीचा तक्ता, माहे जानेवारी,२००९ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा विक्रीचा रुपये २,१८,१२३.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. श्री साईबाबा रुग्णालयात माहे जानेवारी,२००९ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. १७२** (B) श्री साईबाबा रुग्णालयात माहे जानेवारी,२००९ मध्ये वैद्यकीय बीलांमध्ये रुपये १०,९८,३३७.०० देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०३. साईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी,२००९ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. १७२** (C) श्रीसाईबाबा रुग्णालयामध्ये माहे जानेवारी,२००९ मध्ये रुपये ७२,४२,४४२.०० देण्यात आलेल्या अनुदान तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०४. श्रीसाईनाथ रुग्णालय माहे जानेवारी,२००९ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. १७२** (D) साईनाथ रुग्णालयात माहे जानेवारी,२००९ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना अंतररुग्ण रुपये ७४,१३२.०० बाह्य रुग्ण रुपये ४७,८९४.००.०० थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये ५५,१५०.०० वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतीची माहिती दर्शविणाऱ्या तक्त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०५. माहे जानेवारी,२००९ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. १७२** (E) जानेवारी,२००९ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या ४०,४९० कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. १७२** (F) बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता "अ" व "ब" यांच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेणेत येऊन, "ब" तक्त्यातील श्रीसाईबाबा हॉस्पिटलकरीता पार्कीग शेड उभारणे कामाकरिता झालेल्या रक्कम रुपये १,४४,६८४/- मात्रचे जादा खर्चासह अंतिम बिल रक्कम रुपये १२,९७,६२०/- मात्र ठेकेदार श्री.मिलींद एस.पाचोरकर,काकासाहेबनगर,ता.निफाड यांना,आदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवालाची नोंद घेऊन मान्यता देणे.**

**निर्णय क्र. १७२** (G) माहे जानेवारी,२००९ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०४ साई आश्रम प्रकल्प परिसर विकास कामासाठी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.१७३** मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई व श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर आहे. सदर प्रकल्पाचे परिसर विकास कामांसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२७/०७/२००७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६४३ अन्वये रुपये २०,४३,७२,४००.०० मात्रचे खर्चास मंजुरी घेण्यात आली आहे. त्यानुसार आर्किटेक्ट व कन्सलटंट यांचेकडून सदर कामाचे अंदाजपत्रक स्पेशिफिकेशन, नकाशे व निविदा तयार करुन घेण्यात आल्या.

सदरकामी दोन वेळेस वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात देऊन ठेकेदार मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली यांची एकच सिलबंद निविदा प्राप्त झाली. मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/११/२००८ रोजीचे सभेत सदरहू कामासाठी एकच निविदा प्राप्त झाली असल्याने याकामी फेर निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले आहे. तसेच दि. २८/११/२००८ रोजी साई आश्रम प्रकल्प साईटवर साईभक्त श्री. के.व्ही. रमणी, मॅनेजींग ट्रस्टी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे समवेत प्रकल्प आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकी दरम्यान साईटवर श्री रमणी यांचेशी सदरचे टेंडर संदर्भात चर्चा करण्यात आली. याबाबत त्यांना कळविण्यात आले की, सदरकामाचे टेंडर हे दोन वेळेस मागवूनही त्यास फार कमी प्रतीसाद मिळाला. सदर बैठकीमध्ये उपरोक्त परिसर विकास कामाची निविदा तीन भागात विभागने बाबत चर्चा झाली जेणेकरुन जास्तीत जास्त प्रतिसाद मिळेल व संबंधित कामाची विशिष्ट नैपुण्य असलेले ठेकेदार येतील.

त्यानुसार सदर कामाचे आर्किटेक्ट मे.डी.ओ. निकम, पुणे व कन्सलटंट मे. डॉर्श कन्सल्ट इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडून सदर कामाच्या फेर निविदा, अंदाजपत्रक, स्पेशिफिकेशन व नकाशे तयार करुन घेण्यात आले आहेत. सदर परिसर विकास कामासाठी जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकरीता व सदरचे कामात नैपुण्य असलेले ठेकेदार येण्याचे दृष्टीने सदर कामाची निविदा ही खालीलप्रमाणे तिन भागात विभागण्यात आली आहे.

1. Tender for Construction of External Services (Civil work, Roads & Pathways, Pumbing & External Electrification work ) for Sai Ashram Project at Shirdi.
2. Tender for Construction of External Services (ESR, G.S.R. & Septic tank) for Sai Ashram project at Shirdi.

3. Installation & Commissioning of Substation work & D.G. sets for Sai Ashram Project at Shirdi.

त्यानुसार वरीलपैकी क्र. १ चे कामासाठी दि. ०२/०२/२००९ रोजीचे वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या निविदा विक्रीचा कालावधी हा दि. ०२/०२/२००९ ते दि. १२/०२/२००९ पर्यंत ठेवण्यात आला व सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि. २६/०२/२००९ पर्यंत मूदत देण्यात आली होती.

विहीत मूदतीत खालील तिन ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेऊन सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव |
|---|---|
| ०१ | पार्श्वनाथ डेव्हलपर्स, लि., नवि दिल्ली |
| ०२ | आय.व्ही.आर.सी.एल. इन्फ्रास्ट्रक्चर अॅण्ड प्रोजेक्टस् लि. पुणे |
| ०३ | शापोरजी पालोनजी अॅण्ड कंपनी, लि. नाशिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या असता, त्यांनी निविदेत खालीलप्रमाणे देकार दिलेले आहेत.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | Quoted % |
|---|---|---|
| ०१ | पार्श्वनाथ डेव्हलपर्स, लि., नवि दिल्ली | Civil 69 % above |
| | | Elect.54% above |
| ०२ | आय.व्ही.आर.सी.एल. इन्फ्रास्ट्रक्चर अॅण्ड प्रोजेक्टस् लि. पुणे | Civil 46.03 % above |
| | | Elect.46.03% above |
| ०३ | शापोरजी पालोनजी अॅण्ड कंपनी, लि. नाशिक | Civil 41.96 % above |
| | | Elect.35.96% above |

याबाबत निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी सभेपुढे बोलावणेत आले असता,उपरोक्त सर्व निविदासादरकर्त्यांनी वाटाघाटी करुन सुधारीत देकार देण्यासाठी अवधी मिळणेबाबत विनंती केली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निविदासादरकर्त्यांकडून सिलबंद पाकीटात सुधारित देकार घेण्यात यावेत व ते स्थानिक विश्वस्तांपुढे उघडणेत यावेत. स्थानिक विश्वस्तांनी त्याबाबत निविदा सादरकर्त्यांशी चर्चा/ वाटाघाटी करुन निर्णय घ्यावा,असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं. ०५ श्री साईनाथ रुग्णालयासाठी फर्निचर बनविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.१७४** याकामी दिलेल्या विहित मुदतीत एकही निविदा प्राप्त न झाल्याने उपरोक्त कामासाठी फेरनिविदा मागविण्यात याव्यात,असें ठरलें.

**विषय नं. ०६. श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान लॉण्ड्रीकरीता केमिकल्स/डिटर्जंट खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.१७५** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.१०.२००८ मधील निर्णय क्र.७९४ नुसार माहे जानेवारी २००९ ते माहे डिसेंबर २००९ या कालावधीसाठी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील लॉण्ड्रीकरीता आवश्यक असणारे खालीलप्रमाणे केमिकल्स/डिटर्जंट खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.४लाख पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | तपशिल | कंपनी | मागणी |
|---|---|---|---|
| ०१ | डिप पेनेट्रेटींग लॉण्ड्री कॉन्सट्रेट | हिंदुस्थान लिवर लिमीटेड | ७३० लिटर्स |
| | **किंवा** | | |
| ०२. | क्लॅक्स /नॉक्स १०० | जॉनसन डायव्हर्सी लिमीटेड | १४०० किलो |
| ०३. | बुस्ट/ नॉक्स बुस्ट | जॉनसन डायव्हर्सी लिमीटेड | २८०० किलो |
| ०४. | सोर (रिन्स)/नॉक्स सोर | जॉनसन डायव्हर्सी लिमीटेड | ७०० किलो |
| ०५. | ब्लिचींग लिक्वीड | जॉनसन डायव्हर्सी लिमीटेड | १२०० लिटर |

त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-साभनि/१७१६९/२००८ दि.२१.११.२००८ अन्वये दरपत्रकांची मागणी करणेत आलेली होती. प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव |
|---|---|
| ०१. | युनायटेड टेक्नॉलॉजिस्ट, पुणे |
| ०२. | केडिसन्स डिस्ट्रीब्युटर्स अॅण्ड स्टॉकीस्ट, पुणे |
| ०३. | मिनीकेम इंडस्ट्रीज, मुंबई |
| ०४. | विक्रांत एजन्सी, अहमदनगर |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन,त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | तपशिल-<br>निविदासादकर्ते | डिप पेनेट्रेटींग लॉण्ड्री कॉन्सट्रेट | क्लॅक्स /नॉक्स १०० | बुस्ट/ नॉक्स बुस्ट | सोर (रिन्स)/ नॉक्स सोर | ब्लिचींग लिक्वीड |
|---|---|---|---|---|---|---|
| | मागणी | ७३० लिटर्स | १४०० लिटर्स | २८०० किलो | ७०० किलो | १२०० लिटर्स |
| **०१.** | **युनायटेड टेक्नॉलॉजिस्ट, पुणे** | | | | | |
| | निविदेतील दर | -- | १५०.०० | ७५.०० | ८०.०० | ५०.०० |
| | देऊ केले दर | -- | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| **०२.** | **केडिसन्स डिस्ट्रीब्युटर्स ॲण्ड स्टॉकीस्ट, पुणे** | | | | | |
| | निविदेतील दर | -- | ९७.२० | ४६.५३ | ५४.४५ | ३६.६३ |
| | देऊ केले दर | -- | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| **०३.** | **मिनीकेम इंडस्ट्रीज, मुंबई** | | | | | |
| | निविदेतील दर | -- | ८८.०० | ४६.०० | ४८.०० | २२.०० |
| | देऊ केले दर | -- | ८८.०० | ४६.०० | ४८.०० | २२.०० |
| **०४.** | **विक्रांत एजन्सी, अहमदनगर** | | | | | |
| | निविदेतील दर | ५२०.०० | -- | -- | -- | -- |
| | देऊ केले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मिनीकेम इंडस्ट्रीज, मुंबई व मे.विक्रांत एजन्सी,अहमदनगर यांचे दर स्वीकारणेत येऊन, त्यांना विभागुन कार्यादेश देण्यात यावा, तसेच उपरोक्त लॉण्ड्री केमिकलची वेळोवेळी प्रयोगशाळेत तपासणी करण्यात यावी. तसेच मिनीकेम इंडस्ट्रीज चे नावात बदल होऊन, मिनीटेक झाले असल्याने त्यांना या नावाने पुरवठा आदेश देण्यात यावा,असें ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी/भक्तनिवासस्थान)

**विषय नं. ०७. शिर्डी येथील नवीन जिल्हा परिषद शाळेसाठी फर्निचर खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.१७६** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.११.२००६ मधील निर्णय क्र.८९१ नुसार जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडे हस्तांतरीत करावयाचे शाळा इमारतीत संस्थानतर्फे काही वाढीव सुविधा उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडेस जा.नं.११७० दि.२२.०१.२००७ अन्वये सादर करणेत आलेला होता. त्यास महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सा.सं.वि २००६/६०८/(८८)/का.सोळा, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ दि.१५ मे २००८ अन्वये मान्यता मिळालेली असल्याने बांधकाम विभागाने त्यांचे दि.१८.११.२००८ चे पत्राने शाळेसाठी खालीलप्रमाणे फर्निचर खरेदी करुन मागितलेले आहे.

| अ.नं. | तपशिल | वर्णन | मागणी |
|---|---|---|---|
| ०१ | संगणक खुर्च्या | हाताच्या,६५(W)x६५(D)x७५-८६(H) सेमी. | २०नग |
| ०२. | ऑफीस टेबल | १ साईडला ३ ड्रॉवर असलेला, ११९(L)x५९(D)x७४/७५(H) सेमी. | ४० नग |
| ०३. | स्टील कपाट | ६ फुटी, ५ कप्पे असलेले, ९१.५(W)x५०(D)x१९/२०(H) सेमी. | १० नग |
| ०४. | फायबर खुर्च्या | बिगर हाताच्या, (CHR४००१ ), निलकमल कंपनी | १०० नग |
| ०५. | फायबर खुर्च्या | हाताच्या, (CHR२०७१/ CHR२००५ ), निलकमल कंपनी | ४० नग |
| ०६. | सतरंज्या | १५ फुट x २० फुट | ४ नग |

त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-बांधकाम/१८७१४/२००८ दि.२२.१२.२००८ अन्वये दरपत्रकांची मागणी करणेत आलेली होती. प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव |
|---|---|
| ०१. | अमोल फर्निचर, सिन्नर |
| ०२. | साई एन्टरप्राईजेस, श्रीरामपूर |
| ०३. | रोहन एन्टरप्राईजेस, अहमदनगर |
| ०४. | प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर |
| ०५. | अरिहंत इंडस्ट्रीज, नाशिक |
| ०६. | सारडा इंटेरीअर, अहमदनगर |
| ०७. | आर.टी.कराचीवाला, अहमदनगर |
| ०८. | यशराज फर्निचर, शिरवळ ता.खंडाळा |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. फायबर खुर्च्या व सतरंज्या खरेदीकामी संबंधितांशी चर्चा/ वाटाघाटीसाठी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | संगणक खुर्च्या हाताच्या ६५ (W)x६५ (D) x ७५-८६(H)से.मी. | ऑफीस टेबल (एक साईडला ३ ड्रावर असलेला ११९ (L)x ५९ (D) x ७४/७५ (H) से.मी. | स्टील कपाट ६ फुटी ५ कप्पे असलेले ११५ (W) x ५० (D) x १९/२० (H) से.मी. | फायबर खुर्च्या बिगर हाताच्या (CHR ४००१) निलकमल कंपनी | फायबर खुर्च्या हाताच्या (CHR २०७१/ CHR २००५) निलकमल कंपनी | सतरंज्या १५x२०फुट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मागणी | २० नग | ४० नग | १० नग | १०० नग | ४० नग | ०४ नग |
| ०१. | अमोल फर्निचर, सिन्नर मुळ दर | १३००.०० | १६००.०० | ३९००.००<br>४९००.०० | ३२५.०० | २५५.००<br>३५५.०० | --- |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | --- | --- | --- | ३४०.०० | २५५.००<br>३५५.०० | --- |
| ०२. | साई एन्टरप्राईजेस, श्रीरामपूर - मुळ दर | २१००.०० | २१००.०० | ३९९१.०० | ३७०.०० | ४३८.०० | ४५००.०० |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | --- | --- | --- | ३८९.०० | ३०९.०० | ४५००. |
| ०३. | रोहन एन्टरप्राईजेस, अहमदनगर - मुळ दर | २०२५.००<br>३१३६.५० | ३७६८.७५<br>६३०६.७५ | १०४५४.६३ | ३७६.८७ | २९२.५०<br>३९९.३७ | ४४४३.७५ |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | --- | --- | --- | ३६०.०० | २७५.००<br>३८५.०० | ४२००.०० |
| ०४. | प्रगती इंडस्ट्रीज, संगमनेर- मुळ दर | १८९५.०० | २३५०.०० | ४८००.००<br>५९२५.०० | ५१५.०० | ४२५.००<br>५६५.०० | ३९००.०० |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०५. | अरिहंत इंडस्ट्रीज, नाशिक- मुळ दर | २०८१.२५ | २४१८.७५ | ६१८७.५० | ४२१.८७ | ३३७.५०<br>४६६.८७ | --- |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०६. | सारडा इंटेरीअर, अहमदनगर- मुळ दर | --- | --- | --- | --- | --- | ३६५०.०० |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०७. | आर.टी.कराचीवाला, अहमदनगर- मुळ दर | ३६५९०० | ७३६०.०० | १२१६०.०० | ४२७.०० | ४६५.०० | ४५००.०० |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |
| ०८. | यशराज फर्निचर,शिरवळ ता.खंडाळा- मुळ दर | २५००.०० | २१००.०० | ६५००.०० | ३९०.०० | ४३०.०० | ४३००.०० |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | --- | --- | --- | ३९०.०० | ४३०.०० | ४३००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,फायबर खुर्च्या खरेदीकामी अमोल फर्निचर, सिन्नर व सतरंज्या खरेदी कामी सारडा इंटेरिअर,अहमदनगर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच संगणकासाठी आवश्यक खुर्च्या, ऑफिस टेबल, स्टील कपाट या फर्निचरच्या कंपन्या नमुद न केल्यामुळे सदरहू फर्निचर खरेदीकामी गोदरेज, अरिहंत, स्टिलेज आदि नामांकित कंपन्यांकडून फेर कोटेशन्स मागविण्यात यावेत, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं. ०८.** **शिर्डी येथील नवीन जिल्हा परिषद शाळेसाठी संगणक संच खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.१७७** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २५/११/२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ८९१ नुसार जिल्हा परिषद शाळेसाठी संस्थानतर्फे काही वाढीव सुविधा उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे जा. नं. ११७०, दिनांक २२.०१.२००७ चे पत्रान्वये सादर करणेत आलेला आहे. या प्रस्तावामध्ये जि. प. शाळेस २० संगणक संच पुरविणेचा समावेश आहे. सदर निर्णयानुसार २० संगणक संच व २० खुर्च्या खरेदीसाठी अंदाजे रुपये ५,०७,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देण्यात आलेले आहे. त्यापैकी २० संगणक संच खरेदीची कार्यवाही सुरु करणेबाबत बांधकाम विभागाने वेळोवेळी माहिती तंत्रज्ञान विभागास कळविले आहे. त्यास अनुसरुन, माहिती तंत्रज्ञान विभागाचे दिनांक २७ डिसेंबर,२००८ रोजीची टिपणी व त्यावरील अभिप्रायानुसार नुसार नामांकित बहुराष्ट्रीय उत्पादित कंपन्यांकडून थेट दरपत्रके मागवून कंपनीकडूनच संगणके खरेदी करणेस मान्यता मिळणेसाठी टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर संगणके खरेदीची कार्यवाही ही वर्तमान पत्रांत जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागवून करणेबाबत अभिप्राय देण्यात आलेला आहे.

त्यास अनुसरुन, माहिती तंत्रज्ञान विभागाचे दिनांक २७ डिसेंबर,२००८ रोजीची टिपणी व त्यावरील अभिप्रायानुसार सिलबंद निविदा मागविणेसाठी जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करुन, सिलबंद निविदा संस्थानला करण्याची अंतीम मुदत २४ जानेवारी, २००९ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदर जाहिरात संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली होती.

त्यानुसार खालील पुरवठादारांनी निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | पार्टीचे नाव |
|---|---|
| 01. | Minitek Systems (I) Pvt. Ltd., Nashik |
| 02. | Ankit Computers, Mumbai |
| 03. | Pramod Enterprises, Thane |
| 04. | Reckon Technologies, Mumbai |
| 05. | Computer Shopee, Mumbai |
| 06. | Dynamic Solutions, Pune |
| 07. | Manendra Gode, Nashik |
| 08. | Guru Enterprises, Ahmednagar |
| 09. | Vishal Joshi, Nashik |
| 10. | Compulinks, Mumbai |
| 11. | Ace Brain Systems & Software Pvt. Ltd. Pune |
| 12. | S.K. International, Pune |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदांपैकी अ.नं. १० ते १२ च्या निविदा मुदतीनंतर प्राप्त झालेल्या असल्याने, त्यांचा विचार करता येणार नाही. तसेच अ.नं. ३ ते ४ च्या निविदा आवक विभागाकडून उघडलेल्या स्थितीत प्राप्त झालेल्या आहेत.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन,त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नाव | निविदेतील दर रु. | देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| 01. | Minitek Systems (I) Pvt. Ltd., Nashik | 7,48,592.00 | 6,30,000.00 |
| 02. | Ankit Computers, Mumbai | 9,25,600.00 | 8,75,000.00 |
| 03. | Pramod Enterprises, Thane | 5,82,400.00 | अनुपस्थित |
| 04. | Reckon Technologies, Mumbai | 5,20,000.00 | अनुपस्थित |
| 05. | Computer Shopee, Mumbai | 7,97,360.00 | अनुपस्थित |
| 06. | Dynamic Solutions, Pune | 6,80,000.00 | 6,40,000.00 |
| 07. | Manendra Gode, Nashik | 7,70,000.00 | अनुपस्थित |
| 08. | Guru Enterprises, Ahmednagar | 7,39,000.00 | 7,36,000.00 |
| 09. | Vishal Joshi, Nashik | 7,90,000.00 | अनुपस्थित |

यावर उपस्थित निविदासादरकर्ते यांचेंशी सविस्तर चर्चा होऊन, Minitek Systems (I) Pvt. Ltd., Nashik यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन,त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.०९ श्रीसाईबाबा कन्या विद्या मंदिरातील माहिती व तंत्रज्ञान प्रयोगशाळेसाठी संगणक संच व इतर संगणकीय साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा/दरपत्रके उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.१७८** **(अ)**मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३ जानेवारी, २००९ रोजीचे सभेत श्री साईबाबा कन्या विद्यामंदिरातील माहिती तंत्रज्ञान प्रयोगशाळेसाठी संगणक संच नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून दरपत्रके मागवून खरेदी करणेस तसेच इतर संगणकीय साहित्य संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन विविध पुरवठादारांकडून सिलबंद दरपत्रके मागवून खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन, संगणक संच खरेदी करणेसाठी संगणक क्षेत्रातील विविध नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांना पत्र पाठवून त्यांचेकडून दिनांक २७ जानेवारी, २००९ अखेर सिलबंद दरपत्रके मागविणेस तसेच इतर संगणकीय साहित्य खरेदी करणेकामी संस्थान वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन दिनांक २७ जानेवारी, २००९ अखेर दरपत्रके सादर करणेची अंतिम मुदत देण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन, सिलबंद दरपत्रके मागविणेसाठी जा.नं.एसएसएसटी-आयटी-५०१-२००९,दि.१२ जानेवारी,२००९ अन्वये संबंधीत कंपन्यांना पत्र देण्यात आलेले आहे. त्या अन्वये खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | कंपनीचे नाव |
|---|---|
| ०१. | DELL INDIA PVT. LTD., Bangalore-560 071. |
| ०२. | R.D. Data Systems, Nashik-422 001. |
| ०३. | Allied Digital Ltd. Mumbai |

उपरोक्त जा.नं.एसएसएसटी-आयटी-५०१-२००९,दि.१२ जानेवारी,२००९ नुसार पाठविण्यात आलेल्या पत्रांनुसार सदर कंपन्यांपैकी फक्त DELL INDIA PVT. LTD., Bangalore या एकाच

कंपनीची निविदा प्राप्त झालेली असून दोन निविदा पुरवठादारांच्या आहेत. निर्णयासाठी तीनही कंपन्यांच्या निविदा आवश्यक असल्याने व त्यापैकी एकाच कंपनीची निविदा प्राप्त झालेली असल्याने, सदर प्राप्त झालेल्या निविदा रद्द करुन संगणक संच खरेदीकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रांमध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात याव्यात, असे नम्र मत आहे.

**(ब)** कन्या शाळेतील प्रयोगशाळेकरीता संगणकीय साहित्य खरेदीकामी विविध पुरवठादारांकडून सिलबंद दरपत्रके मागविणेसाठी संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन सिलबंद दरपत्रक संस्थानला सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक २७ जानेवारी, २००९ अखेर ठेवण्यात आली होती. सदर जाहिरातीनुसार खालील दरपत्रकधारकांनी सिलबंद दरपत्रके संस्थानकडे सादर केली आहे.

**दरपत्रकधारकांचा तपशील पुढीलप्रमाणे-**

| अ.नं. | कंपनीचे नाव |
|---|---|
| 01. | Minitek Systems (I) Pvt. Ltd., Nashik |
| 02. | Transtech System, Pune |
| 03. | Manendra Gode, Nashik. |
| 04. | Vishal Joshi, Nashik. |
| 05. | Guru Enterprises, Ahmednagar. |
| 06. | Dynamic Solutions, Pune. |
| 07. | Compulinks, Mumbai. |
| 08. | S.K. International, Pune |

उपरोक्त प्राप्त झालेली सर्व दरपत्रके उघडून, त्याच सभेत बोलविण्यात आलेल्या सदर दरपत्रकधारकांशी चर्चा-तथा-वाटाघाटीअंती निर्णय घेण्यात यावा, तसेच **परिच्छेद अ** प्रमाणे संगणक संच खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा रद्द करुन जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रांमध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करुन पुन्हा विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविणेस व यासाठी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

त्याचप्रमाणे **परिच्छेद ब** प्रमाणे संगणकीय साहित्य खरेदीकामी प्राप्त झालेली दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन,त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कंपनीचे नाव | निविदेतील दर रु. | देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| 01. | Minitek Systems (I) Pvt. Ltd., Nashik | 1,92,418.00 | 1,72,000.00 |
| 02. | Transtech System, Pune | अपूर्ण | --- |
| 03. | Manendra Gode, Nashik. | 2,24,150.00 | अनुपस्थित |
| 04. | Vishal Joshi, Nashik. | 2,24,150.00 | अनुपस्थित |
| 05. | Guru Enterprises, Ahmednagar. | 1,76,200.00 | 1,76,200.00 |
| 06. | Dynamic Solutions, Pune. | 1,78,036.56 | 1,58,000.00 |
| 07. | Compulinks, Mumbai. | 3,97,570.00 | अनुपस्थित |
| 08. | S.K. International, Pune | 2,62,150.00 | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन,वरील परिशिष्ट "अ" साठी फेर निविदा न मागविता शिर्डी जिल्हा परिषद शाळेसाठी संगणक संचाच्या मान्य दराने व त्याच तांत्रिक तपशिलाप्रमाणे २५ संगणक संच खरेदी करणेस व त्यासाठी रक्कम रुपये ७,८७,५००/- चे खर्चास मान्यता देण्यात येऊन Minitek Systems(I)Pvt.Ltd.,Nashik यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. तसेच परिशिष्ट "ब" साठी वाटाघाटीअंती Dynamic Solutions, Pune.यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं. १०. मालवाहतूकीकरीता टाटा ४०७ वाहन खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.१७९** दि.२४.०५.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.४६६ अन्वये, संस्थानचे वाहन विभागाकडे उपलब्ध असलेली कार्यालयीन-०३, रूग्णवाहिका-०१ तसेच मालवाहतूक-०२ अशी ०६ वाहने बरीच जुनी असलेने त्यांचे दुरूस्ती व देखभालीवरील खर्च मोठया प्रमाणत होत असलेने त्यांची जाहीर लिलावाने विक्री करण्यात यावी असे ठरले. तसेच दोन मालवाहतुकी वाहनांचा जाहीर लिलावाने विक्री झालेनतर मालवाहतुकी करीता वाहने अपुरी पडणार असलेने एक टाटा ११०९ व एक टाटा ४०७ खरेदीस व या कामी अंदाजे रू.२० लाख मात्रचे खर्चा बाबतचे प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली होती.

सदर दोन मालवाहतुक वाहनांपैकी एक टाटा११०९ खरेदी करण्यात आलेला असून खरेदी करणे बाकी असलेला एक टाटा४०७ खरेदी करणे कामी टाटा कंपनीचे अधिकृत अधिकृत डिलर यांचेकडून

जा.नं.एसएसएस/वाहन/११२३/२००९ दि.२४.०१.२००९ ने खालील प्रमाणे कोटेशन्स बोलावण्यात आलेली आहेत.

| | **बोलाविण्यात आलेली कोटेशन** | **प्राप्त झालेली कोटेशन** |
|---|---|---|
| ०१. | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ०१. स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर |
| ०२. | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक. | ०२. स्टर्लिंग मोटर्स, नाशिक. |
| ०३. | मे.शुभयान मोटर्स प्रा.लि.,अहमदनगर. | ०३. मे.शुभयान मोटर्स प्रा.लि., अ.नगर |
| ०४. | सतिष मोटर्स प्रा.लि., औरंगाबाद | |

उपरोक्तप्रमाणे टाटा४०७ करीता प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत येऊन, कोटेशन सादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रु. | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | स्टर्लिंग मोटर्स, बाभळेश्वर | ५,५४,४२५.०० | ५,३३,३४५.०० |
| ०२ | स्टर्लिंग मोटर्स, नाशिक. | ५,५४,६५०.०० | अनुपस्थित |
| ०३ | मे.शुभयान मोटर्स प्रा.लि., अ.नगर | ५,७३,३८४.०० | ५,२९,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.शुभयान मोटर्स प्रा.लि., अ.नगर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.११** **श्रीसाई प्रसादालय इमारतीमध्ये जिन्यांना सुरक्षिततेकरिता ग्रील बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.१८०** श्रीसाई प्रसादालय इमारतीमध्ये जिन्यांना सुरक्षिततेकरीता ग्रील बसविणेकामी योग्य खर्चास तसेच हे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स/वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी निविदा मागविणेसाठी मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव दिनांक १७-०१-२००९ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या उपसमितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास तसेच निविदा मागविणेसाठी मान्यता मिळाली आहे. त्यानुसार बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉप धारकाना पत्र पाठवून कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०४ कोटेशन प्राप्त झाले आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०३ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०४ | मे. रुचा इंजिनिअरींग वर्क्स, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे श्रीसाई प्रसादालय इमारतीमध्ये जिन्यांना सुरक्षिततेकरीता ग्रील बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन ,त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर रु. |
|---|---|---|---|
| ०१ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता | ५,१८,७२६.०० | ५,०३,१६४.०० |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | ५,३१,९४५.०० | ५,०५,३४८.०० |
| ०३ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ५,८३,४२९.०० | ५,५४,२५८.०० |
| ०४ | मे. रुचा इंजिनिअरींग वर्क्स, मुंबई | ७,०२,६२९.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.१२** **श्रीसाई प्रसादालय इमारतीमध्ये हॉलमधील दरवाजांत ५ फुट उंचीचे दरवाजा कम ग्रील बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.१८१** श्रीसाई प्रसादालय इमारतीमध्ये हॉलमधील दरवाजांत ५ फूट उंचीचे दरवाजा कम ग्रील बसविणेकामी येणा-या योग्य खर्चास तसेच हे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी कोटेशन मागविणेसाठी मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव दि.१७-०१-२००९ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या उपसमितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास तसेच कोटेशन मागविणेसाठी मान्यता मिळाली आहे. त्यानुसार बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉप धारकाना पत्र पाठवून कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०४ कोटेशन प्राप्त झाले आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०३ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०४ | मे. रुचा इंजिनिअरींग वर्क्स, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे श्रीसाई प्रसादालय इमारतीमध्ये हॉलमधील दरवाजांत ५ फूट उंचीचे दरवाजा कम ग्रील बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन ,त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता | ४,४९,९५८.०० | ४,३६,४५९.०० |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | ४,७२,३३१.०० | ४,२९,८२१.०० |
| ०३ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ४,९८,३५२.०० | ४,७३,४३४.०० |
| ०४ | मे. रुचा इंजिनिअरींग वर्क्स, मुंबई | ५,८९,२०८.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश दण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.१३** **श्रीसाई प्रसादालय इमारतीमध्ये तळमाळयाला असणाऱ्या खिडक्यांना आतील बाजूस सुरक्षिततेकरिता लोखंडी ग्रील बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.१८२** श्रीसाई प्रसादालय इमारतीमध्ये तळमाळयाला असणा-या खिडक्यांना आतील बाजूस सुरक्षिततेकरीता लोखंडी ग्रील बसविणेबाबत येणा-या योग्य खर्चास तसेच हे काम बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉपधारकांकडून तयार करुन घेणेसाठी कोटेशन मागविणेसाठी मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव दिनांक १७-०१-२००९ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या उपसमितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास तसेच कोटेशन मागविणेसाठी मान्यता मिळाली आहे. त्यानुसार बाहेरील फॅब्रिकेटर्स / वर्कशॉप धारकाना पत्र पाठवून कोटेशन मागविण्यात आली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे ०४ कोटेशन प्राप्त झाले आहेत. कोटेशन तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता. |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक |
| ०३ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०४ | मे. रुचा इंजिनिअरींग वर्क्स, मुंबई |

उपरोक्तप्रमाणे श्रीसाई प्रसादालय इमारतीमध्ये तळमाळयाला असणा-या खिडक्यांना आतील बाजूस सुरक्षिततेकरीता लोखंडी ग्रील बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन ,त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | पार्टीचे नांव | निविदेतील दर | चर्चेअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.सुपर फॅब्रिकेशन ॲण्ड फर्निचर, साकुरी-राहाता | ४,३४,७९८.०० | ४,२१,७५४.०० |
| ०२ | मे.साई इंजिनिअर्स , अंबड, नाशिक | ४,७८,४०६.०० | ४,५४,४८६.०० |
| ०३ | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ४,९०,५९०.०० | ४,१७,००१.०० |
| ०४ | मे. रुचा इंजिनिअरींग वर्क्स, मुंबई | ६,००,०००.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश दण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख)

**विषय नं.१४** **संस्थानला सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी तसेच अकुशल, कुशल कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नवीन सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणे बाबत**

**निर्णय क्र.१८३** **(अ)** संस्थानला सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी सन-१९९१ पासून व माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी सन-२००६ पासून पुरविणेत येत आहे. सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानचे संबंधीत विभागांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार दैनंदिन कामासाठी ४४६ कंत्राटी कामगार पुरविणेत येतात. कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कामास घेण्यात येणाऱ्या कंत्राटी सिव्हीलीयन सुरक्षा गार्ड यांना किमान वेतन कायदयानुसार, शॉप ॲन्ड कर्माशियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ प्रमाणे किमान वेतन दर देण्यात येत आहे. तसेच सुरक्षा अधिकारी, सुरक्षा पर्यवेक्षक, सशस्त्र सुरक्षा रक्षक व माजी सैनिक सुरक्षा गार्ड यांना चर्चा/वाटाघाटीत ठरलेप्रमाणे वेतनदर देण्यात येत आहे.

मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून नेमणूक करणेत आलेली आहे. संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पीटल सुरक्षेकामी मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांची सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.१७-०८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून व मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) यांची साई मंदिर परिसर व महाद्वार सुरक्षेकामी सेवानिवृत्त/माजी सैनिकांमधून कंत्राटी पध्दतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी दि.११-८-२००७ पासून सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून नेमणूक करणेत आलेली आहे. सदर सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची वाढीव मुदत दि.३०-०४-२००९ अखेर संपत आहे.

सध्या मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि., मुंबई, मे ईगल आय एन्टरप्राईज, वापी (गुजरात) व मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे यांचेमार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या व निविदेत नमूद केलेल्या कंत्राटी सुरक्षा कर्मचारी संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | एजन्सीचे नांव | पुरविणेत येणारी सुरक्षा कंत्राटी कर्मचारी संख्या | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सुरक्षा अधिकारी | सुरक्षा पर्यवेक्षक | गणमॅन | व्यायामशाळा प्रशिक्षक | सुरक्षा गार्ड | एकूण |
| १. | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि. (मंदिर परिसर) | ०१ | ०३ | -- | -- | २०३ | २०७ |
| २. | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हिसेस प्रा.लि. (सा.भ.नि. व इतर परिसर) | ०१ | ०३ | ०१ | ०१ | ११६ | १२२ |
| ३. | मे.ईगल आय एन्टरप्राईज, (महाद्वार सिक्युरिटी) | ०१ | ०३ | ०७ | -- | ३४ | ४५ |
| ४. | मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हिसेस प्रा.लि.पुणे (श्री साईबाबा हॉस्पीटल सिक्युरिटी) | -- | ०३ | १८ | -- | ५१ | ७२ |
| | एकूण | ०३ | १२ | २६ | ०१ | ४०४ | ४४६ |

संस्थानला सुरक्षा कर्मचारी, माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची /कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविणेत आल्या होत्या सिलबंद निविदा विक्रीची मुदत दि.१९-०९-२००८ पासून ते दि.३०-०९-२००८ पर्यंत अशी होती. तसेच सिलबंद निविदा स्विकारणेची अंतीम मुदत दि.०१-१०-२००८ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून संस्थानचे कार्यालयास एकूण ३८ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहे. सदरच्या ३८ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१०-२००८ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करुन, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-११-२००८ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला. तसेच सदर दिवसी उपस्थित ३५ कंत्राटदारांशी /ठेकेदारांशी त्यांचे निविदेतील दरासंदर्भात चर्चा/वाटाघाटीचे वेळी त्यांनी निविदेत देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे? याबाबत माहिती (अंतिम सुधारीत दरपत्रक) लेखी स्वरुपात बंद पाकिटात दि.२०-११-२००८ अखेर संस्थानकडे सादर करावी. असे त्यांना सांगण्यात आले. तसेच ज्या ठेकेदारांची वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त आहे अशा ठेकेदारांचाच विचार करणेत यावा असे ठरले.

त्याप्रमाणे चर्चा/वाटाघाटीचे वेळी संबंधीत उपस्थित ३५ कंत्राटदरापैकी/ठेकेदारांपैकी ३३ कंत्राटदार/ ठेकेदरांनी देऊ केलेले अंतिम सुधारीत दर (बंद पाकिटे) प्राप्त झालेले असून ते उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करून, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३-०१-२००९ रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवून, ज्या सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्सची वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त असेल अशा निविदा सादर कर्त्यांना उपसमितीचे सभेपुढे समक्ष वाटाघाटीसाठी बोलावून अंतिम निर्णय घ्यावा. तसेच कॉन्ट्रक्टची मुदत ०१ वर्षे ऐवजी ०३ वर्षे करणेत यावी अशी चर्चा झालेली आहे. त्यास अनुसरून संबंधीत २० निविदा सादरकर्त्यांना मा.उपसमितीचे दि.१०-०१-२००९ रोजीचे सभेत चर्चा वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेत आले होते. त्याप्रमाणे एकूण २० निविदा सादर कर्त्यांपैकी १८ निविदा सादरकर्ते चर्चा वाटाघाटीचे वेळी उपस्थित राहून, त्यांनी अंतिम सुधारीत दर देवू केले आहे. त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत येवून, तो निर्णयासाठी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०१-२००९ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. त्यावर चर्चा होवून, उपस्थित सुरवातीचे दहा ठेकेदारांना मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेमध्ये चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेत यावे असे ठरले. सदर दहा ठेकदारांचा तुलनात्मक तक्ता मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८-०२-२००९ रोजीचे सभेमध्ये सादर करण्यात आला होता. त्यावर चर्चा होवून, सुरवातीचे पाच ठेकेदारांना पुढील सभेमध्ये चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविणेत यावे असे ठरले होते.

त्यानुसार खालील पाच ठेकेदारांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे अंतिम दर देऊ केले.

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी वेतनदर (रुपये) | | | | सुरक्षा गार्ड (पुरुष /स्त्री) सिव्हीलयन किमान वेतन दर १३१.९७ | सर्व्हिस चार्जेस (टक्केवारी) | वार्षिक उलाढाल (रुपये) | पोलिस कमिशनर लायसन्स प्रत आहे काय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संरक्षण अधिकारी (माजी सैनिक) | सुरक्षा परिवेक्षक (माजी सैनिक) | सशस्त्र सुरक्षा रक्षक (माजी सैनिक) | सुरक्षा गार्ड (माजी सैनिक) | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| ०१ | **मे.टॉप्स सिक्यूरिटी लि., मुंबई** | | | | | | | | |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निविदेतील दर रुपये | **१५०.००** | **१४६.००** | **२३०.००** | **१३९.००** | **१३९.००** | **१ %** | २०० कोटी सर्व्हीस टॅक्स १०.३०% | आहे २८.१२.२००७ |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | **१४६.२८** | **१४२.४४** | **१८४.५५** | **१३८.५९** | **१३८.५९** | **०.७५%** | | |
| ०२ | **मे.बॉम्बे इंटे.सिक्यू., (इंडिया)लि ,नाशिक** | | | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | **१३९.६६** | **१३५.८२** | **१८४.५५** | **१३१.९७** | **१३१.९७** | **०.७५%** | १८० टेी सर्व्हीस टॅक्स १०.३०% | आहे १४.१२.२००७ |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | **१४६.२८** | **१४२.४४** | **१८४.५५** | **१३८.५९** | **१३८.५९** | **०.७५%** | | |
| ०३ | **सेंट्रल इन्व्हेस्टीगेशन ॲण्ड सिक्यू,लि.,मुंबई** | | | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | **२५०.००** | **१७८.००** | **२२१.००** | **१३२.००** | **११५.००** | **१%** | ५७ कोटी सर्व्हीस टॅक्स १०.३०% | आहे १०.१०.२००७ |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | **२५०.००** | **१७८.००** | **२२१.००** | **१३२.००** | **११५.००** | **१%** | | |
| ०४ | **युनिक डेल्टा फोर्स सिक्यू.प्रा.लि., कासारवाडी** | | | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | **३५५.००** | **२६५.००** | **२३५.००** | **१९९.००** | **१३०.००** | **४%** | ५० कोटी सर्व्हीस टॅक्स १०.३०% | नाही |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | **३५५.००** | **२६५.००** | **२३५.००** | **१९९.००** | **१३०.००** | **४%** | | |
| ०५ | **ईगल हंडर सोल्यूशन लि.,अंधेरी,मुंबई** | | | | | | | | |
| | निविदेतील दर रुपये | **४००.००** | **२२०.००** | **२२८.००** | **१५०.००** | **११९.००** | **२.२५%** | ४१ कोटी सर्व्हीस टॅक्स १०.३०% | नाही |
| | चर्चेअंती देऊ केलेले दर | **४००.००** | **२२०.००** | **२२८.००** | **१५०.००** | **११९.००** | **२.२५%** | | |

यावर सविस्तर चर्चा होऊन,संस्थानला कंत्राटी पध्दतीने माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी व इतर सुरक्षा कामगार पुरविणेकामी खालील दोन ठेकेदारांची /एजन्सीची कंत्राटी सुरक्षा कर्मचारी पुरविण्याची क्षमता विचारात घेऊन, तसेच किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतूदीप्रमाणे किमान वेतनदरापेक्षा कमी दर अनुज्ञेय नसल्यामूळे सदरची बाब विचारात घेऊन सदर ठेकेदाराचे दर चर्चा /वाटाघाटीत ठरलेप्रमाणे प्रमाणे मान्य करण्यात यावे व त्यांना दिनांक २१.०३.२००९ पासून प्रथम एक वर्ष कालावधीसाठी सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात यावा. तसेच एक वर्ष कालावधी पूर्ण झालेनंतर सदर ठेकेदारांचे कामाचे मुल्यमापन करुन व त्यांची कार्यक्षमता विचारात घेऊन त्यांना पूढील दोन वर्षे मुदतवाढ देणेबाबत उचित निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.

**कंत्राटी सुरक्षा कर्मचारी -** संस्थानला कंत्राटी पध्दतीने माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी व इतर सुरक्षा कामगार पूरविणेकामी खालीलप्रमाणे दोन निविदा सादरकर्त्यांचे न्युनतम दर मान्य करण्यात आले.

**०१) मे टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड, गोरेगांव (पुर्व ),मुंबई**

**०२) मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि., नाशिक**

या निविदासादरकर्त्यांना -

| | | |
|---|---|---|
| अ) संरक्षण अधिकारी ( माजी सैनिक )- | रुपये १४६.२८ | प्रति दिन (किमान वेतनदराप्रमाणे) |
| ब) सुरक्षा सुपरवायझर ( माजी सैनिक )- | रुपये १४२.४४ | प्रति दिन (किमान वेतनदराप्रमाणे) |
| क) सशस्त्र सुरक्षा रक्षक( माजी सैनिक )- | रुपये १८४.५५ | प्रति दिन (वाटाघाटीत ठरलेप्रमाणे) |
| ड) सुरक्षा रक्षक ( माजी सैनिक )- | रुपये १३८.५९ | प्रति दिन (किमान वेतनदराप्रमाणे) |
| इ) सुरक्षा रक्षक (सिव्हीलियन) | रुपये १३८.५९ | प्रति दिन (किमान वेतनदराप्रमाणे) |

किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०३ ( तसेच मुंबई कार्यालयासाठी झोन नंबर ०१) प्रमाणे उपरोक्त संबधित कंत्राटी माजी सैनिक सुरक्षा कर्मचारी व इतर सुरक्षा कामगार यांना शासनाकडून वेळोवेळी जाहिर होणारे किमान वेतनदर निश्चित करण्यात आले आहे.

या दोन्हीही निविदासादरकर्त्यांना एकूण वेतनावर ०.७५% इतका सर्व्हीस चार्ज, अधिक संपूर्ण बिलाचे रकमेवर १०.३०% इतका सर्व्हीस टॅक्स अधिक प्रॉव्हीडंट फंड ( मालकाचा हिस्सा) प्रशासकीय चार्जेससह १३.६१% इतकी रक्कम अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शुरन्स पॉलिसी प्रिमियम (अंशदान) याप्रमाणे रक्कम देण्यात यावी.

किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतदीअंतर्गत शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०३ (तसेच मुंबई कार्यालयासाठी झोन नं.०१) प्रमाणे शासनाकडून वेळोवेळी जाहिर होणारे किमान वेतनदर, प्रा.फंड दर व सर्व्हीस टॅक्स दर यात वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार सुधारित दर लागू करण्याचे अधिकार मा.कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात येत आहे.

**(ब)** संस्थानला लेबर कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने अकुशल कामगार १९९४ पासून, कुशल कामगार सन-१९९९ पासून पुरविणेत येत आहे. सध्या लेबर कॉन्ट्रॅक्टर्स यांचेमार्फत संस्थानचे संबंधीत विभागांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार दैनंदिन कामासाठी ८१४ कंत्राटी कामगार पुरविणेत येतात. कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कामास घेण्यात येणाऱ्या कंत्राटी अकुशल, कुशल कामगारांना किमान वेतन कायदयानुसार, शॉप ॲन्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.३ प्रमाणे किमान वेतन दर देण्यात येत आहे.

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-११-२००७ पासून नेमणूक करणेत आलेली आहे. सदर लेबर कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/कराराची वाढीव मुदत दि.३०-०४-२००९ अखेर संपत आहे.

मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इंडिया) लि.,नाशिक यांचेमार्फत संस्थानला पुरविणेत येणाऱ्या व निविदेत नमूद केलेल्या अकुशल, कुशल कंत्राटी कामगार संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | एजन्सीचे नांव | पुरविणेत येणारी कंत्राटी कर्मचारी संख्या | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | अकुशल | कुशल | एकूण | |
| १. | मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे (मंदिर परिसर) | २६४ | ४४ | ३०८ | |
| २. | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि., नाशिक (सा.भ.नि. व इतर परिसर) | ४०३ | १०३ | ५०६ | |
| | एकूण (१+२) | ६६७ | १४७ | ८१४ | |

संस्थानला अकुशल, कुशल कामगार पुढील एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने पुरविणेसाठी नविन ठेकेदारांची /कॉन्ट्रॅक्टर्सची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस देवून, मान्यता प्राप्त ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविणेत आल्या होत्या सिलबंद निविदा विक्रीची मुदत दि.१९-०९-२००८ पासून ते दि.३०-०९-२००८ पर्यंत अशी होती. तसेच सिलबंद निविदा स्विकारणेची अंतीम मुदत दि.०१-१०-२००८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून संस्थानचे कार्यालयास एकूण ३० सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदरच्या ३० सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८-१०-२००८ रोजीचे सभेमध्ये उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करुन, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५-११-२००८ रोजीचे सभेपुढे विचारार्थ सादर करणेत आला होता. तसेच सदर दिवसी उपस्थित २७ कंत्राटदारांशी /ठेकेदारांशी त्यांचे निविदेतील दरासंदर्भात चर्चा/वाटाघाटीचे वेळी त्यांनी निविदेत देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे? याबाबत माहिती (अंतिम सुधारीत दरपत्रक) लेखी स्वरुपात बंद पाकिटात दि.२०-११-२००८ अखेर संस्थानकडे सादर करावी असे त्यांना सांगण्यात आले. तसेच ज्या ठेकेदारांची वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त आहे. अशा ठेकेदारांचाच विचार करणेत यावा असे ठरले.

त्याप्रमाणे चर्चा/वाटाघाटीचे वेळी संबंधीत उपस्थित २७ कंत्राटदरापैकी/ठेकेदारांपैकी २५ कंत्राटदार/ ठेकेदरांनी देऊ केलेले अंतिम सुधारीत दर (बंद पाकिटे) प्राप्त झालेले असून ते उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करून, तो मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३-०१-२००९ रोजीचे सभेमध्ये निर्णयार्थ सादर करणेत आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होवून, वार्षीक उलाढाल रुपये एक कोटी पेक्षा जास्त असलेल्या ठेकेदारांचा स्वतंत्र तुलनात्मक तक्ता तयार करणेत येवून तो उपसमितीचे सभेमध्ये सादर करणेत यावा, तसेच कॉन्ट्रॅक्टची मुदत ०१ वर्षे ऐवजी ०३ वर्षे करणेत यावी अशी चर्चा झालेली आहे. त्यास अनुसरून वार्षीक उलाढाल रूपये एक कोटी पेक्षा जास्त उलाढाल असलेल्या ठेकदारांचा स्वतंत्र तुलनात्मक तक्ता तयार करणेत येवून मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०१-२००९ व दि.०८-०२-२००९ रोजीचे सभेमध्ये सादर करणेत आला होता. तथापि सदर विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली होती. वार्षीक उलाढाल रूपये १ कोटीपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या ठेकेदारांचा स्वतंत्र तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला असून, तो आजचे सभेत सादर करण्यात आला होता.

सबब, संस्थानला अकुशल, कुशल कामगार कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी नविन लेबर कॉन्ट्रॅक्टर्स नेमणूकीबाबत व त्याचे कॉन्ट्रॅक्ट कालावधीबाबत निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.१५. श्रीसाईनाथ रुग्णालयाचे डेंटल विभागासाठी डेंटल चेअर खरेदीकामी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.१८४** श्रीसाईनाथ रुग्णालयातील डेंटल विभागातील सध्या असलेली डेंटल चेअर नादुरुस्त असल्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयातील डेंटल विभागाने त्यांचे डि. पी. क्र. ५८७९ दि. १०/०७/२००८ अन्वये डेंटल चेअरची मागणी केलेली होती. त्यानुसार दि. २०/०९/२००८ रोजीचे मा. उपसमिती सभेत उपरोक्तप्रमाणे २ नग डेंटल चेअर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. ४,४०,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. सदरचे मंजुरीन्वये इकडील पत्र क्र. १४८०१ दि. ०७/१०/२००८ अन्वये एकुण ५ पुरवठा धारकांकडून दि. २५/१०/२००८ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन एकच कोटेशन प्राप्त झालेले होते. ते खालीलप्रमाणे -

०१) M/s. Suz-Dent (India) Pvt.Ltd.,Ahmedabad (प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून मिळाले आहे)

सदरचे खरेदीकामी एकच कोटेशन प्राप्त झाल्यामुळे पुन्हा इकडील पत्र क्र. १६४६१ दि. ११/११/२००८ अन्वये पुरवठा धारकांना स्मरणपत्र पाठवून कोटेशन पाठविण्याबाबत तगादा करण्यात आला होता, त्यास अनुसरुन दोन कोटेशन प्राप्त झालेले होते, ते खालीलप्रमाणे -

०१) M/s. Vasant Distributors, Nashik (बंद पाकीट)

०२) M/s. Confident Dental Equipment, Mumbai (प्रशासन शाखेकडून टपालामार्फत उघडून मिळाले आहे)

वरीलप्रमाणे प्राप्त तीन कोटेशन पैकी एक बंद कोटेशन दि. ०३/०१/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेले असून त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात येऊन श्री साईबाबा हॉस्पिटलचे दंतरोग विभागातील डॉ. खांदे तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील दंतरोग विभागातील डॉ. चांदगुडे व डॉ. विखे यांना दाखविण्यात आलेला असून या तिघांनीही मे. सुझ-डेंट (इं) प्रा. लि., अहमदाबाद यांचे Suzy Deluxe हे मॉडेल घेण्याची शिफारस केलेली आहे. सदर चेअरमध्ये मुळ युनीटची किंमत रु. ९५,०००/- तर त्यासाठी लागणाऱ्या आवश्यक ॲक्सेसरीजची वेगळी किंमत दिली होती. सदर ॲक्सेसरीजपैकी या तिनही डॉक्टरांनी शिफारस केलेल्या ॲक्सेसरीजचा समाविष्ट करण्यात आला असून मुळ युनीट अधिक आवश्यक ॲक्सेसरीजसह सदर चेअरची एकुण किंमत रु. १,७३,०००/- इतकी होते. श्री साईनाथ रुग्णालयासाठी दोन डेंटल चेअरची मान्यता मिळालेली होती. परंतू एक चेअर देणगी म्हणून प्राप्त झाल्याने एकच चेअर खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

तरी मे. सुझ-डेंट (इं) प्रा. लि., अहमदाबाद यांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

परंतू मे. सुझ-डेंट (इं) प्रा. लि., अहमदाबाद यांनी फॅक्स पत्राव्दारे त्यांनी देऊ केलेल्या दरात २ टक्के सुट देऊ केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन मे. सुझ-डेंट (इं) प्रा. लि., अहमदाबाद यांनी देऊ केलेली सूट स्विकारुन त्यांना डेंटल चेअर खरेदीकामी पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१६. श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी सी.आर.यु -०१ विभागासाठी Dual Chamber Temporary Pacemaker खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणे बाबत**

**निर्णय क्र.१८५** श्री साईबाबा रुग्णालयातील सी.आर.यु. - १ या विभागाने त्यांचे डि.पी.क्र. ४०६० दि. ०५/१२/२००८ अन्वये Dual Chamber Temporary Pacemaker - १ नगाची मागणी केलेली आहे. यापुर्वी श्री साईबाबा रुग्णालयाकरीता ४ नग पेसमेकर खरेदी करण्यात आलेले आहेत, त्यापैकी कॅथलॅब व सि.व्ही.टी.एस. विभागासाठी प्रत्येकी एक व आय.सी.सी.यु. विभागासाठी दोन पेसमेकर देण्यात आलेले आहेत. सी.आर.यु. - १ या विभागास पुर्वी आपण पेसमेकर दिलेले नाही, सदर वॉर्डमध्ये ॲन्जीओप्लास्टी, ॲन्जीओग्राफी, बायपास झालेले रुग्ण दाखल होत असतात व तेथे शस्त्रक्रिया झाल्यानंतरचे उपचार करण्यात येतात, त्यामुळे तेथे पेसमेकर असणे आवश्यक आहे. अत्यवस्थ रुग्णाच्या ह्दयाचे ठोके नियंत्रित करुन ते स्थिर ठेवण्यासाठी उपरोक्त पेसमेकरचा वापर होतो.

दि. ०३/०१/२००९ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत उपरोक्त पेसमेकर विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीकामीच्या अंदाजे रु. १,९९,६८०/- इतक्या खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ५१९ दि. १३/०१/२००९ अन्वये एकुण ०९ पुरवठा धारकांकडून दि. २४/०१/२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन ३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत, ते खालीलप्रमाणे -

०१) M/s. Cardiotech, Pune

०२) M/s. Critical Care Systems, Pune

०३) M/s. Emergent Medi-tech (India) Pvt.Ltd., Mumbai

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्स तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१७. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता नवीन लॉण्ड्री विभागासाठी लागणारे मशिनरी खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणेबाबत**

**निर्णय क्र.१८६** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयातील धुलाईसाठी दररोज निघणारे खराब लिनन व भविष्यात वाढणाऱ्या रुग्णांची संख्या विचारात घेऊन सर्व सोयीयुक्त अद्यावत व सुसज्ज अशी लॉन्ड्री करणेसाठी, अंदाजे रु.३१,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | मशिनरी | रु.२०,४४,६८७/- |
| ब) | बांधकाम | रु.९,००,०००/- |
| क) | इलेक्ट्रीक व प्लबींग काम | रु.१,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | **एकूण रक्कम रु.** | **रु.३०,४४,६८७/-** |
| | **पुर्णांकित एकूण रक्कम रु.** | **रु.३१,००,०००/-** |

सदर लॉन्ड्री विभाग सुरु करणेकामीच्या अंदाजे रु. ३१,००,०००/- चे खर्चाच्या प्रस्तावास दि. १५/११/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेमध्ये विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली होती.

त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र टाईम्स, डी.एन.ए.-पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.०८/१२/२००८ ते दि.२०/१२/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात ३ निविदा व मुंबई कार्यालयात ७ निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.२३/१२/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकुण ०४ पुरवठा धारकांना इकडील पत्र क्र. १७९०३ दि.०४/१२/२००८ अन्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन सदर खरेदीकामी एकुण ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे-

१. M/s. Ramsons Udhyog Pvt. Ltd., Bangalore
२. M/s. Ramdhan Laundries, Bangalore
३. M/s. Ramsons Garment Finishing Equipment (P) Ltd., Bangalore
४. M/s. Vetech Equipment, Ludhiana (Punjab)

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्स तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१८. श्रीसाईनाथ रुग्णालयासाठी आर्थोस्कोप सेवर खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणेबाबत**

**निर्णय क्र.१८७** श्रीसाईनाथ रुग्णालयातील आर्थोपेडीक सर्जन डॉ. प्रशांत पठारे यांनी एक आर्थोस्कोपी सेवरची मागणी केलेली आहे. कारण सध्या श्री साईनाथ रुग्णालयात आर्थोपेडीकच्या शस्त्रक्रिया करणेसाठी सदरचे सेवर नाही. सदर प्रकारच्या वर्षातून जवळजवळ ४० ते ५० रुग्णांच्या शस्त्रक्रिया होत असतात व त्याचा फायदा रुग्णांना मिळू शकेल. सध्या अशा प्रकारचे सेवर फक्त श्री साईबाबा रुग्णालयात असून श्री साईनाथ रुग्णालयात गरज लागलेस ते श्री साईबाबा रुग्णालयातून वापरावयास नेण्यात येते.

सदरचे आर्थोस्कोपी सेवर खरेदीकामी दि. १२/१२/२००८ रोजीचे मा. उपसमिती सभेत विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४,५०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार इकडील पत्र क्र. १८९५१ दि. ३०/१२/२००८ अन्वये एकुण ११ पुरवठा धारकांकडून दि. १०/०१/२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन ४ कोटेशन प्राप्त झालेले आहेत, ते खालीलप्रमाणे -

०१) M/s. Biomedicon System (I) Pvt.Ltd., Mumbai (बंद कोटेशन)
०२) M/s. Everest Medical Technologies Pvt.Ltd., Mumbai (बंद कोटेशन)
०३) M/s. Chimco Bio-Medical Engineering Co., Mumbai (बंद कोटेशन)
०४) M/s. Eagle Medical Systems Pvt.Ltd., New Delhi (बंद कोटेशन)

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्स तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१९. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये Public Announcement /Address System & CCTV System खरेदीकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडणे बाबत**

**निर्णय क्र.१८८** श्रीसाईबाबा हॉस्पीटलमध्ये भविष्यात वाढत्या रुग्णाची संख्या विचारात घेऊन <u>A) PUBLIC ANNOUNCEMENT/ADDRESS SYSTEM & B) CCTV SYSTEM</u> खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये १०,००००/- (अक्षरी दहा लाख रुपये मात्र) चे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०५/२००८ रोजीच्या सभेतील विषय क्र.३६ निर्णय क्र. ४४९ अन्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्तकामी दि.०५/०१/२००९ ते दि.१७/०१/२००९ पासून विहित पध्दतीने संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन तसेच संस्थानच्या वेबसाईटवर प्रसिध्द होऊन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्यास अनुसरुन उपरोक्त खरेदीकामी दि-०५/०१/२००९ ते दि-१७/०१/२००९ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात १० निविदा व मुंबई कार्यालयात १० निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्वीकारण्याची अंतिम मुदत दि.२१/०१/२००९ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच सदरचे जाहिरातीबाबत अवगत करणेसाठी एकूण १५ पुरवठाधारकांना इकडील पत्र क्र. No.SSS/WS/ SSBH/EDP/ 0018/2008 Date:17/12/2008 अन्वये कळविण्यात आले होते.

सदरचे खरेदीकामी संस्थानचे शिर्डी व मुंबई कार्यालयात एकूण १७ निविदांची विक्री झालेली होती त्यापैकी खालीलप्रमाणे एकूण दहा सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1) Ashwini Agency, Pune.
2) Safe House Security, Pune.
3) M/s. Gujar Electricales, Pune.
4) Adler Security System Pvt. Ltd., Mumbai.
5) Alaram Factory India Pvt. Ltd., Mumbai.
6) Vectra Gloses Private Ltd. Ltd., Mumbai.
7) Kores (India) Ltd., Mumbai.
8) M/s. Micro Secure Solution Ltd., Mumbai.
9) Third Eye Security System, Mumbai.
10) One Sealed Tender (Address Not Mentioned) On Envelope.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्स तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२०** **श्रीसाईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता मशिनरी/उपकरणे खरेदीकामी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडणे बाबत.**

**निर्णय क्र.१८९** श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा विभागातील Histopathology & Cytology विभागात दैनंदिन तपासणीकामी सध्या असलेल्या मशिनरी / उपकरणे व्यवस्थित काम देत नसल्याने तर काही नविन तपासण्या ज्या आपणाकडे सध्या होत नाही. त्या करणेकामी प्रयोगशाळा विभागाने नविन मशिनरी / उपकरणांची मागणी केलेली होती.

त्यांनी मागणी केल्याप्रमाणे मशिनरी / उपकरणे खरेदीकामी दि. १२/१२/२००८ रोजीच्या उपसमिती सभेमध्ये विहित पध्दतीने कोटेशन मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ३,९३,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळाली होती.

त्यानुसार इकडील पत्र क्र. ५१९ दि. १३/०१/२००९ अन्वये एकुण १५ अधिकृत विक्रेते / पुरवठा धारकांकडून दि. २४/०१/२००९ अखेर कोटेशन मागविण्यात आले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे पाच कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

१. M/s. Transasia Biomedicals Pvt.Ltd., Mumbai
२. M/s. Sai Drugs India Pvt.Ltd., Mumbai
३. M/s. Roche Diagnostics Pvt. Ltd., Mumbai
४. M/s. S.S. Scientific Co., Dhule
५. M/s. Universal Chemicals, Nashik

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. या कोटेशन्स तुलनात्मक तक्ता तयार करुन तो व्यवस्थापन समितीचे पूढील सभेपूढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२१** **श्री साईनाथ रक्तपेढीकरीता लागणारी मशिनरी/ उपकरणे खरेदीकामी प्राप्त झालेल्या तांत्रिक निविदा (Technical Bid) उघडून मिळणेबाबत**

**निर्णय क्र.१९०** श्री साईनाथ रक्तपेढी हि २००० मध्ये कार्यान्वित करणेत आली होती. त्यावेळेस सदरचे रक्तपेढी करीता काही मशिनरी, विविध प्रकारचे फ्रिजेस इत्यादी खरेदी करण्यात आले होते. सदरची रक्तपेढी कार्यान्वित होऊन ८ वर्षाचा कालावधी झालेला आहे. तसेच रुग्णांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे उपलब्ध मशिनरी / उपकरणे इत्यादीवर कामाचा बोजा खुपच वाढलेला आहे. त्यामुळे सदर मशिनरी / उपकरणांपैकी काही मशिनरी / उपकरणे बदलणे गरजेचे आहे.

तसेच अन्न व औषध प्रशासन - महाराष्ट्र शासन यांचे विभागाकडून रक्तपेढीकरीता असलेल्या परवाना नुतनीकरण करणेसाठी अन्न व औषध प्रशासन - महाराष्ट्र शासन यांनी दि. २७/०९/२००८ रोजी रुग्णालयास भेट दिली असता त्यांनी देखील काही अदयावत मशिनरी / उपकरणे / डोनरकोच इत्यादी खरेदी करण्याबाबत शिफारस केलेली आहे.

सदर मशिनरी / उपकरणे खरेदीकामीच्या अंदाजे रु. ४२,४२,०८५/- इतक्या खर्चाच्या प्रस्तावास दि. १२/१२/२००८ रोजीचे मा. उपसमिती सभेत विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत महाराष्ट्र टाईम्स - मुंबई, डीएनए - पुणे या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१९/०१/२००९ ते दि.३१/०१/२००९ अखेर निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या, तसेच संस्थानचे वेबसाईटवर देखील निविदा टाकण्यात आली होती व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.०३/०२/२००९ अखेर ठेवण्यात आली होती. सदरचे

जाहिरातीबाबत १९ अधिकृत विक्रेते / कंपन्याना इकडील पत्र क्र. ५६७ दि. १४/०१/२००९ अन्वये निविदा भरणेबाबत कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन संस्थानच्या शिर्डी व मुंबई येथील कार्यालयात एकूण १८ निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे -

| Sr. no. | Name | Sr. no. | Name |
|---|---|---|---|
| 1 | M/s. Unique Diagnostics, Mumbai | 10 | M/s. N.P. Agencies, Mumbai |
| 2 | M/s.Remi Sales & Engg. Ltd., Thane | 11 | M/s. Skylab Instruments & Engineering Pvt.Ltd., Vasai (E) |
| 3 | M/s. Thermolab Scientific Equipments Pvt.Ltd., Vasai (W) (2 ×-Ö×¾Ö¤üÖ) | 12 | M/s. Recorders & Medicare Systems (P) Ltd., Chandigarh |
| 4 | M/s. Ark Diagnostics Pvt.Ltd., Mumbai | 13 | M/s. J.S.P. Surgicals, Nashik |
| 5 | M/s. Biomerieux India Pvt.Ltd., Mumbai | 14 | M/s. Transasia Bio-medicals Ltd., Mumbai |
| 6 | M/s. Hi-Tech Surgical Systems, Mumbai | 15 | M/s. Universal Chemicals, Nashik |
| 7 | M/s. Hindustan Latex Limited, Mumbai | 16 | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad |
| 8 | M/s. Span Healthcare Pvt. Ltd., Mumbai | 17 | M/s. Tulip Diagnostics Pvt. Ltd., Pune |
| 9 | M/s. AGD Biomedicals (P) Ltd., Bangalore | 18 | M/s. Kundan Surgicals, Ahmednagar |

वरीलप्रमाणे प्राप्त १८ सिलबंद तांत्रिक निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या. सदर कोटेशनचा तुलनात्मक तक्ता तयार करुन संबंधित BTO व बायोमेडिकल इंजिनिअर,तसेच बाहेरील दोन तज्ञ पॅथोलॉजिस्ट यांचा सल्ला घेऊन,व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा,असें ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२२** **गुंतवणूक केलेल्या रकमेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत**

**निर्णय क्र.१९१** **(अ)** माहे जानेवारी, २००९ अखेर मुदत पूर्ण होणा-या गुंतवणूकीची रक्कम रु.१७,९९,०१,९७३/- अधिक संस्थानच्या बचत खात्यात गुंतवणूकीसाठी अंदाजे उपलब्ध होऊ शकणारी रक्कम रु.५ कोटी अशी एकूण रक्कम रु.२३ कोटींची गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या शिर्डी येथे दि.३ जानेवारी,२००९ रोजी झालेल्या सभेत बँकांकडून मागविण्यात आलेल्या व्याजदरांच्या तपशीलासह ठेवण्यात आला होता. या विषयावरील निर्णयाच्या अनुषंगाने एकूण रक्कम रु.२३ कोटींची गुंतवणूक ही दि.१४ जानेवारी, २००९ अखेर करण्यात आलेली आहे.

दि.२४ जानेवारी, २००८ अखेर संस्थानच्या बचत खात्यात एकूण रक्कम रु.७ कोटी शिल्लक असल्याने व दि. २५-२६/१/२००९ रोजी भक्तांची गर्दी वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन दैनंदिन खर्च वजा एकूण रक्कम रु.५ कोटींची गुंतवणूक करणेबाबतचा विषय दि.२४.१.२००९ चे टिपणीन्वये मा.कार्यकारी अधिकारी यांचेसमोर ठेवण्यात आला होता. सदर विषयाच्या मंजुरीनुसार संस्थानला नियमित सेवा देणा-या राष्टीयीकृत बँकेकडे व्याजदर मागविण्यात आले होते. या व्याजदराच्या तपशीलात दर्शविल्यानुसार सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी यांनी ५५५ दिवसांच्या योजनेत देऊ केलेला व्याजदर ९.२५ % हा सर्वात जास्त असल्याने गुंतवणूकीसाठी उपलब्ध होत असलेली रक्कम मा.अध्यक्षांचे मान्यतेने त्यांचेकडे गुंतविण्यात आलेली आहे.

**(ब)** आर. बी. आय. बॉण्ड मध्ये गुंतविण्यात आलेल्या रकमेवर संस्थानला दि.१ फेब्रुवारी,२००९ रोजी रक्कम रु. ४,११,५४,६००/- इतके व्याज मिळालेले आहे. सदरची व्याजाची रक्कम व संस्थानच्या बचत खात्यात दैनंदिन खर्च वजा जाता शिल्लक असलेली रक्कम अशी एकूण रक्कम रु. ५ कोटी दि.३ फेब्रुवारी, २००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध होती. व्यवस्थापन समितीचे सभेस अवकाश असल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होऊ नये याकरीता सदरच्या रकमेची जास्तीत-जास्त व्याजदर देणा-या राष्ट्रीयीकृत बँकेकडे गुंतवणूक करण्यासाठी सदरचा विषय दि.३.२.२००९ रोजीच्या टिपणीन्वये मा.कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीसाठी ठेवण्यात आला होता. संस्थानला प्रामुख्याने सेवा देणा-या राष्ट्रीयीकृत बँकांकडून दि.२४/१/२००९ रोजी व्याजदर मागविण्यात आलेले होते, तेच व्याजदर दि.३.२.२००९ रोजी असल्याचे बँकांनी दूरध्वनीवरुन कळविल्याने उपलब्ध रक्कम रु. ५ कोटी सेंट्रल बँक ऑफ इंडीया, शिर्डी यांचेकडे ५५५ दिवसांसाठी ९.२५ % या व्याजदराने मा.अध्यक्षांचे मान्यतेने गुंतविण्यात आलेली आहे.

तरी वरील **अ** व **ब** प्रमाणे करण्यात आलेल्या एकूण रु.१० कोटीचे गुंतवणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.२३** **श्री साईनाथ रुग्णालयाकरीता हॉस्पिटल फर्निचर खरेदी बाबत**

**निर्णय क्र.१९२** श्रीसाईनाथ रुग्णालयातील फर्नीचर हे वापरुन खराब झालेले असल्यामुळे श्री साईनाथ रुग्णालयाचे शस्त्रक्रिया गृहामध्ये तसेच विविध वार्ड / विभागामध्ये लागणारे इन्स्ट्रुमेंट ट्रॉली, स्ट्रेचर ट्रॉली, ड्रेसींग टॉली व इतर फर्निचर इत्यादी वापरुन खराब झालेले असल्यामुळे त्यांना दैनंदिन कामकाजात ते वापरता येत नाही म्हणून, श्री साईनाथ रुग्णालयाने डि.पी. क्रमांक ८००२ दि.२३/०२/२००८ अन्वये फर्निचरची मागणी केलेली होती.

उपरोक्तप्रमाणे मागणी केलेले फर्निचर विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागवून खरेदीकामीचा अंदाजे रु.१९,७०,६४०/- इतक्या खर्चाचा प्रस्ताव दि.१४/०५/२००८ चे मा. वैद्यकिय समिती सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहीरात देऊन निविदा मागविणे बाबत निर्णय झालेला होता.

त्यानुसार उपरोक्त खरेदीकामी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत दैनिक महाराष्ट्र टाईम्स - मुंबई, दैनिक लोकमत - नाशिक या वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन दि.१६/०६/२००८ ते दि.२८/०६/२००८ अखेर संस्थानच्या शिर्डी कार्यालयात १० व मुंबई कार्यालयात १० निविदा विक्रिसाठी ठेवण्यात आल्या होत्या व निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दि.३०/०६/२००८ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी या क्षेत्रातील २१ नामांकित अधिकृत विक्रेत्यांना इकडील पत्र क्र.८५५७ दि. १२/०६/२००८ अन्वये वर्तमान पत्रातील जाहिराती बाबत अवगत करण्यात आले होते. त्यास अनुसरुन ०८ बंद निविदा प्राप्त झालेल्या होत्या. प्राप्त झालेल्या ०८ सिलबंद निविदा दि.१७/०८/२००८ रोजीचे मा.उपसमिती सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या होत्या, त्यानुसार त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन उपरोक्त खरेदीकामीचा प्रस्ताव दि.१५/११/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समिती सभेत चर्चा / वाटाघाटी करुन निर्णय घेणेकामी सादर करण्यात आला होता. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे -

| Sr.No. | Name of Party | Amt. in Rs. | Item Sr.No. quoted items |
|---|---|---|---|
| 1 | M/s. Jalaram Steel Furniture Pvt.Ltd., Surat | 1,64,369.50 | Sr.No. 12,14 |
| 2 | M/s. K.B. Electronics Corporation, Mumbai | 10,62,100.00 | Sr.No. 1,2,3,6,8,17,18 |
| 3 | M/s. Janak Healthcare Pvt.Ltd., Mumbai | 17,06,699.00 | Sr.No. 1 to 9, 17 to 20 |
| 4 | M/s. Shree Hospital Equipments, Ichalkaranji | 12,25,410.00 | Sr.No. 1 to 14, 17 to 20 |
| 5 | M/s. Rahul Enterprises, Nanded | 9,52,960.00 | All Items |
| 6 | M/s. Sudarshan Flexible Packaging Pvt.Ltd., Nashik | 17,39,905.00 | All Items |
| 7 | M/s. Satpuda Engineering Pvt.Ltd., Nashik | 18,16,566.00 | Sr.No. 1 to 11, 17 to 20 |
| 8 | M/s. Hitra Equipments, Mumbai | 11,10,372.00 | Sr.No. 2,3,5,7,8,17,18,20 |

त्यावर चर्चा होऊन मे. राहुल एंटरप्रायजेस, नांदेड यांचे दर सर्वात निम्नत्तम असून त्यांनी सर्व आयटम्सकरीता दर दिलेले आहेत. तेंव्हा त्यांच्या फर्नीचरचा नमुना शिर्डी येथे समक्ष बोलावून किंवा त्यांचे कंपनीत जाऊन समक्ष पाहणी करुन त्यांचे फर्नीचरचा दर्जा योग्य वाटल्यास त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अन्यथा सदर विषय मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवण्यात यावा, असे ठरले.

त्यानुसार मे. राहुल एंटरप्रायजेस, नांदेड यांना इकडील पत्र क्र. १७३८८ दि. २५/११/२००८ तसेच १८५९६ दि. १९/१२/२००८ अन्वये फर्नीचरचा नमुना शिर्डी येथे घेऊन येणेबाबत कळविले होते. परंतु मे. राहुल एंटरप्रायजेस, नांदेड यांनी त्यांचे दि. ३१/१२/२००८ चे पत्रान्वये फर्नीचर नमुना शिर्डी येथे घेऊन येणे शक्य नसल्याचे कळविले होते, त्यामुळे प्रशासकीय अधिकारी श्री. पी. टी. जोशी हे दि. १६/०१/२००९ रोजी नांदेड येथे समक्ष फर्नीचरचा नमुना बघण्यासाठी गेले असता, त्यांनी Municipal Corporation Hospital व मेडीकल कॉलेज, नादेड येथे मे. राहुल एंटरप्रायजेस, नांदेड यांनी पुरवठा केलेले फर्नीचर बघितले असता त्यांना त्यांचे फर्नीचरचा दर्जा योग्य वाटला नाही.

श्री साईबाबा रुग्णालयाचे न्यूरो ओ.टी. करीता लागणाऱ्या फर्निचर करीता मे. क्वालीसर्ज सर्जिकल, पुणे (भारत सर्जिकल) यांचे देखील दर पत्रक मागवून त्यांचे फर्निचरचा नमूना पाहून त्यांचे कडून खरेदी करणे बाबत दि.२४/१०/२००८ चे उपसमिती सभेने शिफारस केलेली आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात मे. क्वालीसर्ज सर्जिकल, पुणे (भारत सर्जिकल) यांचेकडून यापूर्वी विविध प्रकारचे हॉस्पिटल फर्निचर घेण्यात आलेले होते त्यांचा नमुना समाधानकारक आहे.

मे. क्वालीसर्ज सर्जिकल, पुणे (भारत सर्जिकल) यांनी संस्थानचे जाहिरातीस अनूसरुन निविदा भरलेली नव्हती, त्यामुळे त्यांचेकडून त्यांचे दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी दि.०४/१२/२००८ चे पत्रान्वये दरपत्रक पाठविलेले असून त्यांनी १९ आयटमपैकी १६ आयटम्सकरीता दर दिलेले आहे.

त्यापैकी ड्रेसिंग ड्रम (अ.नं. १५) वगळता इतर फर्निचर त्यांचेकडून घेता येईल, कारण साईनाथ रुग्णालयाकरीता तातडीने ड्रेसिंग ड्रम पाहिजे असल्यामुळे स्वतंत्र प्रस्तावास मंजुरी घेऊन खरेदी करुन देण्यात आलेले आहे, त्यामुळे त्याची शिफारस करण्यात आलेली नाही. अ.नं. १२ (Iron Locker) करीता देखील साईनाथ रुग्णालयाने स्वतंत्र मागणी केलेली असून त्याप्रमाणे त्यांना ती खरेदी करुन देण्यात आलेली आहे, त्यामुळे ते खरेदी करण्याची आवश्यकता नाही.

अ.नं.१३ (Iron Rack) करीता मे. क्वालीसर्ज सर्जिकल, पुणे (भारत सर्जिकल) यांनी दर दिलेले नाही त्यामुळे सदर रॅककरीता तुलनात्मक दरांच्या तक्त्यात निम्नतम दर प्रती नग रु. ४३६७.७० असलेले मे. जलाराम स्टिल फर्नीचर, सुरत यांचेकडून घेण्याची शिफारस केलेली आहे. अ.नं. ४

(Single Step Stainless Steel Stool) करीता मे.जनक हेल्थकेअर, मुंबई यांचे दर निम्नतम आहेत ते त्यांचेकडून घेता येईल. उपरोक्त शिफारशीप्रमाणे खालील प्रमाणे खर्च येईल.

| Sr.No. | Name of Party | Quoted items Sr. No. | Amt. in Rs. |
|---|---|---|---|
| 1 | Quali Surge Surgical Pvt. Ltd., Pune | Sr.No. 1, 2, 3, 5-10, 14, 16,17,18,19 | 11,34,304.30 |
| 2 | Jalaram Steel, Surat (Iron Rack) | Sr.No. 13 | 1,44,134.10 |
| 3 | Sudarshan Flexible, Nashik (Shoe Racks for 2 Dozen Pairs) | Sr.No. 11 | 9,900.00 |
| 4 | Janak Healthcare, Mumbai (Single Step Stainless Steel Stool) | Sr.No. 4 | 6,955.72 |
| | | **Total in Rs.** | **12,95,294.12** |

वरीलप्रमाणे श्री साईनाथ रुग्णालयाकरीता हॉस्पिटल फर्नीचर खरेदीकामी रु.१२,९५,२९४.१२ इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२४** **Kidney Stone या आजारावर मोफत शिबीराचे फेर आयोजन करणे बाबत**

**निर्णय क्र.१९३** नगर व शेजारील जिल्हयातील पाण्यामध्ये क्षारांचे प्रमाण जास्त असल्यामुळे येथे Kidney Stone चे रुग्ण जास्त प्रमाणात आढळून येतात. सध्या साऊंड वेव्हच्या सहाय्याने (Non invasive) विना शल्यक्रिया पेशंटवर उपचार करता येतात. अशाच प्रकारचे शिबीर अहमदाबाद येथील लेसर किरण तज्ञ डॉ.केतन शुक्ला व त्यांचे सहकारी यांचे मोफत योगदानातुन श्री साईनाथ रुग्णालयात दि.२०.११.२००८ ते दि.२३.११.२००८ अखेर Kidney Stone शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी परिसरातील २६ रुग्णांवर लेसर किरणांच्या सहाय्याने मोफत करण्यात आले.

तसेच दि.२५.१२.२००८ ते दि.२७.१२.२००८ अखेर (Percutaneous Nephrolithotomy) (P C N L) मोठे स्टोन असलेल्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. यामध्ये परिसरातील २४ (P C N L) स्कोपीने शस्त्रक्रिया तसेच ०६ रुग्णांवर Sound waves च्या (Lithotrypsy) साहयाने उपचार करणेत आले असून असे एकूण ५६ रुग्णावर मोफत शस्त्रक्रिया व उपचार करणेत आले. अशा उपचारासाठी खाजगी रुग्णालयात ३० ते ४० हजार रुपये खर्च येतो. सदर खर्च गरीब रुग्णांना पेलावणारा नसल्याने ते उपचाराच घेत नाही.

याकामी अहमदाबाद येथील युरॉलॉजिस्ट डॉ.केतन शुक्ला वत्यांचे सहकारी यांनी त्यांचे ॲम्बुलन्स तसेच आवश्यक त्या उपकरणासह शिरडी येथे येऊन मोफत सेवा दिली. संस्थान मार्फत फक्त त्यांची रहाण्याची, जेवणाची व दर्शनाची व्यवस्था करण्यात आली.

शिरडी परिसरात अशा रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात असून, सदर रुग्ण वेळोवेळी रुग्णालयात येऊन शिबीर पुन्हा आयोजित करणेबाबत विनंती करत आहेत.

सदर शिबीराचे फेर आयोजन करावयाचे झाल्यास, ते एप्रिल- २००९ मध्ये आयोजित करता येईल. त्यासाठी संस्थानला प्रती रुग्ण रु.५०००/- याप्रमाणे अप्रत्यक्ष खर्च येईल. सदर शिबीराकरीता ५० रुग्णांची निवड झाल्यावर डॉ. केतन शुक्ला, अहमदाबाद यांना कळवून शिबीराची तारीख निश्चित करता येईल.

तसेच जे मेडिसीन व साहित्य ऑपरेशनसाठी डॉ.शुक्ला आणतात त्यांचे बीलाप्रमाणे पैसे त्यांना अदा करावे लागतील तसेच उपलब्ध होणारे औषधे साहित्य संस्थान मेडिकल स्टोअरमधून खरेदी करावे लागेल.

तरी वरीलप्रमाणे शिबीर आयोजित करणेस व अप्रत्यक्ष व प्रत्यक्ष येणाऱ्या अंदाजे रु.२,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२५** **झेनॉन लाईट सोर्सकरीता बल्ब खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.१९४** श्रीसाईनाथ रूग्णालयाकरीता सन १९९९ यावर्षी मे.कार्ल स्टोअर्ज, जर्मनी या कंपनीचे भारतातील तेव्हांचे अधिकृत विक्रेते मे.चिमको इंटरनॅशनल, मुंबई यांचेकडून विविध प्रकारचे लॅप्रोस्कोपी व युरोलॉजी इन्स्ट्रुमेंट सेट खरेदी करण्यात आले आहेत. त्यामध्ये उपरोक्त झेनॉन लाईट सोर्स देखील खरेदी करण्यात आले होते. सदर झेनॉन लाईट सोर्स, लॅप्रोस्कोपी सेट व युरोलॉजी इन्स्ट्रुमेंट सेटची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जाते. परंतु दुरुस्तीकरीता जर काही स्पेअर पार्ट बदलणेची आवश्यकता असेल व त्यामुळे इन्स्ट्रुमेंट येथे दुरुस्त होउ शकत नसेल तर ते इन्स्ट्रुमेंट मे. कार्ल स्टोअर्ज, जर्मनी यांचे भारतातील सध्याचे डीलर मे. चिमको बायोमेडीकल इंजीनिअरींग कं, मुंबई यांचेकडुन दुरुस्त करुन घेतले जातात.

सध्या झेनॉन लाईट सोर्सचा बल्ब खराब झाला असुन ऑपरेशन थिएटर विभागाने त्यांचे पत्र क्र. ५८३ दि. १२/०१/२००९ अन्वये सदर बल्ब तातडीने बदलुन मिळावा याकरीता मागणीपत्र पाठविले आहे. सदरचा झेनॉन बल्ब साधारण १००० तासांच्या वापरानंतर खराब होतो व बदलणे आवश्यक असते. श्री

साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटरमध्ये एकच झेनॉन लाईट सोर्स असुन विविध शस्त्रक्रीया करणेकरीता नियमीत वापरला जातो. त्यामुळे तो तातडीने दुरूस्त करून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे लाईट सोर्सकरीता आवश्यक असलेला झेनॉन बल्ब खरेदी करणेकरीता सदर लाईटसोर्सचे पुरवठाधारक मे.कार्ल स्टोअर्ज,जर्मनी यांचे अधिकृत सर्व्हिस डीलर मे.चिमको बायोमेडीकल इंजि.कं,मुंबई यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी त्यांचे पत्र क्र. QT-MH-१४३७-१दि. २०/०१/२००९ अन्वये सर्व करांसहीत एकुण रु. ६२,२४०/- (अक्षरी रु. बासष्ठ हजार दोनशे चाळीस मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन पाठविले आहे. तसेच सदर रकमेची २५% रक्कम रु. १५,५६०/- ची कंपनीने आगाउ मागणी केली आहे. सदर झेनॉन लाईटसोर्सकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट फक्त मे.कार्ल स्टोअर्ज,जर्मनी यांचे अधिकृत सर्व्हिस डीलर मे.चिमको बायोमेडीकल इंजि.कं,मुंबई यांचेकडेच मिळतात.

तरी झेनॉन लाईटसोर्स दुरुस्तीकामी आवश्यक असणारा झेनॉन बल्ब मे.चिमको बायोमेडीकल इंजि.कं,मुंबई यांचेकडुन बदलुन घेणेस व त्याकरीता येणाऱ्या रु. ६२,२४०/- चे खर्चास आणि सदर रकमेपैकी २५% रक्कम रु. १५,५६०/- कंपनीस आगाउ पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२६** **ACT मशिन दुरुस्तीबाबत.**

**निर्णय क्र.१९५** श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागाकरीता मा. व्य. समितीच्या दि. ०४/०३/२००६ चे सभेतील निर्णय क्र. १२६ अन्वये मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन रुग्णांच्या रक्ताचा गोठणबिंदु तपासणेकामी वापरले जाणारे एक ACT मशीन एकुण रु. १,१०,०००/- इतक्या रकमेत खरेदी करणेत आले आहे. सदर मशीनकरीता कंपनीने दिलेला १ वर्षांचा वॉरंटी कालावधी संपला असुन मशीनची दुरुस्ती व देखभाल बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागामार्फत येथेच केली जाते आहे. परंतु दुरुस्तीकरीता काही स्पेअर पार्ट बदलणेची आवश्यकता असलेमुळे मशीन येथे दुरुस्त करणे शक्य नसल्यास ते कंपनीकडे पाठवुन दुरुस्त करुन घेतले जाते.

सध्या सदरचे ACT मशीन नादुरुस्त झाल्यामुळे मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडे पाठविण्यात आले आहे. कंपनीने सदर मशीनची तपासणी करुन त्यांचे पत्र क्र. BLL/MUM/३८४/०८-०९ दि. १७/०१/२००९ अन्वये मशीनचा एक पॉवर सप्लाय बोर्ड खराब झाल्याचे कळविले असुन दुरुस्तीच्या खर्चाचे कोटेशन सर्व करांसहीत एकुण रु. ४४,९४४/- (अक्षरी रु. चौव्वेचाळीस हजार नउशे चौव्वेचाळीस मात्र) इतक्या खर्चाचे कोटेशन पाठविले आहे. सदरची रक्कम कंपनीस ACT मशीन दुरुस्त होउन श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्राप्त झालेनंतर अदा करावयाची आहे. सदर ACT मशीनचे दुरुस्तीकरीता आवश्यक असणारे स्पेअर पार्ट फक्त मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडेच मिळतात.

तरी मे. बी. एल. लाईफ सायन्सेस प्रा. ली. मुंबई यांचेकडुन ACT मशीन दुरुस्त करुन घेणेस व त्याकरीता येणाऱ्या एकुण रु. ४४,९४४/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२७** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील हॉस्पिटल सेवांच्या सुधारित दरपत्रकास मान्यता मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.१९६** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि.११/१०/२००७ पासुन लागु करण्यात आलेल्या दरपत्रकास मा.व्य.समितीच्या सभेतील निर्णय क्रं.७७०/२२/०९/२००७ अन्वये पुढील सुधारणा होऊपर्यंत लागु करण्यास मान्यता मिळाली आहे त्यास अनुसरुन हॉस्पिटल सेवांची बीले आकारली जात आहे. हॉस्पिटल सुरु होऊन जवळजवळ अडीज वर्ष पुर्ण झाली आहे. सुरुवातीच्या काळात हॉस्पिटल पुर्ण क्षमतेने चालण्याच्या दृष्टीने कमीत कमी दर आकारणी व डॉक्टरांना मासिक फिक्स मानधन/पगार अधिक कामाचे प्रमाणात काही प्रमाणात जास्त टक्केवारीने मोबदला देण्याचे धोरण अवलंबुन हॉस्पिटल सेवांचे दर पत्रक तयार करण्यात आले होते. सध्या हॉस्पिटल पुर्ण क्षमतेने चालत आहे. तपासण्या/सर्जरीसाठी लागणारा एकुण महसुली (Revenue) खर्च व भांडवली खर्च आणि प्रत्यक्ष दरआकारणी यांचा विचार करता असणारी तुट काही प्रमाणात भरुन काढण्याच्या दृष्टीने दि.३/१/२००९ रोजीचे मा.व्य.चे सभेमध्ये हॉस्पिटल सेवांचे दर १०% वाढ करण्याबाबत चर्चा/विचारविनीमय होऊन निर्णय झाला होता त्यास अनुसरुन सर्व हॉस्पिटल सेवांचे दर १०% ने वाढ करुन तो तक्ता आजचे सभेत सादर करण्यात आला होता. यामध्ये पुढीलप्रमाणे ठळक बदल झाले आहे.

१. १०% वाढ करुन दर पुर्णांकीत केल्याने कमी प्रमाणात वाढ असलेल्या काही दरामध्ये बदल झालेला नाही. तर काही दरांमध्ये जास्त प्रमाणात वाढ झाली आहे.

२. दर वाढल्यामुळे टक्केवारीने इंसेन्टीव्ह लागु असलेल्या डॉक्टरांना देण्यात येणारा इंसेन्टीव्ह सुध्दा त्याप्रमाणात वाढणार आहे, तर हृदयशस्त्रक्रिया विभागातील तपासणी/शस्त्रक्रियांवर फिक्स प्रमाणात इंसेन्टीव्ह असल्याने कोणत्याही प्रमाणात बदल करण्यात आलेला नाही.

३. वेळोवेळी मा.वैद्यकीय संचालक यांचे मंजुरीने सुरु करण्यात येत असलेल्या नवीन तपासण्याचा नेहमी प्रमाणे समावेश या दरपत्रकात करण्यात आला आहे. त्यांचे दर इतर हॉस्पिटलमधील दराशी तुलना करुन ठरविण्यात आले आहे.

४. १०% वाढ करुनही मोठया प्रमाणावर तुट असलेले हृदयशस्त्रक्रिया विभागातील BAV व BPV या शस्त्रक्रियांच्या दरामध्ये मात्र ४०% वाढ सुचविली आहे. (रु.२५,०००/-वरुन रु.३५,०००/-), तर पॅथॉलॉजी

विभागामध्ये Harmon चाचण्याचे दर काही प्रमाणात कमी करण्यात आले आहे. पुर्वीचे दर व इतर हॉस्पिटलाचे दर यांची तुलना करता काही चाचाण्याचे दर कमी करुन तर काही नवीन तपासण्यांचा समोवश करुन पॅथॉलॉजीस्ट यांनी दर सुचविले आहे त्याप्रमाणे सुधारणा करुन प्रस्तावित दर सादर केले आहे.

५. डेंटल विभागातील शस्त्रक्रियांचे दर जनरल शस्त्रक्रियांच्या दरपत्रकानुसार लागु करण्यात येत आहे. सदर दरामध्ये साधारणतः ३५ ते ४०% वाढ होत असुन ब-याच शस्त्रक्रियामध्ये भुलतंज्ञची आवश्यकता पडत नाही. अशा वेळी भुलतंज्ञाचा १३% आकार कमी करुन दर आकारणी करण्यात येईल.

६. Opthal विभागासाठी भुलतंज्ञाचा दर पुर्वीप्रमाणेच शस्त्रक्रिया दराच्या ११% राहील. Opthal विभागासाठी शस्त्रक्रियेचे दर स्वतंत्र दर्शविण्यात आले आहे.

तरी दि.३/०१/२००९ रोजीचे मा.व्य.समितीचे सभेमध्ये झालेल्या चर्चेस अनुसरुन हॉस्पिटल सेवांच्या दरांत १० % वाढ करुन तयार करण्यात आलेले दरपत्रक अवलोकनार्थ सादर केले आहे. त्यांची दि.१६ फेब्रुवारी २००९ पासुन अंमलबाजवणी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, लागु केलेल्या सुधारीत दरपत्रकास मान्यता देण्यात आली. तथापी,

१. दि.०१.०४.२००९ पासुन एन्जीओग्राफिचे दर कमी करुन पुर्वी इतकेच रु.५,०००/- ठेवण्यात यावे.
२. काही प्रमाणात तुट भरुन काढण्याच्या दृष्टीने दर लागु केले असल्याने डॉक्टरांच्या इन्सेन्टीव्ह रकमेत वाढ अथवा घट होणार नाही, त्यांना पूर्वी इतकीच इन्सेन्टीव्ह रक्कम मिळेल, अशा प्रमाणात दर लागु करावे, व
३. संस्थान कर्मचाऱ्यांना आवश्यक वैद्यकिय उपचार करण्याबाबत सर्व वैद्यकिय अधिकाऱ्यांना सक्त सुचना द्याव्यात, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२८** **श्रीसाईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागासाठी Monocular Microscope खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.१९७** श्रीसाईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाने दि.२६/११/२००८ अन्वये Olympus/Labomed कंपनीच्या Monocular Microscope 2 नगाची मागणी केली होती.

सध्या त्यांच्याकडे असलेला मायक्रोस्कोप हा २० वर्षापूर्वी खरेदी केला होता, तो नादूरुस्त असून तो दुरुस्त करुन देखील व्यवस्थित काम देत नाही त्यामुळे त्यांनी २ नग नविन मायक्रोस्कोपची मागणी केलेली आहे.

सदर मायक्रोस्कोप त्यांना तातडीने पाहिजे असल्याने त्याकामी तातडीने दूरध्वनीवरुन नाशिक व औरंगाबाद येथून खालील अधिकृत विक्रते यांचेकडून कोटेशन मागविले आहेत.

०१. M/s. Siddhi Medical, Aurangabad
०२. M/s. J.S.P. Surgical, Nashik
०३. M/s. Unique Chemicals, Nashik

वरील तीन कोटेशन मधील तुलनात्मक दरांचा तक्ता खालीलप्रमाणे :-

| Sr. No. | Description | Qty. | Siddhi Medical, Aurangabad | | J.S.P. Surgical, Nashik | | - | | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | Make / Model | Rate Per in Rs. | |
| 1 | Monocular Microscope | 2 | Labomed CXI-ST | 16000.00 | Laboratory Grade GM) | 13860.00 | **Olympus (ML-M) with Halogen Light** | **16599.54** | **16599.54** |
| | | | | | Olympus (Magnus MLM) | 18018.00 | **Olympus (ML-M Freedom) with LED Light (Battery Back-up)** | **20758.27** | **20758.27** |
| | | | | | | | Olympus (ML-M) (co-ax) with Halogen Light | 18455.62 | |
| | | | | | | | | **Total Amt. in Rs.** | **37357.81** |

उपरोक्त प्राप्त तुलनात्मक दरांचा तक्ता श्रीसाईनाथ रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागातील पॅथोलॉजिस्ट डॉ.सौ.इरा भारद्वाज यांना दाखविला असता त्यांनी Olympus कंपनीच्या(ML-M with Halogen Light -१ नग व (ML-M Freedom) with LED Light (Battery Back-up) -१ नग घेण्याची शिफारस केलेली आहे. त्यांचे तुलनात्मक दरांच्या तक्त्यात मे. युनिक केमिकल्स, नाशिक यांचे दर थोडेसे जास्त दिसत आहे, परंतु तांत्रिक दृष्ट्या तो चांगला असल्याने डॉ.सौ.इरा भारद्वाज यांनी शिफारस केल्याप्रमाणे खरेदी कामी शिफारस करण्यात येत आहे. सदर शिफारशी अन्वये मे. युनिक केमिकल्स, नाशिक यांचे दर प्राप्त झालेले असून (ML-M) with Halogen Light कामी रु.१६,५९९.५४ व (ML-M Freedom) with LED Light (Battery Back-up) कामी रु.२०,७५८.२७ याप्रमाणे दोन्ही मिळून सदरचे खरेदीकामी रक्कम रु.३७,३५७.८१ इतका खर्च येणार आहे.

तरी श्रीसाईनाथ रुग्णालयाचे पॅथोलॉजिस्ट डॉ.सौ. इरा भारद्वाज यांचे शिफारशी अन्वये मे. युनिक केमिकल्स, नाशिक यांचेकडून Olympus कंपनीचा(ML-M with Halogen Light -१ नग व (ML-M Freedom) with LED Light (Battery Back-up) -१ नग Monocular Microscope खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.३७,३५७.८१ चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.२९** **श्री.शांताराम मालोजी नांदगावकर,रा.मुंबई यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.१९८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३०** **डॉ.अजय एम.तम्मेवार व्हिजिटींग Vitreo-Retinal Surgeon यांना कामाचे प्रमाणात मोबदला मंजूरीबाबत..**

**निर्णय क्र.१९९** श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये ऑप्थमॉलॉजी विभागामध्ये मानद व्हिजींटींग Vitreo-Retinal Surgeon म्हणुन डॉ.अजय एम. ताम्मेवार, औरंगाबाद यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ऑप्थमॉलॉजी विभागासाठी लागु असलेल्या दरपत्रकानुसार कामाचे प्रमाणात मोबदला देणेबाबत नियुक्ती आदेशात उल्लेख आहे. डॉ. ताम्मेवार यांचे शैक्षणिक पात्रता व अनुभव यांचा विचार करता त्यांचे तपासणी दर इतर डॉक्टरांपेक्षा जास्त ठेवण्यात आलेले आहे.

| अ. क्रं. | तपशील | ओ.पी.डी, आय.पी.डी., फॉलोअप दर | शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|
| १. | सध्याचे जनरल ऑप्थमॉलॉजिस्ट साठीचे दर | ५०/-,५०/-,२५/- | B.Scan Rs.450/-, Leser Photocoagulation for retinal disorders. Rs.900/- |
| २. | डॉ. तम्मेवार यांचेसाठी प्रस्तावित दर | १००/-,१००/-,५०/- | B.Scan Rs.900/- Leser Photocoagulation for retinal disorders Rs.1800/ |

अशा प्रकारे डॉ. ताम्मेवार यांचेकडे तपासणी/शस्त्रक्रिया करणा-या रुग्णांना उपरोक्त प्रमाणे दर आकारणी करण्यास व मंजुर दरपत्रकानुसार इंन्सेन्टीव्ह देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. दिनांक १.४.२००९ त्याची अंमलबजावणी करण्यात यावी,असें ठरलें. कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३१** **हॉस्पिटल मधील फिजीशियन डॉक्टरांचा इंन्सेन्टीव्ह वाढीबाबत.**

**निर्णय क्र.२००** श्रीसाईबाबा हॉस्पिटल मधील फिजीशियन डॉक्टरांना यांचे कामाचे प्रमाणात मोबदला देण्याबाबत दि.१९/०८/०७ चे व्य.स.चे सभेत निर्णय क्रं.७७० अन्वये दरपत्रक मंजुर झाले आहे. त्यानुसार त्यांना इंन्सेन्टीव्ह देण्यात येत आहे. नियोजित कर्मचारी आराखडयात एकुण चार फिजीशियन चे नियोजन करण्यात आले आहे. सध्या हॉस्पिटलमध्ये दोन फिजीशियन काम करतात. त्यांना मासिक फिक्स रु.३०,०००/- वेतनाव्यतिरीक्त इंन्सेन्टीव्ह साधारणतः रु.३५ ते ५० हजार असे साधारणतः एकुण रु.६५ ते ८० हजारापर्यंत मासिक रक्कम देय होत आहे. हॉस्पिटलमध्ये आय.सी.यु व जि.आय.सी.यु. व इतर सुपर स्पेशालिटी विभागांना फिजीशियन यांच्या सेवा अत्यंत महत्वांच्या असतात. शिवाय फिजीशियन डॉक्टरांची मागणी करुनही उपलब्ध होत नाही. फिजीशियन डॉक्टरांना मासिक वेतन अधिक इंसेन्टींव्ह मिळुन एकुण रु.१,००,०००/- पर्यंत मिळाल्यास फिजीशियन डॉक्टर्स उपलब्ध होऊ शकतील व आहे ते फिजीशियन डॉक्टर्स टिकण्यास सुध्दा मदत होईल.

त्यासअनुसरुन हॉस्पिटलमधील फिजीशियन डॉक्टर यांचेशी मा.विश्वस्त डॉ.गोंदकर सो, मा.वैद्यकीय संचालक, उप वैद्यकीय संचालक, यांची चर्चा विचारविनीमय होऊन इतर बाबत कोणताही बदल न करता फिजीशियन यांना रक्कम वाढण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे प्रस्ताव तयार करण्यात आला आहे.

| अ.क्रं | तपासणी प्रकार | ओ.पी.डी. | फॉलो अप | आय.पी.डी. (ICU & GICU) | इमरजंन्सी व्हिजीट | वॉर्ड प्रोसिजर | २ फिजीशिअन साठी एकुण वेतनआधिक इंसेन्टीव्ह मासिक देय रक्कम | प्रति फिजीशिअन एकुण वेतन आधिक इंसेन्टीव्ह मासिक देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सध्याचे दर | ५० | २५ | ५० | १०० | ३०% | १,२६,९१०/- | ६३,४५५/- |
| २. | प्रस्तावित दर | १०० | ५० | १०० | २०० | ३०% | १,९८,९६३/- | ९९,४८१/- |

अशा प्रकारे सध्याच्या तपासणी दरांमध्ये १००% वाढ केल्यास व किमान दोन फिजीशियन डॉक्टर गृहीत धरल्यास सध्याच्या प्रति फिजीशियन डॉक्टर्सला रु.६३,४५५/- प्रति महा ऐवजी रु.९९,४८१/- साधरणतः देय होतील. सदर वाढ फिजीशियनसाठीच राहील याच्या आधारे इतर कोणत्याही डॉक्टरांना इंसेन्टीव्ह लागु करण्यात येणार नाही. यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. सदरहू कार्यवाहीची अंमलबजावणी दिनांक १ एप्रिल, २००९ पासून करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३२** **श्रीसाईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाकरिता X-ray Film Auto Processor मशिन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२०१** श्री साईनाथ रुग्णालयातील क्ष-किरण विभागाकरीता सन २००० मध्ये X-ray Film Auto Processor मशिन मे. छाया ग्राफीक्स लि., बैंगलोर यांचेकडून रु. ४,९९,५००/- इतक्या रक्कमेत खरेदी करण्यात आले होते. सदर मशिनचा उपयोग हा रुग्णांचे फोटो काढल्यानंतर क्ष-किरण फिल्म ऑटोमॅटीक धुवून येणेसाठी होतो. सदरचे मशिनवर दरवर्षी सरासरी १२००० ते १५००० क्ष-किरण फिल्म्स काढल्या जातात. सदर मशिन हे ९ वर्षापुर्वीचे आहे, त्यामुळे ते सध्या व्यवस्थित काम देत नाही व वारंवार नादुरुस्त असून त्याचे दुरुस्तीसाठी महागडी स्पेअर पार्टस टाकावे लागतात. त्यामुळे क्ष-किरण विभागाने दि. ०९/०२/२००९ चे मागणीपत्रकान्वये मशिन बदली (Buyback) करुन नविन मशिन घेण्याबाबत मागणी केलेली आहे.

सदरचे मशिन खरेदीकामी अंदाजे रु. ६,५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी X-ray Film Autoprocessor मशिन विहित पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवून खरेदीस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ६,५०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३३** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलमधील जनरल ऑपरेशन थिएटर विभागासाठी ॲनेस्थेशिया व्हेन्टीलेटर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२०२** श्रीसाईबाबा हॉस्पिटलच्या जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने दि. ३१/०१/२००९ चे मागणी पत्रकान्वये बाईल्स ॲनेस्थेशिया मशिनसाठी आवश्यक असणारे एक नग व्हेन्टीलेटरची मागणी केलेली आहे. सन २००५ मध्ये जनरल ऑपरेशन थिएटर विभागाकरीता मे. एल ॲन्ड टी कंपनी, पुणे यांचेकडून ०४ नग बाईल्स मशिन खरेदी करण्यात आलेले होते. त्यापैकी दोन व्हेन्टीलेटरसह तर दुसरे दोन व्हेन्टीलेटर व्यतिरीक्त होते, त्यापैकी एक व्हेन्टीलेटरसह व दुसरे व्हेन्टीलेटर व्यतिरीक्त असे दोन मशिन जनरल ऑपरेशन थिएटर विभागामध्ये सन २००६ पासून वापरण्यास देण्यात आलेले आहेत, परंतु ज्यावेळेस व्हेन्टीलेटरसह मशिनची आवश्यकता असते, त्यावेळेस पुर्ण बॉईल्स मशिन एका ओ.टी. मधून दुसऱ्या ओ.टी. मध्ये शिफ्ट करावे लागते. तेंव्हा जनरल ऑपरेशन थिएटर विभागाने एका मशिनसाठी व्हेन्टीलेटरची मागणी केलेली आहे.

सदरचे ऑपरेशन थिएटर विभागामधील बॉईल्स मशिन हे एल.ॲन्ड टी. कंपनीचेच असल्यामुळे त्याच कंपनीचे ॲनेस्थेशिया व्हेन्टीलेटर खरेदी करावे लागणार आहे. त्यामुळे थेट उत्पादक कंपनी मे. एल.ॲन्ड टी., पुणे यांना कोटेशन पाठविण्यास सांगितले होते, तेंव्हा त्यांनी त्यांचे अधिकृत विक्रेते मे. एक्सेल कार्पोरेशन, नाशिक यांचेमार्फत रु. २,२५,०००/- इतक्या रक्कमेचे कोटेशन दिलेले आहे.

सदरचे खरेदीकामी थेट उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी यांना वैद्यकिय संचालक, उपवैद्यकिय संचालक यांचे समक्ष बोलावून चर्चा / वाटाघाटी करुन त्यांचेकडून त्यांनी दिलेल्या दरात आणखी सुट घेण्याचा प्रयत्न करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३४** **श्रीसाईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरिता Reagent Module व PT Cuvettes मागील मंजूर दराने खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२०३** श्री साईबाबा रुग्णालयातील प्रयोगशाळा विभागाकरीता Transasia कंपनीचे Blood Gas Analyser मशिन खरेदी करण्यात आलेले आहे. प्रयोगशाळा विभागाने डि.पी.क्र. ३९९८ दि. २६/११/२००८ अन्वये उपरोक्त मशिनसाठी लागणारे Reagent Module-8 pack व PT Cuvettes - 800 nos. ची तातडीने मागणी केलेली होती. सदरचे मशिन हे मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई या कंपनीचे असून सदर मशिनकरीता त्याच कंपनीचे Reagent Module व PT Cuvettes लागतात, इतर कंपनीचे चालत नाहीत. त्यानुसार दि. ०३/०१/२००९ चे मा. व्यवस्थापन समिती सभेतील मंजुरीन्वये मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल, मुंबई यांना खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आला होता.

| Sr. No. | Name of Kits | Packing | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Easy Stat Module | 800 ml | 3 pack | 22,218.00 | 66,654.00 |
| 2 | PT Cuvettes | 3000 Tubes | 1 Pack | 19,996.47 | 19,996.47 |
| | | | | **Total in Rs.** | **86,650.47** |

मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल, मुंबई यांनी पुरवठा आदेशाप्रमाणे उपरोक्त किटचा पुरवठा पुर्ण केलेला असून त्याचा वापर देखील झालेला आहे. सध्या औषध भांडारात उपरोक्त किट शिल्लक नाहीत व प्रयोगशाळा विभागास त्याची आवश्यकता आहे. सदर किटची सन २००९-१० या वार्षिक औषधे खरेदीमध्ये मागणी करण्यात आलेली आहे, परंतु उपरोक्त खरेदीमधील मटेरीयल उपलब्ध होण्यास अजुन २-३ महिन्याचा कालावधी लागणार आहे, त्यामुळे तुर्तास खालीलप्रमाणे किट खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे -

| Sr.No. | Name of Kits | Packing | Qty. | Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Easy Stat Module | 800 ml | 3 pack | 22,218.00 | 66,654.00 |
| 2 | PT Cuvettes | 3000 Tubes | 1 Pack | 19,996.47 | 19,996.47 |
| | | | | **Total in Rs.** | **86,650.47** |

तरी वरीलप्रमाणे किट मे. ट्रान्साशिया बायोमेडीकल लि., मुंबई यांचेकडून मागील मंजुर दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु. ८६,६५०.४७ चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३५ सन-२००८-०९ वार्षिक औषधे खरेदीमधील Inj.Heparin ५००० IU ५ ml Vial खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२०४** श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयाक ऑपरेशन थिएटर विभागात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या उपरोक्त इंजेक्शनकरीता सन २००८-२००९ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने मे. भैरवप्रसाद लाईफ सेव्हींग, अहमदनगर यांना इकडील पत्र क्र.१०९२२ दि. २६/०७/२००८ अन्वये खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

| Sr.No. | Name of Item | Make | Qty. | Rate Per | Total in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | INJ HEPARIN 5000 IU 5ML VIAL | GLAND | 2000 | 16.75 | 33500.00 |
| | | | | **Total in Rs.** | **33500.00** |

मे. भैरवप्रसाद लाईफ सेव्हींग, अहमदनगर यांनी त्यांचे दि. १७/०१/२००९ चे फॅक्स पत्रान्वये उपरोक्त पुरवठा आदेशातील Inj. Heparin ५००० IU ५ml Vial या इंजेक्शनचे दर वाढलेले असून सदर इंजेक्शन आपणास नविन दर रु. ६५.९२ झालेले आहे असे कळविले आहे. उपरोक्त इंजेक्शनकरीता तुलनात्मक दरांचे तक्त्यामध्ये Gland कंपनीचे दरामध्ये मे. एस. पी. डिस्ट्रीब्युटर्स, पुणे यांचे दर रु. ४६/- प्रती व्हायल असे दर आहेत, त्यांना उपरोक्त इंजेक्शनचे पुरवठयाबाबत दुरध्वनीवरुन विचारणा केली असता, त्यांनी सदर इंजेक्शन पुरवठा करण्यास नकार दिलेला आहे. तुलनात्मक दरांचे तक्त्यात या दोनच निविदाधारकांनी Gland कंपनीचे दर दिलेले आहेत, संस्थानचे रुग्णालयातील डॉ. विदयुत कुमार सिन्हा (कार्डीयाक सर्जन) व डॉ. नंदा राजपाल (भूल तज्ञ) यांना Gland कंपनीचेच इंजेक्शन पाहिजे असल्यामुळे मे. भैरवप्रसाद लाईफ सेव्हींग, अहमदनगर यांचेच नविन दराने उपरोक्त इंजेक्शन खरेदी करावे लागणार आहे, त्यांचे नविन दर खालीलप्रमाणे -

| Sr. No. | Name of Item | Make | Qty. | Annual Rate Per | Total in Rs. | New Rate Per | Total in Rs. | Excess Expendi-ture |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | INJ HEPARIN 5000 IU 5ML VIAL | Gland | 2000 | 16.75 | **33500.00** | 65.92 | **131840.00** | **98340.00** |

मे. भैरवप्रसाद लाईफ सेव्हींग, अहमदनगर यांचे नविन दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. ९८,३४०/- इतका जादा खर्च येणार आहे.

दि. २१/०१/२००९ रोजीचे टिपणीवरील वैद्यकिय संचालक यांचे आदेशानुसार M/s. Gland Pharma Ltd., Hyderabad या उत्पादक कंपनीकडून सदर इंजेक्शनचे दर मागविले आहे. त्यांनी त्यांचे दि. ३०/०१/२००९ चे पत्रान्वये आपले रुग्णालयासाठी स्पेशल दर प्रती व्हायल रु. ५७.२० इतके दिले असून सदर इंजेक्शन हे त्यांचे पुणे येथील अधिकृत विक्रेते मे. आनंद एंटरप्रायजेस हे पुरवठा करतील असे कळविले आहे. सदरचे दर हे मुळ निविदाधारक मे. भैरवप्रसाद लाईफ सेव्हींग, अहमदनगर यांचेपेक्षा प्रती व्हायल रु. ८.७२ ने कमी आहेत.

M/s. Gland Pharma Ltd., Hyderabad यांचे सुधारीत दरानुसार सदरचे खरेदीकामी रु. १,१४,४००/- इतका खर्च येईल, म्हणजेच सदरचे खरेदीकामी रु. ८०,९००/- इतका जादा खर्च येईल.

तरी M/s. Gland Pharma Ltd., Hyderabad यांचे अधिकृत विक्रेते मे. आनंद एंटरप्रायजेस, पुणे यांचेकडून वरीलप्रमाणे Inj. Heparin ५००० IU ५ml Vial २००० नग नविन दर रु. ५७.२० या दराने खरेदीस व याकामी येणाऱ्या रु.८०,९००/- चे जादा खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.३६ व्दारावती इमारतीचे आतील बाजूस गार्डन तयार करणे बाबत**

**निर्णय क्र.२०५** संस्थानने नव्याने बांधलेल्या व्दारावती इमारतीच्या आतील बाजुस गार्डन करणेसाठी रिकामी जागा सोडण्यात आलेली आहे. व्दारावती इमारतीच्या आत मधील बाजुस अंडाकृती जागा दोन ठिकाणी सोडण्यात आलेली आहे. या जागेत गार्डन करता येईल.ही जागा ३००० चौ फुट आहे. या जागेत लॉन करुन बाजुने फुलझाडे व शोभेची रोपे लावण्यात येतील.यासाठी खालील प्रमाणे खर्च आपेक्षित आहे.

०१ पोयटा ,१०.५ ब्रास xदर रु. ५०० /- प्रति ब्रास प्रमाणे रु.०५,२५०.००

०२ लॉन , ३००० चौ फुट ( १ x १ स्के फुट ) जपींग , दर रु १०.५० प्रति स्के.फुट प्रमाणे रु.३१,५००.००

०३ शेणखत , ०१ ट्रेलर x दर रु.२००० /- प्रति ट्रेलर प्रमाणे रु.०२,०००.००

०४ शोभेची रोपे रु.०७,०००.००

**एकुण ( रु.पंचेचाळीस हजार सातशे पन्नास ) रु.४५,७५०.००**

सदरचे गार्डन तयार करणेसाठी रु.४५,७५०.०० मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच बगीचा विभागातील कर्मचारी यांच्या कडुन सदरचे (मजुरीचे ) काम करुन घेण्यात येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/बगीचा विभागप्रमुख)

**विषय नं.३७ संस्थान मालकीच्या मौजे शिर्डी येथील सर्व्हे नं.१४८ पैकी मधील उर्वरित जमिनीमध्ये ०३ खोल्या असलेल्या सदनिकांचे भक्तनिवासस्थान इमारतीचे बांधकाम करणेबाबत**

**निर्णय क्र.२०६** **(अ)** श्रीसाईंच्या दर्शनासाठी, श्री साईं सत्चरित्राचे पारायण करणेसाठी, श्री साईंना साक्षी ठेवून केलेला नवस फेडणेसाठी, तसेच देश-विदेशातील अनिवासी भारतीय साईभक्त श्री क्षेत्र शिर्डी येथे आपल्या कुंटूंबासह येत असतात. अशा साईभक्त कुंटूंबांना श्री क्षेत्र शिर्डी येथे कमीत कमी तीन-चार, प्रसंगी सात-आठ दिवस राहून श्री साईंच्या दैनंदिन पूजा-अर्चेबरोबरच इतर धार्मिक कार्य करणेसाठी निवासस्थाने हवी असतात. तसेच अशा प्रकारची निवास व्यवस्था शिर्डी येथे होऊ शकेल काय, असे अनेक भक्त दररोज संस्थानच्या कार्यालयांशी संपर्क साधून चौकशी करीत असतात.

शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना सध्या संस्थानकडे उपलब्ध असलेली निवासस्थाने प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर जास्तीत जास्त ०२ दिवस उपलब्ध करुन दिली जातात. त्यापेक्षा जास्त दिवस निवासस्थाने उपलब्ध करुन दिल्यास, इतर सर्वसामान्य भक्तांची मोठया प्रमाणावर गैरसोय होते. तसेच आंध्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक, दिल्ली, आसाम आदि जास्त अंतर असलेल्या राज्यांतून येणारे साईभक्त कुंटूंबीय दोन दिवसांपेक्षा जास्त दिवस राहतात.

अशा सहकुंटूंब येणाऱ्या साईभक्तांसाठी शिर्डी येथे संस्थानमार्फत ०३ खोल्या असलेल्या सदनिकांचे भक्तनिवासस्थान (३ Rooms Flat Type Bhaktaniwasthan) इमारतीचे बांधकाम सर्व्हे नंबर १४८ पैकी मधील मोकळया जागेत करावे, अशी प्राथमिक चर्चा मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ ऑक्टोबर, २००८ रोजीचे सभेत झालेली होती. सदरहू सभेत मा.व्यवस्थापन सदस्य यांनी संस्थान वास्तुविशारद मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांचेशी अशा प्रकारच्या भक्तनिवासस्थान उभारणीसाठी प्राथमिक चर्चा करुन काही सूचना दिलेल्या होत्या. सदरहू सुचनांस अनुसरुन मे.काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांनी सदरहू इमारतीचे कच्चे बांधकाम आराखडे व याकामी येणाऱ्या ढोबळमानाने येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करुन दिनांक १४ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या पत्रान्वये इकडील कार्यालयास सादर केलेले आहे.

**(ब)** मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १४८ पैकी मध्ये एकूण ५ हे ६७ आर जमीन उपलब्ध आहे. सध्या जमिनीमध्ये धर्मशाळा नंबर १ व २ च्या इमारती, कॅन्टीन इमारत, व्दारावती इमारत, विद्युत जनित्र कक्ष इमारत व उर्वरित जागेत बाग-बगीचा आहे. या शिर्डी-नांदुर्खी रस्त्याचे पश्चिमेस असलेल्या सर्व्हे नंबर १४८ पैकी मधील प्लॉटच्या पश्चिम बाजूला उर्वरित अंदाजे ४५०० चौरस मीटर क्षेत्रामध्ये सदरहू इमारतीचे बांधकाम करता येईल, असे मत आहे.

मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांनी सादर केलेल्या प्राथमिक नकाशांमध्ये तळमजला सोडून चार मजली एकच इमारत (व्दारावती इमारतीप्रमाणे) प्रस्तावित केलेली आहे. या इमारतीमध्ये एक मजल्यावर २४ सदनिका याप्रमाणे एकूण ९६ सदनिका तसेच तळमजल्यावर ४० वाहने उभी राहू शकतील असे स्वतंत्र बंदिस्त वाहनतळ, स्वागत कक्ष, कॅन्टीन, स्टोअर, प्रसाधनगृहे, इमारतीत प्रवेश करणेसाठी विविध बाजूंनी तीन जिने, दोन लिफ्ट, तसेच उर्वरित मोकळया जागी वाहनतळ आदिची सोय प्रस्तावित केलेली आहे.

या इमारतीत खालीलप्रमाणे ०३ खोल्यांची एक सदनिका अशा ९६ सदनिका उपलब्ध होतील :

| अ. नं. | तपशील | खोलीचा आकार (मीटर) | क्षेत्रफळ (चौरस मीटर) |
|---|---|---|---|
| ०१ | लिव्हींग रुम (दिवाणखाना) | ३.०० x ३.४० | १०.२० |
| ०२ | शयनकक्ष १ (बेडरुम १) | ३.०० x ३.६० | १०.८० |
| ०३ | शयनकक्ष २ (बेडरुम २) | ३.०० x ३.६० | १०.८० |
| ०४ | संलग्न प्रसाधनगृह (शयनकक्ष २ साठी) | ३.०० x ३.४० | १०.२० |
| ०५ | प्रसाधनगृह | १.४० x २.२५ | ०३.१५ |
| ०६ | बाल्कनी | ३.०० x १.३५ | ०४.०५ |
| ०७ | लॉबी (वॉश बेसिन आदि) | १.४० x १.२० | ०१.६८ |
| | एका सदनिकेचा कारपेट एरिया | | **४४.०५** |

| | | | |
|---|---|---|---|
| | एका सदनिकेचा बिल्टअप एरिया | | **४९.६२** |
| | म्हणजेच | | **५३४ चौरस फुट** |

तसेच मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस, नाशिक यांनी सदरहू इमारतीचे बांधकामासाठी ढोबळमानाने विविध बाबींवरचा अंदाजित खर्च खालीलप्रमाणे दर्शविला आहे :

| अ. नं. | तपशील | बिल्टअप एरिया चौरस मीटर | अंदाजे दर रुपये / प्रति चौरस मीटर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | तळमजला | ३६८.०० | १०,०००/- | ००,३६,८०,०००/- |
| ०२ | पहिला मजला | १५७५.०० | १०,०००/- | ०१,५७,५०,०००/- |
| ०३ | दुसरा मजला | १५७५.०० | १०,०००/- | ०१,५७,५०,०००/- |
| ०४ | तिसरा मजला | १५७५.०० | १०,०००/- | ०१,५७,५०,०००/- |
| ०५ | चौथा मजला | १५७५.०० | १०,०००/- | ०१,५७,५०,०००/- |
| | **एकूण (अ)** | **६६६८.००** | | **०६,६६,८०,०००/-** |
| ०६ | बंदिस्त वाहनतळ | १२०७.०० | ०६,०००/- | ००,७२,४२,०००/- |
| ०७ | साईट डेव्हलपमेंट | २१५१.०० | ०२,०००/- | ००,४३,०२,०००/- |
| | **एकूण (ब)** | | | **०१,१५,४४,०००/-** |
| | **एकूण ( अ+ ब )** | | | **०७,८२,२४,०००/-** |
| ०८ | ५% कॉन्टीन्जन्सी | | | ००,३९,११,२००/- |
| | | | | **०८,२१,३५,२००/-** |
| ०९ | २% डब्ल्यू.सी.ई. | | | ००,१६,४२,७०४/- |
| | | | | **०८,३७,७७,९०४/-** |
| ११ | २% आर्किटेक्ट फी | | | ००,१६,७५,५५८/- |
| | **एकूण प्रकल्पाचा अंदाजे खर्च** | | | **०८,५४,५३,४६२/-** |
| | म्हणजेच पूर्णांकित | | | **०८,५४,५३,५००/-** |

उपरोक्तप्रमाणे संस्थान वास्तुविशारद मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांनी सर्व्हे नंबर १४८ पैकी मधील उपलब्ध जागेत ०३ खोल्या असलेल्या ९६ सदनिका असलेल्या इमारतीचे बांधकाम करणेसाठी अंदाजित रक्कम रुपये ८.५४ कोटी मात्र खर्च येईल. सदरहू इमारत बांधकामास तत्वत: मान्यता मिळालेस, संस्थान वास्तुविशारद मे. काबरे चौधरी आर्किटेक्टस्, नाशिक यांचेकडून विस्तृत बांधकाम नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन घेऊन विहीत पध्दतीने निविदा मागवुन कार्यवाही करता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी मे. हेमंत देवरे, नाशिक यांचेसह इतर आर्किटेक्ट यांचेकडून प्लॅन मागविण्यात यावेत, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.३८ संस्थानचे विश्वस्तनिधीतून अहमदनगर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास बोटी व इतर साहित्य उपलब्ध करुन देणे बाबत**

**निर्णय क्र.२०७** मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी त्यांचेकडील दि. २८/०६/२००७ रोजीचे पत्रान्वये आपत्ती व्यवस्थापनांर्तगत मदत व पून:र्वसन पूर्वतयारीसाठी संस्थानने FRP Boats व Safety Items खरेदी करुन दयावेत अशी विनंती केली होती. त्यास दि. २९/०६/२००७ रोजीचे सभेत मा.विश्वस्त समिती सभेत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरचे मटेरीअल खरेदी करणेकरीता वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यानुसार खालील पाच ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या होत्या.

| Sr.No | Suppliers Name |
|---|---|
| 01 | M/s. Marine Engineering works, Andheri (W), Mumbai |
| 02 | M/s. Gee Pee Reinforced Products pvt. Ltd., Gurgaon, Hariyana |
| 03 | M/s. Standard Friction Components Ltd., Mumbai |
| 04 | M/s. Vignesh Marine Technical Services Pvt, Ltd; Chennai |
| 05 | Sunny Water Sports Products Pvt. Ltd, Chinchwad, Pune |

मा. व्यवस्थापन समितीचे दि. २८/०७/२००७ रोजीचे सभेत सदरचे विषयावर चर्चा होऊन, आपत्ती व्यवस्थापन बोटी व इतर साहित्य खरेदी करणेसाठी आवश्यक तांत्रीक अधिकारी संस्थानकडे नाही. त्यामुळे उपरोक्त सिलबंद निविदा आजचे सभेपुढे न उघडता ते मा. जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविण्यात यावीत. याकामी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी निविदासादरकर्त्यांशी तज्ञांसह वाटाघाटी करुन अंतिम निर्णय घ्यावा. त्यानुसार संबंधितांना पुरवठा आदेश देण्यात यावा व बिलाची रक्कम संस्थानमार्फत अदा करण्यात यावी असे सदरहू सभेतील निर्णय क्र. ५२५ अन्वये ठरले होते.

त्यानुसार इकडील विभागामार्फत दि. १०/०८/२००७ रोजीचे पत्रान्वये सदरच्या प्राप्त निविदा उघडून संबंधीतांशी चर्चा व वाटाघाटी करणेसाठी व निवड केलेले साहित्य व पुरवठाधारक याबाबतची माहिती मा. जिल्हाधिकारी यांचे शिफारशीसह इकडील कार्यालयास कळविणेबाबत मा. जिल्हाधिकारी

अहमदनगर यांना पत्र देणेत आले. याबाबत यशदा, पुणे यांचेकडील तज्ञ श्री कर्नल मराठे यांनी संपूर्ण अभ्यास करुन सदर निविदांचे स्पेशिफिकेशनमध्ये तफावत असलेकारणाने सर्व निविदा रद्द करुन मा. जिल्हाधिकारी अ.नगर यांचेकडून प्राप्तझालेल्या यादी व स्पेशिफिकेशनप्रमाणे फेर निविदा मागविण्यात याव्यात असे कळविले. त्यानुसार वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात देऊन फेर निविदा मागविण्यात आल्या व निविदा सादर करणेसाठी ठेकेदार यांना दि. ०१/०८/२००८ पर्यंतची मूदत देण्यात आली त्यास अनुसरुन खालील ०४ सिलबंद निविदा प्राप्त झाल्या होत्या.

| Sr.No | Suppliers Name |
|---|---|
| 01 | M/s. Integral safety Engineers, Thane |
| 02 | Standard Friction Components Ltd., Mumbai |
| 03 | Gee pee Reinforced products, pvt., Ltd., Haryana |
| 04 | Sharp sales, Thane |

उपरोक्तपैकी अ.नं. ०१ , ०२ व ०४ चे ठेकेदारांनी विहीत मूदतीत सिलबंद निविदा सादर केली होती व अ.क्र. ०३ चे ठेकेदार यांची निविदा उशीरा प्राप्त झाली होती. सदर प्राप्त निविदा मा. निवासी उप जिल्हाधिकारी, तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अ.नगर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी इकडील दि. ०५/०९/२००८ रोजीचे पत्रान्वये पाठविण्यात आल्या. सदर प्राप्त निविदा मा. निवासी उप जिल्हाधिकारी अ.नगर यांचे दालनात दि. २२/०९/२००८ रोजी उघडण्यात आल्या व कर्नल श्री. मराठे, संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र, यशदा, पुणे यांना निविदाधारकांनी निविदेसोबत सादर केलेल्या तांत्रीक मुदयांचा अभ्यास करुन त्यांचा अहवाल सादर करणेबाबत विनंती करण्यात आली. त्यानुसार कर्नल मराठे यांनी दि. २४/१०/२००८ रोजी त्यांचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविला त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालय अ.नगर यांचेकडील जि. नि.क्र./आ.व्य/१२१/२००८, दि. ०१/१२/२००८ रोजीचे पत्राने खालील प्रमाणे अभिप्राय कळविला आहे.

**क्रमांक ०१ :- <u>रेस्क्यु एफआरपी बोट ओबीएमसह :-</u>**

दराबाबतचा तुलनात्मक तक्ता पाहता मे. शार्प सेल्स, ठाणे यांनी सर्वात कमी रुपये ४,७६,७९०/- दर नमूद केले आहे. पंरतू कर्नल मराठे यांनी त्यांच्या अहवालामध्ये नमूद केलेप्रमाणे मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन, मुंबई यांनी सदर साहित्याबाबत पुरविलेले स्पेसिफिकेशननुसार सदरचे साहित्य हे चांगल्या दर्जाचे असून सदरच्या एजन्सीने नमूद केलेले दर रुपये ४,७८,१००/- यामध्ये सदर साहित्यासोबत फ्लॅट बोर्ड पुरविणेस तयार असलेस सदर साहित्याची मागणी मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्ट्स, मुंबई यांचेकडेस नोंदविण्यास हरकत नाही.

**क्रमांक ०२ :- <u>इनफ्लेटेबल रेस्क्यु बोट ओबीएमसह :-</u>**

दराबाबतचा तुलनात्मक तक्ता पाहतां मे. इंटीग्रल स्फेटी इंजिनियर्स, ठाणे यांनी सर्वात कमी रुपये ३,८५,०००.०० दर नमूद केले आहे. पंरतू कर्नल मराठे यांनी त्यांच्या अहवालामध्ये नमूद केलेप्रमाणे मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्टय, मुंबई यांनी सदर साहित्याबाबत पुरविलेले स्पेसिफिकेशननुसार मक्युरी पोर्टेबल ओबीएम हे साहित्य हे चांगल्या दर्जाचे असून सदरच्या एजन्सीने नमूद केलेले दर रुपये ३,९२,६००.०० यामध्ये सदर साहित्यासोबत रिपेअर किट पुरविणेस तयार असलेस सदर साहित्याची मागणी मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन, मुंबई यांचेकडेस नोंदविण्यास हरकत नाही.

कर्नल मराठे, संचालक, आपत्ती व्यवस्थापन केंद्र, यशदा, पुणे यांचे अभिप्रायानुसार क्रमांक ३ ते १९ यामध्ये नमूद केलेले साहित्य हे तुलनात्मक तक्त्यामध्ये सर्वात कमी दर ज्या एजन्सीने नमूद केले आहे. त्यांचेकडून खरेदी करणेत यावे. याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. तथापी क्रमांक १२, रिफ्लेक्टीव जॅकेट मध्ये नमूद केलेले साहित्य मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्टस, मुंबई यांचेकडून खरेदी करणेत यावे कारण त्यांचे मटेरीअल चांगल्या दर्जाचे आहे, असे नमूद केले आहे.

| क्रमांक | साहित्याचा तपशिल | कर्नल मराठे, यशदा, पुणे यांचे अभिप्रायानुसार खरेदी करावयाच्या एजन्सीचे नांव | एका नगाची खरेदीची किंमत रुपये |
|---|---|---|---|
| ०३ | वॉटरप्रुफ टॉर्च (रिचार्जेबल) | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | ४,१००.०० |
| ०४ | लाईफ जॅकेट फोम टाईप | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | १,३५०.०० |
| ०५ | लाईफ बोया | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | २,१५०.०० |
| ०६ | एसएआर लाईट | मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्ट्स, मुंबई | ९,६५०.०० |
| ०७ | सेफ्टी हेल्मेट | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | १६०.०० |
| ०८ | पोर्टेबल जनरेटर सेट | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | १,३५,०००.०० |
| ०९ | रीलीफ टेन्ट | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | ९,८००.०० |
| १० | गम बुटस | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | ६८५.०० |
| ११ | फायर इक्टसींगवीशर | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | २,१५०.०० |
| १२ | रिफ्लेक्टीव जॅकेट | मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्ट्स, मुंबई | ४७०.०० |
| १३ | स्टेचर फोल्डेबल | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | ८,१००.०० |
| १४ | नायलॉन रोप १६ mm dia | मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्ट्स, मुंबई | ७,४४०.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | वायर रोप ६ मीटर | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | १,५५०.०० |
| १६ | मनिला रोप ४०० मीटर | मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्ट्स, मुंबई | ११,०००.०० |
| १७ | हेड पुलीज (सींगल) | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | १२,८००.०० |
| १८ | हेड पुलीज (डबल) | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | २८,०००.०० |
| १८ | गॅस कटर | मे.इंटीग्रल सेफ्टी इंजिनियर्स, ठाणे | ३,५००.०० |

उपरोक्त प्रमाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्राप्त झालेल्या अहवालानुसार सदरचे संपूर्ण मटेरीअल खरेदी करणेसाठी एकुण रु. ६०,९७,५००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. तथापी महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र. सा. सं. वि- २००७/२८४/(४५)- का. सोळा, मंत्रालय, मुंबई- ४०००३२ दि. ०२.०८.२००७ अन्वये रु. ४९,४२,८००/- मात्र इतक्या रकमेची साधनसामुग्री खरेदी करुन उपलब्ध करुन देण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे अपेक्षित खर्च हा शासन मान्यतेच्या मर्यादेबाहेर होऊ नये याकरीता आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी मागणी केलेल्या मटेरियलपैकी Resuce fibre boat- ०६ नग ऐवजी ०४ नग, Head Pulleys (Single)- १० नग ऐवजी ०५ नग आणि Head Pulleys (Double)-१० नग ऐवजी ०५ नग अशा प्रकारे कमी केल्यास एकुण रु. ४९,३७,३००/- मात्र इतका खर्च येईल. याकामी पुरवठाधारक मे. इंटीग्रल सेफ्टी इंजिनिअर्स, ठाणे व मे. स्टॅण्डर्ड फ्रिक्शन कांपोनन्टस्, मुंबई यांना खालील तपशिलाप्रमाणे साहीत्य खरेदीसाठी पुरवठा आदेश देता येईल.

**A) Integral Safety Engineers,Thane:- Integral Safety Engineers,**

| S.No | Description of Item | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | WATER PROOF TORCH (Rechargeable) | 20 | Nos | 4,100.00 | 82,000.00 |
| 2 | LIFE JACKET FOAM TYPE | 300 | Nos | 1,350.00 | 405,000.00 |
| 3 | LIFE BUOYS | 40 | Nos | 2,150.00 | 86,000.00 |
| 4 | SAFETY HELMET | 100 | Nos | 160.00 | 16,000.00 |
| 5 | PORTABLE GENERATOR (3500 Watts) | 2 | Nos | 135,000.00 | 270,000.00 |
| 6 | RELIEF TENT | 20 | Nos | 9,800.00 | 196,000.00 |
| 7 | GUMBOOTS | 50 | Nos | 685.00 | 34,250.00 |
| 8 | FIRE EXTINGUISHER | 15 | Nos | 2,150.00 | 32,250.00 |
| 9 | STRETCHER FOLDABLE | 20 | Nos | 8,100.00 | 162,000.00 |
| 10 | WIRE ROPE 6 MT | 10 | Nos | 1,550.00 | 15,500.00 |
| 11 | HEAD PULLEYS (Single) | 5 | Nos | 12,800.00 | 64,000.00 |
| 12 | HEAD PULLEYS (Double) | 5 | Nos | 28,000.00 | 140,000.00 |
| 13 | GAS CUTTER | 10 | Nos | 3,500.00 | 35,000.00 |
| | | | **Total Amount :** | | **Rs.1,538,000.00** |

**B) Standard Friction Components LTD., Mumbai :-**

| S.No | Description of Item | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | RESCUE FIBRE BOAT WITH OBM AND WITH FLAT BOARD. | 4 | Nos | 478,100.00 | 1,912,400.00 |
| 2 | INFLATABLE RESCUE BOAT WITH OBM AND WITH REPAIR KIT. | 3 | Nos | 392,600.00 | 1,177,800.00 |
| 3 | SEARCH RESCUE LIGHT (DIVING TORCH) | 10 | Nos | 9,650.00 | 96,500.00 |
| 4 | REFLECTIVE JACKET | 60 | Nos | 470.00 | 28,200.00 |
| 5 | NYLON ROPES 400 MT | 10 | Nos | 7,440.00 | 74,400.00 |
| 6 | MANILA ROPE 400 MT | 10 | Nos | 11,000.00 | 110,000.00 |
| | | | **Total Amount :** | | **Rs.3,399,300.00** |

वरीलप्रमाणे पुरवठादार यांचेकडून उपरोक्त दर्शविलेल्या तपशिलानुसार साहित्य खरेदीसाठी मान्यतेसाठीचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदरहू साहित्य जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचेकडेस सोपविण्यासाठी मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.३९ संस्थानतर्फे सध्या चालू असलेल्या विविध बांधकामांकरीता मुदतवाढ देणे बाबत**

**निर्णय क्र.२०८ (अ) संस्थान रुग्णालयासाठी सांडपाणी प्रक्रीया संयत्र उभारणेकामाचे ठेकेदार डेक्कन एनव्हायरोमेंटल कन्सल्टंट प्रा.लि.,पुणे यांचे मुदतवाढीबाबत.**

श्री साईनाथ व श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता सांडपाणी प्रक्रिया संयंत्र उभारणेचे काम ठेकेदार डेक्कन एनव्हायरोमेंटल कन्सलटंट प्रा.लि., पुणे यांना इकडील जा.क्र. एसएसएसटी/बांध./४०२४/२००८ व जा.क्र. एसएसएसटी/ बांध/४०२५/२००८ दि. १७/०३/२००८ अन्वये दोन्ही रुग्णालयांसाठी कार्यादेश देण्यात आले आहेत. कार्यादेशानुसार काम पूर्ण करण्याचा कालावधी हा ०३ महीने प्रत्येकी असा होता. परंतू मा. अध्यक्ष सो़ा यांचे सूचनेनुसार सदरचे काम तात्पुरते स्थगित ठेवणेत आले. नंतर याबाबत मा. कार्यकारी अधिकारी यांचेशी चर्चा करण्यात आली व दि.०७/०७/२००८ रोजीचे पत्रान्वये काम सुरु करणेबाबत ठेकेदार यांना कळविण्यात आले. त्यानुसार ठेकेदार यांनी पुढील कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यास सुरुवात केली व सदर कामाचे नकाशे कन्सलटंट मे. एनस्ट्रक्ट कन्सलटींग इंजि. प्रा.लि., पुणे यांचेकडे प्रमाणीत करणेस सादर केले. सदर नकाशांमध्ये बऱ्याच राहिलेल्या त्रुटींची अनेकदा दुरुस्ती झालेनंतर सदरचे नकाशे दि. ०२/०१/२००९ रोजी प्रमाणीत करण्यात आहे. त्यानुसार ठेकेदार यांनी पुढील कामास सुरुवात केलेली आहे.

सदर साईटवर दि. २८/०२/२००९ अखेर खालीलप्रमाणे कामे झालेली आहे.

१. खोदाई काम पूर्ण
२. पी.सी.सी. काम पूर्ण
३. राफ्ट फुटींगचे काम पूर्ण
४. पडदीचे स्टील बाईडींग व शटरींगचे काम प्रगतीपथावर आहे.

ठेकेदार यांनी दि. ०२/०२/२००९ (आवक नं. ६९५७ दि. २६/०२/२००९) रोजीचे पत्रान्वये कळविले आहे की, "सदर प्रकल्पाचे आर.सी.सी. ड्रॉईंगस हे दि. ०२/०१/२००९ रोजी राहिलेल्या त्रुटींची पूर्तता झालेनंतर प्रमाणीत करण्यात आले आहे. सदर प्रकल्पाचे फाउंडेशनचे काम आम्ही पूर्ण केलेले आहे व मशिनरी खरेदीची प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. तसेच काही मशिनरी खरेदी झालेली आहे व तयार आहे. साईटवरील काही कारणांमुळे प्रकल्पास पूर्ण करण्यास विलंब झालेला आहे. त्यामुळे आम्ही वेळेत काम पूर्ण करु शकलो नाही.

तरी आम्हास काम पूर्ण करण्यासाठी दि. ३१/०३/२००९ अखेर पर्यंत मूदतवाढ मिळावी अशी विनंती आहे ". असे ठेकेदार यांनी कळविले आहे.

याबाबत प्रकल्पाचे कन्सलटंट मे. एन्ट्रक्ट कन्सलटींग इंजि. प्रा.लि., पुणे यांचा अभिप्राय घेण्यात आला त्यांनी कळविले की, " ठेकेदार यांचे उपरोक्त बाबींचा विचार करता व काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे दृष्टीने ठेकेदार यांना दि. ३१/०३/२००९ पर्यंत मदूतवाढ देणेस हरकत नाही". उपरोक्त बाबींचा विचार करता ठेकेदार यांन सदरचे कामासाठी दि. ३१/०३/२००९ पर्यंत मूदतवाढ देता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्त चर्चा होऊन, सदरहू ठेकेदार यांना दिनांक ३० एप्रिल,२००९ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**ब) <u>संस्थानचे सिन्नर औद्योगीक वसाहत येथील पालखी थांब्याचे बांधकामाचे मूदतवाढीबाबत</u> ..**

संस्थानचे सिन्नर (मुसळगांव ) औद्योगीक वसाहत येथील पालखी थांब्याचे उर्वरीत बांधकाम मे. श्रृती कन्स्ट्रक्शन, सिन्नर यांना जा.नं. ११७३ दि. १८/०१/२००८ कार्यादेशान्वये देण्यात आले आहे. निविदा व करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत ०६ महिने (दि. ०२.०२.२००८ ते दि. ०१.०८.२००८) होती. सदरचे कालावधीमध्ये ठेकेदार यांनी कामपूर्ण न केल्याने व ठेकेदार यांना आलेल्या अडचणी विचार होता दि. ०६.०९.२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन सभेत नि.क्र.६४०/१४ अन्वये पालखी थांब्याचे उर्वरीत कामातील स्ट्रक्चरल स्टीलसाठी भावफरक देणेबाबत तसेच स्ट्रक्चरल स्टीलचे कामासह सर्व काम पूर्ण करणेसाठी दोन महिने मूदतवाढ देण्यात आली आहे.

सदरचे काम मूदतीत करणेबाबत ठेकेदार यांचेकडे वेळोवेळी समक्ष तसेच दुरध्वनीवर पाठपुरवा करण्यात आला. तसेच मंजूर करण्यात आलेल्या वाढीव मदूतीत काम पूर्ण करावे अन्यथा निविदा शर्तीनुसार दंड वसूल करण्यात येईल. याबाबत इकडील जा.नं. १८८८१/२००८ दि. २९/१०/२००८ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

दि. २१.०२.२००९ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांना काम करताना खालीलप्रमाणे आलेल्या अडचणीमुळे कामास विलंब झाल्याचे कळविले आहे.

०१. छताकरीता निविदेतील आयटेममधील स्पेशीफिकेशनप्रमाणे ०.८० एम एम जाडीचे जी.आय.पत्रे बसविणेची तरतूद असून सदर पत्राचे उत्पादन बऱ्याच कालावधी पासून कंपनीने बंद केलेले आहे. तसेच ०.६० एम एम जाडीचे पत्रे ऑर्डराप्रमाणे कंपनी बनवून देते. त्यामुळे ऑर्डर दिल्यानंतर दिड महिण्याने पत्रे मिळताच तसेच दरम्यानचे काळात वाहतुक दरांचा संप असल्याने कामास विलंब झाला.

०२. विजेचे भारनियमनामुळे पालखी शेडचे स्ट्रक्चरल स्टीलमधील कॉलम, ट्रसेसचे फॅब्रीकेशनचे कामास विलंब झाला सद्यपरिस्थीत पालखी थांब्याचे ठेकेदार यांचे खालीलप्रमाणे कामे बाकी आहे.

i. रंगकाम - रंगकामाचा एक कोट बाकी
ii. साईट डेव्हलपमेंट - काम बाकी
iii. मुख्य शेडचे - कोटा पॉलीशिंगचे काम बाकी
iv. कंम्पाऊंड भिंत - एम.एस. जाळी बसविणे, एम.एस. गेट बसविणे
v. टॉयलेट ब्लॉक - दरवाजे शटर, नळ फिटींग, ड्रेनेज लाईन सेप्टीक टँक पर्यंत
vi. इलेक्ट्रीक वर्क - काम बाकी
vii. पिण्याचे पाण्याची लाईन टाकणे - काम बाकी

उपरोक्तप्रमाणे बाकी असलेले कामे पूर्ण करणेकरीता ठेकेदार श्रृती कन्स्ट्रक्शन यांनी दिनांक २१.०२.२००९ चे पत्रान्वये मार्च अखेर मूदतवाढ मागितलेली आहे. याबाबत आर्किटेक्ट निकम पा.असो. श्रीरामपूर यांचा अभिप्राय घेण्यात आला आहे. ठेकेदार यांना स्ट्रक्चरल स्टिलचे फॅब्रीकेशन व इरेक्शन करणेकामी विजेच्या भारनियमनामुळे अडचणी आल्यामुळे उर्वरीत कामे पूर्ण करणेकरीता मार्च-२००९ अखेर मूदतवाढ देणेबाबत आर्किटेक्ट यांनी शिफारस केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्त चर्चा होऊन, सदरहू ठेकेदार यांना दिनांक ३० एप्रिल,२००९ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**क) संस्थानचे पांढुर्ली ता. सिन्नर येथील पालखी थांब्याचे बांधकामाचे मूदतवाढीबाबत.**

संस्थानचे पांढुर्ली ता. सिन्नर येथील पालखी विसावा थांब्याचे बांधकाम मे. एन.एस.बनकर पा. श्रीरामपूर यांना जा.नं. ६८१ दिनांक १२.०१.२००७ चे कार्यादेशान्वये देण्यात आले आहे. निविदा व करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत ०६ महिने होती. सदरचे कालावधीमध्ये ठेकेदार यांनी काम पूर्ण न केल्याने व ठेकेदार यांना आलेल्या अडचणी विचारात घेता दि. ०६/०९/२००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र. ६४०/१४ अन्वये पालखी थांब्याचे स्ट्रक्चरल स्टीलसाठी भावफरक देणेबाबत तसेच सदर काम पूर्ण करणेकरीता दोन महिने मूदतवाढ देणेत आली आहे.

०१. सदरचे काम मूदतीत करणेबाबत ठेकेदार यांचेकडे वेळोवेळी समक्ष तसेच दुरध्वनी व्दोर पाठपुरावा करण्यात आला तसेच मंजूर करण्यात आलेल्या वाढीव मूदतीत काम पूर्ण करावे अन्यथा निविदा शर्तीनुसार दंड वसूल करण्यात येईल. याबाबत इकडील जा.नं. १५८७८/२००८ दि. २७/१०/२००८ रोजीचे पत्रान्वये ठेकेदार यांना कळविण्यात आलेले आहे. दि. १९.०२.२००८ रोजीचे पत्रान्वये विजेचे भारनियमनामुळे पालखी शेडचे स्ट्रक्चरल स्टीलचे फ्रॅब्रीकेशन व इरेक्शनचे कामास विलंब झालेला आहे. सद्यस्थितीत पालखी थांब्याचे ठेकेदार यांचे खालील कामे बाकी आहे.

i. मुख्य शेड :- छताचे पत्रे बसविणे, कोटा फ्लोरींग व पॉलीशींगचे काम बाकी.
ii. टॉयलेट ब्लॉक :- रंगकाम, दरवाजे शटर बसविणे, नळ फिटींग, सेप्टीक टँक स्लॅब
iii. किचन शेड व स्टोअर रुम :- फ्लोरींग, रंगाकम व किचन शेड छताचे पत्रे बसविणे
iv. कंम्पाउंड भिंत :- चेनलिंक जाळी बसविणे, गेटची उभारणी करणे.
v. इलेक्ट्रीक वर्क :- काम बाकी
vi. साईट डेव्हप्लमेंट :- काम बाकी

उपरोक्त बाकी असलेली कामे पूर्ण करणेकरीता ठेकेदार बनकर पाटील असो. श्रीरामपूर यांनी दिनांक १९/०२/२००९ पत्रान्वये मार्च अखेर मूदतवाढ मिळणेबाबत विनंती केली आहे. याबाबत आर्किटेक्ट निकम पा. यांचा मूदतीबाबत अभिप्राय घेण्यात आला आहे. ठेकेदार यांना स्ट्रक्चर स्टीलचे फॅब्रीकेशन व इरेक्शन करणेकामी विजेचे भारनियमनामुळे अडचणी आल्यामुळे उर्वरीत कामे पूर्ण करणेकरीता मार्च-२००९ अखेर मूदतवाढ देणेबाबत आर्किटेक्ट यांनी शिफारस केली केली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्त चर्चा होऊन, सदरहू ठेकेदार यांना दिनांक ३० एप्रिल,२००९ अखेर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं,४०** **वावी ते सायाळे मार्गे शिर्डी रस्ता कि.मी.०/०० ते २७/०० ची सुधारणा करणेकामी प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकाबाबत.**

**निर्णय क्र.२०९** शिर्डी येथे साईबाबांचे दर्शनासाठी मुंबई परिसरातून येणारे पदयात्री साईभक्त जे जवळचा मार्ग म्हणून वावीवरुन सायाळे मार्गे शिर्डी या रस्त्याने येतात. सदरचा रस्ता खराब झालेला असल्याने रस्त्याचे खडीकरणासह डांबरीकरण करणे गरजेचे आहे. सदरहू कामाचे अंदाजपत्रक तयार करणेबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मा. अध्यक्ष सो., यांनी मा. अधिक्षक अभियंता, सार्वजनीक बांधकाम मंडळ, नाशिक यांना दि. ०८/११/२००८ चे पत्रान्वये कळविले होते. त्यास अनुसरुन मा. अधिक्षक अभियंता, सा.बां.

मंडळ, नाशिक यांनी दि. ०३/१२/२००८ चे पत्राव्दारे अंदाजपत्रक सादर केले असून सदर अंदाजपत्रकानुसार वावी ते सायाळे मार्गे शिर्डी या अस्तित्वातील रस्त्याची सद्यस्थिती व करावयची कामे याबाबत तसेच वावी ते सायाळे मार्गे शिर्डी या रस्त्याची एकूण २७ कि.मी. लांबीचे रस्त्याची विविध विभागांचे हद्दीनुसार तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | वावी ते सायाळे | - | ग्रामीण मार्ग क्र १४५ | - | ७.२० कि.मी. |
| ०२. | सायाळे ते डोऱ्हाळे | - | प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ०५ | - | १२.३० कि.मी. |
| ०३. | डोऱ्हाळे ते कनकुरी | - | ग्रामीण मार्ग क्र.६० | - | १.५ कि.मी. |
| ०४. | कनकुरी ते शिर्डी | - | ग्रामीण मार्ग क्र. ७५ | - | ६.० कि.मी |
| | | | एकूण लांबी | - | २७ कि.मी. |

उपरोक्त २७ कि.मी. लांबीचे मार्गात एकूण १८ अरुंद मोऱ्या व १० अरूंद पेव्हडीप आहेत. शिर्डी पासून ०१ कि.मी. लांबीचा रस्ता हा संस्थानचे निधीतून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांचे मार्फत करण्यात येणार असून डोऱ्हाळे ते शिर्डी या ६.५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम संस्थानचे निधीतून सार्वजनीक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे.

सार्वजनीक बांधकाम मंडळ, नाशिक यांनी सदर रस्त्याची सुधारणा करणेकामी २००८-२००९ दरसुचीनुसार अंदाजपत्रकात खालीलप्रमाणे तरतुदी दिलेल्या आहेत.

०१) अस्तित्वातील रस्त्याची ३.५७ मी. रुंदीची डांबरी धावपट्टी असून सुधारीत रस्त्याकरीता ७.०० मी. डांबरी धावपट्टीचे रुंदीकरण करणे. रुंदीकरणासाठी मुरुम ब्लॅ.केटींग व ६० मी मी व ४० मी मी खडीने रुंदीकरण करणे.

०२) खडीकरणाचे रुंदीकरणानंतर पूर्ण ०७ मी. रुंदीसाठी ७५ मी.मी. जाडीचे बी.बी.एम धरण्यात आले आहे.

०३) सुधारीत अंदाजपत्रकात ७.०० मी. रुंदीसाठी ५० मी.मी. जाडीचे ३.५% डांबराचे प्रमाण असलेले बी.एम. चा थर करणे.

०४) ७.०० मी. रुंदीसाठी ४० एम एम जाडीचे अस्फालटीक कॉक्रीट करणे.

०५) २७ कि.मी. लांबीचे रस्त्यातील एकूण १० ठिकाणी लहान पुलाची पुर्नबांधणी व १८ ठिकाणी मोऱ्यांची पुर्नबांधणी करणे

०६) दोन ठिकाणी ओव्हरहेड ग्रॅन्ट्रीज, ६ ठिकाणी संगमस्थान सुधारणा करणे

०७) सामाजीक वनीकरणाकडून ०३ वर्षाच्या कालावधीकरीता संगोपन व देखभाल मिळून येणारी आधारभुत किंमत विचारत घेण्यात आली आहे.

०८) बसबेचे बांधकाम करणे

उपरोक्त तरतुदीनुसार अंदाजपत्रकातीत बाबीसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| | |
|---|---|
| ०१. रस्त्याचे रुंदिकरणासह खडीकरण व डांबरीकरण | - रु.३३,६१,२६,५२९.०० |
| ०२. लहान पुल १० व अरुंद मोऱ्या १८ | - रु.४,५६,१९,२००.०० |
| ०३. गटर | - रु.८८,०४,९५०.०० |
| ०४. निवारा शेड - ४ | - रु.४०,००,०००.०० |
| ०५. ओव्हरहेड गॅन्ट्रीज - २ | - रू.२५,००,०००.०० |
| ०६. बस वे - ६ | - रु.३६,००,०००.०० |
| ०७. अरबोरीकल्चर | - रु.२७,००,०००.०० |
| ०८. रोडसाईड फर्निचर | - रु.२७,००,०००.०० |
| | - रु.४०,६०,५०,६७९.०० |
| अधिक एस्क्लेशन २०% | - रु. ८१,२१०,१३६.०० |
| | रु. ४८,७२,६०,८१४.०० |
| अधिक कन्टेनजन्सीज ४% | रु. १,६२,४२,०२७.०० |
| अधिक २% | रु. ८१,२१,०१४.०० |
| एकूण | रु. ५१,१६,२३,८५५.०० |
| अधिक सेन्टेज चार्जेस ४% | रु. २,०४,६४,९५४.०० |
| | रु. ५३,२०,८८,८०९.०० |

अशाप्रकारे सदर कामासाठी अंदाजे रुपये ५३.२१ कोटी रकमेचे अंदाजपत्रक सार्वजनीक बांधकाम मंडळ, नाशिक यांनी सादर केले आहे. सदरहू अंदाजपत्रकातील एकूण २७ कि.मी.लांबीचे रस्त्यापैकी संस्थानमार्फत सुरु असलेल्या ७.५ कि.मी. रस्त्याची लांबी वगळावी लागेल.

उपरोक्तकामासाठी संस्थानतर्फे निधी उपलब्ध करुन द्यावयाचा झाल्यास त्यासाठी शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे. वरील काम हे मोठ्या खर्चाचे असल्याने त्यासाठी संस्थानतर्फे एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करणेऐवजी सध्या फक्त डोऱ्हाळे ते जवळके या सुमारे ०६ कि.मी. लांबीचे रस्त्यासाठी निधी उपलब्ध करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,प्रथम टप्प्यात डोऱ्हाळे ते जवळके ६ कि.मी.लांबीचे रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करुन घेणेस व याकामी विहित पद्धतीने शासन मान्यता घेणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.४१** **औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या परिसरातील गार्डनची दुरुस्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.२१०** मा.प्राचार्य श्रीसाईबाबा औद्यगिक प्रशिक्षण केंद्र, शिर्डी. यांनी इमारती समोरील जागेत तसेच कार्याशाळेच्या समोरील जागेत, बाजूस लॉन व फुलझाडे लावुन मिळणेबाबत कळविलेले आहे.

शैक्षणिक संकुल परिसरातील इमारती भोवती वेग-वेगळया प्रकारचे गार्डन करण्यात आलेले आहे. श्री साईबाबा औद्यगिक प्रशिक्षण केंद्र, परिसरातील गार्डन आता खराब झालेने या गार्डनची दुरुस्ती करता येईल. सदर गार्डनची दुरुस्ती करुन या ठिकाणी शोभेची रोपे, फुलझाडे, लॉन लावण्यत येईल. यामुळे येथील वातावरण स्वच्छ व सुंदर राहील. श्री साईबाबा औद्यगिक प्रशिक्षण केंद्र इमारत परिसरातील बागेची दुरुस्ती करणेसाठी खालीलप्रमाणे खर्च आवश्यक आहे. या बागेचे क्षेत्रफळ ८००० चौ.फुट आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | पोयटा, २२.५ ब्रास x दर रु. ५०० /- प्रति ब्रास प्रमाणे | रु.११,२५०.०० |
| ०२ | लॉन, ८००० चौ फुट<br>(१ x१ स्के फुट ) जपींग , दर रु १०.५० प्रति स्के.फुट प्रमाणे | रु.८४,०००.०० |
| ०३ | शेणखत, ०२ ट्रेलर x दर रु.२००० /- प्रति ट्रेलर प्रमाणे | रु.०४,०००.०० |
| ०४ | सिंगल सुपर फॉस्फेट ०२ गोणी दर रु.४००/- प्रति गोणी प्रमाणे | रु. ८००.०० |
| ०५ | शोभेची रोपे | रु.०५,०००.०० |
| | एकुण ( रु.एक लाख पाच हजार पन्नास ) | रु.१,०५,०५०.०० |

वरीलप्रमाणे सदरचे गार्डन तयार करणेसाठी रु.१,०५,०५०.०० खर्च अपेक्षित आहे. तसेच बगीचा विभागातील कर्मचारी यांच्याकडून सदरे (मजुरीचे) काम करुन घेण्यात येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

**विषय नं.४२** **इलेक्ट्रीक मोटारींचे रिवाईडिंगसाठी मटेरिअल खरेदी करणेसाठी वार्षिक दर मंजूरी करणे बाबत.**

**निर्णय क्र.२११** पाणी पुरवठा विभागाकडील वाईडिंग शॉप मधून पाणी पुरवठा, प्रसादालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वाहन विभाग, रुग्णालय या विभागातील एकत्रीत अंदाजे १५० मोटारींचे मेन्टनन्स रिवायडिंग केले जाते. त्याकरीता मागील वर्षी वेळोवेळी अंदाजे रु.४०,०००/- मात्रचे वाईडिंग मटेरीयल कोटेशन मागवून खरेदी करण्यात येऊन पाणी पुरवठा वाईडिंग शॉप मधून कामे करुन दिली आहे.

प्रत्येक वेळी वेग-वेगळया वाईडिंग वायरची मोटार मेन्टनंन्ससाठी येते त्यामूळे पूर्ण वर्षाची वार्षिक खरेदी करता येत नाही. तसेच विशिष्ट गेजची वायर खरेदी केल्यास तिचा वापर झाला नाही तर वाईडिंग वायर तशीच शिल्लक राहते. तसेच प्रत्येक वेळी मंजुरी घेणे कोटेशन मागविणे ते उघडून नंतर ऑर्डर देणे यामध्ये बराच वेळ निघुन जातो. प्रसादालय व पाणी पुरवठा सारख्या विभागात काम बंद ठेवता येत नाही. तसेच कामात अडथळे निर्माण होतात.

याकरिता वाईडिंग करीता आवश्यक असणारे मटेरीयल खरेदी करण्यासाठी वार्षिक भाव घेऊन त्यांना स्टॅडींग ऑर्डर दिल्यास प्रत्येक वेळी मंजूरी घेण्यास वेळ जाणार नाही. कामात अडथळे येणार नाही. याकरीता येणारा खर्च- पाणी पुरवठा विभाग- मशिनरी व दुरुस्ती देखभाल खर्च सन २००९-१० चे बजेट रु. ६०,०००/- मात्र मधून करता येईल. रिवायडिंगसाठी लागणारे मटेरियल एक वर्षाकरिता पुरविणेसाठी कोटेशन बोलविण्यास व न्युनतम कोटेशनधारकास रिवायडिंग मटेरियल पुरविणेस वार्षिक आदेश देण्यातस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.४३** **अन्नपाकिटे तयार करणेसाठी ठेकेदाराचे नियुक्ती करणेबाबत**

**निर्णय क्र.२१२** साईभक्तांना सकाळी ७.०० ते १०.०० या वेळेत प्रति पाकीट रु.३.०० प्रमाणे सवलतीचे दरात नाष्टापाकीटाची विक्री करण्यात येत आहे. एका नाष्टा पाकीटात ५ पु-या , सुकी भाजी (ऊसळ) व गोड पदार्थ म्हणून बर्फी वडी देण्यात येत आहे. सदर पदार्थ बनविणे व प्लास्टीक पिशवीत वेगवेगळे भरुन

नाष्टापाकीटे तयार करावी लागतात. सन २००५ पासून नाष्टापाकीटे बनविणेचे काम सौ. रोहिणी राजेंद्र कोते व्दारा, श्री साईबाबा समाज विकास संस्था, शिर्डी या बचतगटास उक्ते टेंडरपध्दतीने देण्यात आलेले आहे. सन २००८-२००९ या कालावधीसाठी प्रति पाकीटास ००/६५ पैसे अधिक नियमानुसार सर्व्हिस टॅक्स असा दर दिलेला आहे. याशिवाय त्यांचे कामगारांना एक वेळ भोजन व चहा मोफत देण्यात येतो. सदर टेंडरची मुदत दिनांक ३१/०३/२००९ रोजी संपत असून ठेकेदार यांनी दि. ३१/०३/०९ नंतर पुढील वर्षाचे कालावधीसाठी काम करण्यास तयार असलेबाबत दिनांक १३/०१/२००९ चे अर्जाव्दारे कळविलेले आहे. मात्र सध्याचे प्रति पाकीटास ००/६५ पैसे ऐवजी रु.०१/- मजूरी मिळावी व नियमानुसार सर्व्हीस टॅक्स संस्थानने द्यावा अशी विनंती केलेली आहे.

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | कामाचे स्वरुप | सध्याचा दर | मागणी केलेला दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | सौ. रोहिणी राजेंद्र कोते व्दारा , श्री साईबाबा समाज विकास संस्था , शिर्डी | पुरी,भाजी बनविणे व पॅकींग करणे (नाष्टापाकीट बनविणे) | ००/६५ पै. + सर्व्हीस टॅक्स | रुपये ०१/- सुमारे ५४% वाढ + सर्व्हीस टॅक्स | कामगारांना एक वेळ मोफत भोजन ,चहा दिले जाते ते मिळावे. |

दिवसेंदिवस साईभक्तांची गर्दी वाढलेली असून गर्दीचे प्रमाणात अन्नपाकीटांची संख्या वाढ झालेली असल्याने ठेकेदारांना कामगार संख्येत वाढ करावी लागलेली आहे. तसेच कामगारांचे पगारातही वाढ झालेली आहे.

तरी सदरचे ठेकेदार यांना दिनांक ०१/०४/२००९ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी नाष्टापाकीटे बनविणेकामी ५४% दरवाढीसह मुदतवाढ देणेस अथवा दिनांक ०१/०४/२००९ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी नवीन ठेकेदार नियुक्तीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देउन निवीदा मागणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नाष्टा पाकिटे बनविणेकामी परिसरातील दारिद्र्यरेषेखालील महिला बचत गटांकडून निविदा मागविणेत येऊन निर्णय घ्यावा व निर्णय होईपर्यंत सध्याचे ठेकेदारास तूर्त २ महिने मुदतवाढ देण्यात यावी,असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.४४** **मोतीचूर लाडू व बर्फी बनविणेकामी ठेकेदाराची नियुक्ती करणे बाबत**

**निर्णय क्र.२१३** श्री साईभक्तांना संस्थानमध्ये बनविलेला मोतीचूर लाडू प्रसाद प्रति पाकीट रु.१०/- ( ५० ग्रॅमचे ३ नग) या सवलतीचे दराने विक्री करण्यात येतो. त्याचप्रमाणे समाधी मंदीराकडून येणा-या नारळातील खोबरे काढून त्यात रवा, साखर, मैदा, घालून तयार केलेली बर्फी साईभक्तांचे भोजनामध्ये गोड पदार्थ म्हणून देण्यात येत आहे. सन २००३ पासून मोतीचूर लाडू व बर्फी बनविण्याचे काम टेंडर पध्दतीने श्री माधव गंगाराम नाईकवाडी यांना दिलेले आहे. श्री नाईकवाडी हे सन २००३ पासून समाधानकारक काम करीत आहेत.

सन २००८-२००९ या कालावधीसाठी मोतीचूर लाडूसाठी प्रतिहजारी रु.१२१ + नियमानुसार सर्व्हीस टॅक्स रक्कम तसेच बर्फीसाठी प्रति क्विंटल साखरेसाठी रु.१३०/- अधिक नियमानुसार सर्व्हिस टॅक्स् या दराने काम देण्यात आलेले आहे. तसेच त्यांचेकडील कामगारांना दोन वेळ भोजन व चहा मोफत देण्यात येत आहे. निवासाकरीता साईउद्यान इमारतीमधील २ खोल्या प्रचलित दराने सेवा आकार वसूल करुन देण्यात आलेल्या आहेत. श्री नाईकवाडी ३ उत्सवाचे व ३ श्रमपरिहार भोजनाचे मिष्टान्न मोफत बनवून देत आहेत.

श्री नाईकवाडी यांना दिलेल्या मोतीचूर लाडू / बर्फी टेंडरची मुदत दि.३१/३/२००९ रोजी संपत असून ठेकेदार यांनी दि.३१/३/२००९ नंतर पुढील वर्षाचे कालावधीसाठी काम करण्यास तयार असलेबाबत दिनांक ३०/१२/०८ चे विनंती अर्जाव्दारे कळविलेले आहे. मात्र कामगार संख्या व कामगारांचे पगारात वाढ झालेली असल्याने पूर्वीचे सोई सवलती चालू ठेऊन मजुरी दरात २०% वाढ मिळावी अशी मागणी केलेली आहे.

| अ.नं | ठेकेदाराचे नाव | कामाचे स्वरुप | सध्याचा दर | मागणी केलेला दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्री माधव गंगाराम नाईकवाडी रा.अंदरसुल, ता. येवला. | १) मोतीचूर लाडू बनविणे व पॅकींग करुन देणे.<br><br>२) बर्फी बनविणे | प्रति हजारी लाडू रु.-१२१/- + सर्व्हीस टॅक्स<br><br>प्रति क्विं.साखर रु.- १३०/- +सर्व्हीस टॅक्स | रु. १४५/- २०% वाढ +सर्व्हीस टॅक्स<br><br>रु.१५६/- २०% वाढ +सर्व्हीस टॅक्स | कामगारांना भोजन, चहा मोफत व निवास व्यवस्था भक्तांसाठी असलेल्या प्रचलित दराने सेवा आकार घेउन करण्यात येते. ती चालू ठेवावी. |

दिवसेंदिवस साईभक्तांची गर्दी वाढलेली असून गर्दीचे प्रमाणात मोतीचूर लाडू व बर्फी वितरण (विक्री व्यवस्था) व्यवस्थेत वाढ झालेली असल्याने ठेकेदारांना कामगार संख्येत वाढ करावी लागलेली आहे. तसेच कामगारांचे पगारातही वाढ झालेली आहे.

तरी सदरचे ठेकेदार यांना दि.०१/०४/२००९ पासून १ वर्ष कालावधीसाठी मोतीचूर लाडू / बर्फी बनविणेकामी २०% दरवाढीसह मुदतवाढ देण्यास अथवा दि.०१/०४/२००९ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी नविन ठेकेदार नियुक्तीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देउन निवीदा मागणी करणस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्याचे मोतीचूर लाडू बनविणारे व बर्फी बनविणारे ठेकेदार श्री माधव गंगाराम नाईकवाडी यांना दि.०१/०४/२००९ पासून १ वर्ष कालावधीसाठी मोतीचूर लाडू / बर्फी बनविणेकामी पुर्वीचे मान्य दरात १०% दरवाढ करण्यात येऊन मुदतवाढ देण्यात यावी. त्यांनी नाकारल्यास वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.४५** **प्रसादालयातील चपात्या (स्वामी नारायण पोळी ) बनविणारे ठेकेदाराची नियुक्ती करणे बाबत.**

**निर्णय क्र.२१४** प्रसादालयामध्ये प्रसादभोजन घेणा-या साईभक्तांना चांगल्या प्रतीच्या चपात्या मिळाव्यात. म्हणन सन १९९९ पासून चपात्या बनविण्याचे काम उक्ते टेंडरपध्दतीने देण्यात येत आहे. सन १९९९ पासून सदर काम श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी, साळंगपूर,राजस्थान यांना देण्यात आलेले आहे. याकामी सन २००८-२००९ मध्ये चपाती बनवून देण्यासाठी प्रति क्विंटल आटा+मैद्यासाठी रुपये ५०१/- अधिक नियमानूसार सर्व्हीस टॅक्स असा दर देण्यात आलेला आहे. याशिवाय त्यांचेकडील कामगारांना निवास , दोन वेळ भोजन व दोन वेळ चहा विनामुल्य देण्यात येत आहे. सदर टेंडरची मुदत दिनांक ३१/०३/२००९ रोजी संपत आहे.

चपाती बनविणारे ठेकेदार श्री प्रेमशंकर जोशी यांचे नेमणूकीपासून आजतागायत त्यांचे काम समाधानकारक आहे. प्रसादालयात प्रसादभोजन घेण्यासाठी येणा-या साईभक्तांचे संख्येच्या प्रमाणात ते आवश्यक तेवढया चपात्या / पु-या बनवून देत आहेत. भक्तांच्या प्रचंड गर्दीत त्यांनी कधीही चपाती/पुरी कमी पडू दिलेली नाही. त्यांचे टेंडरची मुदत दिनांक ३१/०३/२००९ रोजी संपणार असल्याने पुढील एक वर्षाचे मुदतीकरीता काम करण्यास तयार असलेबाबत दिनांक १३/०१/०९ चे विनंती अर्जाव्दारे कळविलेले आहे. मात्र सद्यस्थितीत रोजंदारीचे दर व कामगार संख्येत वाढ झालेने सध्याचे दरामध्ये २०% वाढ व नियमाप्रमाणे सर्व्हीस टॅक्सची रक्कम संस्थानने द्यावी अशी मागणी केलेली आहे.

| अ.नं | ठेकेदाराचे नाव | कामाचे स्वरुप | सध्याचा दर | मागणी केलेला दर | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी | चपात्या/पु-या बनविणे | रु.५०१/- प्रति क्विं. आटा+मैदा + सर्व्हीस टॅक्स | सध्याचा दर - ५०१/- (२०% वाढ) + १००/- = **६०१/-** + सर्व्हीस टॅक्स | पूर्वीपासून कामगारांना मोफत भोजन चहा, निवास दिले जात आहे. ते मिळावे . |

दिवसेंदिवस साईभक्तांची गर्दी वाढलेली असून गर्दीचे प्रमाणात प्रसादभोजन वितरण व्यवस्थेत वाढ झालेली (नविन श्री साई प्रसादालय) असलेने पूर्वीचे कामाचे (सकाळी ७.०० ते रात्रौ ११.००) वेळेतच ठेकेदारांना कामगार संख्येत वाढ करावी लागलेली आहे. तसेच कामगारांचे पगारातही वाढ झालेली आहे.

तरी सदरचे ठेकेदार यांना दि.०१/०४/२००९ पासून १ वर्ष कालावधीसाठी चपात्या/पुरी बनविणेकामी २०% दरवाढसह मुदतवाढ देणेस अथवा दि.०१/०४/२००९ पासून पुढील १ वर्ष कालावधीसाठी नविन ठेकेदार नियुक्तीसाठी वृत्तपत्रात जाहिरात देउन निवीदा मागणी करणस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्याचे प्रसादालयातील चपात्या (स्वामी नारायण पोळी) बनविणारे ठेकेदार श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी यांना दि.०१/०४/२००९ पासून १ वर्ष कालावधीसाठी प्रसादालयातील चपात्या (स्वामी नारायण पोळी) बनविणेकामी पुर्वीचे मान्य दरात १०% दरवाढ करण्यात येऊन मुदतवाढ देण्यात यावी. त्यांनी नाकारल्यास वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.४६** **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व श्री साईबाबा धर्मशाळेतील स्वयसेवी प्रसाद भोजन व्यवस्था बंद करणे बाबत.**

**निर्णय क्र.२१५** श्री साईबाबा भक्तनिवासस्थान व श्री साईबाबा धर्मशाळेतील कॅन्टीन पुर्वी खाजगी केटरर्सकडून मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार जागेचा घसारा रक्कम निश्चीत करुन कॅन्टीन चालविणेस देण्यात येत असे. कॅन्टीनमध्ये देण्यात येणारा अल्पोपहार, चहा, कॉफी, भोजनातील पदार्थाचे अंदाजे वजन, परिमाण व दर संस्थानकडून निश्चीत करुन त्यानुसार साईभक्तांना सेवा उपलब्ध करुन देण्याची पध्दत चालू होती. मात्र सदर केटरर्स / ठेकेदार घसा-याची रक्कम वेळेवर न भरणे, अगर रक्कम भरुन घेण्यासाठी त्या-त्या विभागांना सारखा तगादा लावावा लागत असे. साधारणतः ब-याच केटरर्सकडून घसा-याची रक्कम भरुन घेणे अतिशय त्रासाचे झालेले होते.

केटरर्सचे / ठेकेदारांचे अशाप्रकारचे गैरवर्तनामुळे त्या-त्या ठिकाणी साईभक्तांना देण्यात येणारी सेवा बंद करण्यात आली होती. मात्र साईभक्तांची गैरसोय होउ नये म्हणून साईबाबा भक्तनिवासस्थानमध्ये

चहा, कॉफी, नाष्टापाकीटे, स्वयंसेवी प्रसाद भोजन व्यवस्था सुरु करणेकामी कॅन्टीन विभागाकडील दि.१८/०३/२००६ चे मंजूर टिपणीनुसार व धर्मशाळेकडील मा.व्यवस्थापन समिती दि.२४/०५/२००८ चे सभेतील निर्णय क्र.४१५ अन्वये साईबाबा भक्तनिवासस्थान प्रमाणेच चहा, कॉफी, नाष्टापाकीटे व स्वयंसेवी प्रसाद भोजन व्यवस्था सुरु करण्यात आलेली होती. त्याकामी प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन पदार्थ तयार करुन वाहनातून घेउन जाउन साईभक्तांना सेवा देणेत येते.

साईबाबा भक्तनिवासस्थानमध्ये दि.०३/०४/२००६ पासून व धर्मशाळेमध्ये दि.१२/०६/२००८ पासून स्वयंसेवी भोजन व्यवस्था व कॅन्टीनमार्फत चहा, कॉफी, दुध व नाष्टापाकीटे विक्री व्यवस्था सुरु करणेत आलेली आहे.

साईबाबा भक्तनिवासस्थानमध्ये दररोज सरासरी ५००० व साईबाबा धर्मशाळेमध्ये दररोज सरासरी २५०० साईभक्त प्रसाद भोजन घेत आहेत. मात्र सध्या आपण प्रसादालयामध्येच भोजन पदार्थ तयार करुन वाहनातुन वाहुन घेउन जात आहोत. मात्र गर्दी मोठया प्रमाणात झाल्यानंतर वाहतूक, विलंबाने होते. त्यामुळे ब-याच वेळा भक्तांना प्रसाद भोजनासाठी विलंब होतो. याशिवाय गरम पदार्थाची वाहतूक करतांना कर्मचा-यांनाही भाजणे वगैरे प्रकारास सामोरे जावे लागते. असे होऊ नये म्हणून एकतर सर्व भोजन पदार्थ त्या-त्या ठिकाणी बनविणे सोईस्कर होईल, अथवा तेथील प्रसाद भोजन व्यवस्था बंद करणे ठिक राहील असे वाटते.

पूर्वीचे प्रसादालय आकाराने लहान असल्याने तेथे एका वेळेस एक हजार साईभक्त प्रसाद भोजनासाठी बसत असत. त्यामुळे गर्दीचे प्रमाणात व्यवस्था अतिशय अपुरी पडत असे. त्याचा परिणाम साईभक्तांना प्रसाद भोजनासाठी जास्त वेळ रांगेत उभे रहावे लागत असे. आता दि.०८/०१/२००९ रोजी नविन श्री साई प्रसादालयात सुरु झालेले असून सुमारे ३००० भक्तांची एका वेळेस बैठक व्यवस्थेची सोय आहे. त्यामुळे साईबाबा भक्तनिवास व साईबाबा धर्मशाळेकडील प्रसाद व्यवस्था बंद केल्यास साईभक्तांना नविन साई प्रसादालयामध्ये जास्त वेळ प्रतिक्षा रांगेत उभे रहावे लागणार नाही. याकरीता साईबाबा भक्तनिवासस्थान व साईबाबा धर्मशाळेमधील स्वयंसेवी प्रसाद भोजन व्यवस्था बंद करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.४७** **चपाती /पुरीकरीता रेडीमेड आटा खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२१६** जानेवारी १९७३ पासून संस्थान मार्फत साईभक्तांचे सोईसाठी दिक्षीतवाडा व परिसरात प्रसादालय चालविणेत येत होते. सुरुवातीपासून स्थानिक बाजर समिती मधून गहू खरेदी करुन आटा तयार करुन वापरीत आहोत. सन १९७३ ते १९७८ पर्यंत साईभक्तांची गर्दी अगदीच कमी असायची. सन १९७८ पासून गर्दीचे प्रमाण वाढण्यास सुरुवात झाली. त्यामुळे तत्कालीन व्यवस्थापनाने साईप्रसाद नं.१ इमारतीमध्ये प्रसादालयासाठी जागा निश्चीत केली व सन १९८० मध्ये दिक्षीत वाडा परिसरातून साईप्रसाद नं.१ इमारतीमध्ये प्रसादालयाचे स्थलांतर केले. सदर ठिकाणी १००० व्यक्तींची बैठक व्यवस्था करण्यात आलेली होती. मात्र २० वर्षाचे कालावधीमध्ये साईभक्तांची गर्दी फार मोठया प्रमाणात वाढण्यास सुरुवात झाली. सदर साईप्रसाद नं.१ इमारतीमधील प्रसादालय गर्दीचे तुलनेत अपुर्ण पडू लागले. त्यामुळे साईभक्तांची होणारी गैरसोय विचारात घेउन व भविष्यात साईभक्तांचे वाढणा-या संभाव्य गर्दीचा विचार करुन विद्यमान मा.व्यवस्थापन समितीने नविन असे भव्य / दिव्य श्री साई प्रसादालय इमारत बांधण्याचा निर्णय घेतला व अल्पावधीत आशिया खंडातील सर्वात मोठी प्रसादालय इमारत बांधण्यात आली व दि.०८/०१/२००९ वार गुरुवार रोजी प्रत्यक्षात साईभक्तांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी श्री साई प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन व्यवस्था सुरु करण्यात आलेली आहे.

प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांची संख्या मर्यादीत होती तो पर्यत गहू खरेदी करुन आटा तयार करुन वापरणे सहज शक्य होत होते. ज्या प्रमाणात प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांची संख्या वाढत चाललेली आहे. त्यानुसार गहू खरेदी, आटा तयार करणे व वापरणे अतिशय जिकरीचे होत चाललेले आहे.

अगदी सुरुवातीस १००० (एक हजार) क्विंटल गहू लागत असे. गर्दीचे प्रमाणात चालू वर्षी १०१०० क्विंटल गहू दळण्यात येत आहे. भविष्यात सदर संख्या यापेक्षा जास्त होणार आहे. पूर्वी गहू दळण्याचे काम खाजगी गिरणी मालकाकडून करुन घेण्यात येत होते. गर्दीच्र प्रमाणात जादा गहू लागू लागल्याने संस्थाननेच प्रथम १ गिरणी बसविली. मात्र १ गिरणी कमी पडू लागल्याने ३ गिरण्या बसविल्या व सुरुवातीला २ शिफ्टमध्ये गहू, दाळ दळण्याचे काम चालू होते. मात्र त्या गिरण्या २ शिफ्टमध्ये चालविले नंतरही अपूर्ण पडू लागले म्हणून २४ तास (३ शिफ्टमध्ये) आटा दळण्याचे काम चालू केले. आता मात्र ६ गिरण्या बसविलेल्या असून त्याही वेळप्रसंगी २४ तास चालवाव्या लागतात.

गहू खरेदी केल्यानंतर साठा करणे, वहातूक, निवडणेकामी लागणारे मनुष्यबळ, इलेक्ट्रीसिटी खर्च, घट-तूट, फ्युमिगेशन या सर्व मिळून प्रति किलो आटा तयार होण्यास खालीलप्रमाणे सुमारे खर्च येतो.

| ३० क्विंटल आटा तयार करणेसाठी मजुरी खर्च | प्रति क्विंटल आटा खर्च | **रु. पै.** |
|---|---|---|
| ६ गहू निवडणे स्त्री कर्मचारी | गहू किंमत | ११११६.०० |

| | | |
|---|---|---|
| ४ प्रिक्लीनर व डिस्टोनर ऑपरेटर | निवडणे, दळणे, गोडावून वहातुक मजूरी | ११७.०० |
| ६ गहू दळणेसाठी ड्रायव्हर | कोपरगाव ते शिर्डी वहातुक | १०.०० |
| ३ मुख्य भांडार ते प्रसादालय वहातुक करणारे कर्मचारी | वेअरहाउस भाडे (गोडाउन भाडे) | २४.०० |
| २ आटा चाळणे | हमाली | ३.०० |
| २१ x १६७ = ३५०७ / ३० = ११७.०० | घट-तुट ३ किलो | ३३.५० |
| **प्रति क्विंटल मजुरी रु.११७/-** | | **१३०४.००** |
| | मशिनरी घसारा अंदाजे १% | १३.०० |
| | लाईट खर्च गिरणी | ९३.०० |
| | लाईट खर्च डिस्टोनर, प्रीक्लीनर, आटा मशिन | ३५.०० |
| | फ्युमिगेशन खर्च (वार्षिक) | १०.०० |
| | | **१४५५.००** |

प्रति क्विंटल आटा तयार करणेस रु.१४५५/- एवढा खर्च येतो. मात्र आटा तयार करणेची प्रक्रीया त्रासाची असून त्याकामी सुमारे २१ मनुष्यबळ, गहू वेअरहाउसमध्ये ठेवणे, भाडे भरणे, वहातुक करणे वगैरे सर्व बाबी कष्टप्रद आहेत. याशिवाय बाजारातून खरेदी करण्यात येणारा गहू संपूर्ण वर्षासाठी खरेदी एकदम केला जातो. त्याकामी लागणारी सुमारे १ ते १.२५ कोटी रक्कम एकदम गुंतवावी लागते. तसेच साठविणे व किटकापासून सुरक्षित ठेवणे त्रासाचे होते. याकामी पर्याय म्हणून रेडीमेड आटा वापरणे सोईस्कर होऊ शकेल.

सध्या बाजारात ब-याच कंपन्याचा दर्जेदार ब्रँडेड आटा उपलब्ध होत आहे. त्याची किंमतही साधारणतः प्रति क्विंटलकरीता रु.१५००/- चे आसपास आहे. जर आपण प्रत्येक महिण्यास लागणाराच आटा खरेदी करुन वापरला तर करोडोची गुंतवणूक, गव्हाचा साठा करणे वगैरे आटा तयार करणेची कष्टप्रद प्रक्रीया टाळता येण्यासारखीच आहे. मात्र रेडीमेड आटा नेहमीकरीता वापरणेपूर्वी प्रयोगादाखल १ महिना सदर आटा वापरणे योग्य ठरेल. रेडीमेड आटयापासून तयार होणा-या पोळया, पु-या याची क्वालीटी कशी होते. व भक्तांच्या प्रतिक्रीया काय उमटतात याचा अनुभव घेता येईल. व तदनंतर रेडीमेड आटा नेहमीकरीता वापरणे योग्य ठरेल काय ? हे ठरविता येईल.

तरी प्रयोगादाखल एक महिन्याकरीता सुमारे ९०० क्विंटल रेडीमेड आटा खरेदी व त्याकामी सुमारे रु.१३,५०,०००/- खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.४८ ब्रुक बॉण्ड सुपरडस्ट ताजा चहा खरेदीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत**

**निर्णय क्र.२१७** संस्थानचे चहा कॅन्टीन विभागाकरिता मा.व्यवस्थापन समितीचे मंजुरीने खरेदी विभागामार्फत सन २००८-२००९ या आर्थिक वर्षाकरीता सपट चहा पुरवठा चालू आहे. परंतु सपट चहाच्या चव व क्वालिटी बाबत भक्तांच्या तोंडी तक्रारी आल्या होत्या, तसेच मा.चेअरमन साहेब यांनीही चहा सुधारणेबाबत तोंडी सुचना दिली होती. म्हणून ब्रुक बाँड कंपनीचे हिंदुस्थान लिव्हर यांचे प्रतिनिधी श्री संदीप माहाजन यांचे फर्म श्री गणेश एन्टरप्राईजेस लि. पुणे यांचेशी संपर्क साधून ब्रुक बाँड ताजा चहाची मागणी केली असता त्यांनी संस्थानसाठी कंपनीचे सवलत दरात सर्व करासह २४५ ग्रॅमच्या एका पुडयाची किंमत रु. २८.८० पैसे प्रमाणे ९८० ग्रॅमला १२० दराप्रमाणे संस्थानपोहोच देण्याचे मान्य केले होते. सदर चहाची बाजारातील किंमत १४८ रुपये प्रति किलो आहे. असे त्यांनी सांगितले होते. त्यानुसार मा.कार्यकारी अधिकारी साो. यांचे मंजुर टिपणीने प्रायोगिक तत्वावर २३५ किलो व ११७.६०० किलो ग्रॅम थेट खरेदी करुन भांडार विभागास जमा नावे करुन वापरुन पाहिला असता चहाची चव व क्वालिटी चांगली असल्याचे दिसून आले.

पुर्वी कॅन्टीन विभागास खरेदी विभागामार्फत ब्रुक बाँड सुपरडस्ट चहाचाच पुरवठा चालू होता. मध्यंतरीचे काळात चहा बदलल्यामुळे साईभक्तांच्या तक्रारीत वाढ झाली होती. म्हणून २३५ किलो व ११७.६०० किलो ब्रुक बाँड ताजा सुपरडस्ट चहा खरेदी करणेत आला असून त्यास रक्कम रुपये ४३,२०६.०० खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादरकेला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,कँटीन विभाग)

**विषय नं.४९ मान्यवरांचे सत्कार करणेकामी प्रिंटेड शॉल खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.२१८** समाधी मंदिरात श्रींचे दर्शनासाठी येणारे मान्यवर, अतिथी, व्ही.आय.पी.व महत्वाचे पदसिध्द अधिकारी वर्ग यांचा संस्थानचे वेतीने शॉल, श्रीफळ देऊन सत्कार केला जातो. त्यांचे सत्काराकामी संस्थानचे वतीन शॉल देण्याची पूर्वापार पध्दत आहे.

माहे एप्रिल-२००७ ते माहे मार्च -२००८ अखेर कॉटन शॉल २.५ मीटर लांबी X ६० सेमी रुं (जरी बॉर्डर नसलेली पिवळा रंग) प्रती एक नग शॉल खरेदीस रुपये ४०/- प्रमाणे ४१२२ शॉली खरेदी करण्यात आल्या आहेत.

संस्थानमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमात वाढ होत असल्याने मान्यवरांची संख्याही दिवसेंदिवस वाढत आहे.पुढील वर्षाकरीता दिनांक ०१ एप्रिल २००९ ते दिनांक ३१ मार्च २०१० या वर्षासाठी ८ हजार शॉली विहीत पध्दतीने कोटेशन्स मागणी करुन खरेदी करण्यास व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/अधिक्षक,मंदिर विभाग)

**विषय नं.५०** **श्री रामनवमी उत्सव २००९ चे मुख्य दिवशी समाधी मंदिरावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करणे बाबत**

**निर्णय क्र.२१९** सालाबादप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या वतीने श्रीरामनवमी उत्सव २००९ साजरा करण्यात येत आहे. यावर्षी गुरुवार दिनांक ०२.०४.२००९ ते शनिवार दिनांक ०४.०४.२००९ अखेरी तीन दिवस श्रीरामनवमी उत्सव साजारा करण्यात येणार आहे.

ओ.एस.एस.अेव्हीअेशन प्रा.लि. भोपाळ यांनी दिनांक ३० जानेवारी २००९ चे विनंतीपत्रान्वये श्रीरामनवमी उत्सवाचे मुख्य दिवशी शुक्रवार दिनांक ०३.०४.२००९ रोजी हेलीकॉप्टरमधून श्रींचे समाधी मंदिरावर पुष्पवृष्टी करणेसाठी परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

व्यवस्थापन समितीचे दिनांक २४.०२.२००८ चे सभेत निर्णय क्र.१९५ अन्वये अशाप्रकारची परवानगी देण्यात आलेली आहे. सन २००८ मधील उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक १३.०४.२००८ रोजी माध्यान्ह आरतीनंतर पुष्पवृष्टी करण्यात आली होती.

याही वर्षी गुरुवार दिनांक ०२.०४.२००९ ते शनिवार दिनांक ०४.०४.२००९ अखेर तीन दिवस श्रीरामनवमी उत्सव साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे मुख्य दिवशी शुक्रवार दिनांक ०३.०४.२००९ रोजी हेलीकॉप्टरने पूष्पवृष्टी करणेची परवानगी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली, मात्र संरक्षणाकरीता शिर्डी पोलिस स्टेशन मार्फत यावर नियंत्रण ठेवण्यात यावे, असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर विभाग/संरक्षण अधिकारी)

**विषय नं.५१** **साईनिवास अतिथीगृह येथील रुमसाठी एल.सी.डी टी.व्ही खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र.२२०** दिनांक १.१०.२००१ रोजी तत्कालीन कार्यकारीनीने दर्शन लाईन, अतिथीगृह भक्तनिवासस्थान येथील रुममध्ये ठेवणेसाठी नॉर्मल कॅथरॉड २० व्हीडिओकॉन कंपनीचे मॉ.नं.५१०९ DLX हे १०० नग टी.व्ही. खरेदी केलेले आहेत. त्यातीलच २४ नग टीव्ही अतिथीगृह रुममध्ये ठेवलेले आहेत.

परंतू टीव्ही खरेदी करताना त्यास रिमोट खरेदी केलेले नाही. टीव्हींना ऑडिओ व्हीडिओ इनपुट नाही फक्त RFइनपूट आहे, शिवाय नेहमीच्या वापरामुळे टीव्हींचे कलरही कमी झालेले आहेत. टीव्हींबरोबर रिमोट खरेदी केलेले नसल्यामुळे व आता मार्केटमध्ये मिळणारे रिमोटे हे डूप्लीकेट असल्यामुळे ते टीकाऊ नाहीत. याशिवाय प्रत्येक टीव्हीचया सुमारे आठ वर्षे वापर झाल्यामुळे ते कालबाह्य झालेले आहेत. अतिथीगृह येथे उतरणारे भक्त हे रुमसाठी ७००/- रुपये भाडे आदा करतात. त्यामुळे रुममध्ये असणारे टीव्ही काळानुसार चांगल्या प्रतिचे असणे आवश्यक आहे.

हल्ली मार्केटमध्ये एल.सीडी. टाईप टीव्ही मिळतात ते भींतीवर फिट करता येत असल्यामुळे जागेची बचत होते. प्रत्येक रुममध्ये एक अशाप्रकारे एकुण २४ टीव्ही व मा.व्यवस्थापन समितीच्या सभेच्या वेळेस व्यापारी व इतर मान्यवरांसाठीच्या प्रतिक्षालयात बसल्या जागी श्रींचे दर्शन व्हावे यासाठी ०२ व एखाद्या रुममधील टीव्ही नादुरुस्त झाल्यास तेथे त्वरीत टीव्ही बदलणेसाठी ०२ असे एकूण २८ टीव्ही खरेदी करणे योग्य होईल.

खरेदी करण्यात येणाऱ्या टीव्ही चे वर्णन

| | टीव्हीचे वर्णन | नग | अंदाजे किंमत प्रती नग रुपये | एकुण किंमत रुपये |
|---|---|---|---|---|
| 01 | 26"LCD TV Soni Co.Model No.KL.V.S. 400A with wall mounting Bracket | 28 | 30,000/- | 8,40,000/- |

तरी वरिलप्रमाणे २८ नग टीव्ही खरेदीकामी रक्कम रुपये ८,४०,०००/- पुर्णाकिंत रुपये ८,५०,०००/-चे खर्चास व टीव्ही खरेदी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी साईनिवास अतिथीगृहातील सोफासेट, तसेच बाथरुममधील बादल्या,मग व इतर साहित्य नव्याने खरेदी करण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-ध्वनीक्षेपण विभागप्रमुख/चौकशी व निवासस्थान विभागप्रमुख)

**विषय नं.५२** **वॉकी-टॉकी हॅण्डसेट बॅटरी खरेदीस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**निर्णय क्र.२२१** संरक्षण विभागातंर्गत वायरलेस यंत्रणे करीता दि.०१.०८.२००६ रोजी मा.व्यवस्थापण मंडळाचे सभेतील विषय क्रं.३४ व निर्णय क्रं.२१३ नुसार यंत्रणा खरेदीकामी मान्यता देण्यात आलेली आहे.

वायरलेस यंत्रणा कार्यान्वीत करुन जवळ-जवळ २ वर्षे झाल्यामुळे वॉकी-टॉकीचे हॅंडसेट मध्ये वापरण्यात येणाऱ्या चार्जींग बॅटऱ्या वापरुन वापरुन कालबाहय झाल्याने तसेच बॅटऱ्यांची गॅरंटी ही एक ते

दिड वर्षाची असल्यामुळे त्यांची क्षमता संपुष्टात आल्याने त्या दुरुस्तीसाठी पाठवूनही दुरुस्त होणार नसलेबाबतचे पत्र ॲडीनो कंपनीचे टेक्नीशियन श्री.पी एस.राणा मुंबई यांचे कडून मिळाले आहे.

त्या अनुषंगाने दि.०२.०८.२००८ च्या मंजुर टिपणीन्वये वायरलेस यंत्रणेच्या वॉकी -टॉकी हँडसेट मधील ४० नग नविन बॅटऱ्या खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून अत्यंत तातडीची गरज म्हणून सरकारी मुल्याप्रमाणे ४० नग बॅटऱ्या ॲडीनो टेलीकॉम लि. नवघर, वसई इ.यांचे कडून मागविण्यात आलेल्या असून त्यास खालीलप्रमाणे एकूण रुपये ५४,०००/- खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**ॲडीनो टेलीकॉम लिमिटेड,नवघर,वसई ( ई.)**

| अं.नं. | तपशिल | नग | बिल नं. | दर | किमंत |
|---|---|---|---|---|---|
| १ | वॉकी-टॉकी हँडसेट बॅटरी G.P.३३८ | ४० | INVOICE NO. BOM/३८४ | १,२००/- | ४८,०००/- |
| | VAT १२.५% | ----- | | ---- | ६,०००/- |
| | | | | एकुण | ५४,०००/- |

(कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**विषय नं.५३** **वॉटर फायर फायटर यंत्रणा कार्यान्वीत करणेकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२२२** मंदिर परीसरात सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून ठिकठिकाणी वॉटर फायर फायटर यंत्रणा बसविण्यात आलेली आहे.

सदरील यंत्रेणचे बहुतेक ठिकाणाचे स्पेअर- पार्ट नादुरुस्त निकामी झाल्याने बदलून घेणे अत्यंत आवश्यक होते.सध्या दिल्ली,अहमदाबाद,मालेगाव इत्यादी ठिकाणी झालेले् बॉम्बस्फोट व नुकताच मुंबई येथे झालेल्या घातपाती हल्ला त्यात झालेला गोळीबार,बॉम्बस्फोट व जाळपोळ अशा गंभीर घटना लक्षात घेता सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सदरील अग्नीशामक वॉटर फायर फायटर हायड्रन्ट यंत्रणा तातडीने चालू करणे अत्यंत आवश्यक होते. त्यामुळे दि.०४.१२.०८ च्या मंजुर टिपणीन्चये तातडीने सदरील स्पेअर पार्ट बदलून त्या ठिकाणी नविन स्पेअर पार्ट टाकून सदरील यंत्रणा तातडीने कार्यान्वीत करुन घेण्यात आलेली आहे.तसेच त्याची ट्रायलही घेण्यात आली आहे.

सदरील काम हे नवीन प्रसादालयाचे गॅस टॅक सुरक्षा यंत्रणेसाठी नेमण्यात आलेल्या मास्टर फायर इंजिनर श्री.स्वप्नील राऊत पुणे यांचे मार्फत करण्यात आलेले असून त्यास खालीलप्रमाणे रक्कम रुपये १,२२,२७४.५० खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अं नं. | बील नं. | वस्तुंचे नाव व वर्णन | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ७१/३१.१२.०८ | सिगल हायड्रन्ट व्हॉल्स | ०३ | ६,००० | १८,०००.०० |
| ०२ | | फायर होस पाईप सी.पी.टाईप ISM मार्क | १० | ३,८५० | ३८,५००.०० |
| ०३ | | ब्रॅच पाईप | १२ | १,९५० | २३,४००.०० |
| ०४ | | होस बॉक्स फायबर एम.एस.शिट ग्लासेस | ०८ | १,२५० | १०,०००.०० |
| ०५ | | होस रिल विथ् पाईप आणि शटअप नोझल | ०६ | ३,५५० | २१,३००.०० |
| ०६ | | हायड्रन | ०७ | २७५ | १,९२५.०० |
| ०७ | | हायड्रन्ट व्हील | ०७ | ६० | ४२०.०० |
| ०८ | | सिगल रेड पेंट | ०४ | २२० | ८८०.०० |
| | | | | **रक्कम** | **१,१४,४२५.००** |
| | | **Vat १२.५%** | | ३८,५००.०० | ४,८१२.५० |
| | | **Vat ४ %** | | ७५,९२५.०० | ३,०३७.०० |
| | | | | **एकुण रक्कम** | **१,२२,२७४.५०** |

(कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**विषय नं.५४** **शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना साफसफाईचे कामासाठी कंत्राटी कामगार देणे बाबत.**

**निर्णय क्र.२२३** शिर्डी शहर हे श्री साईबाबांचे तिर्थक्षेत्र असल्यामुळे येथे दररोज अंदाजे ५०,००० ते ७५,००० हजार श्रीसाई भक्त दर्शनासाठी येत असतात. शहराची तरंगती लोकसंख्या जास्त आहे. उत्सवाच्या काळात श्री साई भक्त १ लाखापर्यंत दररोज येत असतात. तसेच शिर्डीत गुरुवार व रविवार जास्त गर्दी होत असते.

शिर्डी नगरपंचायत हद्दीतील नगर- मनमाड रोड हा राज्य महामार्ग व साईबाबा मंदिर बाहेरील परिसरातील रस्ते साफसफाई करणेसाठी शिर्डी नगर पंचायतीचे आरोग्य विभागकडील कर्मचारी कमी पडतात. त्यामुळे नगर मनमाड रोड, मनोज कुमार पथ, पालखी रस्ता या रस्त्यांची साफ सफाई करणे करीता श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांनी देण्यात आलेली ४० अकुशल कंत्राटी

कर्मचाऱ्यांची मुदत दि.३१ मार्च २००९ अखेर संपुष्टात येत आहे.तरी दि.१ एप्रिल २००९ ते दि.३१ मार्च २०१० पुढील वर्षाच्या कालावधी साठी मुदत वाढ देणेस शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी संदर्भित पत्राव्दारे मागणी केलेली आहे.

यापुर्वी व्यवस्थापन समितीचे दि. १६/०३/२००८रोजी सभेपुढील विषय नं.६० व निर्णय क्र. २६९ ने ०१ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९ अखेर एक वर्षाचे मुदतीसाठी सफाईकरिता ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी देण्याचे मंजुर करण्यात आले आहेत. सदर साफसफाईचे काम करीत असतांना सफाई कर्मचा-यांना रोडवरील उभ्या राहणा-या शिर्डी शिंगनापुर वाहतुक करणा-या वाहनांचा व रोडच्या बाजुस असलेल्या दुकांनदारांचे साफसफाई करतांना सहकार्य मिळत नाही. रोडवर वाहन उभे करणे, सफाई कर्मचारी साफसफाई करुन गेल्यानंतर दुकांनदार दुकानातील कचरा रस्त्यावरती आणुन टाकतात. सफाई कर्मचारी ड्युटीवर असतांना वाहनाचा धक्का लागुन आपघात झाल्यास त्यासाठी सामुदाईक विमा व वैद्यकीय सेवा ही श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत विनामुल्य मिळावी.

तरी दि.१५/१२/२००८ चे नगरपंचायतीचे संदर्भित पत्रानुसार या कामी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना पुढील एक वर्षासाठी ४० कंत्राटी अकुशल कर्मचारी नेमल्यास खालील प्रमाणे अंदाजे खर्च येईल.

४० कंत्राटी अकुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्चः-

| | | |
|---|---|---|
| | प्रति दिन प्रति कर्मचारी दर रु. | १३१=९७ |
| | प्रॉ.फंड १३.६१% | १७=९६ |
| ०१ | *सर्व्हिस चार्ज ०.७५%* | ०=९९ |
| | सर्व्हिस टॅक्स १२.२४% | १६=१५ |
| | ----------------- | |
| | प्रति दिन प्रति कर्मचारी रु. | १६७=०७ |
| | | x ४० कर्मचारी |
| | | ----------------- |
| | | रु.६६८२=८० एक दिवसा करिता |
| | | x ३६५ दिवसांकरीता |
| | | ----------------- |
| | | रु.२४,३९,२२२=०० |
| | +१०% वर्षात होणारी अपेक्षित वाढ | रु.२,४३,९२२=२० |
| | | ------------------ |
| | एकुण रुपये | २६,८३,१४४=२० |

तरी उपरोक्त प्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना ४० अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरवावयाचे असल्यास या ४० कंत्राटी कर्मचा-यांचे वेतना पोटी एक वर्षाचे कालावधी करीता अंदाजे रु. २६,८३,१४४/- मात्र पर्यंत खर्च येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी शिर्डी गावठाणाचे स्वच्छतेसाठी स्वतंत्र एजन्सी नेमण्यात यावी यासाठी नगरपंचायतीकडून स्वच्छता करावयाचे विभाग, त्यासाठी आवश्यक कर्मचारी इत्यादीबाबत सविस्तर प्रस्ताव मागणी करुन सादर करावा असे ठरले. (कार्यवाही-स्वच्छता विभागप्रमुख)

**विषय नं.५५ माहिती सुविधा केंद्रावर इंट्रानेट मार्फत ऑनलाईन डोनेशन व रुम रिझर्वेशन व इतर सुविध तथा संस्थानची संगणक प्रणाली अद्ययावत करणे (ERP प्रकल्प)साठी फेर निविदा प्रक्रीयेची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२२४ (अ)** मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १६ मार्च, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २४९ मुंबई दिल्ली व हैद्राबाद येथील माहिती सुविधा-केंद्रांवर इंट्रानेट मार्फत ऑनलाईन डोनेशन व रुम रिझर्वेशन या सुविधा सुरु करणेसाठी अद्ययावत संगणक प्रणाली, इंटरनेट व हार्डवेअरची उपलब्धता याबाबत चर्चा करण्यात आली असून, यासाठी व निविदा मागविणेच्या प्रक्रियेसाठी येणाऱ्या एकत्रित अंदाजे रुपये १,०३,००,०००/- पर्यंतच्या खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्णयास अनुसरुन, माहिती सुविधा-केंद्रांवर इंट्रानेट मार्फत ऑनलाईन डोनेशन व रुम रिझर्वेशन या सुविधा सुरु करणेसाठी नामांकित कंपन्यांकडून प्रस्ताव मागविणेसाठी ०१. Indian Express (English), Mumbai & Pune Edition (दिनांक १६ जुलै, २००८) ०२. महाराष्ट्र टाईम्स (मराठी) मुंबई व पुणे आवृत्ती (दिनांक १५ जुलै, २००८) या दोन वर्तमान पत्रामध्ये व संस्थानचे अधिकृत वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. प्रस्ताव संस्थानकडे सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक ११ ऑगस्ट, २००८ अखेर देण्यात आली होती. त्यानुसार मुदतीत ११ व मुदतीनंतर ०४ असे एकूण १५ प्रस्ताव प्राप्तझालेले आहे. सदर सर्व प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ सप्टेंबर, २००८ रोजीचे सभेमध्ये उघडण्यात आलेले आहे. सदर प्रस्तावांसोबत प्राप्त झालेले प्रस्ताव रक्कमेचे

प्रत्येकी ५,०००/- चे एकुण १५ डिमांड ड्राफ्टस् माहिती तंत्रज्ञान विभागाचे दिनांक ०८ सप्टेंबर, २००८ रोजीचे टिपणीनुसार लेखाशाखा विभागाकडे संस्थान उत्पन्न खाती जमा करणेत आलेले आहे.

**(ब)** तथापि, प्राप्त झालेल्या प्रस्तावधारकांची यादी तांत्रिक सल्लागार कमीटीचे अध्यक्ष श्री के. व्ही. रमणी, चेन्नई यांचे अवलोकनार्थ सादर करण्यात आली होती. सदर यादीचा अभ्यास करुन त्यांनी सदर यादीतील बऱ्याचशा कंपन्या नामांकित संगणक प्रणाली-तथा-संगणक नेटवर्क या दोन्ही क्षेत्रातील नसून, काही फक्त संगणकीय नेटवर्क यंत्रणेत तर काही संगणक प्रणालीशीच सलग्न आहे. शिवाय सदर कंपन्या या लहान असून, त्यांचेकडून सदर प्रकल्पाची पूर्तता करतील की नाही याबाबत शंकाच आहे. सदरील निविदांपैकी फक्त २-३ निविदा या नामांकित कंपन्यांच्या आहे. या सर्व बाबींचा विचार करता, पूर्वीची निविदा रद्द करुन फेर निविदा श्री के. व्ही. रमणी यांचे मार्गदर्शनाखाली तयार करण्यात येऊन ती मुंबई, पुणे, बंगलोर आदि. ठिकाणचे नामांकित वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात देणे बाबतच्या सूचना त्यांचे दिनांक २२ जानेवारी, २००९ रोजीचे ई-मेलव्दारे कळविले आहे. याबाबत मा. अध्यक्ष सो. यांचेशी दूरध्वनीव्दारे चर्चा केली असता, त्यांनी श्री के. व्ही. रमणी सांगतील त्याप्रमाणे कार्यवाही करणेबाबत निर्देश दिलेले आहे.

त्यास अनुसरुन, श्री के. व्ही. रमणी यांचे मार्गदर्शनाखाली नवीन निविदा तयार करण्यात आली आहे. सदर निविदांची किंमत रुपये १०,०००/- ठेवण्यात आलेली आहे. निविदा विक्रीकामी संस्थानचे जनसंपर्क कार्यालयामार्फत मुंबई, पुणे, बंगलोर या ठिकाणांवरुन प्रसिध्द होणाऱ्या टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमान पत्रामध्ये व संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिध्द करुन, साधारणतः २० दिवस निविदा विक्री करण्याची कार्यवाही करण्यात येईल. नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांना सदरील निविदेत सहभागी करणेसाठी प्रस्ताव मागविणेत येणार आहे. सदर प्रस्ताव प्राप्त झालेनंतर त्यांची छाननी (Pree Qualification Round) च्या आधारे साधारणतः तीन ते चार नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांना तांत्रिक फेरीत प्रवेश दिला जाईल व त्याआधारे त्यांना संस्थानची सध्याची आवश्यकता व भविष्यात होणारी वाढ या सर्व बाबींचे तांत्रिक विश्लेषण करुन त्यावर निविदा बनविणेस सांगण्यात येईल. सदरील निविदा बनविले नंतर त्याची पडताळणी करणेसाठी श्री के.व्ही. रमणी यांचे समोर सादर करण्यात येतील. सदर कंपन्यांनी केलेल्या तांत्रिक निविदेतील काही त्रुटी अथवा अडचणी दूर करुन शिवाय काही कंपन्यांची तांत्रिक निविदांचे मुल्यांकन करुन जर कोणी तांत्रिक निविदेत बसत नसल्यास त्यास बाद करण्यात येईल व उर्वरित निविदाधारकांकडून Commercial निविदा मागविण्यात येतील. त्याआधारे त्यांचे Technicial व Commercial निविदेच्या आधारे अंतीम निविदाधारक निवडण्यात येईल. याप्रमाणे सदरील प्रक्रिया पार पाडण्यात येईल. अंतीम निविदाधारकाला कार्यादेश देण्यापूर्वी मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात येईल.

तरी, श्रीसाईभक्तांसाठी अत्याधुनिक सेवा व सुविधा सुरु करणेसाठी व फेर निविदा प्रक्रिया उपरोक्त नमुद केलेप्रमाणे मा. श्री. के. व्ही. रमणी, अध्यक्ष तांत्रिक सल्लागार समिती यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात येईल व त्यांना उपरोक्त नमुद केलेप्रमाणे निविदा प्रक्रियेचे सर्व अधिकार त्यांना देण्यात येतील. याबाबतची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**विषय नं.५६** **द्वारावती भक्तनिवास इमारतीमध्ये संगणकीय सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी संगणकीय जाळयांची उभारणीचे कामकाज स्थगित ठेवणेबाबत.**

**निर्णय क्र.२२५** **(अ)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३/०१/२००९ रोजीचे सभेत व्दारावती इमारतीमध्ये संगणकीय जाळेंची उभारणी विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागवून न्यूनतम निविदाधारकाकडून करुन घेणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५,४२,२३०/- + टॅक्स पर्यंतच्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच दूरध्वनी सुविधा उपलब्ध करुन देणेस व त्यासाठी येणारे उपरोक्त साहित्य खरेदीसाठी अंदाजे रुपये ६,१०,२००/- (कर अतिरिक्त) तसेच पर्यंतच्या खर्चास मान्यता देवून, वर्तमान पत्रांत जाहिरात प्रसिध्द करणेसाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन, व्दारावती इमारतीमध्ये संगणकीय सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी संबंधीत क्षेत्रातील विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविणेकामी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत निविदा नमुना तयार करण्यात आला होता. सदर निविदांबाबत वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात देऊन व त्यास संस्थान संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दिनांक २८/०१/२००९ अखेर ठेवण्यात येऊन, विक्री झालेल्या निविदा संस्थानला सादर करण्याची अंतीम मुदत दिनांक ३१/०१/२००९ देण्यात आलेली होती. प्रती निविदेची किंमत रुपये ५००/- ठेवण्यात आली असून, सदर निविदेसोबत रुपये २५,०००/- मात्र बयाना रक्कम भरणेची अट घालण्यात आलेली आहे. त्यानुसार संगणकीय सुविधांसाठी १९ निविदांची विक्री करण्यात आलेली असून, खालील तपशीलाप्रमाणे निविदा संस्थानकडे मुदतीत प्राप्त झालेल्या आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | Wireworkz Systems & solutions (I) Pvt. Ltd., Mumbai-66. |
| ०२. | Allied Digital Services Ltd., Mumbai-2. |

| | |
|---|---|
| ०३. | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik-9. |
| ०४. | Microlink Solutions Pvt. Ltd., Ahmedabad-15. |
| ०५. | GEO Systems & Solutions, Surat. |
| ०६. | R.D. Data Systems, Nashik-1. |
| ०७. | MINI COMP, Mumbai. |

उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदा मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये उघडून, त्याच सभेत सदर निविदाधारकांना चर्चा-तथा-वाटाघाटीअंती निर्णयार्थ मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव सादर करणेस माहिती तंत्रज्ञान विभागाचे दिनांक ०४ फेब्रुवारी, २००९ रोजीचे टिपणीअन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे.

**(ब)** माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे विविध विभागांसाठी नूतनीकृत संगणक प्रणालीची व संगणकीय जाळयांची उभारणी संदर्भातील निविदा प्रक्रिया श्री. के.व्ही. रमणी अध्यक्ष सल्लागार कमीटी यांचे मार्गदर्शनाखाली चालू असल्याने, तूर्त कोणतेही संगणक संच, इतर अनुषंगीक साहित्य व सॉफ्टवेअर खरेदी करु नये, असे त्यांनी त्यांचे दिनांक ०५/०२/२००९ रोजीचे पत्रान्वये मा. अध्यक्ष सो. व मा. कार्यकारी अधिकारी सो. यांना कळविलेले आहे. नवीन संगणक प्रणालीची व नवीन संगणकीय जाळयांची उभारणीचे कामकाज यथावकाश सुरु होत आहे. सदर कामकाज पूर्ण झालेनंतर संस्थानचे विविध विभागांत चालू असलेले सध्याचे सर्वच संगणक प्रणाली व नेटवर्क बंद करावे लागणार आहे. नेटवर्कींग कामकाजाची पूनरावृत्ती होऊ नये यासाठी व्दारावती भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये संगणकीय जाळयांचे उभारणीचे कामकाज तूर्त स्थगीत ठेवण्यात यावे, असे नम्र मत आहे.

संगणकीय जाळयांचे कामकाज तूर्त स्थगीत ठेवल्यानंतर प्राप्त झालेल्या निविदाधारकांचे निविदांसोबत असलेले बयाना रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट व एकूण विक्री झालेल्या १९ निविदांची रक्कम प्रत्येकी ५००/- निविदा घेतलेल्या निविदाधारकांना लेखाशाखा विभागामार्फत डिमांड ड्राफ्टव्दारे परत करावी लागणार आहे. प्राप्त झालेल्या उपरोक्त सात निविदा उघडण्यात आलेल्या नसल्याने, सदर निविदा मा. कार्यकारी अधिकारी महोदय यांचे समक्ष उघडून नंतर त्यांतील बयाणा रकमेचे डिमांड ड्राफ्ट सदर निविदाधारकांना परत करता येतील असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**विषय नं.५७** **४५ वी विभागीय कौशल्य स्पर्धा ऑक्टोबर-२००८ मधील संस्थेच्या यशाबाबत**

**निर्णय क्र.२२६** औद्योगिक प्रशिक्षण केंद्राचे प्रशिक्षण हे केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाअंतर्गत डायरेक्टोरेट जनरल ऑफ एम्लॉयमेंट अॅण्ड ट्रेनिंग ( D.G.E&T.) यांचे व्दारा राज्यशासनाच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे नियंत्रणाखाली चालते. यामध्ये निरनिराळया १०० हून अधिक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते. त्या-त्या व्यवसायातून देशात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला त्या वर्षाचा उत्कृष्ट कारागीर (Best Craftsman Of The Year) घोषित करण्यात येते. त्यास प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह व रोख रक्कम रु. १००००/- पारितोषिक केंद्र शासनाकडून देण्यात येते . या स्पर्धेसाठी प्रत्येक राज्यातून प्रत्यक ट्रेडसाठी फक्त एक सर्वोत्तम विद्यार्थी पाठविण्यात येतो. महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी विद्यार्थी निवडण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे दोन टप्प्यात होते.

टप्पा १ - विभागीयस्तर कौशल्य स्पर्धा- राज्याच्या सहा महसुली विभागातून विभागीयस्तर कौशल्य स्पर्धा घेण्यात येते. प्रत्येक परिक्षाकेंद्रावरील वार्षिक अखिल भारतीय व्यवसाय परिक्षेमधील त्या-त्या ट्रेड मधील प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांकाचे प्रशिक्षणार्थी सहभागी होतात.

टप्पा २ - राज्य कौशल्य स्पर्धा - विभागीय स्तरावरुन प्रत्येक विभागातून फक्त प्रथम व व्दितीय क्रमांक प्राप्त केलेले प्रशिक्षणार्थी राज्यस्थर स्पर्धेसाठी पात्र ठरतात.

चालू वर्षी नाशिक विभागासाठी विभागीस्तर कौशल्य स्पर्धा ऑक्टोबर २००८ मध्ये शासकीय औ.प्र.संस्था, नाशिक येथे झाली. त्याचा निकाल घोषित झाला असून नाशिक विभागातील ०५ जिल्हयातील सर्व औ.प्र.संस्था / केंद्रमधुन ०६ ट्रेडसाठी १२ विद्यार्थी राज्यस्तर स्पर्धेसाठी पात्र झाले आहेत. यामध्ये आपल्या औं.प्र.केंद्रातील खालील ०८ विद्यार्थी असून नोव्हेंबर २००८ मध्ये औरंगाबाद येथे होणाऱ्या ४५ व्या राज्यस्तर कौशल्य स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे.

| अ.नं | नांव | व्यवसाय | नाशिक विभागातून |
|---|---|---|---|
| ०१ | कोळपकर सचिन गोरक्षनाथ | जोडरी | सर्वप्रथम |
| ०२ | काळूंगे चंद्रकांत नारायण | जोडारी | सर्वव्दितीय |
| ०३ | काकड सतिष बाळासाहेब | वेल्डर | सर्वप्रथम |
| ०४ | महापुरे गणेश चांगदेव | वेल्डर | सर्वव्दितीय |
| ०५ | गोर्डे पवन लहानू | मोटार मेकॅनिक | सर्वप्रथम |
| ०६ | शेळके गणेश भाऊसाहेब | वीजतंत्री | सर्वप्रथम |
| ०७ | मुर्तडक नितीन विठ्ठल | कॉम्प्युटर ऑपरेटर अॅण्ड प्रोग्रामिंग अॅसिस्टंट (कोपा) | सर्वप्रथम |
| ०८ | क्षिरसागर प्रविण दिलीप | टर्नर | सर्वप्रथम |

उर्वरीत ०४ विद्यार्थी हे नाशिक, नाशिक (मुलांची), जळगांव व जामखेड येथील शासकीय औ.प्र.संस्थेचे प्रत्येकी एक या प्रमाणे पात्र झाले आहेत.

औरंगाबादमध्ये होणाऱ्या राज्यस्तर कौशल्य स्पर्धेमधून फक्त प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणारा प्रशिक्षणार्थी राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे त्या-त्या ट्रेडचे प्रतिनिधीत्व करतो.

१२ विद्यार्थ्यामध्ये ८ विद्यार्थी संस्थानच्या आय.टी.आय. मधील आहेत ही गौरवाची बाब आहे. यातून राष्ट्रीय पातळीवर निवड होण्याची शक्यता आहे. प्राचार्य, गटनिदेशक व संबंधित निदेशक हे कैतुकास पात्र आहेत. प्राचार्य व कर्मचारी यांचे हे काम अभिनंदनीय आहे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय )

**विषय नं.५८ ओद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थी स्टेशनरी छपाईबाबत**

**निर्णय क्र.२२७** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०९.२००८ मधील निर्णय क्र.६९६ (ब) नुसार श्री साईबाबा औदयोगिक प्रशिक्षण केंद्र, शिरडी संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांना आवश्यक असणारी जॉबशीट वही, थेअरी रजिष्टर, दैनंदिनी, रजिष्टर व डॉईंगशीट आदी स्टेशनरी छपाईस व त्याकामी येणारे रक्कम रु.८३,३००/-पर्यंतचे खर्चास मान्यता आहे. त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/आयटीआय/४१८/१४८३६/२००८ दि.०८.१०.२००८ अन्वये १२ पुरवठाधारकांकडून मागविणेत आलेली दरपत्रके उघडणेत येऊन न्युनतम दराने खालील पुरवठाधारकांना पुरवठा आदेश पाठविणेत आलेले आहेत.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नांव व गांव | पुरवठा आदेशातील रक्कम |
|---|---|---|
| ०१. | प्रवरा ऑफसेट, लोणी | रु.८२,२२५.०० |
| ०२. | सन्मति प्रिंटर्स, कोपरगांव | रु.१६,०४०.०० |
| | **एकुण** | **रु.९८,२६५.००** |

मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार स्टेशनरी छपाईचे रु.८३,३००/- पर्यंतचे खर्चास मान्यता असल्याने मुळ मंजूरीपेक्षा रु.१४,९६५/- जादा खर्च झालेला आहे.

तरी श्री साईबाबा औदयोगिक प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या स्टेशनरी छपाईसाठी मूळ मंजूरीपेक्षा जादा आलेल्या रक्कम रु.१४,९६५/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.काग्रकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**विषय नं.५९ शैक्षणिक वर्ष २००९-१० करिता स्कुल बस व वर्ग खोल्या नियोजनाबाबत.**

**निर्णय क्र.२२८** सदरहू विषयाबाबत उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्राचार्य,इंग्लिश मिडीयम स्कूल)

**विषय नं.६० इंग्लिश मिडीयम स्कूलकरीता नवीन बेंचेस खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२२९** सदरहू विषयाबाबत उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्राचार्य,इंग्लिश मिडीयम स्कूल)

**विषयनं.६१ संस्थान निवासस्थानांचा सेवाआकार वाढविणे बाबत.**

**निर्णय क्र.२३०** सदरहू विषयाबाबत उपसमिती सभेत निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासकीय अधिकारी,निवासस्थाने/अधिक्षक,सर्व निवासस्थाने)

**विषय नं.६२ नवीन टायर्स खरेदी बाबत**

**निर्णय क्र.२३१** वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील वाहनांचे सध्याचे टायर खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक होते. त्यांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार / वापर | टायर वापराचे एकूण कि.मी. | आवश्यक टायर साईज | कंपनी | टायर नग |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | एमएच-१७/ डब्ल्यू-५ | महिंद्रा स्कॉर्पिओ / कार्यालयीन | ८२,५४० | २३५-७०R-१६ रेडियल | ब्रिजस्टोन | ०५ |
| ०२. | एमएच-१७/ टी-८५०४ | टाटा बस/ भक्तनिवास | ३१,४३६ | १०-००-२० | जे.के. | ०२ |
| ०३. | एमएच-१७/ के-९९१० | महिंद्रा मॅक्स / मालवाहतुक | ५५,७१० | ७-००-R१५ | जे.के. | ०५ |
| | **एकुण** | | | | | **१२** |

महिंद्रा स्कॉर्पिओ करीता ब्रिजस्टोन कंपनीचे तसेच टाटा बस व महिंद्रा मॅक्स करीता करीता जे.के. कंपनीचे अधिकृत डिलर यांचे कडून कोटेशन बोलावुन खरेदी करण्यात येतील.

तरी वरील प्रमाणे १२ टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदीस व येणारे अंदाजे रू.९०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.६३ स्वयंसेवी भोजन व्यवस्थेकामी लावण्यात आलेल्या भाडोत्री वाहनांबाबत**

**निर्णय क्र.२३२** दि.०१.०६.२००८ पासून प्रसादालय विभागाने धर्मशाळा (२०० रूम) कॅन्टीनमध्ये नवीन स्वयसेवी प्रसाद भोजन व्यवस्था केलेली असल्याने दि.१३.०६.२००८ पासून भोजन वाहतुकीकरीता एक स्वतंत्र वाहनाची मागणी केलेली होती.

वाहन विभागाकडे उपलब्ध असलेल्या मालवाहतुक वाहनातुन वाहनाची व्यवस्था करून देणेस अडचण येणार असलेने नवीन मालवाहतुक वाहन खरेदीची कार्यवाही पुर्ण होई पर्यंत धर्मशाळा (२००रूम) येथे रू.५५०/- प्रति दिन (सकाळी ०६.०० ते २२ या वेळेत) नुसार एक भाडोत्री वाहन भोजन वाहतुकी करीता लावणेस मा.का.अ. कार्यालय आवक नं.५९०४ दि.०५.०७.२००० ने मान्यता घेण्यात आली होती.

सदर मान्यतेनुसार, दि.११.०६.२००८ पासून श्री मंगेश रामचंद्र शिंदे यांचे वाहन क्रं.एमएच-१७/के-९७५२ रू.५५०/- प्रति दिन नुसार भाडोत्री लावणेत आलेले असुन त्यांना आज पर्यंत खालील प्रमाणे बील अदा करण्यात आलेले आहे.

| अ.नं. | कालावधी | रक्कम (रू.) |
|---|---|---|
| ०१ | दि.१३.०६.२००८ ते दि.१२.०७.२००८ | १६,५००.०० |
| ०२ | दि.१३.०७.२००८ ते दि.१२.०८.२००८ | १७,०५०.०० |
| ०३ | दि.१३.०८.२००८ ते दि.१२.०९.२००८ | १७,०५०.०० |
| ०४ | दि.१३.०९.२००८ ते दि.१२.१०.२००८ | १६,५००.०० |
| ०५ | दि.१३.१०.२००८ ते दि.१२.११.२००८ | १७,०५०.०० |
| | **एकुण रक्कम (रू.)** | **८४,१५०.००** |

तरी दि.१३.०६.२००८ ते दि.१२.११.२००८ अखेर धर्मशाळा (२०० रूम) प्रसाद भोजन वाहतुक करणे करीता लावण्यात आलेल्या भाडोत्री वाहनाचे बिला पोटी अदा करण्यात आलेल्या रू.८४,१५०/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी अशाप्रकारे भाडोत्री वाहन लावण्याऐवजी संस्थानमार्फत एक थ्री व्हीलर वाहन खरेदी करणेत यावे असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.६४ जुनी वाहने जाहिर लिलावाने विक्री करणे बाबत.**

**निर्णय क्र.२३३** जुनी वाहने निर्लेखित करणेसाठी असलेल्या शासनाच्या खालील अटीचे पालन करून संस्थानचे जाहीर लिलावाच्या विहीत कार्यपध्दती नुसार, यापुर्वी दि.१७.०९.२००६ रोजी ०८ वाहने, दि.०५.०६.२००७ रोजी १४ वाहने व दि.२१.०९.२००८ रोजी ०६ वाहने अशी एकुण २८ जुन्या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करण्यात आलेली आहे.

०१. शासनांच्या नियमाचे पालन करण्याच्या अटीस अधिन राहुन ०५ वर्ष किंवा त्या पेक्षा अधिक जुनी असेलेली किंवा ०१ लाख किलोमिटरपेक्षा जास्त धाव झालेल्या वाहनांचे लिलाव विक्रीस शासन मान्यता देण्यात येत आहे.
०२. सदर लिलाव विक्री संस्थानच्या विहीत कार्यपध्दती नुसार व्हावीत.
०३. लिलाव विक्रीनंतर जमा झालेली रक्कम संस्थानच्या निधीत जमा करण्यात यावी.
०४. उपरोक्त नियमात न बसणाऱ्या वाहनांच्या लिलाव विक्रीबाबत सबळ कारण देऊन प्रस्ताव शासनास पाठविण्यात यावा.
०५. उपरोक्त वाहनांच्या विक्री नंतर संस्थानचा नवीन वाहन खरेदीचा मानस असल्यास त्या बाबतचा परिपुर्ण प्रस्ताव शासन मान्यतेसाठी स्वतंत्रपणे पाठविण्यात यावा.

अ) वाहन विभागाकडे कार्यालयीन कामाकरीता वापरात असलेली वाहने:-

| अ.नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार |
|---|---|---|
| ०१ | एमएच-१७/व्ही-९९७७ | टोंयोटा ईनोव्हा |
| ०२ | एमएच-१७/व्ही-९९८८ | टोंयोटा ईनोव्हा |
| ०३ | एमएच-१७/एक्स-४ | महिंद्रा स्कॉर्पिओ |
| ०४ | एमएच-१७/डब्ल्यू-५ | महिंद्रा स्कॉर्पिओ |
| ०५ | एमएच-१७/डब्ल्यू-५५ | महिंद्रा स्कॉर्पिओ |
| ०६ | एमएच-१७/टी-१००० | टाटा इंडीगो |
| ०७ | एमएच-१७/व्ही-१४१० | ॲम्बेसॅडोर कार |
| ०८ | एमएच-१७/व्ही-१६४१ | महिंद्रा बोलेरो |
| ०९ | एमएच-१७/व्ही-१७०१ | टाटा सुमो |
| १० | एमएच-१७/व्ही-१७०२ | टाटा सुमो |
| ११ | एमएच-१७/वाय-३६३६ | महिंद्रा लोगान |
| १२ | नवीन देणगी | महिंद्रा झायलो |

ब) रूग्णालयाकडील वापरात असलेली रूग्णवाहिका:-

| अ.नं. | वाहन क्रं. | वाहन प्रकार |
|---|---|---|
| ०१ | एमएच-१७/के-९५०१ | कार्डीयाक ॲम्ब्युलन्स |
| ०२ | एमएच-१७/टी-७१०१ | टाटा४०७ ॲम्ब्युलन्स |
| ०३ | एमएच-१७/टी-७१६१ | टाटा सुमो ॲम्ब्युलन्स |
| ०४ | एमएच-१७/टी-७१४१ | टाटा४०७ शववाहिनी |
| ०५ | एमएच-१७/टी-७१३१ | टाटा४०७ शववाहिनी |
| ०६ | एमएच-१७/के-६६५१ | मारूती ॲम्ब्युलन्स |
| ०७ | एमएच-१७/टी-८९१० | मारूती ॲम्ब्युलन्स |
| ०८ | एमएच-०३/एएच-८९१० | मारूती ॲम्ब्युलन्स |

वरील प्रमाणे कार्यालयीन कामकाजाकरीता १२ व रूग्णालयाकरीता ०८ वाहने वापरात आहेत. (उपरोक्त ब तक्त्यातील अ.नं.०६ चे वाहन दि.०७.०७.२००८ चे मा.व्य.स.सभेतील निर्णय क्रं.५५९(४) अन्वये, भगीरथ प्रकल्पास देणगी म्हणून देण्यात यावी, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले. सदर प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे.) वापरात असलेल्या वाहनांची सख्या आवश्यकते पेक्षा अधिक असलेने काही वाहनांचा वापर कमी प्रमाणात आहे. त्यामुळे खालील वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करता येईल.

**क) जाहीर लिलावाने विक्री करावयाची वाहने:-**

| अ. नं | संगणक कोड नं. | वाहन क्रमांक | वाहन प्रकार | खरेदी दिनांक | खरेदी किंमत | झालेले वर्ष-महिने | झालेले कि.मी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | VEH-६०३८ | MH-१७-W-५ | महिंद्रा स्कॉर्पिओ | ११/०४/२००६ | ६,५९,२८८.०० | ०२-०९ | १,७४,३३६ |
| २. | VEH-६०३५ | MH-१७-T-१००० | टाटा इंडीगो | २३/०६/२००५ | ४,६५,४६०.०० | ०३-०६ | ६६,१९३ |
| ३. | VEH-६०४६ | MH-१७-V-१४१० | ॲम्बेसॅडोर कार | ०२/११/२००६ | ५,१२,२७२.०० | ०२-०१ | ६७,४७४ |
| ४. | VEH-६०२० | MH-१७-H-११०१ | महिंद्रा बोलेरो | ०४/०८/२००० | ४,५२,०६७.३४ | ०८-०४ | २,९०,८९९ |
| ५. | VEH-६०४३ | MH-१७-T-७१६१ | सुमो ॲम्ब्युलन्स | १६/१०/२००६ | ४,९३,१९४.०० | ०२-०२ | १,७३,००५ |

जाहीर लिलावाने विक्री करावयाची कारणे-

०१) **वाहन क्रं.एमएच-१७/डब्ल्यू-५ (महिंद्रा स्कॉर्पिओ)-** शासन पत्र क्रं. सासंवि-२००५/३८७/(११७)- का.सोळा, दि.२९/०६/२००६ अटी नुसार, ०१ लाख किलोमिटर पेक्षा अधिक प्रवास तसेच देखभाल दुरूस्ती खर्च दिवसेंदिवस वाढत आहे.

०२) **वाहन क्रं.एमएच-१७/टी-१००० (टाटा इंडीगो)-** सदर वाहनाचे इंधन पेट्रोल असल्याकारणाने वापर जास्त नाही. तसेच दि.०७.०७.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.६०७ अन्वये संस्थानकडे असलेल्या पेट्रोल वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करण्यात यावी असे ठरलेले आहे.

०३) **वाहन क्रं.एमएच-१७/व्ही-१४१० (ॲम्बेसॅडोर कार)-** वाहने अधिक असल्याकारणाने वापर कमी तसेच देखभाल दुरूस्ती खर्च दिवसेंदिवस वाढत आहे.

०४) **वाहन क्रं.एमएच-१७/एच-११०१ (महिंद्रा बोलेरो)-** शासन पत्र क्रं. सासंवि-२००५/३८७/(११७)- का.सोळा, दि.२९/०६/२००६ अटीनुसार, ०१ लाख किलोमिटर पेक्षा अधिक प्रवास तसेच देखभाल दुरूस्ती खर्च दिवसेंदिवस वाढत आहे.

०५) **वाहन क्रं.एमएच-१७/टी-७१६१ (सुमो ॲम्ब्युलन्स)-** शासन पत्र क्रं. सासंवि-२००५/ ३८७/(११७)-का.सोळा, दि.२९/०६/२००६ अटी नुसार, ०१ लाख किलोमिटर पेक्षा अधिक प्रवास तसेच देखभाल दुरूस्ती खर्च दिवसेंदिवस वाढत आहे.

उपरोक्त क तक्त्यातील अ.नं.०४ चे महिंद्रा बोलेरो क्रं.एमएच-१७/एच-११०१ हे वाहन संस्थानचे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या मोटार मॅकेनिक व्यवसायाचे प्रशिक्षणार्थ्यांना अभ्यासक्रमानुसार प्रशिक्षणासाठी दि.०५/०६/२००७ पासून वापरात आहे. सदर वाहनाचा आजपर्यंत एकुण २,९०,८९९ कि.मी. इतका प्रवास झालेला असलेने त्याची जाहीर लिलावाने विक्री करून "अ" तक्त्यातील अ.नं.१० चे टाटा सुमो क्रं.एमएच-१७/टी-१७०२ हे वाहन प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे वर्ग करता येईल.

वरील ०५ वाहनांचा जाहीर लिलावाने विक्री झालेनंतर शासनाचे माहिती करीता प्रस्ताव सादर करता येईल.

तरी वरील प्रमाणे "क" तक्त्यातील ०५ वाहनांचा संस्थानचे विहीत कार्यपध्दतीनुसार जाहीर लिलावाने विक्री करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली. उपरोक्त वाहनांचा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहिर लिलावाने दिनांक १९.०३.२००९ रोजी विक्री करण्यात यावी असे ठरले.

याचवेळी विमानतळावर पाठविण्यात येणाऱ्या संस्थान वाहनांचे रिव्हर्स हॉर्न बंद करणे/ठेवणेबाबत वाहनचालकांना सुचना देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.६५** **वाहन विभागातील सर्व वाहनांचे वार्षिक विमा नुतनीकरणाबाबत.**

**निर्णय क्र.२३४** वाहन विभागात कार, बसेस, रूग्णवाहिका, व मालवाहतूक अशी एकुण ५३ वाहने वापरात आहेत. सदर वाहनांचा दि.३१/०३/२००९ अखेर विमा संपुष्टात येत आहे.

या पुढे दि.०१/०४/२००९ ते दि.३१/०३/२०१० अखेर एक वर्षाकरीता सर्व वाहनांचा विमा उतरविण्याचा असलेने याकामी अंदाजे एकुण रू. दहा लाख मात्र खर्च अपेक्षीत आहे. त्याकरीता राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून कोटेशन बोलावणेत आले असता खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत.

| अ.न. | विमा कंपनीचे नाव |
|---|---|
| ०१. | नॅशनल इन्शुरन्स कं.लि., |
| ०२ | ओरिएन्टल इन्शोरन्स कं.लि., |
| ०३ | युनायटेड इंडिया कं.लि., |
| ०४ | न्यू इंडिया एश्योरन्स कं.लि., |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन प्रतिनिधींना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.न.** | **विमा कंपनीचे नाव** | **कोटेशनमधील दर रुपये** | **देऊ केलेले दर रुपये** |
|---|---|---|---|
| ०१. | नॅशनल इन्शुरन्स कं.लि., | ८,६०,०००.०० | ८,७५,०००.०० |
| ०२ | ओरिएन्टल इन्शोरन्स कं.लि., | ८,३३,२७१.०० | ८,१५,०००.०० |
| ०३ | युनायटेड इंडिया कं.लि., | ८,३७,५००.०० | ८,५१,०००.०० |
| ०४ | न्यू इंडिया एश्योरन्स कं.लि., | ८,०१,०५२.०० | ७,८१,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त तक्त्यातील न्यू इंडिया एश्योरन्स कं.लि., यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.६६** **भाडोत्री क्रेन वापराबाबत.**

**निर्णय क्र.२३५** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डीतर्फे श्री साईबाबांचे श्री रामनवमी, गुरूपौर्णिमा, दसरा हे उत्सव साजरे केले जातात. सदर उत्सवात तसेच नववर्षोरंभ, उन्हाळी, दिवाळी, ख्रिसमस सुट्टयामध्ये शिर्डीत साईभक्तांचे गर्दीत मोठया प्रमाणात वाढ होते. सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातुन नगर-मनमाडरोड वरील अडथळा निर्माण करणारी वाहने उचलण्यासाठी क्रेनची आवश्यकता असलेने जा.नं.एसएसएस/वाहन/११६५३/२००८ दि.०८.०८.२००८ ने परिसरातील क्रेनधारकांकडून वार्षिक दरपत्रके (प्रति दिन नुसार) मागविण्यात आली होती. सदर कोटेशन दि.१४.०८.२००८ रोजी उघडण्यात येउन निम्नतम दरधारक ओम गुरूदेव क्रेन सर्व्हिस, कोपरगांव (प्रति दिन रू.११००/- प्रमाणे) यांना जा.नं.एसएसएस/वाहन/१२२३४/२००८ दि.१६.०८.२००८ ने माहे ऑगस्ट-२००८ ते माहे जुलै-२००९ अखेर गरजेनुसार क्रेन पुरविणे बाबत पुरवठा आदेश देण्यात आला होता.

माहे ऑगस्ट-२००८ पासून ओम गुरूदेव क्रेन सर्व्हिस, कोपरगांव यांना खालील प्रमाणे बिले अदा करण्यात आलेली आहेत.

| **अ.नं.** | **कालावधी** | **रक्कम (रू.)** |
|---|---|---|
| ०१ | दि.१५.०८.२००८ ते दि.१९.०८.२००८ | ५,५००.०० |
| ०२ | दि.२४.०८.२००८ ते दि.२४.०८.२००८ | १,१००.०० |
| ०३ | दि.३०.०८.२००८ ते दि.३१.०८.२००८ | २,२००.०० |
| ०४ | दि.०८.१०.२००८ ते दि.१०.१०.२००८ | ३,३००.०० |
| ०५ | दि.३०.१०.२००८ ते दि.०३.११.२००८ | ५,५००.०० |
| ०६ | दि.०८.११.२००८ ते दि.१०.११.२००८ | ३,३००.०० |
| ०७ | दि.१७.११.२००८ ते दि.२४.११.२००८ | ८,८००.०० |
| ०८ | दि.३०.११.२००८ ते दि.३०.११.२००८ | १,१००.०० |
| ०९ | दि.०७.१२.२००८ ते दि.०७.१२.२००८ | १,१००.०० |

| | | |
|---|---|---|
| १० | दि.१३.१२.२००८ ते दि.१४.१२.२००८ | २,२००.०० |
| ११ | दि.२०.१२.२००८ ते दि.०४.०१.२००९ | १७,६००.०० |
| १२ | दि.१०.०१.२००९ ते दि.११.०१.२००९ | २,२००.०० |
| | **एकुण रक्कम (रू.)** | **५३,९००.००** |

तरी दि.१५.०८.२००८ ते दि.११.०१.२००९ अखेर भाडोत्री क्रेनचे बिला पोटी अदा करण्यात आलेल्या रू.५३,९००/- मात्रचे खर्चास तसेच माहे जुलै-२००९ पर्यंत येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली, क्रेनने वाहन उचलल्यानंतर जमा होणारी दंडाची रक्कम शासनास जमा केल्यानंतर त्याची एक प्रत संस्थानकडे देणेबाबत शिर्डी पोलिस स्टेशन यांना कळविण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.६७** **देणगी वाहनांबाबत.**

**निर्णय क्र.२३६** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे विविध कल्याणकारी योजने करीता दि.१६/०१/२००९ रोजी महिंद्रा टुव्हिलर लि. यांनी खालीलप्रमाणे एक महिंद्रा फ्लाईट टुव्हिलर (पेट्रोल) तसेच दि.१७/०१/२००९ रोजी महिंद्रा ॲण्ड महिंद्रा कंपनी यांनी एक महिंद्रा झायलो (डिझेल) देणगी वाहने दिलेली आहे त्याची नोंद घेण्यात आली.

| अ.नं. | तपशिल | किंमत (रू.) |
|---|---|---|
| ०१ | महिंद्रा फ्लाईट टुव्हिलर | ३१,१४२.०० |
| ०२ | महिंद्रा झायलो | ५,८२,०७७.०० |

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.६८** **किटक नाशक फवारणीबाबत**

**निर्णय क्र.२३७** शिर्डी येथे श्री साईंच्या दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांचे निवासासाठी ज्या इमारती आहेत, त्या इमारतीमध्ये तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे इमारतीमध्ये भक्तांना/ रुग्णांना ढेकूण, झुरळ इ.किटकांचा त्रास होऊ नये म्हणून इमारतीमध्ये किटकनाशक फवारणी करण्यात येते.

०१. निविदा/ दरपत्रके मागणी करुन किटकनाशक फवारणीचे काम मे.एम.वाल्श, मुंबई या कंपनीस दि.०१.०४.२००६ ते दि.३१.०३.२००७ अखेर एक वर्षे कालावधीसाठी इमारतीचे आकारमानानुसार देण्यात आले होते.

०२. वर्षभराचे कालावधीत त्यांनी दिलली विनातक्रार व समाधानकारक सेवा विचारात घेऊन दि.३१.०३.२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.२८७ नुसार "आहे त्याच अटी शर्तीवर व दरावर" त्यांना दि.०१.०४.२००७ ते दि.३१.०३.२००८ अखेर एक वर्षाचे कालावधीसाठी किटकनाशके (पेस्ट कंट्रोल) फवारणीकामी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

०३. दि.२४.०२.२००८ रोजी मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.१९४ नुसार "आहे त्याच अटी शर्तीवर व दरावर" त्यांना दि.०१.०४.२००८ ते दि.३१.०३.२००९ अखेर एक वर्षाचे कालावधीसाठी किटकनाशके (पेस्ट कंट्रोल) फवारणीकामी मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

आता दि.३१.०३.२००९ अखेर मे.एम.वाल्श, मुंबई यांचा किटकनाशक फवारणीचा कालावधी संपुष्टात असुन, दि.०१.०४.२००९ पासुन पुढील एक वर्ष कालावधीसाठी किटकनाशक फवारणी करण्यासाठी कंत्राटदाराची नेमणूक करणे आवश्यक आहे.

किटकनाशके फवारणीच्या सर्वसाधारण अटी-शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) किटकनाशके फवारणीसाठी लागणारी औषधे, कामगार, त्यांचा रहाणेचा खर्च, चहापाणी, नाष्टा, जेवण, पगार इ. सर्व खर्च कंत्राटदाराने स्वतः करावयाचा आहे.

२) फवारणी करावयाचे निश्चित केलेल्या इमारतींसाठी त्यांचे एकूण आकारमानानुसार वार्षिक मंजुर रकमेवर ५% कंत्राटदाराची रक्कम संस्थानकडे सुरक्षा अनामत रक्कम म्हणून बिनव्याजी जमा राहील.

३) प्रति दोन महिन्यास एक फवारणी, याप्रमाणे वर्षभरात सर्व इमारतींमध्ये एकूण ६ फवारण्या करावयाच्या असून प्रत्येक फवारणी पुर्ण झालेनंतर एकूण मंजूर रकमेच्य १०% एवढे बिल कंत्राटदारास आदा करण्यात येईल व उर्वरीत बिलाची रक्कम वर्षअखेरीस कंत्राटदारास आदा करण्यात येईल.

४) एकदा किटकनाशके फवारणी केल्यानंतरही किटकांचा नाश न झाल्यास तक्रार निवारण होईपर्यंत पुनश्च कंत्राटदाराने त्याचे स्वखर्चाने पुन्हा किटकनाशके फवारणी करुन देण्याची व इमारतीमध्ये संपुर्ण वार्षिक कालावधीमध्ये ढेकूण, झुरळे इ. किटकांचा उपद्रव होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

उपरोक्त सर्व कारणांसाठी व त्या अनुषंगीक बाबींकरीता रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर कंत्राटदाराने करारनामा करुन देणे आवश्यक राहील.

दि.०१.०४.२००९ पासून पुढील एक वर्षासाठी किटकनाशके फवारणी करण्याकरीता ठेकेदारी निश्चित करण्यासाठी इमारती व आकारमानात बदल झालेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | विभाग | इमारतीचे नाव | खोल्या संख्या | हॉल संख्या | लॉकर्स | खोल्या व हाल मिळून एकूण क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | साईबाबा भक्तनिवासस्थान | साईबाबा भक्तनिवासस्थान | ५०९ | १५ | --- | १,७३,२६८.०० |
| २ | चौकशी व निवासस्थान | ०१. साईप्रसाद नं.१ | ८१ | --- | --- | २४,५७०.०० |
| | | ०२. साईप्रसाद नं.२ | ७८ | --- | --- | २०,२५७.०० |
| | | ०३. समर्पण | ०२ | --- | --- | ४९०.०० |
| | | ०४. साईनाथ छाया | --- | ०१ | --- | ४४८.०० |
| | | ०५. साईनिवास अतिथीगृह | २४ | ०२ | --- | १४,२२४.५० |
| | | ०६. साईउद्यान | ३३ | १२ | ९९ | २३,३१६.०० |
| | | ०७. शांतिनिकेतन | १४ | --- | --- | २,५६८.७२ |
| | | ०८ सेवाधाम | ६१ | --- | --- | ५,५०८.८९ |
| ३ | धर्मशाळा | धर्मशाळा नं.१ | ३१ | --- | --- | ७,८७२.०० |
| ४ | श्री साईनाथ रुग्णालय | धर्मशाळा नं.१<br>धर्मशाळा नं.२ | १२<br>७२ | ०४<br>०१ | ---<br>--- | ११,११४.००<br>१९,०४०.०० |
| ५ | श्री साईबाबा हॉस्पिटल | श्री साईबाबा हॉस्पिटल इमारत | १४९ | ३० | --- | ८७,४००.०० |
| ६ | बांधकाम | द्वारावती इमारत | ३३४ | --- | --- | २,०५,११७.०० |
| | | एकूण- | १४०० | ६५ | --- | ५,९५,१९२.११ |

गतवर्षी इमारतीचे आकारमान ३,८६,४८२.०० चौ.फुट होते. त्याकामी प्रती चौ.फुटास वार्षिक रु.२.६१ या दराने रु.१०,०८,१०५/- एवढी रक्कम निश्चित करण्यात आली आहे. आता इमारतीचे आकारमान ५,९५,१९२.११ चौ.फुट एवढे आहे. नव्याने २,०८,७१०.११ चौ.फुट इमारतीचे आकारमानात वाढ झालेली आहे. सन २००९-१० या एक वर्षासाठी किटकनाशके फवारणीचा वार्षिक अंदाजे खर्च रु.१७,८५,०००/- असा लागणार आहे.

मे.एम.वाल्श, मुंबई हे वार्षिक कराराने किटकनाशके फवारणी काम करीत आहेत. त्यांचे काम समाधानकारक असून, त्यांचे किटकनाशके फवारणी कामाची परिणामकारकता प्रभावी आहे. त्यांची मुदत दि.३१.०३.२००९ अखेर संपुष्टात येणार आहे.

तरी दि.०१.०४.२००९ पासून पुढील एक वर्ष कालावधीसाठी किटकनाशके फवारणीसाठी मे.एम.वाल्श, मुंबई यांना सध्या आहे त्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ द्यावी किंवा या कामासाठी नवीन ठेकेदार नियुक्ती करणेकरीता निविदा मागणी करण्यासाठी वर्तमानपत्रात जाहिरात द्यावी याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१.०४.२००९ पासून पुढील एक वर्ष कालावधीसाठी किटकनाशके फवारणीसाठी मे.एम.वाल्श, मुंबई यांना सध्या आहे त्याच अटी/ शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी. मे.एम.वाल्श, मुंबई यांनी नाकारल्यास याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवास)

**विषय नं.६९** **प्रसादालय परिसराचे सुरक्षा संदर्भात प्रसादालय परिसराच्या कास्टींग आयर्न कंम्पाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणेबाबत**

**निर्णय क्र.२३८** समाधी मंदीर, दर्शनहॉल, मंदीर परिसर, बाहेरील परिसर, चावडी, व्दारकामाई, प्रसादालय परिसराची पाहणी करुन सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला असता श्रीसमाधी मंदिर परिसराच्या कडेला असलेल्या कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता ज्याप्रमाणे लोखंडी बारीक जाळी बसविण्यात आली आहे त्याचप्रमाणे प्रसादालय परिसराचे सुरक्षा संदर्भात प्रसादालय परिसराच्या कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणे गरजेचे आहे.

याकरीता पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षित असून तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क. | तपशील | **साईज** | परिमाण | दर रुपये | किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|
| **(अ)** | **लक्ष्मीनगर कॉर्नर ते पिंपळवाडी रोड कॉर्नर**<br>गेट - ०३ नग. | | ०१४४ नग<br>०००६ नग | | |
| ०१) | जी.आय.पंचींग जाळी | ८` x ४` | १५० नग | १८००.०० | २,७००००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०२) | एम.एस.अँगल | २५ x२५ x ५ एम.एम. | ११०० कि.ग्रॅ | ४५.०० | ४९,५००.०० |
| ०३) | एम.एस. टी सेक्शन | २५ x ५ एम.एम. | ५८० कि.ग्रॅ | ४५.०० | २६,१००.०० |
| ०४) | एम.एस. फ्लॅट पट्टी | १८ x ४ एम.एम. | ३०० कि.ग्रॅ | ४५.०० | १३,५००.०० |
| **(ब)** | **नगर-मनमाड रोड ते सोसायटी जनरल बाथरुम पर्यंत**<br>गेट - ०१ नग. | | ०१२९ नग<br>०००६ नग | | |
| ०१) | जी.आय.पंचींग जाळी | ८` x४` | १४० नग | १८००.०० | २,५२,०००.०० |
| ०२) | एम.एस.अँगल | २५ x २५ x ५ एम.एम. | ८०० कि.ग्रॅ | ४५.०० | ३६,०००.०० |
| ०३) | एम.एस. टी सेक्शन | २५ x ५ एम.एम. | ४०० कि.ग्रॅ | ४५.०० | १८,०००.०० |
| ०४) | एम.एस. फ्लॅट पट्टी | १८ x ४ एम.एम. | ३०० कि.ग्रॅ | ४५.०० | १३,५००.०० |
| | | | | एकुण रक्कम | ६,७८,६००.०० |
| | वॅट १२.५ | | | रु. | ८४,८२५.०० |
| | एकुण | | | रु. | ७,६३,४२५.०० |
| | लेबर + फॅब्रिकेशन चार्जेस २५ % | | | रु. | १,९०,८५६.०० |
| | एकुण रक्कम | | | रु. | ९,५४,२८१.०० |

उपरोक्तप्रमाणे प्रसादालय परिसराच्या कास्टींग आयर्न कंपाऊंडला आतून सुरक्षिततेकरीता लोखंडी बारीक जाळी बसविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बाहेरील फॅब्रिकेटर्स/ वर्कशॉपधारकांकडून निविदा मागवून बसवून घेणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ९,५४,२८१.०० मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.७०** **व्दारावती इमारतीमधील भक्तांना थंड पाणी मिळणेकरीता वॉटर कुलर खरेदी करणे बाबत**

**निर्णय क्र.२३९** द्वारावती इमारतीचे काम पूर्णत्वाकडे असून लवकरच ही इमारत भक्तांना निवासासाठी वापरात येणार आहे. उन्हाळ्यात भक्तांना पिण्यासाठी थंड पाणी मिळावे म्हणून प्रत्येक मजल्यावर water post ठेवण्यात आलेले असून त्याठिकाणी water cooler बसविण्याची सोय केलेली आहे.

यासाठी खालीलप्रमाणे वॉटर कुलर खरेदी करावे लागतील .

| Sr.No | Description | Quantity | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | VOLTAS /BLUE STAR MAKE WATER COOLER CAPACITY-40 Ltr Delivery taps - Two Nos. STAINLESS STEEL BODY | 12- NOS. | Rs. 30,000.00 | Rs. 3,60,000.00 |

उपरोक्तप्रमाणे वॉटरकुलर खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ३,६०,०००.०० मात्र खर्च अपेक्षित असून सदरचे वॉटरकुलर कोटेशन मागवून खरेदी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.७१** **निमगांव शिवारातील साईआश्रम या इमारतीकरीता संस्थान नांवे विज जोडणी करुन घेणेकामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी यांना रक्कम रुपये ६०,१२१/- मांत्र करणेस कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**निर्णय क्र.२४०** संस्थानचे सर्व्हे नंबर - १७२ ( निमगांव ) मध्ये साईआश्रम या इमारतीचे बांधकाम मे.पार्श्वनाथ बिल्डर्स, नवि दिल्ली यांना देण्यात आलेले असून सदरील बांधकामासाठी लागणारा वीजपुरवठा मे.पार्श्वनाथ बिल्डर्स, नवि दिल्ली यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून सुरुवातीला त्यांनी त्यांचे नांवे जोडून घेतलेला आहे. आता साईआश्रम येथील वीजपुरवठयाची जोडणी संस्थान नांवे करुन घ्यावयाची आहे.

त्यासंबंधी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे कागदपत्रांची पुर्तता करण्याचे काम चालू असून वीज जोडणी संस्थान नांवे करुन घेण्याकरीता संस्थानला वीज जोडणीची अनामत रक्कम भरावी लागणार आहे. महाराष्ट्र राज्य वितरण कंपनीने संस्थान नावावर वीज जोडणी करुन घेणेकरीता रुपये ६०,१२१/- मात्र रक्कमेचे कोटेशन दिलेले असून ही रक्कम महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे भरावी लागणार आहे.

तरी संस्थानचे सर्व्हे नंबर-१७२ (निमगांव) मध्ये साईआश्रम या इमारतीकरीता संस्थान नांवे वीज जोडणी करुन घेणेकामी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि., यांना रक्कम रुपये ६०,१२१/- मात्र आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.७२** **शिर्डी शहरातून नगर-मनमाड या राजमार्गावर ठिकठिकाणी ट्रॅफिक सिग्नल बसविणे बाबत.**

**निर्णय क्र.२४१** शिर्डी शहरातून जाणा-या नगर -मनमाड या राजमार्गावर वाहतुकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. गर्दीच्या काळात वारंवार ट्रॅफीक जाम होते. व त्याचा भक्तांसोबतच ग्रामस्थ, राजमार्गावरुन जाणा-या वाहनधारकांना त्रास होतो व त्यांचा वेळ वाया जातो.

ही ट्रॅफीक जामची समस्या संपुष्टात आणणे तसेच ट्रॅफीकचे नियोजन करणेसाठी शिर्डी शहरातून ठिकठिकाणी ट्रॅफिक सिग्नल बसविणे गरजेचे आहे. मा. अध्यक्ष साहेब यांनी दि.१३.०१.२००९ रोजी याबाबत त्वरीत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा असे निर्देश दिले आहेत.

नगर - मनमाड रोडवर खालील ठिकाणी ट्राफिक सिग्नल बसविणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | ठिकाण | जंक्शन |
|---|---|---|
| ०१ | नविन श्री साई प्रसादालय (हॉटेल सिध्दांत जवळ ) | फोर आर्म क्रॉस जंक्शन |
| ०२ | नांदुर्खी - पिंपळवाडी रोड ( हरीप्रसाद हॉटेल जवळ ) | फोर आर्म क्रॉस जंक्शन |
| ०३ | एस.टी.स्टँड (स्वागत कक्ष ) | फोर आर्म क्रॉस जंक्शन |
| ०४ | ५०० रुम | थ्री आर्म क्रॉस जंक्शन (टी ) |

फोर आर्म क्रॉस जंक्शनसाठी खर्च खालील प्रमाणे :-

A) Supply, Erection,Installation of LED Road Traffic Signal Junction Four Arm Cross Junction. Hybrid ( solar + electricity) Mode (AC / DC).
Three Junctions as below:-
1. S.T-Stand - Swagat Kaksha
2. Pimple Wadi Road
3. New Shree Sai Prasadalay
Cost for One junction:-

| Sr.No. | Particulars | Quantity | Rate | Cost |
|---|---|---|---|---|
| 1 | Led Lamp Heads (230v A/c), Signal Body - Polycarbonate - Altek Systems Make Size - 300mm, Power Consumption 7 to 10 Watts. | 40Nos. | 5800.00 | 232000.00 |
| 2 | Battery set up Industrial Grade Tubular Exide | 02 NOs. | 18500.00 | 37000.00 |
| 3 | Solar Panel 75Wx4(Tata BP) | 300watt | 300.00 | 90000.00 |
| 4 | Inverter for the JN sine wave | 1 No. | 16500.00 | 16500.00 |
| 5 | MS Pole 4"Dia,6 meter with Fabrication and painting | 4 No. | 12000.00 | 48000.00 |
| 6 | Microprocessor Controller-Keltron | 1 No. | 59000.00 | 59000.00 |
| 7 | Charge Controller- Keltron | 2 No. | 3000.00 | 6000.00 |
| 8 | Frame for Panel | 4 No. | 1000.00 | 4000.00 |
| 9 | Clamp for Lamp Heads | 40 Nos. | 150.00 | 6000.00 |
| 10 | (Battery+ Invertor) Box | 1 No. | 4500.00 | 4500.00 |
| 11 | Cables (AC+DC) | JOB | 49000.00 | 49000.00 |
| 12 | Civil Work + Operation of JN | JOB | 45000.00 | 45000.00 |
| 13 | Junction Box | 4 NOS. | 500.00 | 2000.00 |
| 14 | Transport + LABOUR + MISC | JOB | 19000.00 | 19000.00 |
| | Total | | | 618000.00 |
| | VAT 12.5 % | | | 77250.00 |
| | Cost | | | 695250.00 |

एका फोर आर्म क्रॉस जंक्शनसाठी जंक्शनसाठी रु. ६,९५,२५०.०० प्रमाणे तर तीन फोर आर्म क्रॉस जंक्शनसाठी जंक्शनसाठी रु. २०,८५,७५०.०० खर्च येऊ शकतो.

**थ्री आर्म जंक्शन ( टी )साठी खर्च खालील प्रमाणे :-**

(B) Supply, Erection,Installation of LED Road Traffic Signal Junction Three Arm Cross Junction.( T) Hybrid ( solar + electricity) Mode (AC / DC).

**Junction:- At ५०० Rooms**

| Sr.No. | Particulars | Quantity | Rate | Cost |
|---|---|---|---|---|
| 1 | Led Lamp Heads (230v A/c), Signal Body - Polycarbonate - Altek Systems Make Size - 300mm, Power Consumption 7 to 10 Watts. | 30 Nos. | 5800.00 | 174000.00 |
| 2 | Battery set up Industrial Grade Tubular Exide | 02 Nos. | 18500.00 | 37000.00 |
| 3 | Solar Panel 75Wx4(Tata BP) | 300watt | 300.00 | 90000.00 |
| 4 | Inverter for the JN sine wave | 1 No. | 16500.00 | 16500.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 5 | MS Pole 4"Dia,6 meter with Fabrication and painting | 3 Nos. | 12000.00 | 36000.00 |
| 6 | Microprocessor Controller-Keltron | 1 No. | 59000.00 | 59000.00 |
| 7 | Charge Controller- Keltron | 2 No. | 3000.00 | 6000.00 |
| 8 | Frame for Panel | 4 No. | 1000.00 | 4000.00 |
| 9 | Clamp for Lamp Heads | 30 Nos. | 150.00 | 4500.00 |
| 10 | (Battery+ Invertor) Box | 1 No. | 4500.00 | 4500.00 |
| 11 | Cables (AC+DC) | Job | 49000.00 | 49000.00 |
| 12 | Civil Work + Operation of JN | Job | 45000.00 | 45000.00 |
| 13 | Junction Box | 3 NOS. | 500.00 | 1500.00 |
| 14 | Transport + LABOUR + MISC | JOB | 19000.00 | 19000.00 |
| | Total | | | 546000.00 |
| | VAT 12.5 % | | | 68250.00 |
| | Cost | | | 614250.00 |

नगर मनमाड रोडवर एकुण ३ ठिकाणी फोर आर्म क्रॉस जंक्शन ट्रॅफिक सिग्नलसाठी रु. २०,८५,७५०.०० व एका ठिकाणी थ्री आर्म क्रॉस जंक्शन ( टी ) ट्रॅफिक सिग्नल उभारण्यासाठी रु.६,१४,२५०.०० मिळून रु. २७,००,०००.०० इतका खर्च अपेक्षीत असून हे ट्रॅफिक सिग्नल हायब्रीड सिस्टिमवर चालणारे असून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर सोलर सिस्टीमद्वारे एनर्जाईज झालेल्या बॅटऱ्यामधून मिळणाऱ्या डीसी वीजपुरवठ्यावर हे सिग्नल चालणार आहेत. हे ट्रॅफिक सिग्नल बसविल्यानंतर ही मालमत्ता शिरडी नगरपंचायतीकडे हस्तांतरीत होत असल्याने ट्रॅफिक सिग्नलकरीता लागणाऱ्या खर्चास राज्य शासनाची पूर्व परवानगी घ्यावी लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी नगर-मनमाड रोडवर क्रॉसिंगवर जेथे सिग्नल बसविण्यात येणार नाही अशा ठिकाणी सिमेंट ब्लॉक टाकून सदर रस्ता वाहनांसाठी बंद करण्याची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.७३ शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोडवर मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलिंग तयार करुन बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.२४२** श्री साईबाबांच्या दर्शनासाठी दिवसेंदिवस भक्तांची गर्दी वाढत आहे. कधी कधी हा आकडा लाखोच्या घरात जातो. त्यामुळे सध्या असलेल्या दर्शन लाईन हॉलमधील जागा कमी पडत आहे. अलिकडे बऱ्याच वेळा भक्तांची गर्दी वाढल्याने दर्शन लाईन मधील रांगा कमी पडल्या आहेत. तरी भक्तांची गर्दी लक्षात घेता शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोडवर मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करून बसविल्यास दर्शन लाईनमधील रांगाची संख्या वाढून जास्तीत जास्त भक्तांना रांगेत समाविष्ट करून घेता येईल. हे रेलींग गर्दीच्या काळात लावता येईल व गर्दी नसताना काढून घेता येईल. हे रेलींग जमीनीपासून ५ फूट ऊंचीचे असणार आहे, त्यामुळे रेलींगवरून ऊडी मारून एका रांगेतून दुसऱ्या रांगेत भक्तांना जाता येणार नाही.

शांतिनिवास इमारतीचे उत्तरेकडील पिंपळवाडी रोडवर मुव्हेबल स्टेनलेस स्टील रेलींग तयार करून बसविण्याकरीता प्रती फूट रुपये ६७५.०० प्रमाणे रु. ३१,७५,७५०.०० इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्त कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन वर्कशॉपधारकांकडून टेंडर मागविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३१,७५,७५०.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.७४ व्दारावती या नवीन इमारतीचे परिसरात हायमास्ट पोल उभारणेस व येणाऱ्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२४३** व्दारावती या नविन इमारतीचे काम अंतिम टप्प्यामध्ये असून सदर इमारतीला मा.आर्कीटेक्ट, श्री.काबरे यांनी संध्याकाळच्या वेळी भेट दिली असता सदर परीसरातील प्रकाशव्यवस्था कमी असल्याचे आढळले. व्दारावती इमारत चालू झाल्यानंतर होणारी भक्तांची गर्दी तसेच श्री साईनाथ हॉस्पीटलकडील तेथील रुग्ण व त्यांचे नातेवाईकांची गर्दी अहोरात्र असणार आहे. त्याकरीता मा.आर्कीटेक्ट यांनी सदर परीसरामध्ये हायमास्ट पोल उभारणी संदर्भात पत्र दिलेले आहे. त्यानुसार सदरचे हायमास्ट पोल खालील ठिकाणी उभारणेस कळविलेले आहे.

०१). मेनगेटच्या बाहेरील रोडच्या मध्यभागी

०२). व्दारावती इमारतीच्या मेनगेट समोरील बगीचाच्या मध्यभागी

०३). व्दारावती इमारतीच्या शेजारील पार्कींग परीसरामध्ये

उपरोक्त ठिकाणी हायमास्ट पोल उभारणेस आर्कीटेक्ट, श्री.काबरे यांनी कळविलेले असून सदरचे काम व्दारावती इमारतीचे ठेकेदार मे.गोलानी बिल्डर्स, मुंबई यांचेकडून करवून घेता येईल. व होणारे बील

शासनमान्य सी.एस.आर.नुसार EXtra Item म्हणून देता येईल. त्यानुसार शासनमान्य सी.एस.आर.नुसार खालीलप्रमाणे खर्च येणार आहे.

| Sr. No. | C.S.R. | DESCRIPTION | Qty. | Rate. Rs | Amount. Rs |
|---|---|---|---|---|---|
| 01 | 8-3-1 | Providing and erecting 12.5m High-Mast, weight 240 kg on provided foundation as per specification no. OH-PL/HM. | 03 | 53,550.00 | 1,60,650.00 |
| 02 | 2-3-28 | Supplying and erecting gate gate light fitting with 300 mm. dia.Opal acrylic bowl / mushroom / round shape without bollard suitable for one 9 / 11 w CFL lamp on provided pipe as per specification no.FG-ODF / GFT. | 18 | 07,776.30 | 1,39,973.40 |
| 03 | 2-1-33 | Supplying and erecting Metal Halide lamp, 230V, 250 W double ended. | 18 | 01,060.50 | 0,19,089.00 |
| 04 | 17-3-8 | Designing & casting M-20 cement concrete foundation suitable for 12.5 m high mast considering the safe soil bearing capacity at site as 10 T/sq m at 2 meter depth including excavation, foundation nut bolts etc in an approved manner. | 03 | 19,950.00 | 0,59,850.00 |
| | | | | Total Rs. | 3,79,562.40 |
| | | | | Contigency 4% Rs. | 0,15,182.49 |
| | | | | Total. | 3,94,744.89 |
| | | | | **Round up Total :-** | **3,94,745.00** |

उपरोक्तप्रमाणे हायमास्ट पोल उभारणीकामी रक्कम रु.३,९४,७४५.०० + मे.गोलानी बिल्डर्स, नाशिक यांना मा.व्यवस्थापन समितीने मान्य केलेली चौथ्या मजल्याच्या टेंडर रकमेवरील परसेंटेज दरानुसार होणारी रक्कम इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.७५** **श्रीसाई मंदिराचे उत्तरेकडील बाजूस स्टेनलेस स्टील रिलींग बसविणेकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी देणे बाबत.**

**निर्णय क्र.२४४** श्री साई समाधी मंदीरातील लादी (फरशी) देणगी स्वरूपात नवीन बसविण्याचे काम श्री प्रजापती, जयपूर यांचेमार्फत चालू असून या संदर्भात मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०३/०१/२००९ रोजी झालेल्या सभेतील विषय क्र.२१ निर्णय क्र.२१ अन्वये मंदीराचे उत्तर बाजूस नवीन स्टेनलेस स्टील रेलींग करण्यास व याकामी अंदाजित रू.३,५०,०००/- इतक्या खर्चास मान्यता मिळाली होती.

मा.व्य.समितीसमोर प्रस्ताव सादर करतांना रेलींगची उंची ५ फुट x १०० फुट लांब इतकी गृहीत धरून रू.७००/- प्रती स्क्वेअर फुट प्रमाणे रू.३,५०,०००/- इतक्या रकमेस मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०३/०१/२००९ रोजी झालेल्या सभेतील विषय क्र.२१ निर्णय क्र.२१ अन्वये मान्यता घेण्यात आली होती. यानंतर संरक्षण विभागाने मंदीराचे सुरक्षिततेकरीता तसेच भक्तांनी रेलींगवरून उडी मारून आत जाऊ नये म्हणून रेलींगची उंची ७ फुट करण्याची सूचना केली. त्यानुसार ७ फुट उंच x १०० फुट लांबीच्या रेलींगसाठी रू.७००/- प्रति स्क्वेअर फुट प्रमाणे रू.४,९०,०००/- इतका खर्च येईल.

मंदिरातील लादी बदलण्याचे काम चालू असून बाहेरील उत्तर बाजूकडील सिव्हील कामही चालू झाले आहे. त्यामुळे या ठिकाणी तातडीने मंदीराचे सुरक्षिततेकरीता तसेच भक्तांनी दरवाजांमध्ये गर्दी करू नये म्हणून रेलींग बसविणे गरजेचे होते. मंदीर परिसरात यापूर्वी स्टेनलेस स्टील रेलींगचे काम केलेले कॉन्ट्रक्टर मे.साई इंजिनिअर्स नाशिक यांना समक्ष पाहणीकरीता व चर्चेकरीता दि.१३/०२/२००९ रोजी बोलविले असता त्यांनी हे रेलींग मा.व्य.समितीने लाडू काउंटरच्या स्टेनलेस स्टील रेलींगसाठी मंजूर केलेल्या दरात काम करून देऊ तसेच या व्यतिरिक्त रेलींगच्या आतून बारीक जाळी डोनेशन स्वरूपात लावून देऊ म्हणून सांगितले.त्यांनी याकामी त्वरीत कोटेशन सादर केले असून याचा व पूर्वीच्या दराचा तपशील खालीलप्रमाणे-

०१). मा.व्य.समितीच्या दि.१०/०१/२००८ च्या सभेतील विषय क्र.२२ निर्णय क्र.२२ अन्वये मंजूर दर खालील प्रमाणे-

| SR.NO | MATERIAL DETAILS | QTY. | RATE | | COST |
|---|---|---|---|---|---|
| 01. | STAINLESS STEEL 304 ROUND PIPE – 50MM DIA. X 16 SWG THK. | 90 ft. | 170.00 | per ft | 15,300.00 |
| 02. | STAINLESS STEEL 304 ROUND PIPE – 25MM DIA. X 16 SWG THK. | 150 ft. | 95.00 | per ft. | 14,250.00 |
| 03. | STAINLESS STEEL 304 HALF-ROUND BEND –25MM DIA. X 16 SWG THK. | 24nos. | 280.00 | per no. | 6,720.00 |
| 04. | STAINLESS STEEL 304 90 DEG. BEND – 50MM DIA. | 4 nos. | 250.00 | per no. | 1,000.00 |
| 05. | STAINLESS STEEL 304 CANOPY | 10 nos. | 180.00 | per no. | 1,800.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 06. | STAINLESS STEEL 304 FLANGE. | 20 nos. | 135.00 | per no. | 2,700.00 |
| 07. | STAINLESS STEEL 304 GROUTING PIPE BRACKET WITH HARDWARE SIZE 60MM DIA X 10 " | 10 nos. | 550.00 | per no. | 5,500.00 |
| 08 | WELDING ROD | 3.0 KG. | 2650.00 | per kg. | 7,950.00 |
| 09 | Total | | | | 55220.00 |
| 10 | LABOUR + TRANSPORTATION + COST. INCLUDING FITTING AT SITE WITH CIVIL WORK .( 5.3436 % on material cost SR. No. 09) | | | LUMP SUM | 19,500.00 |
| 11 | Total ( material + Labour Cost ) | | | | 74,720.00 |
| 12 | Vat 12.5 % | | | | 09,340.00 |
| 13 | Total ( 11 + 12) | | | | 84,060.00 |
| 14 | Less Discount offered in the meeting dt:- 10/01/2008 | | | 5.3436 % | 04,492.00 |
| | NET TOTAL | | | | 79,568.00 |

०२). मे.साई इंजिनिअर्स यांनी वरील मंजूर दरात समाधी मंदीराचे उत्तर बाजूकडील ७ फूट ऊंचीच्या रेलींगच्या कामाचे दिलेले कोटेशन खालीलप्रमाणे-

| SR.NO | MATERIAL DETAILS | QTY. | | RATE | | COST |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | Stainless Steel 304 Round Pipe, Size- 50mm X 16 SWG Thick | 670 | Ft. | 170.00 | Per Ft. | 113,900.00 |
| 02 | Stainless Steel 304 Round Pipe, Size - 25mm X 16 SWG Thick | 1400 | Ft. | 95.00 | Per Ft. | 133,000.00 |
| 03 | Stainless Steel 304 Half Round Bend, Size- 25mm X 16 SWG Thick | 100 | No. | 280.00 | Per No. | 28,000.00 |
| 04 | Stainless Steel 304 90 DEG Bend - Class, Size- 50 mm DIA. | 30 | No. | 250.00 | Per No. | 7,500.00 |
| 05 | Stainless Steel 304 Canopy | 30 | No. | 180.00 | Per No. | 5,400.00 |
| 06 | Stainless Steel 304 Flange | 60 | No. | 135.00 | Per No. | 8,100.00 |
| 07 | Stainless Steel 304 Grouting Pipe Bracket with Hardware Size - 60 MM Dia X 10" long | 30 | No. | 550.00 | Per No. | 16,500.00 |
| 08 | Welding Rod | 10 | Kg. | 2,650.00 | Per Kg. | 26,500.00 |
| 09 | **Total ( Material Cost )** | | | | | |
| 10 | Labour + Transportation + Cost. Including fitting at site with Civil Work (as per percentage Rate given in abovesaid tender ) | | | Lumpsum | | |
| 11 | **Total ( material + Labour Cost** | | | | | 458,577.45 |
| 12 | **Vat 12.5 %** | | | | | 57,322.18 |
| 13 | **Total ( 11 + 12)** | | | | | 515,899.63 |
| 14 | **Less Discount offered in the meeting dt:-10/01/2008** | | | 5,3436% | | 27,567.61 |
| **NET TOTAL** | | | | | | 27,567.02 |

मंदीराचे सुरक्षिततेकरीता तसेच भक्तांनी दरवाजांमध्ये गर्दी करू नये म्हणून रेलींगची उंची वाढविले मुळे रू.३,५०,०००/- पेक्षा जास्त आलेल्या रू.१,३८,३३२/- इतक्या खर्चास तसेच काम तातडीचे असल्याने व मे. साई इंजिनिअर्स,नाशिक हे मा.व्य.समितीच्या मान्य केलेल्या पूर्वीच्या दरात काम करण्यास तयार असल्याने त्यांना रू. ४,८८,३३२/- इतक्या रकमेचा कार्यादेश देणेत आला होता. त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.७६** **श्रीसाई मंदीरातील सध्या वेगवेगळया पाईपमधुन असलेल्या विविध प्रकारचे वायरिंग सुशोभिकरणाचे दृष्टीने एकाच नविन प्रकारच्या काण्ड्यूटमधुन टाकणेकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२४५** श्री साई मंदिरात नविन संगमरवरी फरशी बसविण्याचे चालू असून या कामाचे वेळी तेथील सर्व यंत्रणा / मशिनरी व्यवस्थीत व दृष्टीस आल्हाददायक वाटेल अशा त-हेने पुर्ण रचना करण्याचे प्रस्तावित आहे.

मंदिरात सीसीटिव्ही-ध्वनिक्षेपण तसेच विद्युत यंत्रणेचे ठिकठिकाणी वायरींग असून ते वेगवेगळे प्रकाराचे असल्याने विद्रुप दिसते. त्यामुळे ते एकत्र बंदिस्त पाईपमधून टाकणे गरजेचे आहे. परंतू इलेक्ट्रीकल व सीसीटिव्ही-ध्वनिक्षेपण वायरींग एकत्र टाकल्यास त्याचा परिणाम सीसीटिव्हीतील प्रक्षेपणावर होऊ शकतो. म्हणून स्पेशल प्रकारच्या पाईपमधून ही वायरींग करावी लागणार आहे. जेणेकरुन इलेक्ट्रीकल व सीसीटिव्ही-ध्वनीक्षेपण वायरींग एकाच पाईपमधून जाऊनही त्यांचा एकमेकांवर परिणाम होणार नाही. या विशिष्ट प्रकारच्या पाईपमध्ये वेगवेगळया कंपार्टमेंट असून या वेगवेगळया कंपार्टमेंटमधून

स्वतंत्ररित्या इलेक्ट्रीलचे वायरींग, सीसीटिव्ही वायरींग करता येईल. तसेच यात लॅन (कामप्युटर) वायरींगही करता येऊ शकते.

यामुळे वायरींगचे वेगवेगळे पाईप, प्रकार न दिसता फक्त स्क्वेअर कॉन्डयूटच दिसेल. शिवाय या कॉन्डयूटमध्ये प्लग-सॉकेट, पिन वगैरेचा समावेश असलेल्या सिलींग रोज, होल्डर वगैरे बाबी टाळता येतील.

यासाठी मे.आर.आर.केबल लिमिटेड , मुंबई यांनी भारतात प्रथमतःच जापान / सिंगापूर टेक्नॉलॉजी वापरुन वेगळया प्रकाराचे आरारीयुबीआयक्यु केबल सिस्टिम नावाचे कॅन्डयूट तयार केले आहे. व ते या प्रकारच्या पाईपचे व साहित्याचे उत्पादक आहेत. हे पाईप समक्ष पाहिले असता दणकट व कामास सोपे तसेच दिसण्यास सुंदर आहेत. ते वापरल्यास मंदिरातील वायरींगचे जाळे नाहिसे होऊन आतील हॉल सुंदर दिसेल.

याकामी मे.आर.आर.केबल लिमिटेड , मुंबई यांनी खालीलप्रमाणे अपेक्षित खर्च कळविला आहे.

| Sr. No. | Product Desctription | Qty. | Net Price Rs. | Total Amt. Rs. |
|---|---|---|---|---|
| 01 | Surface Mount cable management system SH1, Housing Net Price Rs.= Per 1 Meter | 70 Meter. | 1,200.00 | 0,84,000.00 |
| 02 | Surface Mount cable management system SFC2d, Dummy Cover Net Price Rs.= Per 1 Meter | 70 Meter. | 0,400.00 | 0,28,000.00 |
| 03 | Surface Mount cable management system SH1, End Cap (1pair) Net Price Rs.= Per 1 Pair | 25 Nos. | 0,480.00 | 0,12,000.00 |
| 04 | Surface Mount cable management system SH1, Internal Corner Cap & Corner Links Net Price Rs.= Per 1 Unit | 20 Nos. | 0,360.00 | 0,07,200.00 |
| 05 | Surface Mount cable management system SH1, External Corner Cap & Corner Links Net Price Rs.= Per 1 Unit | 20 Nos. | 0,360.00 | 0,07,200.00 |
| 06 | SFC2 Power Track 40A 400 mm | 10 | 1,840.00 | 0,18,400.00 |
| 07 | IN1 Indian Classic Adaptor 6/16A | 10 | 0,760.00 | 0,07,600.00 |
| 08 | XLR Panel 3 Pole Female 12PE083-99 | 10 | 0,175.00 | 0,01,750.00 |
| 09 | Speaker Connector Socket 4 Pole Speak-on 12PE – 342-00 | 10 | 0,250.00 | 0,02,500.00 |
| 10 | Speaker Connector Top 4 Pole Speak-on 12PE – 347-00 | 10 | 0,300.00 | 0,03,000.00 |
| 11 | Camera Plug 75 Ohm Crimp BNC Top Female 12 PF – 053 – 99 | 10 | 0,390.00 | 0,03,900.00 |
| 12 | Camera Plug 75 Ohm Crimp BNC Top Mail 12 PF – 016 / 038 – 99 | 10 | 0,110.00 | 0,01,100.00 |
| 13 | Cat5 Panel Plug 12 PG070 | 12 | 0,390.00 | 0,04,680.00 |
| 14 | Cat5 Panel Plug 12 PG060 | 12 | 0,110.00 | 0,01,320.00 |
| 15 | Cable Tie 10mm / 15mm (Pack of 100nos.) | 12 | 0,100.00 | 0,01,200.00 |
| 16 | Cable Tie Binder (Pack of 100nos.) | 12 | 0,300.00 | 0,03,000.00 |
| 17 | Labour Charges (per meter) | 70 | 0,215.00 | 0,15,050.00 |
| | | Total | Total Rs.:- | 2,01,900.00 |
| | | Vat 12.5 % | | 0,25,238.00 |
| | | Net Total :- | | 2,27,138.00 |
| Total Rs. Two Lac Twentyseven Thousand One Hundred Thirtyeight Only. | | | | |

वरीलप्रमाणे मे.आर.आर.केबल लिमिटेड , मुंबई यांनी रुपये २,०१,९००.०० + वॅट १२.५ % रु. २५,२३८.०० = रुपये २,२७,१३८.०० इतके इस्टिमेट कळविले होते. तसेच मे.आर.आर.केबल,लि., मुंबई यांनी या कामाची ऑर्डर त्यांच्याच मे.एमईडब्ल्यू इलेक्ट्रिकल्स प्रा.लि.,मुंबई यांचे नावावर काढावी असेही कोटेशनमध्ये कळविले आहे. हे काम तातडीने करावयाचे असल्याने व मे.आर.आर.केबल लि.,मुंबई हे या प्रकारच्या पाईपचे व साहित्याचे एकमेव उत्पादक असल्याने त्यांनी कळविल्यानुसार मे.एमईडब्ल्यू इलेक्ट्रिकल्स प्रा.लि.,मुंबई रुपये २,२७,१३८.०० इतक्या रकमेचा कार्यादेश देणेत आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.७७** **नविन श्रीसाईप्रसादालयाकरिता डिजीटल डिसप्ले बोर्ड खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२४६** सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.७८** **बंदोबस्ताकरीता आलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांची संस्थानमार्फत मोफत निवास व्यवस्था करणेबाबत**

**निर्णय क्र.२४७** शिर्डी येथे श्रींच्या दर्शनासाठी अतिमहत्वाच्या व्यक्ती येत असतात येणाऱ्या या अतिमहत्वाच्या व्यक्तींमध्ये बहुतांशी झेड किंवा झेड प्लस प्रकारातील सुरक्षा व्यवस्था असते. त्यामुळे त्यांचे शिर्डी येथील नियोजित दौऱ्याचेवेळी सुरक्षिततेच्या कारणास्तव एक दिवस अगोदर पोलिस विभागाचे उच्च पदस्थ अधिकारी व

कर्मचारी शिर्डी येथे मुक्कामी येतात. या येणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची संस्थानमार्फत विनामूल्य निवासव्यवस्था करणेबाबत पोलिस निरिक्षक, शिर्डी पोलिस स्टेशन यांचेकडून विनंतीपत्र येत असते.

दिनांक १९.११.२००८ रोजी मा.मुख्यमंत्री सो. यांचे शिर्डी भेटी प्रसंगी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बाहेरील येणारे वरिष्ठ अधिकारी, पोलिस अधिकारी व कर्मचारी यांची खालीलप्रमाणे संस्थानकडून विनामूल्य निवास व्यवस्था करणेकामी संस्थानला लेखी पत्र दिलेले आहे.

०१. आय.पी.एस. अधिकारी यांचेकरीता - २ रुम अतिथीगृह
०२. पोलिस उपनिरीक्षक व पोलिस निरीक्षक (एकुण-१५) यांचेकरीता ५०० रुम येथे ०६ रुम.
०३. सपोनि/पीसई (एकुण-३५) यांचेकरीता १० रुम साईप्रसाद बिल्डींग
०४. पोलिस कर्मचारी (एकुण-२५० कर्मचारी) यांचेकरीता ०४ हॉल साईउद्यान, मंगल कार्यालय, २०० रुम (धर्मशाळा)
०५. महिला पोलिस कर्मचारी (एकुण-२५ महिला कर्मचारी) यांचेकरीता ०१ हॉल साईउद्यान, मंगल कार्यालय.

श्री साईबाबा संस्थानच्या वतीने विनामूल्य निवासव्यवस्था करण्याची प्रचलित पध्दती नाही. तसेच अतिमहत्वाच्या व्यक्तींसाठी सुरक्षिततेच्या कारणास्तव येणाऱ्या सर्व पोलिस विभागांच्या कर्मचाऱ्यांना शासनातर्फे अतिरिक्त भत्ता देण्यात येतो असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या शिर्डी भेट प्रसंगी सुरक्षा व्यवस्थेसाठी येणाऱ्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांची संस्थानतर्फे विनामूल्य निवास व्यवस्था करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**विषय नं.७९** **श्रीसद्गुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा हिंदी अनुवाद पुस्तक छपाई खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत**

**निर्णय क्र.२४८** मे. कल्याणी कार्पोरेशन, पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/३४११/२००८ दि.०४.०३.२००८ संस्थान प्रकाशित श्री सद्गुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा हिन्दी अनुवाद १०,००० नग निम्नतम दर रु.६.८५ पैसे प्रमाणे छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला होता.

श्री सद्गुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा हिन्दी अनुवाद छपाई होऊन माहे जुलै २००८ मध्ये १०,००० प्रती प्राप्त होऊन भक्तांची जास्त प्रमाणात मागणी वाढल्याने ३ महिन्यात विक्री झाली आहे. तसेच माहे जून २००८ पासूनचा २०% सवलतीचे दराने विक्री केल्याने स्टॉक संपलेला आहे. आजरोजी भांडार विभागात स्टॉक शिल्लक नसल्याने व नाताळची सुटी असल्याने भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून वरील प्रेसधारक यांना दि. २५.११.२००८ रोजी दूरध्वनीवरुन आरती पुस्तक २५,००० नग तातडीने छपाई करणेबाबत प्रशासकीय अधिकारी यांनी चर्चा केली असता प्रेस चे मालक श्री गौतम गेलेंडा यांनी सांगितले की आरती पुस्तक छपाई होऊन ३ महिन्याचा कालावधी झालेला आहे त्यामुळे वरील छपाई दराने छपाई न होता वाढीव दर मिळाल्यास आपणास आवश्यक असलेल्या २५,००० प्रती छपाई करुन देणेस तयार असलेबाबत सांगितले आहे.कारण बाजारामध्ये कागदाचे दर भरपूर प्रमाणात वाढलेले आहेत तसेच वहातुक दरात पण डिझेल दर वाढीमुळे वाहतूकीचे दरही वाढलेली आहे. श्री सद्गुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा हिन्दी अनुवाद पुस्तक छपाईकामी आजचे कागदाचे बाजारभाव व वहातुकीचा विचार करता प्रती नग दर रु. ७.६८ पैसे येत आहे. चर्चेअंती आपण प्रती नग रु. ७.५० मध्ये करत असल्यास २५,००० नग छपाई करावयाची आहे. त्यास त्यांनी सहमती दिल्याने २५,००० नग दर रु. ७.५० पैसे प्रमाणे रु. १,८७,५००/- खर्च अपेक्षित आहे.

श्री सद्गुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा हिन्दी अनुवाद १,५०,००० नग छपाई करणे आहे. सदरहू पुस्तकांचे कोटेशन तयार करणे, कोटेशन प्राप्त होणे, उघडणे, छपाई कामाचे आदेश देणे यास जवळजवळ २ ते ३ महिन्यांचा कालवधी लागणार आहे. त्यामुळे तातडीने आरती पुस्तके छपाई करुन घेणे गरजेचे असल्याने मे. कल्याणी कार्पोरेशन,पुणे यांना जा.नं. एसएसएस/वशी/प्रकाशने/१७६०८ दि.२८.११.२००८ नुसार छपाई कामाचा आदेश देण्यात आलेला असून त्यास रक्कम रु.१,८७,५००/- खर्च आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**विषय नं.८०** **श्रीसाईबाबा थ्री डी फोटो (पॉकेट साईज) छपाईबाबत**

**निर्णय क्र.२४९** मे. परफेक्ट प्रिंट प्रॉडक्टस् प्रा.लि., मुंबई दि.१६.०९.२००८ चे प्रस्तावात थ्रीडी पॉकेट साईज फोटो (३.५"x २.५") किंमत प्रती नग रु.६.५० पैसे प्रमाणे व ५० लाख फोटो घेतल्यास किंमत प्रती नग रु.५/- प्रमाणे पुरवु असा प्रस्ताव सादर केला होता.

संस्थान प्रकाशित ७६ प्रकारची पुस्तके २२ प्रकारचे फोटो १२ प्रकारच्या सी.डी. कॅसेट संस्थान मार्फत विक्री केल्या जातात. प्रकाशनांच्या संख्येत झालेली लक्षणीय वाढीमुळे भांडारात साठा करणेसाठी जागेची अडचण निर्माण होते. तसेच सदर पॉकेट साईज फोटोचे अंदाजे वार्षीक खप विचारात घेता मा.

व्यवस्थापन समितीच्या दि.१८.१०.२००८ च्या सभेतील निर्णयानुसार प्रती नग रु.६.५० पैसे प्रमाणे एक नग एकूण किंमत रु. सहा लाख पन्नास हजाराची आर्डर त्यांना देण्यात आलेली आहे.

मे. परफेक्ट प्रिंट प्रॉडक्टस् प्रा.लि., मुंबई यांनी दि.१२.११.२००८ च्या पत्राने सदर फोटोसाठी लागणारे मटेरीयल आयात करावे लागते किमान ५ लाख फोटोची आर्डर मिळाल्यास मटेरीयल आयात करणे साईचे होईल तरी ५ लाख प्रतीची ऑर्डर मिळावी. त्यासाठी किंमत प्रती नग रु. ६.५० ऐवजी प्रती नग रु.६/- प्रमाणे पुरवठा करु असा प्रस्ताव सादर केला आहे.

उपरोक्त दरानुसार दरवर्षी मे. परफेक्ट प्रिंट प्रॉडक्टस, मुंबई यांची मटेरीयल आयात करणेची अडचण व संस्थानची उपरोक्त नमूद केलेली वस्तूस्थीती विचारात घेता ५,००,००० प्रती नग रु.६/- प्रमाणे एकूण रक्कम रु.३०,००,०००/- ची आर्डर देणेबाबत विचार होणेस विनंती. पुरवठा मात्र दरवर्षी एक लाख याप्रमाणे ५ वर्षात ५ लाख प्रतीचा पुरवठा करावा अशी अट आदेशात नमुद करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. परफेक्ट प्रिंट प्रॉडक्टस् प्रा.लि., मुंबई यांना समक्ष व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चेस बोलावून अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**विषय नं.८१** **प्रतिसाद नसलेल्या प्रेसधारकांची नांवे निवडक प्रेसधारकांचे यादीतून कमी करणेस व नवीन प्रेसधारकांची नांवे समाविष्ठ करणे बाबत**

**निर्णय क्र.२५०** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ च्या कलम नं.१७ ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहीतीचा प्रचार- प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

१) त्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. तर्फे श्री साईबाबांची विविध भाषेतील साईचरित्रे वगैरे पुस्तके तसेच फोटो/ कॅलेंडर ,डाय-या छपाई करुन विक्री करते.

२) छपाई कामाच्या नियोजनाच्या दृष्टीने मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. २९-३१.३.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१३८ नुसार छपाई कामी मा.व्यवस्थापन मंडळाने ठरविलेल्या निकषानुसार प्रेसधारकांची निवडक यादी करावी व त्या यादीतील प्रेसधारकाकडून दरपत्रके मागवून न्यूनतम दर असणा-या प्रेसधारकांकडून छपाई करुन घ्यावी असे ठरले आहे.

३) त्यानुसार मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. २९-३१.३.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१३८ नुसार १८ प्रेसधारकांची , मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६७८नुसार ११ प्रेसधारकांची, मा. व्यवस्थापन समितीचे दि.१७.०२.२००७ चे सभेतील निर्णय क्र.१५४ अन्वये २ प्रेसधारकांची , मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६.०९.२००८ चे सभेतील निर्णय क्र.६७९ अनुसार १ प्रेसधारक व मा. व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२००८ चे सभेतील निर्णय क्र.७७९ नुसार ४ प्रेसधारक अशा एकूण ३६ निवडक प्रेसधाकांची अधिकृत यादी करण्यात आलेली आहे.सदर यादीतील निवडक प्रेसधारकांकडून दरपत्रके मागविण्यात येतात निम्नतम दर असणा-या प्रेसकडून अशी छपाई करुन घेण्यात येते.

४) तथापी असे निदर्शनास आले आहे की, खालील नमुद केलेल्या प्रेसधारकाकडून वेळोवेळी दरपत्रके मागवूनही ते प्रतिसाद देत नाहीत. त्यामुळे प्रशासनाच्या वेळेचा,स्टेशनरीचा पोस्टेज खर्चाचा अपव्यय होतो. सबब प्रतिसाद न देणा-या १६ प्रेसधारकांची नांवे निवडक यादीतून कमी करणे उचित होईल.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | अ.नं. | प्रेसधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मे.युनायटेड मल्टीकलर प्रिंटर्स, पुणे | ०२ | मे.अमल ऑफसेट प्रॉ.प्रा. लि.,सातपुर,नासिक |
| ०३ | मे. रविक आर्टस् ॲण्ड प्रिंटर्स प्रा.लि., मुंबई | ०४ | मे. सुमंगल आरटेक अंधेरी (पू.) मुंबई |
| ०५ | बळवंत प्रिंटर्स, पुणे | ०६ | मे. प्रिंटोग्राफी, मुंबई |
| ०७ | मे.प्रिंटमन्न,मुंबई | ०८ | मे. विकास इले. (सकाळ पेपर्स), नाशिक |
| ०९ | मे. प्रिंट पॅक बिजनेस फॉमर्स प्रा.लि.,लातुर | १० | मे.माणिकचंद नंदादिप पेपर प्रॉ.प्रा.लि.,पुणे |
| ११ | मे. चिराग प्रिंटर्स, मुंबई | १२ | मे.नेक्टर प्रिंटर्स प्रायव्हेट लिमिटेड,मुंबई |
| १३ | मे.निर्मल ऑफसेट प्रा.लि.,नाशिक | १४ | मे.एस.व्ही.प्रिंटर्स,मुंबई |
| १५ | मे. मौज प्रिंटींग ब्यूरो, मुंबई | १६ | मे. श्रीरंग प्रकाशन प्रा.लि., नाशिक. |

तसेच १) मे. शिवम ऑफसेट, कोल्हापूर २) ओरिएंट प्रेस लि., मुंबई या २ प्रेसधारकांनी त्यांचे नावाचा निवडक प्रेसधाकांचे यादीत समावेश करावा अशी विनंती केली आहे. त्याच्याबाबतचा माहिती तक्ता सोबत परिशिष्ट 'ब' म्हणून सादर केला आहे. मा.व्यवस्थापन समितीने ठरवून दिलेल्या निकषानुसार निवडक यादीत घेणेस ते पात्र आहेत.

सबब यादीतील ३६ पैकी वरील १६ नावे कमी करुन, सदरची २ नावे वाढविलेस सुधारीत निवडक २२ यादीतील प्रेसधारकांकडून पुस्तके ,फोटो ,दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईची कामे करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | अ.नं. | प्रेसधारकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मे.ब्लू बर्ड (इंडिया) प्रा.लि.पुणे | ०२ | मे.कमर्शिअल बुक बायडींग वर्क्स प्रभादेवी,मुंबई |
| ०३ | मे.निट प्रिंटर्स,अहमदनगर | ०४ | मे.मॅग्ना ग्रॉफीक्स (इंडिया) लि.कांदिवली(पश्चिम) मुंबई |
| ०५ | मे.अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे | ०६ | मे.चेरी ऑफसेट प्रिंटींग ॲण्ड पॅकेजिंग इंड.प्रा.लि.सोलापूर |
| ०७ | मे.सेफ ऑफसेट प्रा.लि.मुंबई | ०८ | मे.न्यु राधारमण प्रिंटींग प्रेस,मुंबई |
| ०९ | मे.कल्याणी कार्पोरेशन,पुणे | १० | मे.ओनस प्रिंट सोल्यूशन (इं)प्रा.लि.मुंबई |
| ११ | मे.ऑस्कर ऑफसेट प्रा.लि.मुंबई | १२ | दि प्रिमियर को ऑप प्रिंटर्स लि.चे महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय,पुणे |
| १३ | मे.उचिता ग्राफिक प्रिंटर्स,प्रा.लि.मुंबई | १४ | मे.प्रिमिअर प्रेस सिकंदराबाद |
| १५ | मे.साई सिक्युरिटी प्रिंटर्स लि.बंगलोर | १६ | मे.इंडो एंटरप्रायजेस प्रा.लि.लातूर |
| १७ | मे.मदर्स ग्राफिक्स (इं) प्रा.लि.मुंबई | १८ | मे.सकाळ पेपर्स लि.कोल्हापूर |
| १९ | मे.कॅलेंडर एक्झिबिशन (इं)प्रा.हावरा | २० | मे.प्रगती ऑफसेट,हैद्राबाद |
| २१ | मे.शिवम ऑफसेट,कोल्हापूर | २२ | मे.ओरिएंट प्रेस., मुंबई |

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.८२** **संस्थानचे कायम कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारसीप्रमाणे वेतन लागू करणेविषयी तत्वतः मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८३** **श्रीसाईबाबा हॉस्पिटल विभागाकडील वैद्यकीय अधिकारी यांचे मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.२५२** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिरडी मार्फत श्री साईबाबा हॉस्पीटल सन-२००५ सुरु झाले. त्यानंतर श्री साईबाबा हॉस्पीटल करीता आवश्यक असलेला वैद्यकिय अधिकारी / पॅरामेडीकल कर्मचारी आकृतीबंध मा.सचिव विधी व न्याय विभाग महाराष्ट्र राज्य यांचेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता.त्यास शासन मान्यतेचे अधिन राहून श्री साईबाबा हॉस्पीटल चे विविध विभागामध्ये वैद्यकिय अधिकारी व पॅरामेडीकल स्टॉफ च्या तात्पुरत्या एक वर्षासाठी नेमणूका करण्यात आल्या होत्या.

सदर आकृतीबंधास शासन निर्णय क्र.सासंवि २००५/३१७/(१०३)-का सोळा मंत्रालय, मुंबई दि.१३ जून २००७ अन्वये महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळालेली आहे.

श्री साईबाबा हॉस्पीटल कडे वैद्यकिय अधिकारी/ पॅरामेडीकल कर्मचारी यांच्या एकत्रित मानधन/एकत्रित वेतनावर एक वर्ष कालावधी साठी नेमणूका करण्यात आलेल्या असून वेळोवेळी त्यांच्या मुदतवाढी करण्यात आल्या असून सदरच्या करण्यात आलेल्या मुदतवाढी खाली त्यांचे नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे संपुष्ठात येत आहेत

| अ.नं. | वैद्यकिय अधिकारी नांव | नेमणूक दिनांक | वाढीव वालावधी संपुष्ठात आलेची तारीख | एकूण झालेली सेवा |
|---|---|---|---|---|
| ०१ | डॉ. सचिन रामदास ऊंडे<br>असो कन्स (नेत्ररोग) | १६/०२/२००६ | १५/०२/२००९ | ०३ वर्षे |
| ०२. | डॉ. अशोक अनंत न्यायाधिश<br>पॅथालॉजीस्ट | ०९/०३/२००६ | ०८/०३/२००९ | ०३ वर्षे |
| ०३. | डॉ. राजेंद्र सदाशिव गवात्रे<br>सिनियर ॲनेस्थेशियालॉजीस्ट | ०१/०२/२००७ | ३१/०१/२००९ | ०२ वर्षे |
| ०४. | डॉ. संतोषकुमार नवनाथ मराठे<br>कनिष्ठ भूलतज्ञ | ०५/०३/२००७ | ०४/०३/२००९ | ०२ वर्षे |
| ०५. | डॉ. रोहीणी विवेकानंद सिंग<br>वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ ) | १५/०२/२००८ | १४/०२/२००९ | ०१ वर्षे |
| ०६. | डॉ.कृष्णा मधुकर गिरी<br>फिजीशियन | ०१/०३/२००८ | २८/०२/२००९ | ०१ वर्षे |
| ०७. | डॉ.दिपाली दत्तात्रय गोसावी<br>वैद्यकिय अधिकारी (आर.एम.ओ ) | ०१/०३/२००८ | २८/०२/२००९ | ०१ वर्षे |
| ०८. | डॉ. मंगला सोन्याबापू मुंढे<br>क्लिनीकल असिस्टंट (रेडीओलॉजी ) | १६/०९/२००८ | १५/०३/२००९ | ०६ महिने |

उपरोक्त अ.नं. ०१ ते ४ वरील वैद्यकिय अधिकारी यांना वेळोवेळी मुदतवाढी देण्यात आलेल्या असून आता त्यांना दोन वर्षापेक्षा जास्त कालाधीपासून ते संस्थान सेवेत आहेत. तसेच अ.नं. ५ ते ७ वरील वैद्यकिय अधिकारी यांना संस्थान सवेत हजर होऊन ०१ वर्ष कालावधी होत आहे. व अ.नं. ०८

वरील क्लिनीकल असिस्टंट (रेडीओलॉजी ) सहा महिने पूर्ण होत आहेत. वैद्यकिय संचालक, श्री साईबाबा हॉस्पीटल यांनी उपरोक्त अ.नं. ०१ ते ०८ वरील वैद्यकिय अधिकारी / यांचे एक वर्षाचे कालावधीमध्ये काम समाधानकारक असून त्यांची वर्तणूकही चांगली आहे. तसेच ते योग्य रितीने हुकूमाप्रमाणे कामे करतात त्यांचे बाबतीत काहीही प्रकरणे चालू नाही किंवा प्रस्तावितही नाहीत त्यामुळे त्यांना पुढील ०१ वर्ष मुदतवाढ देणेस हरकत नाही असे अभिप्राय दिले आहेत.

तरी वैद्यकिय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे अभिप्राय विचारात घेता अ.नं. ०१ ते ०४ वरील वैद्यकिय अधिकारी यांच्या सेवा त्यांच्या मुदतवाढ संपुष्ठात येत असलेल्या तारखेच्या लगतच्या तारखेपासून पुढे चालू ठेवणेबाबत तसेच अ.नं. ०५ ते ०८ वरील वैद्यकिय अधिकारी यांच्या नेमणूकीची मुदत संपुष्ठात येत असलेच्या तारखेच्या लगतच्या तारखेपासून पुढे ०१ वर्ष मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.८४ भक्तनिवासस्थान इमारतीमधील गाळे लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर ११ महिने मुदतीसाठी वापरास देणेबाबत.**

**निर्णय क्र.२५३** संस्थानचे नवीन भक्तनिवासमध्ये एकंदर ३४ गाळे असून त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आहे-

| अ.नं. | गाळयांची संख्या | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | १८ | गाळे संस्थानचे विविध खात्याकडे समान ठेवणेकामी |
| ०२ | १३ | श्री साई संस्थान नोकरांची सहकारी पतपेढीस लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर वापरात दिलेले आहेत |
| ०३ | ०८ | गाळे विविध व्यवसायांसाठी ११ महिने मुदतीसाठी चालविणेस देण्यात आलेले आहेत |
| ०४ | ०५ | गाळे रिकामे आहेत. |
| | ३४ | |

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.११.२००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८६७,८६८,८६९, ८७० मध्ये भक्तनिवासस्थान इमारतीतील असलेल्या सर्व गाळ्यांची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहिर लिलावाने विक्री करण्यात यावी असे ठरले आहे.

संस्थानचे भक्तनिवासस्थान इमारतीत उपलब्ध असलेल्या गाळ्यांची वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहिर लिलावाने ११ महिने मुदतीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर जास्तीत जास्त अनामत रक्कम व मासिक परवाना फी घेऊन जास्तीत जास्त बोली बोलणारांस वापरांस देण्यात यावी असे अभिप्रेत असल्यामूळे नवीन भक्तनिवास इमारतीतील ३४ गाळयांपैकी १२ ते १५ (संस्थानच्या विभागासाठी उपलब्ध नसलेल्या) गाळ्यांचा वर्तमानपत्रात जाहीरात देऊन ११ महिने मुदतीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर लिलावामध्ये अनामत रक्कम व लायसेन्स फी जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास वापरास देण्याबाबतची कार्यवाही करता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवास इमारतीत उपलब्ध असलेल्या उपरोक्त गाळ्यांचे लिलावाबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देऊन ११ महिने मुदतीसाठी लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर लिलावामध्ये अनामत रक्कम व लायसेन्स फी जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दिनांक १९.०३.२००९ रोजी जाहिर लिलावाव्दारे देण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं.८५ एस.टी तिकीट ॲडव्हॉन्स बुकींग स्टॉलकरीता मुदतवाढ देणेबाबत**

**निर्णय क्र.२५४** श्री साईबाबा संस्थानने साई भक्तांची सोय व्हावी या दृष्टीने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,अ.नगर विभागा तर्फे आगार व्यवस्थापक कोपरगांव, ता.कोपरगांव जि.अ.नगर यांना एस.टी.चे तिकीट ॲडव्हान्स बुकींगकामी संस्थानचे प्रसादालय परिसरात स्टॉलसाठी leave and liceence तत्वावर जागा अकरा महिने मुदतीचे तात्पुरत्या वापरासाठी दिलेली आहे.

| अ.नं. | इमारतीचे नांव | गाळा/ जागाधारकांचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | पूर्वीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईप्रसाद परिसर/चहा कॅन्टीन कार्यालयजवळ स्टॉलकामी जागा | महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अ.नगर विभाग आगार प्रमुख राज्य परिवहन कोपरगांव,ता.कोपरगांव जि.अ.नगर | एका स्टॉलसाठी दरमहा रु.५००/- व दरमहा मीटर रिडींग प्रमाणे येणारे वीजचे बील वेगळे आकारुन | एस.टी.चे तिकीट ॲडव्हान्स बुकींगसाठी | दि.०५/११/२००७ ते दि.०४/१०/२००८ ११ महिने कालावधी साठी. |

उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अ.नगर विभागातर्फे आगार प्रमुख राज्य परिवहन कोपरगांव, जि.अ.नगर यांना देण्यात आलेल्या उपरोक्त जागेची परवाना मुदत दि.०४/१०/२००८ रोजी संपत असल्याने पुढील मुदतवाढ प्रस्ताव इकडील कार्यालयास दि.२३/१०/२००८ चे पत्राने प्राप्त झ ाालेला आहे. त्यात त्यांनी श्री साईबाबा संस्थानचे सदरचे जागेची परवानगी दि.०४/१०/२००८ रोजी

संपलेली आहे. दि.०५/१०/२००८ पासून आरक्षण कार्यालयासाठी पुढील मुदतवाढ मिळावी,अशी विनंती केली आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन कोपरगांव ,ता.कोपरगांव जि.अ.नगर यांना दिलेल्या एका स्टॉलसाठी तात्पुरत्या वापरासाठी दिलेल्या जागेस दि.०५/१०/२००८ पासून ते दि. ३१/०३/२००९ अखेर ६ महिने कालावधीकरीता लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देता येईल.

मागील लीव्ह ॲन्ड लायसन्सी फी मध्ये १०टक्के वाढ म्हणजे मासिक परवाना फी रु ५५० /- पाचशे पन्नास मात्र आकारुन स्टॉलसाठी लीव्ह ॲन्ड लायसन्सी तत्वावर दि. ३१/३/२००९ पावेतो जागा देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं.८६ श्रीराम आईस्क्रीम व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी श्रीरामपूर दुध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दुध व्याव.संघ लि.बाभळेश्वर यांना प्रसादालय परिसरात दिलेल्या जागेस मुदतवाढ देणेबाबत**

**निर्णय क्र.२५५** संस्थानने श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संघ लि. बाभळेश्वर , ता- राहाता यांना श्रीराम आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थाचे विक्री साठी प्रसादालय परिसरात एका बुथ स्टॉलसाठी जागा साईभक्तांचे व संस्थानचे सोयीच्या दृष्टीने बारा महिने मुदतीचे कालावधी करिता (लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर) वापरांसाठी दिलेली आहे.

| अ.नं | इमारतीचे नांव | जागा /गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी फी | वापर | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईप्रसाद परिसर -चहा कॅन्टीन कार्यालय जवळ | श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव.संघ, लिमि. बाभळेश्वर, ता- राहाता अहमदनगर ४१३ ७३७ | दरमहा रुपये २०००/- (डिपॉझीट रु.१०,०००/- ) मात्र | श्रीरामपूर संघाचे उत्पादीत आईस्क्रिम व दुग्धजन्य पदार्थ विक्रीकामी | ३०-११-२००७ ते २९-११-२००८ |

आता श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संघ लि. बाभळेश्वर , ता- राहाता, जिल्हा अहमदनगर यांचे दि ०५/११/२००८रोजीचे पत्र इ डिील ािर्यालयास प्राप्त झालेले आहे. त्यात त्यांनी " सस्थानचे प्रसादालय परिसरात आमचे दूध संघास आईस्क्रीम व इतर दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी स्टॉल ठेवर्ाििसाठी भाडेतत्वावर जागा दिलेली आहे. सदर बुथस्टॉलसाठी दिलेल्या जागेची मुदत दि २९/११/२००८ रोजी संपुष्टात येत आहे. तरी कृपया पुढील कालावधीसाठी आईस्क्रीम बुथ स्टॉलचे जागेसाठी मुदतवाढ मिळावी." अशी विनंती केलेली आहे.

साईभक्तांना व संस्थानला उपरोक्त गाळयाचा होणारा उपयोग लक्षात घेता श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्याव. संघ लि. बाभळेश्वर , ता- राहाता , जिल्हा - अहमदनगर यांना लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर एका स्टॉलसाठी दिनांक ३०/११/२००८ रोजी पासून दि ३१/०३/२००९अखेर ४महिने करिता एका स्टॉलसाठी डिपॉझीट रुपये १०,०००/- तसेच मासिक परवाना भाडे रुपये ३०००/- ( अक्षरी रुपये तीन हजार ) मात्र व विद्युत बील मिटर रिडींग प्रमाणे वेगळे आकारून पूर्वीचेच अटी व शर्ती अनुसरून लिव्ह ॲन्ड लायसेन्सी तत्वावर सदर स्टॉलला ४महिने करिता मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.८७ स्पेशल मुकदमा नं.६३/१९९८ सौ.शैला अशोक आग्रे विरुध्द श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी वगैरे वादी -शैला अशोक आग्रे यांना आर्थिक मदत करणे बाबत**

**निर्णय क्र.२५६** सौ. शैला अशोक आग्रे रा. एकरुखा यांचे संस्थानचे रुग्णालयमध्ये दि. ०२/०२/१९८७ रोजी झालेल्या मोतिबिंदु शस्त्रक्रिया शिबिरामध्ये डाव्या डोळयाचे ऑपरेशन करण्यात आले . सदर ऑपरेशन लायन्स क्लब मुंबई सिव्हील हॉस्पिटल व जिल्हा परीषद अहमदनगर यांनी संयुक्त रित्या आयोतजीत केलेल्या शिबिरामध्ये करण्यात आले होते.

ऑपरेशन केल्यामुळे डाव्या डोळयाचे ऑपरेशन केल्यानंतर त्या डोळयाची दृष्टी पुन्हा प्राप्त झ ाली नाही. मात्र उजव्या बाजुच्या व चांगल्या दिसणा-या डोळयाची दृष्टी मात्र ऑपरेशन व औषध उपचारामुळे कायमची गेली व सौ. शैला अशोक आग्रे दोन्ही डोळयाने कायमच्या आंधळया झाल्या. अशा आशयांचा दावा सौ. शैला अशोक आग्रे यांनी कोपरगांव कोर्टात दाखल केला असुन डोळयावर उपचार करुन मिळणेस /नुकसान भरपाई मिळणे बाबत त्यांनी मा. कोर्टास मागणी केलेली आहे.

सौ. शैला आग्रे यांचेकडे दुर्बल असुन औषधोपचार ऑपरेशनसाठी त्यांच्याकडे पैसा नाही , त्यांना लहान लहान मुले आहेत. शिबिरातील डॉक्टरांचे हलगलर्जीपणामुळे व निष्कळजीपणामुळे व ऑपरेशननंतरचे काळजीसाठी सदर शिबिरात व संस्थानचे दवाखाण्यात व्यवस्था माहीतीज्ञान नसल्याने त्यांची दृष्टी गेली असे सौ. शैला अशोक आग्रे यांचे म्हणणे आहे . सदर दाव्यांत त्यांनी श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डीचे संस्थानचे चीफ मेडीकल ऑफीसर तसेच संस्थानचे डॉक्टर ज्योती गोगले ( संस्थानचे तत्कालीन डॉक्टर ), लायन्स क्लब मुंबई , सिव्हील हॉस्पिटल अहमदनगर , कलेक्टर

अहमदनगर, जिल्हापरिषद अहमदनगर, चारिटी कमिशनर यांचे विरुध्द सदर दावा दाखल केलेला आहे व या सर्वाकडुन औषधोपचार करुन दृष्टी प्राप्त करुन दयावी. व त्यासाठी लागणारा खर्च द्यावा. दृष्टी प्राप्त होईपावेतो दररोज रु १५०-०० ( दिडशे ) प्रमाणे नुकसान भरपाई द्यावी. दृष्टी प्राप्त न झाल्यास रक्कम रु. २२,४४,७५०.०० अक्षरी (बावीस लाख चौरेचाळीस हजार सातशे पन्नास )वसुल होऊन मिळावे .अशा आशयाची विनंती मा. कोर्टास केलेली आहे. संस्थानतर्फे दाव्यांत कैफीयत देतांना वादीचे म्हणणे नाकारलेले आहे. संस्थानकडुन कोणताही हलगर्जीपणा झालेला नाही. संस्थानचा शिबिरातील सहभाग हा शिबिरासाठी जागा, विज, पाणी देणे एवढयापुरता होता. वादीचे डोळयात (पडदयांत) मुळतः दोष असल्यामुळे दृष्टी गेली असावी . अशा अर्थाचे म्हणणे संस्थानने दाखल केलेले आहे. सदरच्या दाव्याचे काम माननिय कोर्टात चालु झालेले आहे.

उपरोक्त दावा चालु असताना सौ. शैला अशोक आग्रे यांनी वेळोवेळी मा. विश्वस्तांकडे व संस्थानकडे अर्ज केले आहेत. त्यांचे कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. नुकसान भरपाई म्हणुन नव्हे तर मदत म्हणुन योग्य वाटेल ती रक्कम मिळाल्यास त्या माननीय कोर्टातील तक्रारी सोडुन देणेस तयार असल्याचा अर्ज केला आहे. त्यांची परिस्थिती हलाखीची आहे व त्यांचा नवरा गणेश कारखान्यात सिजनल कामगार आहे. असेही अर्जात म्हटले आहे.

दाव्यामध्ये डिक्री मिळण्याचा त्यांचा हेतु नाही परंतु त्यांना मानवी दृष्टी कोनातुन दिलेली नुकसान भरपाई म्हणुन नाही तर मदत म्हणुन मानवी दृष्टीकोनातुन दिलेले दान म्हणुनही स्विकारण्याची त्यांची तयारी आहे. त्यांनी अशा आशयाच्या अर्ज दिलेला आहे. सदर अर्जाचा सहानुभुतीपुर्वक विचार व्हावा असे म्हणलेले आहे.

उपरोक्त दाव्यामध्ये चौकशीचे काम चालु झाले आहे. सौ. शैला अशोक आग्रे यांचे एकंदरीत परिस्थिती पाहता कायदेशीर दृष्टीकोनातुन नव्हे तर मानवी दृष्टीकोनातुन त्यांना अर्थिक मदत करण्याबाबत शिर्डी संस्थानाने पुढाकार घ्यावा. व त्यांना काहीतरी अर्थिक मदत द्यावी . असे माननिय कोर्टाने सुचित केले आहे त्याचप्रमाणे इतर प्रतिवादी लायसन्स क्लब वगैरे यांनाही अर्थिक मदत देता यईल कारण सौ. शैला अशोक आग्रे यांचे खरोखरच हाल होत असल्याचे दिसुन येते असे कोर्टाने सुचित केले आहे. यापुर्वी दरखास्त नं. ५/१९९० चे तारखेचे वेळी संस्थानचे प्रशासकिय अधिकारी श्री. प्र. तु. जोशी साहेब यांचेकडे सांगितले आहे.इतर रुग्णालयांस अर्थीक मदत संस्थानकडुन दिली जाते. त्याधर्तीवर संस्थानने सौ. शैला अशोक आग्रे यांना अर्थिक मदत करावी असे मा. कोटाने सांगीतले आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता सौ. शैला अशोक आग्रे यांना कायदेशीर बाबी गुणदोषांचे विचाराऐवजी त्यांना दृष्टी नाही व परिस्थिती हालाखीची असल्याने समजुतीने व सहानुभुतीपुर्वक मानवतावादी दृष्टीकोणातुन विचार करुन त्यांना वैद्यकीय मदत म्हणुन उचीत रक्कम २ ते अडीच लाख पावेतो आर्थिक मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो स्थगित ठेवण्यात आला. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.८८** **मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,तुळजापूर यांना द्यावयाचा राहिलेला उर्वरित निधी (रुपये ५० लाख ) देणे बाबत.**

**निर्णय क्र.२५७** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.८९** **जय हनूमान विद्यालय रांजणगांव देशमुख यांना अर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.२५८** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.९०** **श्रीसंत तुकाराम महाराज यांचे १० हजार गाथा श्री क्षेत्र देहू येथे होणाऱ्या पारायण सोहळयास देणगी देणेबाबत**

**निर्णय क्र.२५९** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.९१** **कॅन्सर एड फाऊंडेशन,कोकण ब्रँच रत्नागिरी यांना हॉस्पिटलचे उभारणीसाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.२६०** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.९२** **योगीराज तुकाराम बाबा चॅरिटेबल ट्रस्ट खेडले झुंगे यांना आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.२६१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.९३** **चि.विदीत संतोष गुजराथी,नाशिक यांस अंतरर्राष्ट्रीय बुद्धीबळ स्पर्धेस सहभाग घेण्यासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.२६२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.९४** **संत तुकडोजी महाराज जन्मस्थान यावली शहीद जि.अमरावती,यांना संस्कार केंद्राचे उभारणीसाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.२६३** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.९५** **ग्रामिण महाराष्ट्र वैद्यकीय संशोधन संस्था, संगमनेर यांना ग्रामिण भागातील शालेय विद्यार्थ्यांचे तपासणीकरिता वाहन देणे बाबत.**

**निर्णय क्र.२६४** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.९६ प्रगती एज्युकेशन ट्रस्ट,मुंबई यांना विद्यालयाचे बांधकामासाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.२६५** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.९७ फुले एज्यूकेशन सोसायटी,पुणे यांना इमारत बांधकामास आर्थिक मदत देणेबाबत**

**निर्णय क्र.२६६** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**विषय नं.९८ श्रीरामनवमी उत्सव -२००९ बाबत**

**निर्णय क्र.२६७** श्रीक्षेत्र शिर्डी येथे सालाबाद प्रमाणे यावर्षी श्रीरामनवमी उत्सव गुरुवार दिनांक ०२/०४/२००९ ते शनिवार दिनांक ०४/०४/२००९ ( चैत्र शुध्द ७ शके १९३१ ते चैत्र शुध्द १० शके १९३१) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचा मुख्य दिवस शुक्रवार दिनांक ०३/०४/२००९ हा राहिल. या उत्सवासाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे तयारी करावी लागेल. ज्यास मान्यता देण्यात आली व इतर अनुषंगिक निर्णय घेण्यात आले-

**०१) उत्सव निमंत्रण पत्रिका :-** संस्थानचा कारभार चालविणेसाठी तयार करण्यात आलेल्या योजनेच्या तरतुदीमध्ये दुरुस्ती झाल्या प्रमाणे भक्त मंडळाचे आजीव व आश्रयदाते सभासदांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात. यंदाचे श्री रामनवमी उत्सवात सभासदांची वाढती संख्या धरुन १ लाख ४० हजार निमंत्रण पत्रिका तसेच सन्माननीय पाहुण्यांसाठी १,००० पाकीटांसह निमंत्रण पत्रिका छपाई करुन घ्याव्या लागतील. तसेच नेहमी प्रमाणे प्रेस नोट( न्यूज अॅटम) म्हणून वर्तमान पत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.

**०२) उत्सव व्यवस्था :-**

**अ) कलाकार कार्यक्रम :-**

निर्मंत्रित कलाकारांचे कार्यक्रम मिळणेबाबत आलेली कलाकारांची पत्रे मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष व मा.विश्वस्तांना दाखवून कार्यक्रम निश्चित करण्यात यावे.

**ब) कीर्तन कार्यक्रम :-** परंपरेनुसार श्रीरामनवमी उत्सवातील कीर्तन कार्यक्रम ह.भ.प.दासगणू महाराज आश्रम गोरटे, यांनी नामनिर्देशित केलेली कीर्तनकार करीत असतात. त्यांचेकडून नामनिर्देशित करण्यात आलेल्या कीर्तनकारांमार्फत कीर्तने व्हवीत.

**०३) श्री साईसत्यव्रत (सत्यनारायण ) पूजा व अभिषेक पूजा :-** उत्सवकाळात दि. ०२/०४/२००९ ते दि. ०४/०४/२००९ अखेर श्री साईसत्यव्रत पूजा व अभिषेक पूजा चालू राहतील.

**०४) अखंड पारायण व्यवस्था :-** उत्सव काळात दिनांक ०२/०४/२००९ रोजी सकाळी ०६.१५ वाजता श्री द्वारकामाई मंदिरात श्री साईचरित्राचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक ०३/०४/२००९ रोजी सकाळी ०५.४५ वाजता त्यांची समाप्ती होईल. मा.व्यवस्थापन समितीचे ५ सदस्य पहिले पाच अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नांवे दिनांक ०१/०४/२००९ रोजी मंदिर कार्यालयात नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणा करीता नांवे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल.

या उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.विश्वस्त भाग घेतील. मुख्य दिवशी पाद्यपुजा मा.अध्यक्ष व एक मा.विश्वस्त हे करतील. मा.विश्वस्तांच्या या सर्व कार्यक्रमातील सहभागाबाबत उचित निर्णय घेण्याचे अधिकार मा.अध्यक्ष यांना देण्यात आले.

**०५) पालखी व रथ मिरवणूक :-** उत्सवाचे पहिले दिवशी गुरुवार दिनांक ०२/०४/२००९ रोजी रात्रौ ९.१५ वाजता नित्याची गुरुवारची पालखी व तद्नंतर श्रींचे पालखीची गांवातून मिरवणूक व शुक्रवार दि-नांक ०३/०४/२००९ रोजी रथाची गांवातून मिरवणूक सायंकाळी ०४.४५ वाजता निघेल.

**०६) कावडी व निशाणांची मिरवणूक :-** उत्सवाचे मुख्य दिवशी दिनांक ०३/०४/२००९ रोजी सकाळी कावडी व सायंकाळी निशाणांची मिरवणूक राहिल. श्री रामनवमीचे दिवशी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी आणून श्री साईबाबांचे समाधीस मंगलस्नान घालतात. कावडी घेऊन येणारे गांवकरी व साईभक्तांना समाधीला पाणी घालण्याचा मान दिला जातो. कावडीधारकांना श्रीफळ व लहान मुलांना पेरु प्रसाद दिला जातो. सायंकाळी ०४.०० वाजता निशाणांची मिरवणूक निघेल.

**०७) विद्युत रोषणाई :-** समाधी मंदिर, श्री द्वारकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात सोईप्रमाणे विद्युत रोषणाई करण्यात येईल. श्री रामनवमी उत्सवात श्री द्वारकामाई मंडळ, मुंबई हे वि-नामुल्य विद्युत रोषणाई करीत असतात. मात्र ट्रक भाडे व जाणे - येण्याचा खर्च त्यांना द्यावा लागेल. यावेळी विद्युत विभागामार्फत त्यांना पत्र देण्यात आलेले आहे. ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत रोषणाई करण्यात यावी.

**०८) संरक्षण व्यवस्था :-** उत्सव काळात मंदिर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागात ठेकेदारी पध्दतीने जादा गार्ड नेमण्यात येतील. तसेच शांतता व सुव्यवस्था राखणेसाठी पुरेसा बंदोबस्त ठेवणेकामी मा.पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना विनंती करण्यात यावी.

**०९) प्रसाद - भोजन व्यवस्था :-** उत्सव काळात प्रसादालयात मिष्टांन्नासह रुपये ५=०० या दराने भक्तांना प्रसाद भोजन दिले जाते. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्याचे कुटुंबिय व नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींना स्वतंत्र प्रसाद भोजनाची व्यवस्था केली जाते. पोलीस कर्मचारी व उत्सवात काम करणेकरीता मदतीस येणा-या व्यक्तींची प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून केली जाते. साईभक्तांचे सोईसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कॅटींनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध आहे. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टांन्न प्रसाद नेहमीचे दराने देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री जास्तीत जास्त ठिकाणी चालू करावी लागतील. तशी व्यवस्था करण्यात यावी.

उत्सवाचे तीनही दिवशी मिष्टान्न म्हणून प्रथम दिवशी शिरा, मुख्य दिवशी जिलेबी व सांगता दिनी बुंदी मिष्टान्न म्हणून देण्यात यावे.

**१०) लिलाव :-** श्रींना अर्पण केलेली वस्त्रे व इतर वस्तूंची प्रसाद रुपाने जाहिर लिलावाने विक्री तीनही दिवस करण्यात यावा.

**११) जादा कंत्राटी कर्मचारी :-** उत्सवाचे पूर्व तयारी करणेकामी व उत्सव पार पडणेकरीता लागणा-या जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यास नेमण्यात येईल. याकामी मा.कार्यकारी अधिकारी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य ते आदेश पारीत करण्यात यावेत.

**१२) मंडप व कमानी :-** उत्सवात समाधी मंदिर परिसर व इतर ठिकाणी तसेच पालखी पदयात्रींसाठी आवश्यकतेनुसार मंडप/शामियाने व स्टेज टाकावयाचे आहेत त्यास मान्यता देण्यात आली. तसेच उन्हाळी मंडपही टाकण्यात यावेत. गरजेनुसार त्यात वाढ करण्यात यावी.

**१३) सर्व साधारण व्यवस्था :-** नेहमी प्रमाणे भक्तांची स्वागत व्यवस्था, मदत केंद्र, प्रथमोपचार केंद्र, निवास व्यवस्था, आरोग्य व्यवस्था इत्यादी व्यवस्था ठेवण्यात यावी. स्वयंसेवी म्हणून काम करु इच्छिणाऱ्या कर्मचारी व इतर व्यक्तींना नेहमी प्रमाणे संधी देण्यात यावी. देणगी स्विकारणे कामी जादा काऊंटर्स उघडण्याची व्यवस्था करण्यात यावी. निमंत्रीत कलाकारांची निवास, भोजन, मानधन व्यवस्था करण्यात यावी. कलाकारांसाठी वास्तव्य व्यवस्था गरजेनुसार संस्थानचे निवासात करण्यात यावी.

**१४) पालखी व्यवस्था:-** श्रीरामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणाऱ्या पालख्या ठेवण्याची व्यवस्था लेंडीबाग, मंगल कार्यालय, साईउद्यान, धर्मशाळा परिसरात करण्यात यावी व पालखी सोबत येणाऱ्या भक्तांची व्यवस्था मंगलकार्यालय, साईउद्यान, श्रीसाईनाथ माध्यमिक विद्यालय, धर्मशाळा इ. इमारतीत करण्यात यावी. या वर्षीही ती व्यवस्था मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार करण्यात यावी. पालख्यांचे स्वागताकरीता मा.विश्वस्तांची एक कमिटी असावी व या कमिटीने पालख्याचे स्वागत करावे. त्याचप्रमाणे येणाऱ्या पालख्यांसाठी पिण्याचे पाण्याची व्यवस्था सिन्नर ते शिरडी रस्त्यावर मागील श्रीरामनवमी प्रमाणे यंदाही करावी लागणार आहे. त्या संबंधी खर्चाची टिपणी पाणीपुरवठा विभाग तयार करुन मंजूरीसाठी सादर करतील. गरजेनुसार पालख्या मुक्कामाचे ठिकाणी खर्डी, लतीफवाडी, घाटनदेवी, खंबाळे, वेल्लोळी, नासिक, शिंदे, सिन्नर (एमआयडीसी),खोपडी-दत्तमंदिर, पांगरी, वावी, हॉटेल वनराई, पोहेगांव, दुशिंगवाडी, मलढोण फाटा, सायाळे, जवळके, डो-हाळे, इ. ठिकाणी पालखी मंडप, वीजव्यवस्था व पाणी व्यवस्था करणेत यावी. तसेच मागील वर्षापासून पालखीधारकांतील पदयात्रींना संस्थानमार्फत शिर्डी येथे आलेवर एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात येत आहे. त्यानुसार यावर्षीही एकवेळचे भोजन प्रसाद म्हणून देण्यात यावे.

**१५) भक्तांची निवास व्यवस्था :-** संस्थानचे साईप्रसाद नं. १ व नं. २, धर्मशाळा नं. २, द्वारावती , भक्तनिवासस्थान, शैक्षणिक संकुलाचे इमारतीतील वर्ग इ. इमारतीमधून तसेच धर्मशाळा व न.भ.निवासस्थान परिसरात स्वतंत्र मंडप टाकून भक्तांची निवास व्यवस्था करण्यात यावी.

**१६) कुस्त्या हंगामा :-** श्रीरामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हंगामा गांवकऱ्यांमार्फत भरविण्यात येतो. यावर्षी कुस्त्यासाठी रक्कम रुपये ७५ हजार मात्रचे खर्चास मंजूरी देण्यात आली.

**१७) पाणीपुरवठा :-** पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात यावी. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात यावी.

**१८) कार्यक्रमाची सांगता :-** गोपाळ काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील.

**१९) खर्चाचे अंदाज पत्रक:-** श्रीरामनवमी उत्सव सन २००९ चे खर्चाकरीता एकूण रुपये ४०,००,०००.०० (अक्षरी रुपये चाळीस लाख मात्र) एवढी आर्थिक तरतूद मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी ०५)

**विषय नं.९९ अखंड साईनाम सप्ताह कार्यक्रमासाठी जागा व इतर सुविधा देणेसाठी धोरण ठरविणे बाबत**

**निर्णय क्र.२६८** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) कडे बरेच साईभक्त मंडळ ही अखंड साईनाम सप्ताहासाठी तसेच पालखी ठेवणेसाठी लेंडीबागेची मागणी करतात व त्याचवेळी मंडप, स्टेज, बैठकव्यवस्था, विद्युत व्यवस्था, ध्वनीक्षेपण व्यवस्था, तसेच निवास व भोजन व्यवस्था संस्थानमार्फत होणेबाबत विनंती करत असतात. त्यावेळी संबंधीतांना मंडप, स्टेज, ध्वनीक्षेपण इ. व्यवस्था स्वखर्चाने करणेबाबत तसेच निवास व भोजनव्यवस्था संस्थान नियमानुसार व उपलब्धतेनुसार देण्यात येईल असे कळविणेत येते. संस्थानमार्फत फक्त बैठकव्यवस्था म्हणजे सतरंजी इ. व विद्युत व्यवस्था करण्यात येते. सदर बाबतीत यापुर्वी मा.कार्यकारी अधिकारीचे परवानगीनेच कार्यवाही केली जात असे. आता साईभक्तांची गर्दी, जागेअभावी व सुरक्षिततेच्या दृष्टीने साईनाम सप्ताह हे कार्यक्रम जुन्या मराठी शाळेच्या मैदानावर घेणेस परवानगी देत आहे. तथापि त्याठिकाणीही साईभक्तांची जा-ये सतत चालू असते त्यामुळे १६ गुंठे जागेतही कार्यक्रमास परवानगी देता येणे शक्य नाही. तसेच अशाप्रकारे उपरोक्त दर्शविलेले विविध कार्यक्रम विविध संस्थेनी आयोजित केलेवर संस्थानचे विविध विभागांवर त्या त्या कामाची जबाबदारी टाकावी लागते व त्यामुळे संबंधीत विभागावर तो अतिरिक्त भार पडतो.

तसेच आता वर्षभरात साधारणपणे ५० ते ७५ मंडळांकडून अशाप्रकारे अखंड साईनाम जप करणेस लेंडीबाग वा समाधी मंदिर परिसरात परवानगी मिळणेबाबत पत्र येत असतात. बहुतेक मंडळ हे लेंडीबागेत दत्तमंदिर परिसरात अखंड हरिनाम सप्ताहास परवानगी मागतात.

दि. १०/०१/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय नं.१०, निर्णय क्र.१० मधील (१६) मधील श्री महेश रेड्डी व त्यांचे कुटुंबीय यांना कायमस्वरुपी आरती व दर्शन व्यवस्थेबाबतचे विषयामध्ये - दि.२० डिसेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत त्यांच्यामार्फत लेंडीबागेत आयोजित करण्यात येणा-या अखंड साईनाम सप्ताहास कायमस्वरुपी मान्यता देणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आलेली आहे. त्यानंतर दि.२४/०५/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.६६ व निर्णय क्र. ४७९ अन्वये कार्यक्रमासाठी जागा व इतर सुविधा देणेसाठी धोरण ठरविणेबाबत- यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे लेंडीबागेत पालखी, भजन इ.साठी परवानगी देऊ नये, असे ठरले.

श्री महेश रेड्डी, हैद्राबाद यांना दि.२०/१२/२००८ ते दि.३१/१२/२००८ अखेर अखंड साईनाम सप्ताह लेंडीबागेत दत्तमंदीराजवळ संपन्न झालेला आहे. आता श्री गुरुजी साईरामप्रसाद, फाऊंडर चेअरमन, शिर्डी साई मंदिर, बेंगलोर यांचे दि.०१/०१/२००९ ते दि.०८/०१/२००९ अखेर लेंडीबागेतच अखंड साईनाम सप्ताह करणेस परवानगी मिळणेबाबत अर्ज आलेला आहे. दि.२४/०५/२००८ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार लेंडीबागेत परवानगी देण्यात आलेली नाही अशाप्रकारे इतरही मंडळाकडून मागणी होण्याची शक्यता असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, लेंडीबाग वा समाधी मंदिर परिसरात कोणासही परवानगी देण्यात येऊ नये असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **गुंतवणूकीविषयी निर्णय घेणे.**
**निर्णय क्र.२६९** **अ)** माहे मार्च,२००९ अखेर गुंतवणूकीसाठी उपलब्ध रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे : -

| अ.नं. | तपशील | मुदतपूर्तीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| ०१ | बँक ऑफ बरोडा, नासिक | २७/०३/२००९ | १,३७,२९,७५७.०० |
| 149 | Tyco Healthcare India Pvt. Ltd., Mumbai | 150 | UAP Pharma Pvt. Ltd., Moraiya - Ahmedabad |
| 151 | Unibio, Mumbai | 152 | Unijeles Life Sciences Ltd., Nagpur |
| 153 | Unimark Remedies Ltd., Mumbai | 154 | Universal Chemicals, Nashik |
| 155 | Universal Traders, Pune | 156 | Vaibhav Agency, Pune |
| 157 | Vascular Concepts Ltd., Mumbai | 158 | VHB Lifesciences Ltd., Mumbai |
| 159 | Vijay Trading Corporation, Shrirampur | 160 | Vishal Agencies, Ahmednagar |

| | | | |
|---|---|---|---|
| 161 | S.G. phyto pharma,Kolhapur | 162 | VIT Technology, Navi Mumbai |
| 163 | Yash Enterprises, Sangamner | 164 | Yoga Enterprises, Pune |
| 165 | Zenith Surgical Co., Mumbai | 166 | S.G. Phyto Pharma Pvt. Ltd., Kolhapur |

यावर सविस्तर चर्चा होऊन,सदर निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन तो स्थानिक समितीचे मा.विश्वस्त श्री.पांडुरंग गमाजी अभंग, श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी निर्णय घेऊन,पुरवठा आदेश देण्यात यावा,असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलचे माजी वैद्यकीय संचालक,डॉ.ढवळे यांनी त्यांचे कार्यकाळात रुग्णांना दिलेल्या जादा सवलतीचे रकमेबाबत प्राप्त झालेला लेखी खुलासा.**

**निर्णय क्र.२८३** दि.०६.०९.२००८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन सभेतील विषय नं.४०, निर्णय क्रं.६७२ नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलचे माजी वैद्यकीय संचालक, डॉ. ढवळे यांनी त्यांचे कार्यकाळातील रुग्णांना दिलेल्या ज्यादा सवलतींबाबतचा डॉ. ढवळे, यांनी त्यांचे अधिकारात जी बीले माफ केली त्याबाबत डॉ. ढवळे यांचेकडून सदर रक्कम वसूल का करण्यात येऊ नये? याबाबत खुलासा मागविण्याचा निर्णय झाला होता, त्यानुसार संदर्भ क्रं. २ अन्वये डॉ. ढवळे यांजकडून लेखी खुलासा मागविण्यात आला होता.

त्यानुसार डॉ. ढवळे यांजकडून दि.२३.०१.२००९ लेखी निवेदन प्राप्त झाले असून त्याचा गोषवारा खालीलप्रमाणे :-

मी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि.१.१२.२००६ ते दि.२९.०२.२००८ या कालावधीमध्ये वैद्यकीय संचालक या पदावर कार्यरत होतो, उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये एकूण ३६ रुग्णांना रु.७,२३,५९६.५०/- इतकी सवलत वैद्यकीय संचालक यांना असलेल्या अधिकारापेक्षा जास्त दिल्याबाबत कळविण्यात आले आहे यावर मी विनंती पुर्वक निवेदन सादर करीत आहे.

१. सदर काळात श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये भरती झालेल्या रुग्णांना डिसचार्ज करण्याची जबाबदारी वैद्यकीय संचालकांची असल्याने अपघात झालेले रुग्ण, जळालेले रुग्ण, नैसर्गिक आपत्तीने बाधीत झालेले रुग्ण, यांचे कडून बिलांची संपुर्ण रक्कम वसुल करुन डिसचार्ज करणे शक्य नसते, डेड बॉडी सोडतांना बिलांची रक्कम देण्यापुर्वी सोडण्याबाबत कार्यकारी अधिकारी, प्रशासकीय अधिकारी, मा. विश्वस्त यांचे कडून दुरध्वनी/तोंडी आदेश होत असे मानवतावादी दृष्टीकोनास अनुसरुन सदर रुग्णांना वैद्यकीय बीलांची पुर्ण रक्कम भरण्यापुर्वी सोडून देणे भाग पडे.

२. रुग्ण/नातेवाईकांकडून आवश्यक कागदपत्रांची मागणी पी.आर.ओ. मार्फत व प्रत्यक्ष माझे मार्फत सुध्दा करण्यात येत असे, रुग्णांचे नातेवाईक सदर कागदपत्रे पुढील एक दोन दिवसांत सादर करण्यास अनुसरुन रुग्णांस डिसचार्ज दयावा असे रुग्णांचे नातेवाईक विनंती करतात, मा. विश्वस्तांकडे साकडे घालतात, अशा वेळी मा. वरिष्ठांचे तोंडी/दुरध्वनीचे आदेशास अनुसरुन रुग्णांस डिसचार्ज केले गेले आहे.

३. भरती झालेल्या रुग्णांना हॉस्पिटलमध्ये उपलब्ध नसलेल्या वैद्यकीय उपचारासाठी इतर हॉस्पिटलमध्ये तातडीने पाठविण्यासाठी अंतिम बिल भरणा करण्या अगोदर जीवरक्षणाच्या दृष्टीने डिसचार्ज करण्यात आले आहे.

४. अशा प्रकारे अंतिम बील भरणा करण्यापुर्वी नाईलाजास्तव डिसचार्ज केलेल्या रुग्णांमध्ये सुदैवाने एकही नातेवाईक/मित्र नाही.

५. या रुग्णांच्या यादीमध्ये बरेच साईभक्त नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकल्याने आले आहे.

६. शिवाय सदर रुग्णांची रितसर कागदपत्रे मिळवून चॅरीटी पुर्ण करण्यासाठी मला वेळ मिळण्यापुर्वीच कार्यकाळ संपुष्टात आलेचे पत्र हाती मिळाल्याने हे काम मला पुर्ण करता आले नाही.

७. रुग्णांच्या आय.पी.डी. फाईलवर मान्यवरांनी दिलेल्या तोंडी सुचना लिखीत स्वरुपात करुन रेकॉर्ड बनविण्याचे काम न करता मी पी.आर.ओ. मार्फत विहीत पध्दतीने कागदपत्रे दप्तरी जमा करुन सवलत देत असे.

८. अशा प्रकारे साईचरणी सेवा देत असताना मी कोणतेही वाईट काम केले नाही, शिल्लक कामाचा उरक होण्यापुर्वी आपले पत्र मिळाल्याने नंतर संबंधीतांनी हे काम पुर्ण केले नाही असे वाटते तरी सदर खुलासा ग्राहय धरुन मला संस्थान कडून येणे असलेल्या रक्कमेतून कोणतीही कपात न करता लवकरात लवकर मिळावी, ही नम्र विनंती.

आपला विश्वासु,
स्वाक्षरी
**डॉ.आर.जी.ढवळे**
माजी वैद्यकीय संचालक
श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी

दि.०६.०९.२००८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन सभेतील विषय नं.४०, निर्णय क्रं.६७२ नुसार डॉ. ढवळे यांचा उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेला लेखी खुलासा आजचे सभेत मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ. ढवळे यांचा वरील खुलासा विचारात घेता डॉ.ढवळे यांचे कार्यकाळात रुग्णांकडून वसूल न झालेल्या रकमेस वैद्यकीय सवलत म्हणून मान्यता देऊन या बीलांवर कोणत्याही प्रकारचा इन्सेंटीव्ह देण्यात येऊ नये असे ठरले. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१६** **श्री साईबाबा रुग्णालयात नवीन कॅथलॅब विभागासाठी कॅथलॅब मशिन खरेदी बाबत**
**निर्णय क्र.२८४** श्री साईबाबा रुग्णालयात सन २००६ मध्ये एक कॅथलॅब ओ.टी.विभाग सुरु करण्यात आला होता. त्यासाठी मे.सिमेन्स लि.,मुंबई यांचेकडून १ नग कॅथलॅब मशिन रु. २,९५,००,०००/- इतक्या किंमतीस खरेदी करण्यात आले होते.

सध्या रुग्णालयात कार्डीयाक पेशन्टची संख्या अतिप्रमाणात वाढती असल्यामुळे तसेच कॅथलॅब विभागासाठी डॉ.बजाज व डॉ.वर्मा हे पुर्णवेळ कार्डीओलॉजिस्ट म्हणून काम करत असून डॉ.धर्माधिकारी , डॉ.चोपडा व डॉ.व्हीजन हे मानद कार्डीओलॉजिस्ट सुध्दा आठवडयातून एक दिवस येत असतात. त्यामुळे सदरचे कॅथलॅब विभाग कमी पडत असल्यामुळे सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये चालू असलेली Opthal O.T. श्री साईनाथ रुग्णालयात स्थलांतरीत करुन त्याजागेत अजून एक नविन कॅथलॅब विभाग सुरु करण्यास मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८.०२.२००९ चे सभेमध्ये मान्यता मिळालेली आहे. तसेच मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांनी दुरध्वनीवरुन वैद्यकीय संचालक यांना नविन कॅथलॅब विभागासाठी कॅथलॅब मशिन खरेदीकामी सुचना दिली आहे.

त्यानुसार १ नग कॅथलॅब मशिनकरीता अंदाजे रु.३,२५,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

श्री साईनाथ रुग्णालयात सध्या Opthal O.T. बनविण्याचे काम चालू असून ते पुर्ण होण्यास अजून दोन ते तीन महिन्यांचा कालावधी अपेक्षित आहे. तेंव्हा अजून तरी Opthal O.T. स्थलांतरीत करणेस दोन ते तीन महिने कालावधी लागणार आहे.

तरी नविन कॅथलॅब खरेदीची कार्यवाही वेळेवर पूर्ण व्हावी यासाठी १ नग कॅथलॅब मशिन खरेदीकामी विहीत पध्दतीने जाहिरात देऊन निविदा मागवण्यास व याकामी येणाऱ्या अंदाजे रु. ३,२५,००,०००/- खर्चास व उत्पादक कंपन्या/ अधिकृत विक्रेत्यांना अवगत करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१७** **ब्लड गॅस ॲनालायझर मशिनचा Reference Micro Electrod बदलणेबाबत**
**निर्णय क्र.२८५** श्री साईबाबा हॉस्पिटलच्या पॅथॉलॉजी लॅबमध्ये रूग्णांचे रक्त तपासणी करणेकामी मा.व्य.समिती दि.०६/०८/०५ च्या सभेतील विषय क्र.०५ व निर्णय क्र.३९३(३) अन्वये मे.रोश डायग्नॉस्टिक प्रा.लि.मुंबई या कंपनीचे OMNI C हे ऑटोमॅटिक ब्लड गॅस ॲनालायझर मशिन एकुण रू.६,७५,०००/-इतक्या रकमेत खरेदी करण्यात आले आहे. सदर मशीन दि.२२/११/०५ रोजी बसविण्यात आले असून दि.०६/०५/०६ पासून पॅथोलॉजी विभागात नियमीत वापरात आहे. सदर मशिनचा वॉरंटी कालावधी दि. १७/०१/०७ रोजी संपला असून मा.व्य.समितीच्या दि.१५/११/०८ च्या सभेतील निर्णय क्र. ८२५ अन्वये सदर मशिनचे दिनांक ०१/१२/२००८ ते ३०/११/२००९ या कालावधी करीता वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात आले आहे. कंपनीचे इंजिनीअर त्यांच्या नियमीत व तातडीच्या भेटी देउन मशीनची दुरुस्ती व देखभाल करीत आहेत. सदर वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट कालावधीत दुरूस्तीसाठी आवश्यक असणाऱ्या स्पेअर पार्टची किंमत संस्थानला वेगळी अदा करावयाची आहे.

सदर ब्लड गॅस ॲनालायझर मशीनमध्ये रक्तातील विविध गॅसेसचे प्रमाण तपासणेकरीता वेगवेगळे Electrode असतात. सदर इलेक्ट्रोड ९ ते १२ महीन्यांच्या वापरानंतर खराब होतात. दि. २८/०२/२००९ रोजी कंपनीचे इंजिनीअर त्यांचे नियमीत सर्व्हिसींगकरीता आले असता, त्यांनी त्यांचे पत्र क्र. २५३१५ दि. २८/०२/२००९ अन्वये ब्लड गॅस ॲनालायझर मशिनचा Reference Micro Electrode खराब झाला असल्याचे सांगीतले आहे. सदर मशीन श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दि. १८/०१/२००६ रोजी कार्यान्वीत केल्यापासुन सदरचा इलेक्ट्रोड सतत वापरात असुन आजपावेतो बदललेला नाही. Reference Micro Electrode खराब झाल्यामुळे रक्तात विरघळलेले विविध गॅसेस, व क्षार यांचे प्रमाण चुकीचे दर्शविले जाते. सदर मशीनवर केल्या जाणाऱ्या रक्ताच्या तपासण्या विविध ऑपरेशन्सकरीता आवश्यक असतात. त्यामुळे सदर मशीन नेहमी अद्यावत ठेवणे आवश्यक असल्याने Reference Micro Electrode तातडीने बदलणे आवश्यक आहे.

सदर ए.बी.जी. मशीनचे स्पेअर पार्ट फक्त मे.रोश डायग्नॉस्टिक प्रा. ली. मुंबई व त्यांचे अधिकृत डीलर यांचेकडेच मिळतात. मे.रोश डायग्नॉस्टिक प्रा. ली. मुंबई यांचे सध्याचे अधिकृत डिलर मे.युनिबायो,

मुंबई यांनी त्यांचे दि. ०२/०३/२००९ चे पत्रान्वये Reference Micro Electrode सर्व करांसहीत एकुण रु. ४०,९५०/- (अक्षरी रु. चाळीस हजार नउशे पन्नास मात्र) इतक्या रकमेचे कोटेशन दिले आहे. सदर रक्कम कंपनीस Reference Micro Electrode श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये प्राप्त झालेनंतर अदा करावयाची आहे.

तरी मे.युनिबायो, मुंबई यांचेकडुन ए.बी.जी. मशीनचे Reference Micro Electrode खरेदी करणेस व त्याकरीता येणाऱ्या एकुण रु. ४०,९५०/- चे खर्चास मान्यता देणेबाबत प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८** **अपघातग्रस्त शव वाहिका क्र.एम.एच.१७ टी ७१३१ चे बीलाबाबत व कायदेशीर दावा दाखल करणेबाबत.**

**निर्णय क्र.२८६** दिनांक २७.०८.२००७ रोजी शववाहिका क्रं. एमएच-१७/टी-७१३१ हे वाहन श्री साईबाबा हॉस्पिटल मधुन कै. विष्णु रूपचंदजी हिंदुजा यांची डेडबॉडी कटणी (मध्यप्रदेश) येथे सोडणे कामी सकाळी ०६.०० वाजता गेले होते. जातांना प्रवासात अकोला (बाळापुर) या शहराच्या पुढे साधारंताः १५-२० कि.मी. चे अंतरावर बोरगांव-मंजु या गावाजवळ वाहन पलटी होऊन अपघात झाला होता.

दि.०४.१०.२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.७ (०७) ने प्राप्त झालेली कोटेशन्स उघडणेत येऊन कोटेशनधारकांशी समक्ष चर्चा/वाटाघाटीने सदर सभेत शिवशक्ती इंजिनिअरींग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांचे निम्नतमदर (रू.१,२५,०००/-) मात्र स्विकारण्यात यावेत तसेच सदर शववाहिकेचे संपुर्ण बॉडी नवीन करण्यात येऊन त्याबदल्यात या गाडीचे जुने निघालेले मटेरियल शिवशक्ती इंजिनिअरींग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांना मोफत देण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली होती.

वरील निर्णयानुसार, दि.०९.१०.२००७ चे जा.नं.एसएसएस/वाहन/१६१५६/२००७ने अपघातग्रस्त शववाहिकेची बॉडी बांधणीचे काम दि.०९.१०.२००७ पासून शिवशक्ती इंजिनिअरींग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांना देण्यात आलेले होते. परंतू, काम वेळेत होत नसलेने इकडील कार्यालयामार्फत जा.नं.एसएसएस/ वाहन/१९६९६ दि.१४.१२.२००७ / १९२९ दि.०२.०२.२००८ / ३३०३ दि.०४.०३.२००८ /५५११ दि.१७.०४.२००८ ने नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. तरीही काम होत नसल्याने दि.२४.०५.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत यावर सविस्तर चर्चा होऊन शिवशक्ती इंजिनिअरींग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांचेशी मा.विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी समक्ष चर्चा करून अंतिम निर्णय घ्यावा अशी उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

दि.०७.०७.२००८ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत शिवशक्ती इंजिनिअरींग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांचेकडून बॉडी बांधणीचे कामात काहीही प्रगती होत नसल्याने यांचेवर कायदेशिर कार्यवाही करण्यात यावी असे ठरले. त्यानुसार, संस्थान कायदे सल्लागार ॲड.श्री.एस.डी.कुलकर्णी, कोपरगांव यांचेमार्फत कायदेशिर नोटीस देण्यात आलेली आहे.

शिवशक्ती इंजिनिअरींग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांना नोटीस मिळालेनंतर त्यांनी दि.२८.०१.२००९ रोजी बॉडी बांधणीचे काम पुर्ण करून सदर गाडी आपले ताब्यात दिलेली आहे. सदर गाडी आपले हक्कास बाधा न येता ताब्यात घेतली आहे. व गाडीचा वापर चालू करण्यात आलेला आहे. तसेच विमाधारक कंपनी युनाइटेड इंडिया इन्शूरेन्स कं. लि. यांचेकडे विमा क्लेम करण्यात आलेला आहे.

दि.२८.०१.२००९ चे पत्राप्रमाणे रू.१,२५,०००/- मात्रचे बिल दिलेले आहे. पैकी ॲडव्हान्स म्हणून दिलेली रक्कम रू.६२,५००/- मात्र वजा जाता बाकी रक्कम रू.६२,५००/- मात्र देणे बाकी आहे.

त्यांनी शववाहिका मुद्दतीत म्हणजे ०१ महिण्याचे आत न दिल्याने कामाची अडचण होउ नये म्हणून शववाहिका म्हणून रूग्णवाहिका क्रं.एमएच-१७/टी-७१४१ चा वापर करण्यात आलेला आहे. सदर वापर ९७,४१८ कि.मी. झालेला आहे. आपले रूग्णवाहिका प्रति कि.मी. रू.३/- प्रमाणे रूग्णांकरीता ना नफा ना तोटा या तत्वावर वापरात आहे. सदर वाहनांचा ॲव्हरेजचा विचार करता इंधनचा खर्चही सुटत नाही. त्यामुळे आपले अंदाजे रू.एक लाख मात्रचे नुकसान झालेली आहे.

तरी शिवशक्ती इंजिनिअरींग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांना उर्वरित शिल्लक रक्कम रू.६२,५००/- मात्र न देणे बाबत तसेच अंदाजे रू.एक लाख मात्र रक्कमेचा दावा दाखल करणे बाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिवशक्ती इंजिनिअरींग ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर यांना उर्वरित शिल्लक रक्कम रू.६२,५००/- मात्र देण्यात येऊ नये. तसेच रुपये एक लाख मात्रचा दावा दाखल करु नये असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **श्री साई मंदीरात श्रीं च्या मूर्तीच्या मागील एक्झिट दरवाजांमध्ये जाळीचे शटर बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.२८७** श्री साई मंदिरात आरतीचे वेळी बाबांच्या मूर्ती मागील दोन्ही सागवानी दरवाजे हे आरती चालू असताना कोणी जा - ये करु नये म्हणून बंद ठेवण्यात येतात. नेमके ह्या वेळी त्याठिकाणी नॅचरल व्हेन्टीलेशन बंद होऊन आतमध्ये गरम होते. त्याकरीता याकामी जाळी असलेले शटर बसविल्यास आरतीचे वेळी जा- ये करण्यास प्रतिबंध होऊन नॅचरल व्हेन्टीलेशनही मिळू शकेल.

श्री साई मंदिरात सोन्याने मढविलेले सिंहासन, भिंती असल्याने सुरक्षितता महत्त्वाची आहे. याकामी टाटा मोटार्स-पुणे, सँडविक एशिया-पुणे, एस.के.एफ.इण्डीया लि.पुणे, तसेच तारापूर येथील भारत सरकारच्या न्युक्लीअर पॉवर कार्पोरेशन ऑफ इंडिया लि. याठिकाणी सुरक्षा सिस्टिमचे काम करणारे मे.अॅव्हियन्स, पुणे यांना बोलावून त्यांना पूर्ण दिवसातील आरतीच्या वेळी तसेच इतर वेळी होणारी भक्तांची मंदिरातील ये- जा दाखविण्यात आली. याकामी त्यांनी साधे रोलींग शटरऐवजी ऑटोमॅटीक रोलींग जाळीचे शटर बसवावे म्हणून सुचविले आहे.

या ऑटोमॅटीक रोलींग जाळीचा शटरला सिक्युरिटी सिस्टिमही जोडता येऊ शकते. तसेच सिक्युरिटी सिस्टिम लॉक केल्यानंतर हे शटर उघडण्याचा प्रयत्न केला, त्याच्या सिस्टिमचा वायर तोडण्याचा प्रयत्न केला, किंवा अन्य कोणत्याही कारणाने शटरवर काही प्रयोग करण्याचा प्रयत्न केला तर सिक्युरिटी सिस्टिम अलर्ट होऊन त्याचे इंडीकेशन पी.सी.वर तसेच त्या सिस्टिमला जोडलेल्या मोबाईलवर मिळते. शिवाय हे ऑटोमॅटीक रोलींग शटर दिवसभर सिक्युरिटी बायपासमध्ये असणार आहे.

यात फोटो सेल टेक्नीक वापरण्यात आलेली असल्याने इतर वेळात शटर खाली-वर घेताना शटरच्या खाली कोणी व्यक्ती आले तरी शटर मुव्हमेंट आपोआप थांबते व शटर पुन्हा वर जाते.

या दोन्ही दरवाजांकरीता १.४० मीटर x २.७० मीटर या साईजच्या ऑटोमॅटीक शटरसाठी अंदाजे रक्कम रुपये ४,९८,०००.०० इतका व सिक्युरिटी सिस्टिमसाठी वेगळा खर्च राहील.

तरी उपरोक्तकामी कोटेशन्स मागविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **मंदीर परीसर सिक्युरिटी सर्च टॉवरचे उर्वरीत काम दुसऱ्या ठेकेदाराकडून पूर्ण करुन घेणेस व काम अपूर्ण ठेवलेल्या ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२८८** मंदिर परीसराभोवती चारही बाजूस संरक्षणाचे दृष्टीने ०४ नग सिक्युरिटी सर्च टॉवर बनविणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २९-०६-२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र.४१ निर्णय क्र.४९६ अन्वये मे.श्रीराम इंजिनिअरींग वर्क्स, साकुरी-राहाता यांचे निम्नतम दर मान्य करण्यात येऊन त्यानुसार मे.श्रीराम इंजिनिअरींग वर्क्स, साकुरी-राहाता यांना जा.क्र.एसएसएस / विद्युत / १०५०६ / २००७ दिनांक ०५-०७-२००७ अन्वये कामाचा रक्कम रुपये ३,२२,७८८.०० इतक्या रकमेचा कार्यादेश देण्यात आला होता.

मे.श्रीराम इंजिनिअरींग वर्क्स, साकुरी-राहाता यांनी रक्कम रुपये २,४५,३१८.०० इतक्या रकमेचे काम पूर्ण केल्यानंतर उर्वरीत रक्कम रुपये ७७,४७०/- इतक्या रकमेचे काम पूर्ण करणेबाबत टाळाटाळ केली म्हणून प्रत्यक्ष त्यांचेकडे जाऊन तसेच दुरध्वनीवरुन वारंवार सांगणेत आले आहे. परंतू मे.श्रीराम इंजिनिअरींग वर्क्स, साकुरी-राहाता हे सदर काम करणेस टाळाटाळ करीत असल्याने त्यांची बीलातून कपात केलेली सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम रुपये १२,९१२/- इतकी जप्त करुन संस्थानमध्ये जमा करणेस मान्यता मिळणेस व मंदिर परीसर सिक्युरिटी सर्च टॉवरचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण करुन घेणेकामी येणारा खर्च रक्कम रुपये ७७,४७०/- मात्र खर्चास व सदरचे काम दुस-या वर्कशॉप-फॅब्रिकेटर्स यांचेकडून करुन घेणेस कोटेशन्स मागविणेकामी मंजूरी घेतलेली आहे.

याकामी कोटेशन्स मागविण्यात आली व त्या कोटेशन्समधील निम्नतम दर दिलेले मे. सुपर फॅब्रिकेशन अॅण्ड फर्निचर,साकुरी-राहाता यांना ऑर्डर देण्यास व येणा-या प्रती टॉवर रू. १८,५००/- प्रमाणे चार टॉवरसाठी रक्कम रुपये ७४,०००/- इतक्या येणा-या खर्चास मान्यता मिळणेस तसेच मे.श्रीराम इंजिनिअरींग वर्क्स, साकुरी-राहाता यांची सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम रुपये १२,९१२/- इतकी जप्त करुन संस्थानमध्ये जमा करणेस मान्यता मिळणेसाठी टिपणी तयार करुन मान्यता घेण्यात आली व त्यानुसार मे.श्रीराम इंजिनिअरींग वर्क्स, साकुरी-राहाता यांना जा.नं.एसएसएस / विद्युत / २०६९ / १८-०२-२००९ अन्वये सिक्युरिटी डिपॉझिट जप्त केल्याचे कळविले आहे.

तरी मे. सुपर फॅब्रिकेशन अॅण्ड फर्निचर,साकुरी-राहाता यांना उर्वरीत काम पूर्ण करण्यासाठी निम्नतम दर दिल्याने प्रती टॉवर रु, १५,५००.०० प्रमाणे चार टॉवरसाठी रक्कम रुपये ७४,०००/- इतक्या रक्कमेचा कार्यादेश मे. सुपर फॅब्रिकेशन अॅण्ड फर्निचर, साकुरी-राहाता यांना देणेस तसेच मे.श्रीराम इंजिनिअरींग वर्क्स, साकुरी-राहाता यांची सिक्युरिटी डिपॉझिटची रक्कम रुपये १२,९१२/- इतकी जप्त करुन संस्थानमध्ये जमा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **संस्थानच्या कनिष्ठ महाविद्यालयाकरिता साऊंडप्रुफ जनसेट खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२८९** श्री साईबाबा संस्थानने जिल्हा परिषद शाळेकरीता नविन इमारत बांधून दिलेली असून या इमारतीमध्ये इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे वर्ग भरत आहेत. मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २०-०५-२००७ चे सभेतील निर्णय क्र.३८१ नुसार जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीमध्ये संस्थानने या वर्षापासून श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाचे ११ वी व १२ वी चे वर्ग सुरु केलेले असून या कनिष्ठ महाविद्यालयाच्या इमारतीत संस्थानचा जनरेटर सप्लाय जोडलेला नाही. या भागात सतत वीज भारनियमन होते. त्यामुळे वीज प्रवाह खंडीत झाल्यावर संगणकावर होणारे सर्व कामकाज थांबते. त्यामुळे कार्यालयीन कामकाजात अडथळा निर्माण होतो. तसेच ग्रंथालय व स्टाफरुम याठिकाणी पुरेसा प्रकाश मिळत नाही. तरी कृपया कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यालय, स्टाफरुम तसेच ग्रंथालय येथील २८ संगणक, सर्व फॅन व सर्व टयुबलाईट चालू शकतील असा अखंडीत वीज प्रवाह उपलब्ध होईल असे जनरेटर विद्युत विभागामार्फत बसवून मिळणेकामी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी यांनी दिनांक ०२-०७-२००८ चे पत्रान्वये कळविले आहे.

संस्थानमार्फत साजरे होणारे उत्सव तसेच मे महिना, दिवाळी व नाताळ या सुट्टयांच्या काळात जिल्हा परिषद शाळेच्या वर्ग खोल्या भक्तांना निवास व्यवस्थेकरीता दिल्या जातात. या इमारतीस महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा थ्री फेज वीज सप्लाय जोडून घेण्यात आलेला आहे. भक्तांना वर्ग खोल्या दिल्यानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर भक्तांची गैरसोय होऊ नये म्हणून याठिकाणी भाडोत्री जनरेटरची व्यवस्था करावी लागते.

जिल्हा परिषद व श्री साईबाबा संस्थानचे कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व फॅन, टयुब, संगणक व पाण्याच्या मोटारी यांना विना खंडीत वीजपुरवठा मिळावा याकरीता खालील वर्णनाचा १५ केव्हीए चा ३ फेज जनरेटरसेट खरेदी करुन बसवून द्यावा लागणार आहे. तपशील खालीलप्रमाणे :-

| Sr. No. | C.S.R. N0. | Discription | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 11-1-4 | Supplying and erecting and Commissioning of **Diesel generating set 15 KVA** continuous rating, 3 phase, 415 volts, 50 Hz A.C. with standared accessories control panel and acoustic enclosure (canopy) as per specification No.**GEN-DG.** | 01 Nos. | Rs. 3,66,135.00 | Rs. 3,66,135.00 |
| 02) | Non C.S.R. | Supplying and erecting and Commissioning of AMF Panel suitable for Diesel Generating set of 15 KVA Capacity 3 Phase, 415 Volts, 50 Hz AC with all standards features safeties etc. **as per specification no. GEN.AMF.** | 01 Nos. | Rs. 1,05,000.00 | Rs. 1,05,000.00 |
| 03) | 9-1-2 | Supplying and erecting **Copper earth plate**. 30mm x 30mm x 0.6 cm complete with all materials, testing and recording the results as per specifications **EA-EP.** | 02 Nos. | Rs. 0,02,625.00 | Rs. 0,05,250.00 |
| 04) | 7-1-18 | Supplying and erecting **PVC armoured** Cable **3.1/2 core 35 sq.mm.** Standared / Solid **Aluminimum** Conductor with continuous **5.48 sq.mm. (12 SWG)** G.I. Earth wire complete erected with glands & lugs on wall / trusses / pole or laid in provided trench / pipe **as per specification No.CB – LT / AL.** | 200 Meter | Rs. 0,00,249.90 | Rs. 0,49,980.00 |
| 05) | 17-1-2 | **Making the trench in hard murun / Tar road** of suitable width and depth for laying provided L.T. cable up to 10 Sq.mm. complete as per specification No. **CW - EXN - CTR**. | 100 Meter | Rs. 0,00,99.75 | Rs. 0,09,975.00 |
| | | | | Total | Rs. 5,36,340.00 |
| | | | | Contigency 5% | Rs. 0,26,817.00 |
| | | | | Net Total | Rs. 5,63,157.00 |

उपरोक्तप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाकरीता १५ केव्हीए साउंड प्रुफ जनरेटरसेट खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ५,६३,१५७.०० मात्र खर्च व जनसेट्साठी शेड व फाउंडेशन तयार करणेसाठी अंदाजे रु. १,२५,०००.०० असा एकूण रु. ६,८८,१५७.०० इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कनिष्ठ महाविद्यालयाकरीता १५ केव्हीए साउंड प्रुफ जनरेटरसेट खरेदीकामी येणारे अंदाजे एकूण रक्कम रुपये ६,८८,१५७.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२** **विद्युत विभागाकडील वर्कशॉपकरिता वेल्डिंग मशिन खरेदीबाबत**

**निर्णय क्र.२९०** विद्युत विभागातील कार्यशाळेमध्ये दैनंदिन मंदिर परीसरातील शांतिनिवास, भक्तनिवास १ ला माळा, २ रा माळा दर्शनलाईन, जिल्हा परिषद शाळामधील, कनिष्ठ महाविद्यालय , पालखी रोड विसावा थांबे, २०० रुम धर्मशाळा, श्री साईबाबा हॉस्पीटल, श्री साईनाथ रुग्णालय, नविन श्री साई प्रसादालय, नविन स्टाफ क्वार्टर इ.ठिकाणी वेल्डींगची कामे करणेसाठी असलेले वेल्डींग मशिन जागेवर घेऊन जावे लागते. आपल्याकडे वापरात असलेले वेल्डींग मशिन्स् हे अत्यंत जुने व खुप वजनदार असल्याने मशिन कामाच्या

ठिकाणी घेऊन जाणे फार अवघड होते. तसेच हे मशिन्स जुनी असल्याने त्यांना वीजही जास्त लागते. त्यासाठी वजनाने कमी असलेले कमी वीज घेणारे व जास्त करंट देणारे वेल्डींग मशिन (वजन १० ते ११ किलो) असणे गरजेचे आहे, म्हणजे ते मशिन सहजरित्या साईटवर घेऊन काम करणे सोपे जाईल.

दिनांक २७-०२-२००९ रोजी मॅगनम् इंजिनिअर्स, नाशिक या कंपनीने JASIC MAKE, WELDING MACHINE, SINGLE PHASE, ARC २०० B MMA. DC. हे मशिन शिर्डी येथे संस्थानच्या कार्यशाळेत आणून त्यावर प्रात्यक्षिक करुन दाखविले असता वापरलेले मशिन हे कामासाठी योग्य आहे. व वजनाला हलके आहे. तसेच करंट कमी घेणारे आहे. अशा प्रकारचे मशिन्स खरेदी करणेकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | JASIC MAKE, WELDING MACHINE, SINGLE PHASE, ARC 200 B MMA.DC. | ०२ नग. | रु. ४०,०००.०० (प्रति नग) (वॅटसहित) | रु. ८०,०००.०० |
| | | | **एकुण रक्कम :-** | **रु. ८०,०००.००** |

श्री साईबाबा संस्थानचे वेगवेगळया ठिकाणची वेल्डींगची कामे करणेसाठी आवश्यक असणारे उपरोक्तप्रमाणे वेल्डींग मशिन्स् खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ८०,०००.०० मात्र खर्च अपक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३** **श्रीसाईप्रसादालयाचे व्ही.आय.पी.प्रसादभोजन कक्षामध्ये बसविणेकामी एअर कुलर खरेदबाबत**

**निर्णय क्र.२९१** श्री साई प्रसादालयाचे व्ही.आय.पी. प्रसादभोजन हॉलमध्ये मोठया प्रमाणात व्ही.व्ही.आय.पी. प्रसाद घेणेसाठी येत असतात. सद्या नुकताच उन्हाळा सुरु झालेला आहे. तरी विद्युत विभागामार्फत तातडीने व्ही.आय.पी.हॉलमध्ये फॅन / ए.सी.व्यवस्था करुन मिळणेकामी प्रसादालय विभागाने डि.पी.क्र. २४५७ दिनांक २८-०२-२००९ अन्वये कळविले आहे.

प्रसादालय व्ही.आय.पी.प्रसाद भोजन कक्षामध्ये अनेक व्ही.आय.पी. व विश्वस्त प्रसाद भोजन घेणेसाठी येत असतात. सदर हॉलमध्ये योग्य व्हेन्टीलेशन नसल्याने आणि सद्या उन्हाळा सुरु असल्याने उष्णतेचा / उकाडयाचा त्रास जाणवू नये यासाठी साईप्रसादालयाचे व्ही.आय.पी. प्रसाद भोजन कक्षामध्ये एअर कुलर बसविल्यास येणा-या व्ही.आय.पी. व विश्वस्त यांना उकाडयाचा त्रास जाणवणार नाही. यासाठी सदर ठिकाणी १० नग एअर कुलर खरेदी करुन बसवावे लागणार आहे. याकामी येणा-या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एअर कुलर, बजाज मेक | १० नग. | रु. ८,०००.०० | रु. ८०,०००.०० |
| | | | एकुण रक्कम :- | रु. ८०,०००.०० |

श्री साई प्रसादालयाचे व्ही.आय.पी. प्रसाद भोजन कक्षामध्ये उपरोक्तप्रमाणे एअर कुलर कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ८०,०००.०० मात्र खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४** **श्रीसाईबाबा हॉस्पिटलच्या मेन डिस्ट्रीब्यूशन पॅनेलमधील चेंजओव्हर बदलणेकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९२** श्री साईबाबा हॉस्पीटलला महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजपुरवठा खंडीत झाल्यानंतर पर्यायी वीजपुरवठयासाठी ५०० केव्हीए जनसेटव्दारे वीजपुरवठा केला जातो. ५०० केव्हीएला स्टँडबाय म्हणून २०० केव्हीएचा वीजपुरवठा आहे. व याकरीता मेन डिस्ट्रीब्युशन पॅनेलमध्ये एक ८०० अॅम्पीअर क्षमतेचा एल.अँड.टी.कंपनीचा चेंजओव्हर स्विच बसविण्यात आलेला आहे.

सततच्या वापराने या चेंजओव्हर स्विचमधील इन्टरनल मुव्हेबल गिअर सिस्टिम खराब झाली असून तो एकाच साईडला फिक्स झाला आहे. जर एखादे वेळेस ५०० केव्हीए जनरेटरसेटला प्रॉब्लेम झाला तर २०० केव्हीएचा सप्लाय आणीबाणीच्या काळात श्री साईबाबा हॉस्पीटलला देणे अशक्य होईल व ह्दयशस्त्रक्रीया झालेल्या पेशंटचे मॉनिटरींग तसेच ऑपरेशन्स यात परिणामी होऊन उद्‌भवू शकत होता.त्यामुळे तातडीने हा चेंजओव्हर स्विच बदलणे गरजेचे होते.

याकरीता चेंजओव्हरची उत्पादक कंपनी मे.एल.अँड.टी.यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी त्यांचे नासिक येथील डिलर मे.जाधव स्विचगिअर्स, नासिक यांना शिर्डी येथे पाठवून चेकींग करावयांस सांगितले. त्यानुसार मे.जाधव स्विचगिअर्स, नासिक हे शिर्डी येथे आले व त्यांनी चेंजओव्हर स्विच चेक केला.

श्री साईबाबा हॉस्पीटल अहोरात्र चालू असल्याने सप्लाय बंद ठेवता येत नाही. त्यामुळे जागेवर, चेंजओव्हर स्विच, चालू सप्लायमध्ये रिपेअर करणे धोकेदायक व प्राणघातक ठरू शकते. म्हणून हा

चेंजओव्हर स्विच तात्काळ खोलून त्याजागी नविन चेंजओव्हर स्विच बसवून सप्लाय पूर्ववत करणे सोपे राहील. तसेच यात जोखीमही कमी राहील असे निदर्शनास आले.

त्यानुसार एल.अँड.टी.कंपनीचे अधिकृत सेल्स अँड सर्व्हिस डिलर, मे.जाधव स्विचगिअर्स, नासिक यांनी चेंजओव्हर स्विचचे कोटेशन पाठविले होते. तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | नग | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एल.अँड.टी.मेक,<br>८०० ॲम्पीअर, ४ पोल,<br>एफ.जी.सी. इन्टेरीअर टाईप चे चेंजओव्हर स्विच | ०१ नग. | रु. ३५,४००.०० | रु. ३५,४००.०० |
| | वॅट १२.५% | | | रु. ०४,४२५.०० |
| | | | **(अ) एकुण :-** | **रु. ३९,८२५.००** |
| ०२) | लेबर चार्जेस | ०१ नग. | रु. ०३,५००.०० | रु. ०३,५००.०० |
| | सर्व्हिस टॅक्स १२.३६% | | | रु. ००,४३२.६० |
| | | | **(ब) एकुण :-** | **रु. ०३,९३२.६०** |
| | | | **एकुण (अ) + (ब) =** | **रु. ४३,५७५.६०** |

हा चेंजओव्हर स्विच युद्धपातळीवर बदलणे गरजेचे होते, त्यामुळे मे.जाधव स्विचगिअर्स, नासिक यांना रू. ४३,५७५.६० इतक्या रकमेचा कार्यादेश देऊन त्यांचेकडून चेंजओव्हर स्विच मागवून बदलून सप्लाय पूर्ववत करुन घेतला आहे. तरी या कार्यादेशास व झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२५** **ओरिया भाषेतून श्री साईसतचरित प्रकाशित करण्यास परवानगी देणेबाबत.**
**निर्णय क्र.२९३** श्री सत्य खडगरया (ओरिसा) यांनी दि. १३.०१.२००९ चे पत्रात श्री साई सत्‌चरित्र (पोथी) चे प्रत्येक ओवीचे, ओवी टू ओवी ओरीया भाषेत रुपांतर करुन ५१ अध्यायाचे साईचरित्र तयार केले आहे. ओरीया साईभक्तांसाठी प्रकाशित करणेस परवानगी मिळल्यास भक्तांना चांगलाच उपयोग होईल असे कळविले आहे.

सदर पुस्तक प्रकाशनाबाबत ओरिया भाषेतील तज्ञ प्रो.बावरी बंधुकर, प्रोफेसर ॲण्ड हेड, ओरिया डिपार्टमेंट बेरहमपुर युनिव्हरसीटी यांचे शिफारस पत्र सादर केले आहे. सदर पत्रात श्री सत्य खडगरया (ओरिसा) यांचे ओरिया भाषेतील अनेक मासिकात त्यांनी लेखन केले आहे, तसेच त्यांनी अनेक धार्मिक पुस्तकांचे भाषांतर, लेखन, अनेक वर्तमान पत्रात लेखन, भाषांतराचे काम केले आहे. त्यांचा लेखनाचा चांगला अनुभव असलेबाबत कळविले आहे. महाप्रसाद या मासिकासाठी लेख प्रसिध्द झाले असून, ते चांगले लेखक असल्याचे कळविले आहे.

संस्थानमार्फत १५ भाषेत श्री साई सत् चरित्र प्रकाशित करण्यात आलेली आहेत. अद्याप पावेतो संस्थानमार्फत ओरिया भाषेत साईचरित्र प्रकाशित करण्यात आलेले नाही. ओरिया भाषेत साईचरित्र प्रकाशित केल्यास ओरिसा प्रातांत श्री साईबाबांचा प्रचार प्रसार होईल तसेच ओरिया भाषीक साईभक्तांची सोय होईल.

सबब श्री साईबाबांचे कार्याचा प्रचार-प्रसार व्हावा तसेच मुळ संहितेत बदल न करता ना नफा ना तोटा या तत्त्वावर पुस्तक प्रकाशन करण्याचे अटीवर त्यांना परवानगी देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२६** **श्रीसाईबाबा दिनर्शिका सिंगल सीट (मोठी साईज)छपाई खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**
**निर्णय क्र.२९४** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी तर्फे गोवा (पणजी), लखनौ, रायपूर, कलकत्ता या ठिकाणी श्री साईबाबांच्या शिकवणुकीचा प्रचार - प्रसार होणेसाठी साई संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनाच्या ठिकाणी स्टॉल लावून श्री साईबाबा दिनदर्शिका/पुस्तके/फोटो भक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देणे असल्याने, श्री साईबाबा दिनदर्शिका १ पानी शिल्लक नसल्याने, मा. अध्यक्ष साहेब यांनी प्रशासकीय अधिकारी श्री. आर.एस. साबळे साहेब यांना निर्देशीत केलेनुसार मे. साई सिक्युरिटी प्रिंटर्स,बंगलोर यांना दुरध्वनीद्वारे श्री साईबाबा दिनदर्शिका १ पानी (मोठी साईज) ५,००० नग, छपाई दर रु.१०/- प्रमाणे रु. ५०,०००/- रकमेचा जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१३३६८/२००८ दि.१२.०९.२००८ चे आदेशातील अटीनुसार दुरध्वनीवरुन छपाई आदेश देऊन, श्री साईबाबा दिनदर्शिका १ पानी (मोठी साईज) ५,००० नग छपाई करुन घेण्यात आले आहे.

उपरोक्तप्रमाणे मे. साई सिक्युरिटी प्रिंटर्स, बंगलोर यांना बिल नं.७६५ दि.२१.०२.२००९ अन्वये श्री साईबाबा दिनर्शिका १ पानी (मोठी साईज) ५,००० नग, छपाई दर रु.१०/- प्रमाणे रक्कम रु. ५०,०००/- मात्रचे छपाई खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७** **श्रीसाईच्चरित मराठी (पोथी),श्रीसाईसत्चरित्र हिन्दी दोहावली,श्रीसाईबाबा मंदिरातील आरत्या मंत्रोच्चार,ऑडिओ सी.डी. व शिर्डी श्रीसाईबाबाकी संपूर्ण शिर्डी दर्शन व्हीसीडी निर्मिती कामाचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९५** मा. व्यवस्थापन समितीचे १०.०१.२००८ चे सभेतील विषय नं.७१ निर्णय क्र.७१ नुसार मे. सोनी डीएडीस मॅन्युपॅक्चरींग इंडिया प्रा.लि., मुंबई यांचेकडील सी.डी./ व्हीसीडी निर्मितीसाठी असलेल्या शर्ती /अटी मान्य करण्यात येऊन त्यांचेकडून कायमस्वरुपी संस्थान निर्मित सी.डी., व्हीसीडी चे काम करुन घेण्यास मान्यता देण्यात आली आहे.

संस्थान निर्मित श्री साईसच्चरित मराठी (पोथी),श्री साईसत्चरित्र हिन्दी दोहावली, श्री साईबाबा मंदिरातील आरत्या मंत्रोच्चार, ऑडीओ सी.डी. व शिर्डी श्री साईबाबा की संपूर्ण शिर्डी दर्शन व्हीसीडी चा स्टॉक अल्प प्रमाणात असल्याने मे.सोनी डीएडीस मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांचे दि.१९.०२.२००९ चे फॅक्स पत्राद्वारे प्राप्त झालेले कोटेशन प्रमाणे खालील सी.डी./व्हीसीडी निर्मिती करणेसाठी दरपत्रक मागविण्यात येऊन दर कळविले आहे.

| अ.नं | तपशिल | संख्या | मुळ दर | व्हॅट ४ % | एकूण दर | एकूण रक्कम | संस्थान विक्री किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सच्चरित मराठी पोथी , ऑडीओ सी.डी. (४ सीडीचा संच ) | १०,००० संच | ६७.८० | २.७१ | ७०.५१ | ७,०५,१००/- | १०० प्रती संच |
| ०२ | श्री साई सच्चरित सार हिन्दी दोहावली ग्रंथाची ऑडीओ सी.डी.(३ सीडीचा संच) | १०,००० संच | ५५.३० | २.२१ | ५७.५१ | ५,७५,१००/- | ९०/- प्रती नग |
| ०३ | श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडिओ सी.डी.(एम.पी ३) | १०,००० नग | १४.०० | ०.५६ | १४.५६ | १,४५,६००/- | ३०/-प्रती नग |
| ०४ | शिर्डी श्री साईबाबाकी संपूर्ण शिर्डी दर्शन - व्हीसीडी | १०,००० नग | १७.२५ | ०.६९ | १७.९४ | १,७९,४००/- | ५०/-प्रती नग |
| | | | | | एकूण रु. | १६,०५,२००/- | |

वरील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे सी.डी/व्हीसीडी निर्मिती करणेकामी मे सोनी डीएडीस मॅन्युफॅक्चरींग इंडिया प्रा.लि.,मुंबई यांना निर्मिती कामाचा आदेश देणेस, व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १६,०५,२००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **व्दारावती भक्तनिवास इमारतीमध्ये अंतर्गत दूरध्वनी सुविधा उपलब्ध करुन देणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून चर्चा-तथा-वाटाघाटीअंती निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२९६** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३/०१/२००९ रोजीचे सभेत व्दारावती इमारतीमध्ये संगणकीय जाळेंची उभारणी विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागवून न्यूनतम निविदाधारकाकडून करुन घेणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये ५,४२,२३०/- + टॅक्स पर्यंतच्या खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच दूरध्वनी सुविधा उपलब्ध करुन देणेस व त्यासाठी येणारे उपरोक्त साहित्य खरेदीसाठी अंदाजे रुपये ६ ,१०,२००/- (कर अतिरिक्त) तसेच पर्यंतच्या खर्चास मान्यता देवून, वर्तमान पत्रांत जाहिरात प्रसिध्द करणेसाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन, व्दारावती इमारतीमध्ये दूरध्वनी सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी संबंधीत क्षेत्रातील विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविणेकामी माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत निविदा नमुना तयार करण्यात आला होता. सदर निविदांबाबत वर्तमान पत्रांमध्ये जाहिरात देऊन व त्यास संस्थान संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दिनांक २८/०१/२००९ अखेर ठेवण्यात येऊन, विक्री झालेल्या निविदा संस्थानला सादर करण्याची अंतीम मुदत दिनांक ३१/०१/२००९ देण्यात आलेली होती. प्रति निविदेची किंमत रुपये ५००/- ठेवण्यात आली असून, सदर निविदेसोबत रुपये २५,०००/- मात्र बयाना रक्कम भरणेची अट घालण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर ९ निविदांची विक्री करण्यात आलेली असून, खालील तपशीलाप्रमाणे निविदा संस्थानकडे मुदतीत प्राप्त झालेल्या आहे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| ०१ | S. R. Traders, Nashik. |
| ०२. | Hi Tech India, Nashik. |
| ०३. | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik. |
| ०४. | Aditi Electronics, Nashik. |
| ०५. | GEO Systems & Solutions, Surat |
| ०६. | MINI COMP, Mumbai |

उपरोक्त प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन,निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **निविदेतील दर रु.** | **चर्चेअंती देऊ केले दर रु.** |
|---|---|---|---|
| 01 | S. R. Traders, Nashik. | 4,10,400.00 | 3,33,100.00 |

| | | | |
|---|---|---|---|
| 02. | Hi Tech India, Nashik. | 6,10,400.00 | अनुपस्थित |
| 03. | Racca Infotech Pvt. Ltd., Nashik. | 3,48,500.00 | 3,25,000.00 |
| 04. | Aditi Electronics, Nashik. | 5,92,543.00 | 5,33,288.00 |
| 05. | GEO Systems & Solutions, Surat | 3,45,212.00 | 3,31,200.00 |
| 06. | MINI COMP, Mumbai | 3,81,066.00 | 3,42,960.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, Racca Infotech Pvt. Ltd., Nashik.यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९** **TREND MICRO ANTI VIRUS (सॉफ्ट वेअर) ५१ युजर्सचे नविन पॅकेज खरेदीचे दरात झालेल्या बदलाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.२९७** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २४ मे, २००८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ४६४ नुसार TREND MICRO ANTI VIRUS (सॉफ्टवेअर) ५१ युजर्सचे नवीन पॅकेज खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये २,२०,०००/- + टॅक्स मात्रचे खर्चास तसेच सदर सॉफ्टवेअरसाठी अद्ययावत संगणक संच खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये ५२,०००/-+ टॅक्स मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यास अनुसरुन, TREND MICRO ANTI VIRUS (सॉफ्टवेअर) ५१ युजर्सचे नवीन पॅकेज खरेदी करणेसाठी विविध पुरवठादारांकडून सिलबंद निविदा मागविणेसाठी संस्थानचे www.sai.org.in या अधिकृत वेबसाईटवर दिनांक १० ऑगस्ट, २००८ पर्यंत जाहिरात प्रसिध्द करुन, सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतीम मुदत दिनांक १५ ऑगस्ट, २००८ पर्यंत ठेवण्यात आली होती. त्यानुसार ०३ पुरवठादारांनी आपल्या सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत. सदर निविदाधाकरांना मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ सप्टेंबर, २००८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे चर्चा-तथा-वाटाघाटीअंती निर्णयार्थ बोलाविण्यात आले होते. तथापि, SUJATA COMPUTERS PVT.LTD. PUNE यांनी त्यांचे निविदेमध्ये एक वर्षाचे कालावधीसाठी ७५,९५०/- चे दरपत्रक दिलेले होते व आपणास तीन वर्षाचे कालावधीसाठी सदर सॉफ्टवेअर घ्यावयाचे असल्याने, SUJATA COMPUTERS PVT.LTD. PUNE यांनी चर्चेपूर्वी रुपये १,२२,०००/- चे दरपत्रक दिले होते. मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये चर्चा-तथा-वाटाघाटीअंती निर्णय घेतांना त्यांनी रुपये १,१७,५००/- चे दरपत्रक दिलेले असून, ते मान्य करण्यात आलेले आहे. सदर दरपत्रकाप्रमाणे जा. नं. एसएसएसटी/आयटी/१५८७५/२००८ दिनांक २७ ऑक्टोबर, २००८ नुसार कार्यादेश देऊन कार्यवाही करुन घेण्यात आलेली आहे. तरी, त्यांचे तीन वर्षासाठीचे सुधारित दरपत्रक रुपये १,१७,५००/- ची नोंद घेणेसाठी सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये सादर करणेत यावा, असे नम्र मत आहे.

उपरोक्तप्रमाणे, SUJATA COMPUTERS PVT.LTD. PUNE यांचे तीन वर्षासाठी दिलेल्या सुधारित दरपत्रक रुपये १,१७,५००/-ची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०** **नविन श्री साई प्रसादालयाकरीता कर्मचारी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९८** दिवसेंदिवस साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी वाढलेली असल्याने याआधीचे मंदीर परिसरातील १००० क्षमतेचे बैठक व्यवस्था असलेले प्रसादालय अतिशय कमी पडत असल्याने प्रसाद भोजनासाठी साईभक्तांना जास्त वेळ प्रतिक्षा करावी लागत असे. साईभक्तांची अडचण विचारात घेऊन मा.व्यवस्थापन समितीने सुमारे ५००० बैठक क्षमतेची भव्य अशी श्री साई प्रसादालय इमारत बांधलेली आहे. या प्रसादालयाचे किचनमध्ये अत्याधुनिक मशिनरीचा वापर करणेत आलेला आहे. तसेच जुन्या प्रसादालयामध्ये येणाऱ्या अडचणींचा विचार करुन सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

नविन श्री साई प्रसादालय इमारतीमध्ये दि.०८.०१.२००९ रोजी प्रत्यक्ष प्रसाद भोजन व्यवस्था सुरु केलेली असून त्यास साईभक्तांचा उत्स्फुर्तपणे प्रचंड प्रतिसाद मिळालेला आहे.

मंदिर परिसरातील याआधीचे प्रसादालयाचे क्षेत्रफळ अंदाजे ४५,००० स्क्वे.फूट होते त्यामध्ये १००० बैठक व्यवस्थेचा भोजन हॉल, किचन, उपभांडार, कार्यालय, व्ही.आय.पी. भोजन कक्ष इ.चा समावेश होता. या प्रसादालयामध्ये साईभक्तांना प्रसाद भोजन सेवा पुरविणेसाठी ३८३ कर्मचारी आणि साईबाबा भक्तनिवासस्थान व धर्मशाळा स्वयंसेवी भोजन व्यवस्थेकामी ५०+५०= १०० असे एकूण ४८३ कर्मचारी प्रसादालय विभागाकडे आहेत. नविन श्री साई प्रसादालयाचे क्षेत्रफळ सुमारे १,७१,००० स्क्वे.फूट असून मंदिर परिसरातील प्रसादालयाचे क्षेत्रफळापेक्षा ते ४ पट मोठे आहे. नवीन श्री साई प्रसादालयामध्ये सुमारे ५००० क्षमतेची बैठक व्यवस्था करणेत आलेली असून जुन्या प्रसादालयापेक्षा ५ पट क्षमता वाढलेली आहे. श्री साई प्रसादालयाचे एकूण क्षेत्रफळ व बैठक व्यवस्थेचा विचार करता जुन्या प्रसादालयापेक्षा ५ पट म्हणजे जवळपास २४१५ एवढे कर्मचारी लागणार आहेत.

नवीन श्री साई प्रसादालयासाठी सर्व बाबींचा विचार करुन आवश्यक कर्मचारी संख्येचा आकृतीबंध तयर करण्यात आलेला आहे. त्यानुसार एकूण कर्मचारी १९५१ लागणार आहेत. सदर आकृतीबंधाची प्रत अवलोकनार्थ सोबत सादर केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| आकृतीबंधानुसार संख्या | = | १९५१ |
| सध्या विभागाकडे असलेले कर्मचारी | = | ४८३ |
| आऊट सोर्सिंग हाऊस किपींग | = | ७२ |
| सुरक्षा गार्ड (सुरक्षा विभागाने तरतुद केलेले) | = | ४७ |
| एकूण | = | ६०२ |

आकृतीबंधानुसार आवश्यक एकूण कर्मचारी- उपलब्ध कर्मचारी= आवश्यक असलेले जादा कर्मचारी

१९५१ - ६०२ = १३४९

सध्या साईबाबा भक्तनिवासस्थान व धर्मशाळा कॅन्टीनमध्ये साईभक्तांना स्वयंसेवी भोजन व्यवस्था पुरविणेत येत आहे. मात्र त्याकामी लागणारे भोजन पदार्थ नवीन श्री साई प्रसादालयातच तयार करणेत येत आहेत व ते भक्तनिवासस्थान व धर्मशाळा विभागाचे कॅन्टीनमध्ये स्वयंसेवी पध्दतीने (प्रसाद भोजन) वितरीत करणेकामी ५०+५० = १०० कर्मचारी घेतलेले आहेत.

साईबाबा भक्तनिवासस्थान कॅन्टीनमध्ये दररोज सरासरी ५००० साईभक्त व धर्मशाळा कॅन्टीनमध्ये दररोज सरासरी २,५०० साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेतात. याशिवाय धर्मशाळेकडील द्वारावती इमारत सुरु झाल्यानंतर धर्मशाळा कॅन्टीन मध्येही दररोज सरासरी ५००० प्रसाद भोजनाचा लाभ घेण्याची शक्यता आहे. त्यामुळे साईभक्तांना साईबाबा भक्तनिवासस्थान व धर्मशाळा कॅन्टीनमध्ये गरम व ताजे पदार्थ मिळावेत म्हणून तेथेही प्रसाद भोजन पदार्थ तयार करण्याची प्रक्रिया केली तर साईभक्तांचे सेवा/ सुविधेत वाढ होईल. मात्र त्याकामी कर्मचारी आकृतीबंधामध्ये दर्शविल्याप्रमाणे कर्मचारी घेणे आवश्यक राहील.

नवीन श्री साई प्रसादालय इमारतीत क्षेत्रफळ १,७१,००० स्क्वे. फूट असून जुन्या प्रसादालयाचे आकारापेक्षा ४ पट मोठे आहे व बैठक व्यवस्था ५ पट वाढलेली आहे. नवीन श्री साई प्रसादालय पुर्ण क्षमतेने चालविल्यास तसेच साईबाबा भक्तनिवासस्थान व धर्मशाळा येथे साईभक्तांसाठी प्रसाद भोजन पदार्थ स्वतंत्रपणे तयार करुन वितरीत करणेचे काम सुरु केल्यास सध्याचे कर्मचाऱ्यांशिवाय आणखी १३४९ कर्मचारी घेणे आवश्यक आहे.

जर साईबाबा भक्तनिवासस्थान व धर्मशाळा येथील कॅन्टीनमधील प्रसाद भोजन व्यवस्था बंद करुन फक्त नवीन श्री साई प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन व्यवस्था पुर्ण क्षमतेने चालू ठेवायची झाल्यास संध्याचे कर्मचाऱ्यांशिवाय खालीलप्रमाणे एकूण कर्मचारी घेणे आवश्यक असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| | |
|---|---|
| साईबाबा भक्तनिवासस्थान करीता कर्मचारी | १०८ |
| धर्मशाळा करीता कर्मचारी | +१०४ |
| | २१२ |
| + रजा/ सुट्टया सोडविणारे | + ७१ |
| एकूण | २८३ |
| एकूण जादा आवश्यक असलेले कर्मचारी | १३४९ |
| वजा- साईबाबा भ.नि.+ धर्मशाळा कर्मचारी | - २८३ |
| | १०६६ |

यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन प्रसादालयात होणारी साईभक्तांची प्रसाद भोजन घेण्यासाठी होणारी गर्दी विचारात घेता सध्या बॉयलर अंटेडंट,आर.ओ.प्लॅन्ट ऑपरेटर,एल.पी.जी.गॅस प्लॅन्ट ऑपरेटर इ. ११ तांत्रिक पदाचे व इतर ३३९ असे एकूण ३५० पर्यंत आवश्यक रोजंदारी/कंत्राटी कर्मचारी ठेकेदारामार्फत आवश्यकतेनुसार घेण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा विषय नं.३१** **सन २००९-१० प्रसादालय व कॅन्टीन वार्षिक किराणा माल खरेदी निविदा उघडणे व नमुने निवडणे.**

**निर्णय क्र.२९९** सन २००९-१० मध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल वार्षिक दराने खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३.०१.२००९ निर्णय क्र.७१ नुसार तत्वत: मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.०५-०७.०२.२००९ चे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन दि.०९.०२.२००९ ते दि.१८.०२.२००९ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.२०.०२.२००९ अशी निविदा स्विकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली होती.

वरीलप्रमाणे निविदा २ लिफाफा पध्दतीने मागविणेत आलेल्या असून क्र.०१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.०२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी. अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची तसेच स्वतंत्र पॅकिंगमध्ये नमुन्यांची मागणी केलेली आहे. तरी दोन्ही निविदांचे लिफाफे आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले. निवडलेल्या नमुनाधारकांना पुढील सभेत चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत येईल. दरम्यानचे काळात निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी करणेत येईल. मागणीनुसार बयाणा रक्कम तसेच कागदपत्रे नसल्यास त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत

आमंत्रित करण्यात येणार नाही. असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.त्यानुसार प्राप्त झालेल्या खालील निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१ | धरम एंटरप्रायजेस,नाशिक |
| ०२. | शुभम इंडस्ट्रील, इंदौर |
| ०३. | हाय टेक वेंडींग, नाशिक |
| ०४. | धनलक्ष्मी ट्रेडिंग कंपनी,अहमदनगर |
| ०५. | नेहरुनगर महिला बचत गट, श्रीरामपूर |
| ०६. | गुरुकृपा सेल्स, कोपरगांव |
| ०७. | एम.एम.एंटरप्राईजेस, वाशी |
| ०८. | गोदावरी खोरे नामदेवरावजी पराजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ लिमीटेड, कोपरगाव |
| ०९. | सरस प्लॅस्टिक्स, अहमदनगर |
| १०. | गुप्ता ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| ११. | राणी मिनरल वॉटर प्रा.लि. कात्रज,पुणे |
| १२. | डि.जे.ॲण्ड सन्स,पुणे. |
| १३. | सुरज सेल्स कार्पोरेशन, नाशिकरोड |
| १४. | जयंत ट्रेडिंग कपनी, जळगांव |
| १५. | सिताराम ट्रेडिंग कपनी, जळगांव |
| १६. | के.रामजी ॲण्ड कंपनी, नांदेड |
| १७. | श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीव्युटर्स, तिसगाव |
| १८. | सुरेश पुनमचंद बागमार जनरल मर्चंट, पुणे |
| १९. | संगमनेर तालुका सह.दूध उत्पा. व प्रकिया संघ मर्या.,अमृतनगर ता. संगमनेर |
| २०. | पुखराज रामनिवास, जळगांव |
| २१. | संतोष ट्रेडिंग कंपनी,जळगांव |
| २२. | अर्योदेय प्लॅस्टिक्स इंडिस्ट्रीज,कोल्हापूर |
| २३. | पवन पॅकेजिंग, कोल्हापूर |
| २४. | ओमसाई फ्लेक्स पॅक, शिरोली-पुणे |
| २५. | अग्रवाल एजन्सीज, साकुरी |
| २६. | चैतन्य नीर जल प्रायव्हेट लिमीटेड, औरंगाबाद |
| २७. | संदिप ट्रेडिंग कंपनी, नांदेड |
| २८. | कैलाश ट्रेडिंग कंपनी, नांदेड |
| २९. | संगमनेर तालुका ॲग्रिकल्चर प्रोडयुस प्रोसेसिंग मार्केटींग को-ऑप सोसा. लि., संगमनेर |
| ३०. | मयुरी ट्रेडिंग कंपनी,नांदेड |
| ३१. | दगडुराम पिरचंद एजन्सीज, श्रीरामपूर |
| ३२. | श्री गणेश ड्राय फ्रुटस्, पुणे |
| ३३. | सिध्दार्थ कंटेनर्स, श्रीरामपूर |
| ३४. | स्वस्तिक ट्रेडर्स, माधवनगर |
| ३५. | एस.के.ऑईल इंडस्ट्रीज, जळगाव |
| ३६. | श्रीजी कार्पोरेशन, जळगांव |
| ३७. | जयहिंद किराणा स्टोअर्स,नाशिकरोड |
| ३८. | राहुल एंटरप्रायजेस,नाशिक |
| ३९. | राजेश फुड प्रॉडक्टस, अहमदनगर |
| ४०. | कुणाल टी सेंटर, शिरडी |
| ४१. | रेखी प्रॉडक्टस प्रायव्हेट लिमीटेड, नाशिक |
| ४२. | बाफणा बाजार, नाशिक |
| ४३. | रामनाथ जगन्नाथ आणि कंपनी, नाशिकरोड |
| ४४. | रेखा डेअरी इंडस्ट्रीज,इंदोर |
| ४५. | हिरालाल चुनिलाल भराडीया ॲण्ड कंपनी,नांदेड |
| ४६. | मार्सन (इंडिया) इंडस्ट्रीज,मुंबई |
| ४७. | शांती प्लॅस्टीक्स, मुंबई |
| ४८. | महालक्ष्मी महिला सहकारी ग्राहक संस्था लि., दहीवाडी, ता.कर्जत |
| ४९. | सोनदुर्ग सन्स, वाशी |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी सादर केलेले प्रसादालय व कँटीन मालाचे नमूने उपसमितीचे सभेत निवडावेत व निवडण्यात आलेल्या नमूनाधारक निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपूढे बोलविण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२ लिंग्वा फोन भाषा/प्रयोगशाळा (Language Lab) बाबत.**

**निर्णय क्र.३००** श्री साईबाबा संस्थान शैक्षणिक संकुलातील श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ज्यु के.जी. ते इयत्ता १० पर्यन्तच्या विद्यार्थ्यांना भाषा विषयक ज्ञा नाचे विस्तृत माहिती व मार्गदर्शन मिळणेकामी लोटस लर्निंग प्रा.लि.मुंबई यांनी लिंग्वाफोन भाषा प्रयोगशाळा (Language Lab.) चा प्रस्ताव दिलेला असून या भाषा प्रयोग शाळेच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना व्याकरण व तत्सम विषासंबधी विविधी अंगी माहिती मिळून त्यांच्या ज्ञानात भर पडेल असे वाटते सध्या शाळेकडे २० अद्ययावत संगणक उपलब्ध असलेली प्रयोगशाळा असून सदर संगणकावरच लिंग्वाफोन भाषा प्रयोगशाळा (स्वतंत्र सॉफ्टवेअर) सुरु करता येईल या लिंग्वाफोन प्रयोगशाळेसाठी खालीलप्रमाणे सॉफ्टवेअरचा खर्च येईल.

| अ.नं. | उपलब्ध संगणक | सॉफ्टवेअर खर्च प्रत्येकी | एकूण खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | २० संगणक | १५,५८०.०० | ३,११,६००.०० |
| ०२ | प्रयोगशाळा तयार करणे व संबंधित शिक्षकांना प्रशिक्षण | -- | ३०,०००.०० |
| | | एकूण खर्च | ३,४१,६००.०० |

सदर लिंग्वाफोन आय.टी विभागाचे मार्गदर्शनाखाली खरेदी विभागामार्फत लिंग्वाफोन सॉफ्टवेअर व साहित्य खरेदी करुन लॅब तयार करुन घेत येईल. या लिंग्वाफोन लॅबसाठी अंदाजे एकूण रुपये ३,४१,६००.०० इतका खर्च अपेक्षित आहे तसेच १० सॉफ्टवेअरवर एक या प्रमाणे २० सॉफ्टवेअरवर दोन सॉफ्टवेअर कंपनी मोफत देण्यास तयार असून त्यांना याकामी ५० टक्के अॅडव्हान्स देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्राचार्य,इ.मि.स्कूल)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३३** **बिहार राज्यातील पुरग्रस्तांसाठी आर्थिक मदत देणेसाठी काढलेल्या डिमांड ड्राफ्ट बाबत**

**निर्णय क्र.३०१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३४** **श्री आसाराम बापू यांचा सत्संग कार्यक्रम श्रीसाईबाबा संस्थानमार्फत आयोजित करणेबाबत श्री अनंत कुलकर्णी, सत्संग आयोजन समिती,शिर्डी, यांचे पत्र**

**निर्णय क्र.३०२** श्री.अनंत कुलकर्णी,सत्संग आयोजन समिती शिर्डी, ता.राहाता यांनी दिनांक २६.०२.२००९ चे पत्रान्वये कळविले आहे की, श्री आसाराम बापु यांचा सत्संग कार्यक्रम शिर्डी येथे होणेसाठी आम्ही २-३ वर्षापासून पाठपुरावा करीत होतो. श्रीसाईबाबा संस्थानने दिनांक ४.०२.२००६ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत रुपये ११ लाख खर्चास मान्यता दिलेली आहे तसे आम्हाला संस्थानने दिनांक ५.०३.२००६ चे पत्रान्वये कळविले होते. तसेच आताही मा.अध्यक्ष श्री.ससाणे साहेब यांनी विज,पाणी,जागा,उपलब्ध करुन देणेबद्दल दिनांक ६.२.२००९ रोजी पत्र दिलेले आहे. महाशिवरात्री निमित्त नाशिक येथे दिनांक २० ते २३ फेब्रुवारी, २००९ रोजी सत्संग होता त्यावेळी श्री आसाराम बापूजींनी शिर्डी येथे सत्संग कार्यक्रम करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती.

तरी श्रीसाईबाबा संस्थान मार्फत आपण पुढाकार घ्यावा व कार्यक्रमाच्या आयोजनाची चर्चा करण्यासाठी संस्थानचा प्रतिनिधी सत्संग आयोजन समितीबरोबर श्री आसाराम बापुजींकडक पाठविण्याची विनंती केलेली आहे.

यापूर्वी श्री आसाराम बापु सेवा समिती व साधक परिवार यांना दिनाक २९.१२.२००५ चे पत्रान्वये कार्यक्रमास एकूण खर्च रुपये १५ लाख येणार असून साधक परिवार ४ ते ५ लाख योगदान देणार आहे, असे कळविलेले होते. सदरच्या प्रस्तावावर दिनांक ४.०२.२००६ रोजीचे व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.८४ अन्वये रुपये १५ लाख खर्चास मान्यता देण्यात आलेली होती. तसेच दिनांक ५.०३.२००६ चे पत्रान्वये संबंधितांना कळविले होते. तथापि सदरच्या समितीला कार्यक्रमाची तारीख मिळालेली नसल्यामुळे कार्यक्रम झ ाालेला नाही.

आता दिनांक ६.०२.२००९ चे पत्रान्वये नविन प्रसादालयाशेजारी शेती महामंडळाची २० एकर जागा उपलब्ध करुन देऊ असे पत्र दिलेले आहे. सदरच्या पत्रात इतर सुविधा अगर इतर खर्चाबाबत उल्लेख केलेला नाही. सत्संग मिळण्याची संभाव्य तारीख ७,८,९ एप्रिल,२००९ कळविलेली आहे असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता तो तूर्त पुढे ढकलण्यात आला.

(कार्यवाही-प्रशासन शाखा वशी,०५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३५** **श्री रामनवमी उत्सव- २००९ कलाकार निश्चिती होणेबाबत.**

**निर्णय क्र.३०३** सदरहू विषयाबाबत उपसमितीचे सभेत निर्णय घेण्यात यावेत असे ठरले.(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३६** **ट्रायकलर कन्सल्टंट यांचे बीलाचे रकमेवरील सेवा कराबाबत**

**निर्णय क्र.३०४** व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २२.०९.२००९ चे सभेतील निर्णय क्र.७७२ अन्वये समाधी मंदीर व परिसराचे सुरक्षा व्यवस्थेकरिता सुरक्षा कन्सल्टंट म्हणून मे.ट्रायकलर कन्सल्टंट प्रा.लि.,मुंबई यांची नेमणूक करण्यात

आलेली आहे. याकामी त्यांना प्रोफेशनल फ़ी म्हणून रुपये ३,५०,०००/- मात्र देण्याचे ठरलेले आहे. मात्र उपरोक्त ठरावामध्ये सेवाकर तसेच शिक्षण कर याबाबत उल्लेख केलेला नाही.

वरील द्यावयाची रक्कम रुपये ३,५०,०००/- या रकमेवर असलेला सर्व्हिस टॅक्स १२ % एज्युकेशन सेस ३ % याप्रमाणे द्यावयाच्या सेवा कराबाबत मे.ट्रायकलर कन्सल्टंट यांनी त्यांचे बिलाद्वारे मागणी केलेली आहे.

तरी शासन नियमाप्रमाणे मे.ट्रायकलर कन्सल्टंट,मुंबई यांचे ठरलेल्या एकूण बीलाचे रकमेवर सर्व्हीस टॅक्स,एज्युकेशन सेस इत्यादि सेवा कर त्यांना देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-संरक्षण विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३७** **मानद वैद्यकीय अधिकारी, स्पीच ॲण्ड ऑडिओलॉजिस्ट नेमणूकीबाबत.**
**निर्णय क्र.३०५** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२४/०५/२००८ रोजीचे सभेतील निर्णयानुसार जा.नं.एसएसएस/वशी-०१/१२९१२/२००८ दि. ०२/०९/२००८ अन्वये डॉ. मोहम्मद अशफाक पटेल पुणे यांची संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयात नाक, कान घसा विभागाकडे मानद "स्पीच ॲण्ड ऑडिओलॉजीस्ट " या पदावर माहे ०१ सप्टेंबर-२००८ पासून महिन्यातून दोन व्हिजीट व प्रति व्हिजीट प्रवास खर्चासहीत एकूण रु.२५००/- एकत्रित मानधनावर नेमणूक देण्यात आलेली होती.

वैद्यकिय अधिक्षीका श्री साईनाथ रुग्णालय यांनी दि.१७/०२/२००९ रोजी टिपणी सादर करुन टिपणी मध्ये उपरोक्त प्रमाणे नेमणूक करण्यात आलेले मानद "स्पीच ॲण्ड ऑडिओलॉजीस्ट " यांनी श्री साईनाथ रुग्णालयाकडे माहे नोव्हेंबर-२००८ पासून व्हिजीट देणे बंद केलेले आहे. डॉ.विशाल गडवीर, औरंगाबाद यांनी दि.३१/०१/२००९ रोजीच्या अर्जाने श्री साईनाथ रुग्णालयाकडे मानद "स्पीच ॲण्ड ऑडिओलॉजीस्ट " या पदावर सेवा देण्यास इच्छा दर्शविलेली आहे. संस्थान रुग्णालयाचे डॉ. कुलकर्णी वैद्यकिय अधिकारी (नाक कान घसा तज्ञ) यांनी श्री साईनाथ रुग्णालयात "स्पीच ॲण्ड ऑडिओलॉजीस्ट " यांची आवश्यकता असून डॉ.विशाल गडवीर, औरंगाबाद यांना महिन्यातून दोन वेळा व्हिजीट व प्रति व्हिजीट रु.२५००/- एकत्रित मानधनावर नियुक्ती देण्यात यावी. असे अभिप्राय दिलेले आहेत.

डॉ. कुलकर्णी यांचे अभिप्राय विचारात घेऊन डॉ.विशाल गडवीर,औरंगाबाद यांना श्री साईनाथ रुग्णालयात नाक कान घसा या विभागाकडे मानद "स्पीच ॲण्ड ऑडिओलॉजीस्ट " या पदावर महिन्यातून दोन व्हिजीट व प्रवास खर्चासहीत प्रति व्हिजीट रु.२५००/- एकत्रित मानधनावर नेमणूक देण्यास हरकत नाही असे कळविले आहे.

वैद्यकिय अधिक्षीका यांची टिपणी व वैद्यकिय अधिकारी (नाक कान घसा तज्ञ ) यांचे अभिप्राय विचारात घेऊन डॉ.विशाल गडवीर, औरंगाबाद यांना मानद "स्पीच ॲण्ड ऑडिओलॉजीस्ट " या पदावर महिन्यातून दोन व्हिजीट व प्रवास खर्चासहीत प्रति व्हिजीट रु.२५००/- एकत्रित मानधनावर नेमणूक देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.
(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३८** **अतिरिक्त कार्यभार भत्त्या (विशेष वेतना)बाबत**
**निर्णय क्र.३०६** सदरहू विषयावरील चर्चा पूढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३९** **श्री पी.टी.जोशी,प्रशासकीय अधिकारी या पदावर सेवानिवृत्तीनंतर मुदतवाढ देणेबाबतचा अर्ज**
**निर्णय क्र.३०७** **अ)** संस्थानचे ध्येय धोरणानुसार विहीत वयोमान (वयाची ६० वर्षे) पुर्ण झाल्याने श्री प्रकाश तुकारामपंत जोशी,प्रशासकीय अधिकारी हे दि.३०/०४/२००९ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. तसा आदेश उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

तथापि त्यांनी दिनांक नसलेला अर्ज सादर करुन त्यात," मी प्रशासकीय अधिकारी या पदावर दि.०१/०५/१९९७ पासून सेवेत असून आता संस्थानमधील सेवाकाळ फक्त ३०/०४/२००९ पर्यंत असलेने मी लवकरच संस्थान सेवेतून निवृत्त होत असून अजून मुलांचे पुढील शिक्षण होणे बाकी असल्याने मला सेवानिवृत्तीनंतर नोकरीची नितांत गरज आहे.तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन मला सेवानिवृत्तीनंतर म्हणजेच मे-२००९ पासून पुढील ०२ किंवा ०३ वर्षे सेवेची संधी प्राप्त करुन द्यावी.तसेच सेवेत असतांना मला माहे एप्रिल २००९ मध्ये मिळणाऱ्या मासिक वेतनाच्या अनुषंगाने वेतन मिळावे अथवा तोपर्यंत ०६ वा वेतन आयोग लागु झालेस त्यानुसार एकत्रित वेतन मिळावे तसेच सेवेत असतांना ज्या इतर अनुषंगीक सुविधा मिळत होत्या त्या सर्व सुविधा आहे त्याच पध्दतीने चालू ठेवाव्यात " अशी विनंती केलेली असून सोबत मा.भास्करराव पाटील खतगांवकर, आमदार बिलोली मतदारसंग जिल्हा-नांदेड यांनी मा.अध्यक्ष साहेब यांचे नांवे श्री प्रकाश तुकारामपंत जोशी प्रशासकिय अधिकारी हे नांदेड जिल्हयातील सोनखेड येथील रहिवाशी आहेत व ते साईबाबा संस्थान शिरडी येथे प्रशासकिय अधिकारी म्हणून गेली बारा वर्षापासून सेवेत आहेत ते दि.३०/०४/२००९ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या अगोदर

श्री साईबाबा संस्थान शिरडी येथे कार्यरत श्री एस.के.जगताप प्रशासकिय अधिकारी यांना सेवानिवृत्तीनंतर मुदतवाढ देण्यात आलेली आहे त्याच धर्तीवर श्री जोशी यांना मुदतवाढ देण्यात यावी अशी शिफारस केली असून तसे पत्र दिले आहे.

**ब)** याआधी संस्थान आस्थापनेवरील "श्री ए.आर.शिंदे चौकशी व निवासस्थान विभाग प्रमुख हे सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी तसेच डॉ.पी.एस.देशपांडे,वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांनीही यापूर्वी सेवानिवृत्तीनंतर सेवेत मुदतवाढ मागितली होती. तथापि त्यांची विनंती तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाने अमान्य केली होती.

मात्र दिनांक ३१/०१/२००४ रोजी श्री श्यामसुंदर लक्ष्मण शहाणे स्वागत अधिकारी,हे वयाची ६० वर्ष पुर्ण झाल्याने सेवानिवृत्त झाले होते.ते त्या कालावधीत व्यवस्थापन मंडळाचे विश्वस्त,(कर्मचारी प्रतिनिधी म्हणून) होते.त्यावेळच्या विश्वस्त मंडळाची मुदत दि.३१/०८/२००४ या कालावधी अखेर संपत असल्याने मा.विश्वस्त मंडळाच्या मुदती अखेर पावेतो त्यांना विश्वस्त (त्यांची विश्वस्तपदी "कर्मचारी प्रतिनिधी "म्हणून नेमणूक असल्याने सेवानिवृत्तीनंतर त्यांना विश्वस्त पदावर राहाता आले नसते म्हणून) या पदावर राहाता यावे,या करीता एक खास बाब म्हणून उपरोक्त तारखे अखेर (सात महिने) प्रतिमहा रुपये- ११,०००/- मानधनावर कंत्राटी पध्दतीने स्वागत अधिकारी या पदावर नेमणुक करण्यात आली होती त्यावेळी त्यांचा एकूण मासिक पगार रुपये- ११,२३८/- इतका होता.

तदनंतर माजी प्रशासकीय अधिकारी श्री एस.के.जगताप विहीत वयोमान पुर्ण झाल्याने दि.३०/०६/२००७ रोजी सेवानिवृत्त झाले होते. त्यांनाही मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने एक वर्षे (दि.०३/०७/२००७ पासून पुढे ) कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने प्रशासकीय अधिकारी या पदावर नेमणूक करण्यात आली होती तथापि,श्री जगताप यांनी दि.३०/०४/२००८ पासून दिलेला राजीनामा दिलेला राजीनामा मंजूर करण्यात येऊन त्यांना दि.३०/०४/२००८ रोजी सेवामुक्त करण्यात आलेले आहे.

तसेच श्री. प्रल्हाद गंगाधर शेळके, पाणी पुरवठा प्रमुख हे दि.३१/०३/२००९ रोजी विहीत वयामानानुसार सेवानिवृत्त होत असून मा. आस्थापना उपसमितीचे दि.१७/०१/२००९ रोजीचे सभेत निर्णय होऊन त्यांना ०६ महिने मुदतवाढ देणेत आलेली आहे.

**क)** यापूर्वी रिक्त झालेल्या प्रशासकिय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळणेकामी संस्थान सेवेत असलेले सर्वश्री. भाऊसाहेब दाजीबा साबळे, अधिक्षक, प्रभाकर भिकोबा बारावके अधिक्षक, सुभाष नारायण गर्कल,विधी अधिकारी, सुभाष नारायण चित्रे,विभाग प्रमुख, अशोक मुरलीधर काळे, लेखाधिकारी, रामराव रंभाजी शेळके, अधिक्षक, प्रकाश रा. रत्नपारखी यांनी अर्ज केले होते.

त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/१०/२००८ रोजीच्या सभेत निर्णय होऊन श्री. भाऊसाहेब दाजीबा साबळे अधिक्षक(आस्थापना) यांची नेमणूक करण्यात आलेली असून ते सदर पदावर दि.२४/१०/२००८ पासून कामावर हजर झालेले आहेत

**ड)** त्याच वेळी श्री. प्रभाकर भिकोबा बोरावके अधिक्षक यांनी मा.हायकोर्ट मुंबई , बेंच औरंगाबाद येथे सदर पदावर पदोन्नती नेमणूक मिळणेकामी ४५७२/२००७ अन्वये अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर मा.हायकोर्ट मुंबई बेंच औरंगाबाद यांनी

1. in view of the averments made in paragraph 6 of the counter affidavait, Writ Petition is disposed of. Respondents would consider case of the petitioner in accordance with rules and bye laws.
2. We make it clear that this direction would, no way, be treated as precendence for the purposes that writ petition under article 226 of the constitution of India would be maintainable. No order as to costs. अशी ऑर्डर केली आहे.

सध्याचे "श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिरडी अधिनियम २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ मधील कलम नं.१३ (४) अन्वये ज्या अधिकाऱ्यांला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही ", अशी तरतूद आहे.

उपरोक्त श्री. प्र.तु.जोशी प्रशासकिय अधिकारी यांची मुदतवाढ मिळणेबाबतची विनंती, मा.श्री. भास्करराव खतगांवकर,आमदार बिलोली मतदार संघ, जिल्हा नांदेड यांची शिफारस व उपरोक्त नमूद केलेली परिस्थीती विचारात घेऊन श्री जोशी,प्रशासकीय अधिकारी यांचे मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.प्र.तु.जोशी,प्रशासकीय अधिकारी यांना सेवानिवृत्ती नंतर १ वर्ष कालावधीसाठी ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी या पदावर रुपये २१,०००/- एकत्रित मानधनावर कंत्राटी पद्धतीने नेमणूक देण्यात यावी. मा.कार्यकारी अधिकारी यांनी त्यांना कामे नेमून द्यावीत असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४० हॉस्पिटलकडील वैद्यकीय अधिकारी/आरएमओ नेमणूकीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३०८** संस्थानचे श्रीसाईबाबा व श्री साईनाथ हॉस्पीटल वैद्यकिय अधिकारी तसेच आर.एम.ओ.या पदावर नोकरी मिळणेबाबत अर्ज केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती मा.विश्वस्त तसचे वैद्यकिय संचालक व वैद्यकिय उपसंचालक श्रीसाईबाबा हॉस्पीटल यांनी मुलाखती घेण्यात येऊन पात्र उमेदवारांना खाली दर्शविल्याप्रमाणे नेमणूक पत्र देण्यात आलेले आहेत.

| **अ.नं.** | **वैद्यकीय अधिकारी नांव** | **शैक्षणिक पात्रता** | **नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव** | **दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन /वेतन** |
|---|---|---|---|---|
| ०१. | डॉ.मकरंद एस.फुंलझेले, ठाणे | एम.एस. जनरल सर्जरी | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२१२/२००९ दि.०३/०१/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | जनरल सर्जन एकत्रित वेतन प्रतिमहा रु. ३०,०००/- |
| ०२. | डॉ. राहुल डी. राऊत ता. श्रीरामपूर जिल्हा-अ.नगर | डी.एम.आर.ई | जा.नं.एसएसएस/वशी-०१/३४६/२००९ दि.०६/०१/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | ज्यु. रेडीओलॉजिस्ट एकत्रित वेतन प्रतिमहा रु.२५,०००/- |
| ०३. | डॉ. काळे सारिका कृष्णराव ता. संगमनेर जिल्हा-अ.नगर | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/४४५/२००९ दि.०९/०१/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१८,०००/- |
| ०४. | डॉ. गौरव वर्मा रोहटाक हरियाना | डी.एम कार्डीओलॉजी | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३९७/२००९ दि.३१/०१/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | कार्डीओलॉजिस्ट एकत्रित वेतन प्रतिमहा रु.३०,०००/- |
| ०५ | डॉ. सारंग डी. खोचीकर शिरडी ता.राहाता | एम.बी..बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१३९८/२००९ दि.३१/०१/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |
| ०६. | डॉ.अमोल बी. सरदार ता. कोपरगांव | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१७६७/२००९ दि.०९/०२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |
| ०७. | डॉ.आभा जाजू मु.पो. कोळपेवाडी ,कोपरगांव जि.अहमदनगर | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१७९२/२००९ दि.१०/०२/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१८,०००/- |
| ०८. | डॉ. शुभा अे मेहरोत्रा (वेरमा) रोहटाक हरियांना | एम.डी. मेडीसीन | जा.नं.एसएसएस/वशी-०१/१८४३/२००९ दि.१२/०२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | फिजीशियन एकत्रित वेतन प्रतिमहा रु.३०,०००/- |
| ०९ | डॉ. अमोल डी. भालेराव ता. राहाता जिल्हा-अहमदनगर | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२६४६/२००९ दि.०६/०२/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |
| १० | डॉ. योगिता आर.सोनवणे नाशिक | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२६४६/२००९ दि.०६/०२/२००९ श्री साईनाथ हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१८,०००/- |
| ११. | डॉ. किर्ती अे कुंदनवाल ता. श्रीरामपूर जिल्हा-अ.नगर | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२६५६/२००९ दि.०६/०२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |
| १२. | डॉ.अपेक्षा एम. घुले ता. संगमनेर जिल्हा-अ.नगर | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२६५७/२००९ दि.०६/०२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |
| १३. | डॉ. पुनम व्ही.गायकवाड नाशिक | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२६५८/२००९ दि.०६/०२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |
| १४. | डॉ. सचिन बी. राठोड ता.पाथर्डी जिल्हा अ.नगर | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२६५९/२००९ दि.०६/०२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |
| १५. | डॉ. योगिता एन. कुटे नाशिक | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२६६०/२००९ दि.०६/०२/२००९ श्री साईबाबा हॉस्पीटल, | आर.एम.ओ. एकत्रित वेतन प्रतिमहा रु.१७,०००/- |

तरी उपरोक्त ०१ ते १५ वरील उमेदवारांच्या नांवासमोर दर्शविल्याप्रमाणे वैद्यकिय अधिकारी/आर.एम.ओ या पदावर करण्यात आलेल्या असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१ श्री साई आश्रम प्रकल्पाचे बांधकाम ठेकेदार मे.पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि,नवी दिल्ली यांना वीज जोडणीसाठी आलेला खर्च आदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.३०९** **(अ)** संस्थानचे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १०७ पै, १०८ पै व १०९ पै मध्ये तसेच मौजे निमगांव को-हाळे येथील गट नंबर १७२ पै मध्ये शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेतर्फे देणगी स्वरुपात साईआश्रम प्रकल्प भाग १ व भाग २ चे बांधकाम सुरु आहे. सदर प्रकल्पाचे बांधकाम ठेकेदार मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली यांना बांधकामासाठी वीज पुरवठयाची आवश्यकता होती. त्यासाठी मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली यांनी त्यांचेकडील दिनांक ०३ जानेवारी, २००८ रोजीचे पत्रान्वये संस्थानतर्फे वीजपुरवठयाची व्यवस्था करणेची विनंती केली होती. याबाबत मा. कार्यकारी अधिकारी व मा. श्री. के.व्ही. रमणी, कार्यकारी विश्वस्त, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे दरम्यान झालेल्या चर्चेत, ट्रस्टतर्फे मोठया स्वरुपाचा

प्रकल्प देणगीदाखल करण्यात येत आहे, तसेच दिनांक २८ जुलै, २००८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रमांक ६४३ अन्वये नियोजित साईआश्रम प्रकल्पाचे परिसर विकासाचे काम संस्थानतर्फे करण्यात येणार आहे. त्यामुळे वीजपुरवठा लवकर उपलब्ध होण्याचे दृष्टीने मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली यांना वीज जोडणी देणेबाबत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शिर्डी यांना संस्थानतर्फे पत्र देण्यांत यावे असे ठरले. त्यानुसार, मा. कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, शिर्डी यांना इकडील दिनांक ०४ जानेवारी, २००८ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आले. तसेच सदर वीज जोडणीसाठी मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली यांना येणारा वीज जोडणीचा खर्च, वीज जोडणी संस्थानचे नावावर करुन मिळाल्यावर संस्थानतर्फे आदा करण्यात यावा, असे ठरले. त्यानुसार, प्राथमिक वीज जोडणीचा खर्च मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली यांनी केला असून, सदरहू प्रकल्पाच्या निविदेतील अटी शर्तीनुसार सदरील खर्च संस्थानने त्यांना परत द्यावयाचा आहे.

**(ब)** सध्या साईआश्रम भाग १ (शिर्डी) व भाग २ (निमगांव को-हाळे) या दोन्ही ठिकाणी वीज जोडणी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, शिर्डी यांनी मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स, नवि दिल्ली यांचे नांवावर दिलेला आहे. सदरहू वीज जोडणी संस्थानचे नांवावर करुन घेण्याची कार्यवाही विदयुत विभागामार्फत सुरु आहे. विदयुत विभागाचे दिनांक १० डिसेंबर, २००८ रोजीचे टिपणीनुसार, मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स, नवि दिल्ली यांना यांना सदरहू वीज जोडणीपोटी एकूण रक्कम रुपये १७,४९,०६३/- मात्र इतका खर्च आलेला आहे. सदरहू वीज जोडणी संस्थानचे नांवावर होईपर्यन्त, मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली यांना रक्कम रुपये १२,००,०००/- मात्र इतकी आगाऊ रक्कम विद्युत विभागामार्फत आदा करण्यात आलेली आहे.

**(क)** उपरोक्त विवेचनास अनुसरुन, साईआश्रम प्रकल्प भाग १ व भाग २ येथे वेगवेगळी वीज जोडणी घेणेकामी मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली यांना आलेला एकूण खर्च रक्कम रुपये १७,४९,०६३/- मात्र (अक्षरी रक्कम रुपये सतरा लाख एकोणपन्नास हजार त्रेसष्ट मात्र), सदरहू प्रकल्पाच्या निविदेतील अटी शर्तीनुसार बांधकाम ठेकेदारास आदा करणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. कार्यकारी अधिकारी सादर केला होता.

सदरहू प्रस्तावावर चर्चा होऊन, मे. पार्श्वनाथ डेव्हलपर्स लि., नवि दिल्ली यांना साईआश्रम भाग १ (शिर्डी) व भाग २ (निमगांव को-हाळे) या ठिकाणी विद्युत जोडणी घेणेकामी आलेला खर्च रक्कम रुपये १७,४९,०६३/- मात्र आदा करणेत यावेत तसेच सदरहू बांधकाम ठेकेदार यांचे नांवे असलेल्या विदयुत जोडण्या संस्थानचे नांवे करुन घेणेबाबत कार्यवाही करण्यात यावी, याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४२** **संस्थान प्रकाशित पुस्तक/फोटो छपाईचे कामाचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.**
**निर्णय क्र.३१०** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१०.२००८ चे सभेतील निर्णय क्र.८१२ नुसार संस्थान प्रकाशित पुस्तके/फोटो छपाई करणे, विक्री किंमती ठरविणे वगैरे रुटीनच्या कामाची कार्यालयीन पद्धती निश्चित करण्यात आली आहे.

त्यानुसार खालील प्रमाणे पुस्तके/फोटो छपाईबाबत दरपत्रक मागवून दरपत्रक उपसमितीचे दि.१७.०१.२००९ चे सभेत उघडून निम्नतम दर असणा-यांना छपाई कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. पुस्तके/फोटो छपाईचे कामास शिफारशीनुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८.०२.२००९ चे सभेत मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | प्रेसधारकाचे नांव | पुस्तके/फोटो तपशिल | छपाई संख्या | निम्नतम दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे. अजय ऑफसेट प्रा.लि., पुणे | १) चिल्ड्रेन्स साईबाबा हिन्दी (विकास मेहता) | १०,००० | ५५.२९ | ५,५२,९००/- |
| | | २) चिल्ड्रेन्स साईबाबा हिन्दी (विकास मेहता) इंग्रजी | १०,००० | ५५.८९ | ५,५८,९००/- |
| ०२ | मे.ब्ल्यू बर्ड इंडिया लि., पुणे | श्री सदगुरु साईनाथ सगुणो. तामिळ | १०,००० | ०९.०५ | ९०,५००/- |
| ०३ | मे कमर्शियल बुक बायडींग वर्क्स, मुंबई | १) मुलांचे साईबाबा- तामिळ | १०,००० | ३.८५ | ३८,५००/- |
| | | २) श्री सदगुरु साईनाथ सगुणो. इंग्रजी (झरीन) | १०,००० | १०.६५ | १,०६,५००/- |
| ०४ | मे. चेरि ऑफसेट प्रिटींग प्रा.लि., सोलापूर | १) श्री साई सतचरित्र हिन्दी | २००००० | २९.२० | ५८,४०,०००/- |
| | | २) श्री साई सतचरित्र इंग्रजी | १५०,००० | २४.४२ | ३६,६३,०००/- |
| | | ३) श्री साईसतचरित्र कन्नड | ५०,००० | २५.३५ | १२,६७,५००/- |
| | | ४) श्री साईसतचरित्र तामिळ | ५०,००० | ३५.६० | १७,८०,०००/- |
| | | ५) मुलांचे साईबाबा मराठी | २०,००० | ३.७५ | ७५,०००/- |
| | | ६) दैनंदिन साईबोध मराठी | १०,००० | ५७.४० | ५,७४,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ७) श्री सदगुरु साईनाथ सगुणो. मराठी आरतीचा हिंदी अनुवाद | १,५०,००० | ६.७८ | १०,१७,०००/- |
| ०५ | श्री साई सिक्युरिटी प्रिंटर्स, बंगलोर | श्री साई समर्थ चरित्र इंग्रजी | १०,००० | ९२.०० | ९,२०,०००/- |
| ०६ | मे. कल्याणी कार्पोरेशन, पुणे | १) श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात १४" X २०" | १००००० | २.८९ | २,८९,०००/- |
| | | २) दगडावर बसलेले बाबा फोटो ४रंगात २०" X २८" | ५०००० | ५.६५ | २,८२,५००/- |
| | | ३) द्वारकामाई ४ रंगात २०" X २८" | ५०००० | ५.६५ | २,८२,५००/- |
| | | ४)द्वारकामाई बाबा फोटो (ओल्ड)४रंगात २०" X २८" | ५०००० | ५.६५ | २,८२,५००/- |
| | | ५) पालखी फोटो ४ रंगात २०" X २८" | ५०००० | ५.६५ | २,८२,५००/- |
| | | ६) श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात २०" X २८" | ५०००० | ५.६५ | २,८२,५००/- |
| | | **एकूण नग** | ९४०,००१ | **एकूण रु.** | १,८१,८५,३००/- |

उपरोक्तप्रमाणे पुस्तके/फोटो छपाई करणेकामी एकूण रक्कम रु.१,८१,८५,३००/- मात्र चे खर्चास कार्यात्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रकाशने विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ४३** **मौजे निमगाव कोऱ्हाळे येथील ग.नं १९८/१९९/२०० मधील नियोजित साई गार्डन बांधकामासाठी मातीपरीक्षण (Soil investigation) करणेकामी आलेले खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.३११** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७/०२/२००८ रोजीचे सभेत आर्किटेक्ट माथुर ॲण्ड काप्रे यांच्या प्रतिनीधी श्रीमती सोनीया काप्रे, नवि दिल्ली यांनी शिर्डी येथे साईभक्तांसाठी साई गार्डनचा रु. ४६.०० कोटीचा प्रस्ताव सादर केला होता त्यास मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त सभेतील निर्णय क्र. २४१ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

आर्किटेक्ट सोनिया काप्रे यांनी प्रस्तावीत साई गार्डनचे बांधकाम करणेकामी अंदाजपत्रक व निविदा मसूदा सादर केला आहे. निविदेसोबत तपशीलवार आर.सी.सी. डिझाईन व आराखडे (स्ट्रक्चरल ड्रॉईंग्ज) सादर करणेकामी सदर जागेत आराखडयानुसार ४ बोअरहोल्सचे मातीपरीक्षण (Soil investigation) करणे गरजेचे असल्याचे आर्किटेक्ट श्रीमती सोनीया काप्रे, नवि दिल्ली यांनी कळविले आहे. उपरोक्त कामी अशाप्रकारचे काम करणाऱ्या खालील ०४ एजन्सीजकडून इकडील जा. नं. १३१८/२००९ दि. २१.०१.२००९ चे पत्रान्वये कोटेशन सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

१. DBM GEOTECHNIC AND CONSTRUCTIONS PVT. LTD., Mumbai
२. OCHRE DRILLERS INDIA PVT. LTD., Thane (W)
३. DUROCRETE ENGINEERING SERVICES PVT.LTD., Pune
४. Pune Institute of Engineering & Technology, Pune

वरिल प्रमाणे सदर जागेचे माती परिक्षण करणेकामी अशा प्रकारचे उपरोक्त नामंकीत एजन्सीकडून कोटेशन / दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यापैकी अ. नं. ०१ व ०२ यांनी याकामी कोटेशन / दरपत्रक सादर केले होते. सदरचे प्राप्त झालेले कोटेशन /दरपत्रक मा. कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष दि. ०७.०२.२००९ रोजी उघडण्यात आले असून निम्नतम दराचे दर सादरकर्ते मे. DBM GEOTECHNIC AND CONSTRUCTIONS PVT. LTD., MUMBAI. यांचे निम्नतम स्वरुपाचे दर असल्याने सदरकामासाठी त्यांना कार्यादेश देणेत आलेला असून सदरचे काम त्यांचेकडून करुन घेण्यात आले असून याकामी रु. ७७,२४०.०० मात्र इतका खर्च आलेला आहे.

तरी वरिल प्रमाणे नियोजीत साईगार्डन तयार करणेसाठी आर्किटेक्ट यांना आवश्यक असणारे माती परिक्षण करुन घेणेकामी आलेले रु. ७७,२४०.०० मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणे बाबतचा विषय मा. कार्यकारी अधिकारी यांनी आजचे सभेपुढे सादर केला होता. त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४४** **उन्हांळी व श्रीरामनवमी उत्सव २००९ निमीत्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मंडप व्यवस्था करणेबाबत...**

**निर्णय क्र.३१२** श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी शनिवार दि. ०२ एप्रिल, २००९ ते दि. ०४ एप्रिल, २००९ अखेर "श्रीं" चा रामनवमी उत्सव संस्थान मार्फत साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये तसेच उन्हाळयाचे सुट्टीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसर, धर्मशाळा परिसर, जुने प्रसादालय परिसर व साईनगर परिसर या सर्व ठिकाणी उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे तसेच तात्पुरत्या स्वरुपाची अतिरिक्त निवास व्यवस्था व्हावी म्हणुन उपरोक्त ठिकाणी तसेच साईभक्तांचे निवास व्यवस्थेकरीता साईनगर मैदानावर व नविन भक्तनिवासस्थान परिसर या ठिकाणी उत्सवाच्या कालावधीत तसेच उन्हाळयाचे दिवस असल्याने साईभक्तांचे उन्हापासून रक्षण होणेकरीता उन्हाळी मंडप दिनांक

२२.०२.२००९ ते दिनांक १५.०६.२००९ अखेर बिछायतीसह मंडप / शामियाना उभारणी करणे कामी येणारे रु. ३०.८१ लक्ष मात्रचे खर्चास व अशा प्रकारचे काम करणारे मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे ०८.०२.२००९ रोजीचे सभेत मान्यता देणेत आलेली आहे.

त्यानूसार खालील प्रमाणे मंडप व्यवस्था करणेकामी अशा प्रकारचे काम करणारे मंडप ठेकेदारांकडून कोटेशन मागविण्यात आले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | कामाचा तपशिल | कालावधी अंदाजे | परिमाण | एकक |
|---|---|---|---|---|
| ०१ | मंदिर व संस्थानचे इतर परिसरात उन्हांळी व उत्सव कापडी मंडप व्यवस्था | तिन महिने | ५४,२२७.०० | चौ. फुट |
| ०२ | उन्हांळी व उत्सव शामियाना मंडप व्यवस्था कनात व बिछायतीसह (जुने प्रसादालय परिसर) | तिन महिने | २९,७२५.०० | चौ. फुट |
| ०३ | उत्सव शामियाना मंडप व्यवस्था कनात व बिछायतीसह (साईनगर, भक्तनिवास ५०० रुम इ. परिसर ) | ०२.०४.२००९ ते ०४.०४.२००९ | ६१,५५०.०० | चौ. फुट |
| ०४ | स्टेज व्यवस्था साईनगर मैदान | ०२.०४.२००९ ते ०४.०४.२००९ | ६००.०० | चौ. फुट |
| ०५ | तात्पुरते बाथरुम व्यवस्था आवश्यक त्या ठिकाणी | ०२.०४.२००९ ते ०४.०४.२००९ | २००.०० | रनिंग फुट |

**ब)** उपरोक्त प्रमाणे मंदिर परिसर व संस्थानच्या परिसरामध्ये उन्हाळी व उत्सव कालावधीमध्ये कापडी / शामियाना मंडप व अनुषंगिक व्यवस्था करण्यासाठी ११ मंडप ठेकेदार यांचेकडून प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन दि. २८.०२.२००९ रोजी मा. व्यवस्थापन समितीचे मा. अध्यक्ष, विश्वस्त व कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले. यावेळेस मंडप निवीदाधारकांशी चर्चा करणेचे वेळेस निवीदेतील अ.क्र. १ ते ५ (समाधी मंदिर दक्षिण / उत्तरबाजू, गुरुस्थान पुर्व / पश्चिम बाजू व सभाकुड, चावडीसमोर या ठिकाणी ) एम. एस. पाईपचे स्ट्रक्चर असलेले पत्रा मंडप टाकणे योग्य राहील असे लक्षात आल्याने निविदा सादरकर्त्यांशी याबाबत चर्चा करून,जे निविदा सादरकर्ते पाईप व पत्र्याचे मंडप देउ शकतील अशा निविदाधारकांकडून दर घेणेत आले. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | मंडप निवीदा सादर कर्त्याचे नांव | मंडप उभारणी तपशिल | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंदिर व संस्थानचे इतर परिसरात उन्हांळी व उत्सव कापडी मंडप व्यवस्था करणे अंदाजे ०३ महिन्यासाठी एकुण ५४,२२७.०० चौ. फुट | | उन्हांळी व उत्सव शामियाना मंडप व्यवस्था कनात व बिछायतीसह करणे अंदाजे ०३ महिन्यासाठी एकुण २९,७२५.०० चौ. फुट | | उत्सव शामियाना मंडप व्यवस्था कनात व बिछायतीसह ०२.०४.२००९ ते ०४.०४.२००९ एकुण ६१,५५०.०० | | स्टेज व्यवस्था ३०'x२०' साईजचे स्टेज, १० x२० साईजमध्ये दोन मेकअप रुम २००० नग खुर्च्या व १०,००० चौ.फुट मॅटीन ०२.०४.२००९ ते ०४.०४.२००९ | | तात्पुरते बाथरुम व्यवस्था०२.०४.२००९ ते ०४.०४.२००९ एकुण २००.०० रनिंग फुट | |
| | | कोटेशन मधिल दर | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर | कोटेशन मधिल दर | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर | कोटेशन मधिल दर | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर | कोटेशन मधिल दर | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर | कोटेशन मधिल दर | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर |
| ०१ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | ०.३८ | ०.३० ०.२८ | ०.४५ | ०.३० | १.७० | १.६० | ४९००० | ४८००० | ३५.०० | ३०.०० |
| ०२ | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | ०.६० | ०.५२ | ०.५५ | ०.३२ | १.५० | १.४० | ५५००० | ५०००० | २५.०० | १५.०० |
| ०३ | सावता मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, राहाता | ०.४५ | ०.२५ | ०.४५ | ०.२५ | १.५० | १.१० | ५५००० | ४१००० | २५.०० | २०.०० |
| ०४ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | ०.६६ | ०.५० | ०.५५ | ०.३५ | १.५० | १.२० | ५१००० | ३९,५०० | २५.०० | १२.०० |
| ०५ | शर्मा मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, वैजापूर | ०.५० | ०.३८ | -- | -- | -- | -- | ४१००० | ४०००० | ३३.३३ | ३०.०० |
| ०६ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ०.५५ | ०.४५ | ०.५० | ०.२२ | १.५५ | ०.८० | ५१००० | ५१००० | २०.०० | १०.०० |
| ०७ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मु. पो. मनमाड | ०.८० | ०.५० | ०.७० | ०.३५ | २.०० | १.४० | ६५००० | ६५००० | ३५.०० | २५.०० |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी | ०.८० | ०.७० | ०.६० | ०.४० | १.८० | १.७० | ५४००० | ५४००० | १६.०० | १६.०० |
| ०९ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव | ०.६० | ०.४५ | ०.५० | ०.३० | १.६० | १.१० | ६१००० | ५५००० | २५.०० | १५.०० |
| १० | कल्यानी टेन्ट हाऊस, मु. पो. नांदुर, | ०.६५ | ०.४० | ०.५५ | ०.३५ | १.६५ | १.०० | ५५००० | ५०००० | २३.३३ | २०.०० |
| ११ | लोकप्रिय डेकोरेटर्स, मु. पो. संक्रापूर | ०.६० | ०.५० | ०.५० | ०.४० | १.५० | १.३० | ९०००० | ७०००० | ४०.०० | ३५.०० |

वरिल प्रमाणे मंदिर परिसरातील उन्हाळी व उत्सव कापडी मंडप व्यवस्थे करीता दर सादरकर्ते मे. कैलास मंडप, अहमदनगर यांचे मंदिर परिसरामध्ये एकुण २१४३७.०० चौ. फुट मंडपाकरीता (एम. एस. पाईपचे स्ट्रक्चर तयार करुन त्यावर लोखंडी कैच्या बसवून छतावर लोखंडी पत्रे टाकणे व आतिल बाजूने जाड सुशोभित कापड लावून मंडप उभारणी करणे.) रु. ०.३० प्र. दि. प्र. चौ. फुट दर मान्य करणेत आले तसेच उर्वरीत कापडी मंडपासाठी भक्कम बांबू गोल्टे वापरुन मंडप उभारणी करणेसाठी मे. सावता मंडप, राहाता यांचे रु. ०.२५ प्र. दि. प्र. चौ. फुट दर निम्नतम आहेत, तसेच उन्हाळी शामियाना मंडपासाठी रु. ०.२२ व उत्सव शामियाना मंडप उभारणीसाठी रु. ०.८० दर मे. बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांचे दर निम्नतम आहे, स्टेज व्यवस्थेसाठी मे. रोशनी मंडप यांना एकत्रित ०३ दिवसासाठी रु. ३९,५००/- मात्र निम्नतम आहेत. व पार्टीशनसाठी मे. बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर यांचे रु. १०.०० प्र. दि. प्र. रनिंग फुट दर निम्नतम स्वरुपाचे आहे.

**क)** उपरोक्त प्रमाणे निवीदासादर कर्त्यांशी झालेल्या चर्चा तथा वाटीघाटी अंती त्यांनी देऊ केलेले दरामध्ये खालील निवीदासादर कर्त्यांचे दर निम्नतम स्वरुपाचे आहेत. करीता सदरची व्यवस्था त्यांचेकडून करुन घेण्यात यावी असे ठरले.

| अ. नं. | कामाचा तपशिल | निमन्तम दर सादरकर्त्यांचे नांव | दर | कालावधी | अंदाजे एकुण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ०१ | मंदिर परिसरात उन्हाळी व उत्सव कापडी मंडप बांधणीचे परिशिष्ट : एम. एस. पाईपचे स्ट्रक्चर तयार करुन त्यावर लोखंडी कैच्या बसवून छतावर लोखंडी पत्रे टाकणे व आतिल बाजूने जाड सुशोभित कापड लावून मंडप उभारणी करणे. मंडप उभारणीचे क्षेत्रफळ : अंदाजे एकुण २१४३७.०० चौ. फुट | कैलास मंडप, अहमदनगर | ०.३० प्र. दि. प्र. चौ. फुट | ८.०३.२००९ ते १५.०६.२००९ एकुण दिवस १०० | ६,४३,११०.०० |
| ०२ | मंदिर परिसरात उन्हाळी व उत्सव कापडी मंडप बांधणीचे परिशिष्ट : बांबू बल्ली वापरुन स्ट्रक्चर तयार करुन आतिल बाजूने जाड ताडपत्री व त्याखालील सुशोभित कापड लावून मंडप उभारणी करणे.<br>मंडप उभारणीचे क्षेत्रफळ :<br>अंदाजे एकुण ३२७९०.०० चौ. फुट | सावता मंडप, राहाता | ०.२५ प्र. दि. प्र. चौ. फुट | ६.०३.२००९ ते १५.०६.२००९ एकुण दिवस १०२ | ८,३६,१४५.०० |
| ०३ | संस्थानचे विवीध परिसरामध्ये उन्हाळी व उत्सव शामियाना मंडप कनात व बिछातीसह उभारणी करणे.<br>मंडप उभारणीचे क्षेत्रफळ :<br>अंदाजे एकुण २९,७२५.०० चौ. फुट | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ०.२२ प्र. दि. प्र. चौ. फुट | ३.०३.२००९ ते १५.०६.२००९ एकुण दिवस १०५ | ६,८६,६४७.५० |
| ०४ | संस्थानचे विवीध परिसरामध्ये उत्सव शामियाना मंडप कनात व बिछातीसह उभारणी करणे.<br>मंडप उभारणीचे क्षेत्रफळ :<br>अंदाजे एकुण ६१,५५०.०० चौ. फुट | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ०.८० प्र. दि. प्र. चौ. फुट | २.०४.२००९ ते ४.०४.२००९ एकुण दिवस ०३ | १,४७,७२०.०० |
| ०५ | स्टेज व्यवस्था साईनगर प्रांगण :- ३०'x२०' साईजचे स्टेज त्यावर भक्कम प्लायवूड टाकून स्टेज तयार करणे १० x२० साईजमध्ये दोन मेकअप रुम तयार करणे २००० नग खुर्च्या व १०,००० चौ.फुट मॅटीन टाकणे | रोशनी मंडप, संक्रापूर | एकत्रित ०३ दिवसासाठी | २.०४.२००९ ते ०४.०४.२००९ एकुण दिवस ०३ | ३९,५००.०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०६ | तात्पुरते बाथरुम व्यवस्था करणेकरीता बाजुने व आतील पार्टीशनकरीता पत्र्याचे १० फुट उंचीचे पार्टीशन करुन कपडा लावणे. एकुण २०० रनिंग फुट | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | १०.०० प्रति र. फुट प्रति दिवस | २.०४.२००९ ते ०४.०४.२००९ एकुण दिवस ०३ | ६,०००.०० |
| | | | | एकुण रुपये... | २३,५९,१२२.५० |

उपरोक्त तक्यात दर्शविल्याप्रमाणे उन्हाळी व श्रीरामनवमी उत्सवासाठी कापडी व शामियाना मंडप उभारणी, कार्यक्रमासाठी स्टेज व इतर व्यवस्था यासाठी रकाना क्र. ०३ मध्ये नमूद केलेल्या निवीदासादरकर्त्यांचे रकाना क्र. ०४ मध्ये दर्शविलेले दर निम्नतम असून, या निम्नतम दराने निवीदेत नमूद केलेली मंडप व स्टेज व्यवस्था करुन घेता येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे निम्नतम दरांच्या निवीदाधारकांकडून मंडप व स्टेज व्यवस्था करुन घेणेस व त्याकामी येणारे अदाजीत रक्कम रु. २३,५९,१२२.५० मात्रचे खर्चास व तसेच संबधीत निम्नतम दरधारकांना देण्यात आलेल्या कार्यादेशांना कार्योत्तर मान्यता मिळणेबाबतचा विषय कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देणेत आली तसेच यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, साईभक्ताचं उन्हापासून संरक्षण व्हावे यासाठी संस्थानचे (जुनी जिल्हा परिषद शाळेचे जागेवर) १६ आर जागेमध्ये, नविन प्रसादालय मुख्य प्रवेशव्दारापासून ते बुकींग काउंटर पर्यंत, लेडींबागेत दर्शनरांगेसाठी इ. ठिकाणी तसेच उत्सवाचे कालावधीत भक्तांची गर्दी लक्षात घेऊन आवश्यकतेप्रमाणे कापडी / शामियाना मंडप व इतर अनुशंगीक व्यवस्था करुन घेण्यात यावी व याकामी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत यावी. तसेच आवश्यकता भासल्यास साईभक्तांचे सोयीसाठी आवश्यक त्या प्रमाणात मंडप आवश्यक त्या कालावधी करीता करुन घेण्यात यावी व त्याकामी सर्वसमावेशक खर्चासही मान्यता देणेत आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४५** **श्रीरामनवमी उत्सव २००९ निमीत्ताने साईभक्तांचे सोयीसाठी मुंबई ते शिर्डी मार्गावर मंडप व्यवस्था करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१३** अ) श्री साईबाबा संस्थान मार्फत सालाबाद प्रमाणे याही वर्षी शनिवार दि. ०२ एप्रिल, २००९ ते दि. ०४ एप्रिल, २००९ अखेर "श्रीं " चा रामनवमी उत्सव संस्थान मार्फत साजरा करण्यात येणार आहे. उत्सवाचे कालावधीमध्ये तसेच उन्हाळयाचे सुट्टीमध्ये साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता असल्यामुळे मंदिर परिसर, नविन भक्तनिवासस्थान (५०० रुम) परिसर, धर्मशाळा परिसर, जुने प्रसादालय परिसर व साईनगर परिसर या सर्व ठिकाणी उन्हापासून साईभक्तांचे संरक्षण व्हावे तसेच तात्पुरत्या स्वरुपाची अतिरिक्त निवास व्यवस्था व्हावी म्हणुन उपरोक्त ठिकाणी तसेच साईभक्तांचे निवास व्यवस्थेकरीता साईनगर मैदानावर व नविन भक्तनिवासस्थान परिसर या ठिकाणी उत्सवाच्या कालावधीत तसेच उन्हाळयाचे दिवस असल्याने साईभक्तांचे उन्हापासून रक्षण होणेकरीता उन्हाळी मंडप उभारणेस तसेच श्रीरामनवमी उत्सव २००९ निमीत्त मुंबई येथून पायी पालखी घेऊन येणारे साईभक्त यांचे सोयीकरीता मुंबई ते शिर्डी मार्गावर विवीध ठिकाणी कापडी / शामियाना मंडप, कनात व बिछातीसह उभारणेकामी येणारे रु. ३०.८१ लक्ष मात्रचे खर्चास व अशा प्रकारचे काम करणारे मंडप ठेकेदार यांचेकडून कोटेशन मागविणेस मा. व्यवस्थापन समितीचे ०८.०२.२००९ रोजीचे सभेत मान्यता देणेत आलेली आहे.

त्यानूसार मुंबई ते शिर्डी मार्गावर खालील प्रमाणे मंडप व्यवस्था करणेकामी अशा प्रकारचे काम करणारे मंडप ठेकेदारांकडून कोटेशन मागविण्यात आले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

कापडी / शामियाना मंडप उभारणीचा तपशिल :- छताकरीता प्लास्टीक ताडपत्री व त्याखाली सुशोभित जाड कापड बांधून कापडी मंडप कनात व बिछायतीसह उभारणी करणे, तसेच सदर मंडपाकरीता ७.५ के. व्हि. जनरेटरसह, डिझेल व विद्युत व्यवस्थेसह तयार करुन देणे.

०१. मुंबई ते घोटी मार्गावर कापडी मंडप (कालावधी दि. २४/०३/२००९ ते दि. २८/०३/२००९ अखेर ०५ दिवस) एकुण ३१,६००.०० चौ. फुट मडप.

०२. सिन्नर ते वावी मार्गावर शामियाना मंडप (कालावधी दि. २८/०३/२००९ ते दि. ०१/०४/२००९ अखेर ०५ दिवस) एकुण ७६,६५१.०० चौ. फुट मंडप.

०३. पाथरे ते शिर्डी मार्गावर शामियाना मंडप (कालावधी दि. २८/०३/२००९ ते दि. ०१/०४/२००९ अखेर०५ दिवस) एकुण ३५,६५३.०० चौ. फुट मडप.

वरिल प्रमाणे मंडप व्यवस्था करणेकामी अशा प्रकारचे काम करणारे खालील मंडपधारक यांचेकडून कोटेशन / दरपत्रक मागविण्यात आले आहे.

०१. कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर ०२. झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी

०३. सावता मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, राहाता
०४. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर
०५. बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर
०६. शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी
०७. साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव ता. श्रीरामपूर
०८. कल्यानी टेन्ट हाऊस, मु. पो. नांदुर, ता. राहाता
०९. लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर
१०. जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी
११. शेटे डेकोरेटर्स, शहापूर
१२. अनिल टेन्ट हाऊस व मंडप, राहाता
१३. शर्मा मंडप डेकोरेटर्स, वैजापूर
१४. बालाजी मंडप, मनमाड

वरिल प्रमाणे अशा प्रकारचे मंडपाचे काम करणारे एकुण १४ ठेकेदार यांचेकडून मुंबई ते शिर्डी मार्गावर पालखी मंडप उभारणेसाठी कोटेशन / दरपत्रक मागविण्यात आलेले असून प्राप्त झालेले सिलबंद कोटेशन / दरपत्रक आजचे सभेसमोर उघडून त्यावर निर्णय होणे बाबतचा विषय मा. कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

त्यानूसार प्राप्त झालेले कोटेशन आजचे सभेपुढे उघडण्यात आले असून निवीदा सादरकर्त्यांशी केलेले चर्चा -तथा वाटाघाटी अंती त्यानी खालील परिशिष्टात दर्शविले प्रमाणे दर देऊ केले आहे.

| अ. नं. | कोटेशन सादरकर्त्यांचे नांव | मंडप उभारणी तपशिल | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुंबई ते घोटी मार्गावर कापडी मंडप (कालावधी दि. २४/०३/२००९ ते दि. २८/०३/२००९ अखेर ०५ दिवस) एकुण ३१,६००.०० चौ. फुट मडप. | | सिन्नर ते वावी मार्गावर शामियाना मंडप ( कालावधी दि. २८/०३/२००९ ते दि. ०१/०४/२००९ अखेर ०५ दिवस) एकुण ७६,६५१.०० चौ. फुट मंडप | | पाथरे ते शिर्डी मार्गावर शामियाना मंडप (कालावधी दि. २८/०३/२००९ ते दि. ०१/०४/२००९ अखेर०५ दिवस) एकुण ३५,६५३.०० चौ. फुट मडप. | |
| | | कोटेशन मधिल दर | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर | कोटेशन मधिल दर | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर | कोटेशन मधिल दर | चर्चा वाटाघाटी नंतरचे दर |
| ०१ | कैलास मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, अहमदनगर | १.५० | -- | १.०० | -- | १.०० | -- |
| ०२ | झुराळे टेन्ट मंडप डेकोरेटर्स, निमगांव खैरी | २.५५ | -- | १.३० | ०.६८ | १.१५ | ०.६८ |
| ०३ | सावता मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, राहाता | २.४५ | १.६० | १.३५ | ०.७० | १.२० | ०.६० |
| ०४ | रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेशन, संक्रापूर | २.६५ | २.०० | १.२० | ०.६० | १.२५ | ०.५५ |
| ०५ | शर्मा मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, वैजापूर | १०.०० | ६.०० | -- | -- | -- | -- |
| ०६ | बाबला टेन्ट हाऊस, श्रीरामपूर | ३.०० | २.८० | १.६० | १.२५ | १.४० | १.१० |
| ०७ | जगदंबा मंडप डेकोरेटर्स, वावी | २.५० | -- | १.२५ | -- | १.१० | -- |
| ०८ | लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर | ४.०० | ४.०० | ०.९० | ०.५५ | ०.९० | ०.५५ |
| ०९ | शेटे डेकोरेटर्स, शहापूर | १.४८ | १.४५ | -- | -- | -- | -- |
| १० | अनिल टेन्ट हाऊस व मंडप, राहाता | ३.५० | -- | १.१० | १.०० | १.०० | ०.९० |
| ११ | साईकृपा टेन्ट हाऊस, बेलापूरगांव | ३.०० | ४.०० | १.०० | ०.६० | १.०० | ०.६० |
| १२ | कल्यानी टेन्ट हाऊस, मु. पो. नांदुर | ५.०० | ४.०० | १.१० | ०.६० | १.१० | ०.६० |
| १३ | शुभम टेन्ट हाऊस, निमगांव खैरी | ६.०० | ४.०० | १.७० | १.०० | १.६० | १.०० |
| १४ | बालाजी मंडप डेकोरेटर्स, मनमाड | ३.०० | २.०० | २.५० | १.२५ | २.०० | १.२५ |

निवीदा सादरकर्त्यांनी देऊ केलेले दरामध्ये खालील मंडप ठेकेदार यांचे निम्नतम स्वरुपाचे दर आहे.

०१. मुंबई ते शिर्डी मार्गावर एकुण ३१,६००.०० चौ. फुट कापडी मंडप व्यवस्थेसाठी मे. शेटे डेकोरेटर्स, शहापूर यांचे रु. १.४५ प्रति दिवस प्रति चौ. फुट दर.

०२. सिन्नर ते वावी मार्गावर एकुण ७६,६५१.०० चौ. फुट शामियाना मंडप व्यवस्थेसाठी मे. लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर यांचे रु. ०.५५ प्रति दिवस प्रति चौ. फुट दर

०३. पाथरे ते शिर्डी मार्गावर एकुण ३५,६५३.०० चौ. फुट शामियाना मंडप व्यवस्थेसाठी मे. रोशनी मंडप ॲण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांचे रु. ०.५५ प्रति दिवस प्रति चौ. फुट दर

वरिल प्रमाणे अ. नं. ०१ ते ०३ चे निवीदाधारकांनी निम्नतम स्वरुपाचे दर देऊ केले होते. यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, मुंबई ते शिर्डी मार्गावर श्रीरामनवमी उत्सवा निमीत्ताने पायी पालखी घेऊन येणारे साईभक्त यांचे सोयीसाठी कापडी / शामियाना मंडप व्यवस्था अनुक्रमे. शेटे डेकोरेटर्स, शहापूर, लोकप्रिय डेकोरेटर्स, संक्रापूर व रोशनी मंडप अॅण्ड लाईट डेकोरेटर्स, संक्रापूर यांचेकडून करुन घेण्यात यावी व याकामी येणारे सर्वसमावेशक खर्चासही मान्यता देण्यात आली तसेच साईभक्तांचे सोयीसाठी याव्यतिरीक्त आवश्यकता भासल्यास मडपाचा कालावधी वाढविणेस तसेच जादा मंडप, पार्टीशन करुन घेण्यात यावे. व याकामी येणारे खर्चासही मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४६** **शैक्षणिक संकुलाकरीता क्रिडांगण तयार करणेकामी क्रिडांगणावर लालमाती टाकणे व क्रिडांगणाची साईज वाढविणे बाबत**

**निर्णय क्र.३१४** शैक्षणीक संकुलाकरीता संस्थानचे स.नं. १०७, १०९/१,२ मध्ये क्रिडांगण तयार करणेचे रुपये ७,८५,०२२.०० रकमेचे काम ठेकेदार श्री. मिलींद पाचोरकर, काकासाहेब नगर निफाड यांना देणेत आले आहे. ठेकेदार यांनी निविदेनुसार काम पूर्ण केले आहे. निविदेनुसार खो-खो ग्राउंड, बॉस्केटबॉल ग्राउंड, व्हॉलीबॉल ग्राउंड, कबड्डी ग्राउंड इ. ठिकाणी लालमाती टाकणेत आलेली आहे.

दि. १६/०१/२००९ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., मा. प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य, शैक्षणिक संकुल व क्रिडा शिक्षक यांनी क्रिडांगणाची पाहणी केली असता क्रिडाशिक्षक यांनी मैदानावर खो-खो ग्राउंड, बॉस्केट बॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी ग्राउंड इ. ठिकाणी लालमाती टाकलेली आहे. त्याचप्रमाणे उर्वरीत सर्व ग्राउंडवर ही लालमाती टाकून मिळावे म्हणजे पावसाळ्यात चिखल होणार नाही. तसेच उत्तरेकडील काही झुडपे काढून टाकून मैदान वाढवून मिळावे अशी मागणी केली आहे . त्यानुसार मैदानावर लालमाती टाकणे व मैदान उत्तर बाजूस ८५ मी x७ मी. साईजने वाढविणेकरीता मुरुम, पोयटा व लालमाती टाकणेकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **अ)** मंजुर निविदा रक्कम | | - | ७,८५,०२२.०० |
| अपेक्षित खर्च | | - | ७,१०,०२२.०० |
| मंजुर निविदेपेक्षा कमी होणारा अंदाजे खर्च | | - | ७५,०००.०० (अ) |
| **ब)** वाढिव कामासाठी येणारा अंदाजे खर्च | | | |
| ०१. | मैदानावर (५३०७.६० चौ.मी. ) लालमाती टाकणे | - | ३,६७,१४०.०० |
| ०२. | मैदानाची साईज ८५ मी.x ७ मी. वाढविणे | - | १,६१,७१६.०० |
| | एकूण रुपये | - | ५,२८,८५६.०० (ब) |
| **वाढिव कामासाठी येणारा एकुण अंदाजे जादा खर्च (ब- अ)** | | **-** | **४,५३,८५६.००** |

सदरचे काम क्रिडांगणाचे काम करीत असलेले ठेकेदार श्री. मिलींद पाचोरकर, काकासाहेब नगर, ता. निफाड यांचेकडून त्यांचे मंजूर दरात करुन घेता येईल. याकामी मुळ मंजूर निविदा रक्कम रुपये ७,८५,०२२.०० पेक्षा अंदाजे रुपये ४,५३,८५६.०० मात्र जादा खर्च येणार आहे. तरी जादा येणारे अंदाजे रुपये ४,५३,८५६.०० मात्रचे खर्चास मंजुरी देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४७** **शिर्डी रेल्वे स्टेशन उद्‌घाटन समारंभ जाहिरात देणेबाबत.**

**निर्णय क्र.३१५** मा.अध्यक्ष महोदय यांनी दिनांक २७.०२.२००९ रोजी सकाळी ११.३० वा.दूरध्वनीवरुन "दिनांक २८.०२.२००९ रोजी शिर्डी रेल्वे स्टेशनचा व शिर्डी-मुंबई थेट रेल्वे सेवेचा शुभारंभ होत आहे. या कार्यक्रमाची सर्व वर्तमानपत्रामध्ये अर्धे पानाची रंगीत साईभक्तांची इच्छा पूर्ती-वजा-निमंत्रण जाहिरात देणेबाबतची कार्यवाही करावी." असे निर्देश दिलेले होते.

मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार व साईभक्तांची यामुळे होणारी सोय-तसेच भक्तांची शिर्डीला थेट रेल्वे सुविधा असेणबाबतची असलेली मनोकामना पूर्ण होणार असल्यामुळे या कार्यक्रमाची जाहिरात एक विशेष बाब म्हणून सर्व स्थानिक वृत्तपत्रात देणेस व याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास कार्योतर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४८** **मा.विश्वस्तांचे सुचनेबाबत.**

**निर्णय क्र.३१६** मा.विश्वस्तांनी सभेत खालीलप्रमाणे सुचना मांडल्या त्या मान्य करण्यात आल्या-

०१. संस्थानचे मारुती मंदिराशेजारी असलेल्या १६ गुंठे जागेवर संस्थानचे कार्यक्रमाव्यतिरिक्त कोणत्याही खाजगी कार्यक्रमास परवानगी देण्यात येऊ नये. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

०२. श्रीसाईबाबा हॉस्पिटलकडील वैद्यकीय प्रशासक डॉ.संजय पटवर्धन यांची सेवेची संस्थानला आवश्यकता नसल्याने त्यांचेबाबत चौकशी अहवाल सादर करावा व त्यानंतर निर्णय घेण्यात येईल. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०३. संस्थान मार्फत डी.एन.बी., नर्सिंग, सी.पी.एस. कोर्सेस सुरु करणेबाबत कन्सल्टंन्सीमार्फत सविस्तर प्रस्ताव तयार करुन व्यवस्थापन समितीचे सभेपूढे सादर करावा. त्यासाठी योग्य त्या प्राथमिक खर्चास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

०४. संस्थानतर्फे साईभक्तांना पेरुबर्फी उपलब्ध करुन देण्याचे ठरले आहे. सदर पेरु बर्फी तयार करणेकामी आवश्यक ती मशिनरी खरेदीकामी कोटेशन्स मागविण्यात यावेत. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

०५. सध्या प्रसादालयात प्रसादभोजनासाठी प्रती ताटास अंदाजे रुपये १४ ते १५ इतका खर्च येत असून पैकी रुपये ६ ते ७ खर्च कर्मचारी,मजूरी,वीज,पाणी इ.करिता येतो व उर्वरित कीराणा,भाजीपाला, गॅस इत्यादीवर खर्च होतो याकरिता सध्याचे प्रसादभोजनाचे दरात वाढ करुन प्रौढास रु ५/- ऐवजी रु.६/- व १० वर्षाखालील मुलास रु.२/- ऐवजी ३/- या दराने आकारणी करण्यात यावी. सदर आदेशाची कार्यवाही दिनांक १.०४.२००९ पासून करण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

०६. संस्थान आस्थापनेवर अपंगांना ३% आरक्षण ठेवणे बंधनकारक आहे किंवा कसे याबाबत शासनाचा अभिप्राय घेण्यात यावा. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

०७. नवीन प्रसादालयात प्रसाद भोजन घेणेस व प्रसादभोजन घेऊन आलेल्या भक्तांना उतरणेकामी जातांना रस्ता ओलांडणे, उन्हा-पावसापासून संरक्षण व्हावे तसेच लहान मुले व वृद्ध साईभक्तांना चालण्याच्या त्रास कमी व्हावा यादृष्टीने साईप्रसाद नं.०२ समोर कायमस्वरुपी बस स्टॉप उभारण्यात यावा. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

वरील निर्णय क्र ७३ ते ३१६ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

(किशोर रा.मोरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

(जयंत मुरलीधर ससाणे )
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)